**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी.** : राज्यातील रिक्षा चालकांसाठी रिक्षा कल्याणकारी मंडळ स्थापन करणे

**मु.शी.** : राज्यातील रिक्षा चालकांसाठी रिक्षा कल्याणकारी मंडळ स्थापन करणे यासंबंधी श्री मोहन जोशी ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील रिक्षा चालकांसाठी रिक्षा कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबतचे आश्वासन अद्याप पूर्ण झाले नसणे, तसेच आश्वासनाप्रमाणे तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात ॲटो रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी सामाजिक सुरक्षा व कल्याणनिधी योजना राबविण्याबाबत पुढे काहीही कार्यवाही झालेली नसणे, सदरहू योजना कामगार विभागामार्फत ॲटोरिक्षा, टॅक्सी, व्हॅन, टेम्पो, लॉरीज व बसेस चालविणाऱ्या चालकांसाठी लागू करण्याची होत असलेली मागणी, योजनेत नोंदणीकृत चालकांना वैयक्तिक अपघात मदत, निवृत्ती योजना, अंत्यसंस्कारासाठी मदत व लग्न कार्यासाठी मदत अशा लाभांचा समावेश करण्याची आवश्यकता, यासाठी अधिभार वसूल करण्याकरिता मुंबई मोटार वाहन कर कायद्यात योग्य ती सुधारणा करणे व कल्याणकारी मंडळ स्थापन करणे याबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष परिणामी राज्यातील सर्व रिक्षा व टॅक्सी चालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, राज्यातील रिक्षा चालकांचा हा प्रश्न आहे. या संबंधात मी नागपूर अधिवेशनामध्ये देखील लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी मला शासनातर्फे या प्रश्नासंबंधी लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे उत्तर दिले होते. परिहवन आणि कामगार विभाग यांच्या अंतर्गत लाथाळीमुळे राज्यातील सर्व रिक्षा चालकांवर अन्याय होत आहे. पुरोगामी महाराष्ट्राला हे शोभेसे नाही. सभापती महोदय, आपण सर्वांना न्याय देण्याची भूमिका घेता. आज राज्यात 6 लाखाच्या आसपास रिक्षा चालक आहेत. त्यांना तीन हजार रूपये विमा टीपीएकडे भरावा लागत आहे. वर्षाकाठी 150 कोटी रूपये जमा होत असून हा सर्व निधी खाजगी कंपनीच्या खिशात जात आहे. मी गेल्या चार वर्षातील माहिती घेतली असता आता पर्यंत खाजगी विमा कंपनीने 150 कोटी रूपयांपैकी 2 ते 3 टक्के एवढीच रक्कम विमेदारांना दिलेली आहे म्हणजे जवळ जवळ 140 कोटी रूपये त्या कंपनीच्या खिशात जात आहेत. खाजगी कंपनीचे भले करण्यासाठी 150 कोटी रूपये टीपीएकडे जात आहेत. सदर रक्कम शासनाने आपल्या कंपनीमध्ये जमा करावी. शासनाला एक नव्या पैशाची तोशीस नाही. रिक्षा चालकांच्या पैशातूनच आपण कल्याणकारी मंडळ स्थापन करावे. या मंडळामार्फत रिक्षा चालकांना निवृत्त वेतनासाठी, घरातील लग्न कार्यासाठी पैसे उपलब्ध करून द्यावेत. माझे असे म्हणणे आहे की, या मंडळा मार्फत त्यांना सामाजिक गोष्टी उपलब्ध करून द्याव्यात. त्यांच्या पैशातूनच आपल्याला बोर्ड करावयाचे आहे. यासंबंधात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक झाली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तत्कालीन विभागीय आयुक्त श्री.नितीन करीर यांनी तीन वर्षा पूर्वी शासनाकडे यासंबंधातील प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, घरेलू कामगारांसाठी आणि बांधकाम कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन केले. त्याच धर्तीवर रिक्षा चालकांसाठी दिनांक 1 ऑगस्ट 2013 पर्यंत स्वतंत्र कल्याणकारी मंडळ शासन स्थापन करणार आहे काय ? बांधकामावर आपण सेस आकारला आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांसाठी 1500 कोटी रूपये जमा झाल्याचे आपल्याला माहीत आहे. रिक्षा चालकांचा निधी टीपीएकडे जमा होत आहे. मोटार कायद्यातील कलम 146 (3) नुसार स्पेशल पर्पज बोर्ड किंवा कंपनी शासन स्थापन करून शासन रिक्षा चालकांना न्याय देणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जेथे असंघटित कामगार आहेत त्यांच्यासाठी बोर्ड निर्माण करण्याचा कामगार विभागाचा धोरणात्मक निर्णय आहे. केंद्र शासनाने सुद्धा असंघटित कामगारांसाठी कायदा केला असून त्याची अंमलबजावणी तीन महिन्यात करण्यात येईल असे मी विधान सभेच्या सभागृहात सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी 2-3 सूचना केल्या आहेत. आमच्या पुढे तीन पर्याय आहेत. रिक्षा चालक, टॅक्सी चालक, व्हॅन, टेम्पो, लॉरी, बस चालक आहेत त्यांचे मंडळ निर्माण करण्यासाठी आमच्या पुढे तीन पर्याय आहेत. पहिल्या पर्यायाचा उल्लेख त्यांनी केला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

सभापती महोदय, तामिळनाडू मध्ये 1982 साली असाच एक कायदा मंजूर केला. त्यामध्ये रिक्षा चालक आणि टॅक्सी चालक या दोघांचा समावेश केला. तसेच 2006 मध्ये त्यांनी कल्याण बोर्ड स्थापन केले. ते ड्रायव्हरच्या पगारातून 3 टक्के लेव्ही कापून घेतात आणि बोर्डाकडे जमा करतात. तसेच प्रवासी व माल वाहतूक कर आहे, त्यातून शासन 1 टक्का कापून घेऊन शासन बोर्डाकडे वर्ग करते आणि बोर्डाकडे जमा झालेल्या पैशातून सगळया कल्याणकारी योजना मग अंत्यसंस्कार असतील, अचानक कोणाचा मृत्यू झाला असेल किंवा पेन्शन द्यावयाचे असेल किंवा औषधोपचार असतील तसेच मुलांना स्कॉलरशीप द्यावयाची असेल अशा अनेक योजना राबवितात. 2006 पासून हे बोर्ड तामिळनाडू मध्ये अस्तित्वात आहे.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा उल्लेख केला आहे की, थर्ड पार्टी इन्शुरन्ससाठी रिक्षा किंवा टॅक्सी खरेदी करतो, तेव्हा इन्शुरन्स कंपनीकडे आपण रक्कम भरतो. त्यांनी सांगितले ते खरे आहे की, कामगार विभागाने 1997 ते 2007 पर्यंतची सर्व माहिती जमा केलेली आहे. त्या बाबतीत मी एकाच कंपनीचे उदाहरण सांगतो. त्यांनी 8225 पॉलिसी केल्या आणि 1.25 कोटी रुपयांचाच प्रिमिअम त्यांनी क्लेम केला आणि 4.75 कोटीचा त्यांना फायदा झाला म्हणजे यामध्ये त्यांना 97 टक्के फायदा होत आहे. तसेच एस.टी.महामंडळ सुध्दा तेच करीत आहे. ते आपल्या बसेसचे थर्ड-पार्टी इन्शुरन्स जमा करतात. जे अपघात होतात, त्याचे सेटलमेंट करतात आणि बाकीचे पैसे ते आपल्या इतर कामांसाठी वापरतात. रिक्षा व टॅक्सी चालकांचा एक पर्याय एस.टी.कामगारांचा दुसरा पर्याय आणि केंद्र शासनाचा असंघटित कामगारांसाठी असलेला कायद्याचा पर्याय असे तीन पर्याय आहेत. सन्माननीय सदस्यांनी 1 ऑगस्ट पूर्वी निर्णय घ्यावा असे म्हटलेले आहे. पण याबाबत मला ताबडतोब सांगता येणार नाही. माननीय मुख्यमंत्री हेच परिवहन मंत्री असल्याने परिवहन विभाग, कामगार विभाग आणि वित्त विभाग एकत्र बसून लवकरात लवकर निर्णय घेऊ.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, परिवहन विभाग आणि कामगार विभाग यांच्या बाबतीत गेल्या चार वर्षापासून हा विषय चर्चिला जात आहे.

**उप सभापती** : याबाबत एकत्रित बैठक घेऊन पुढील अधिवेशनापूर्वी निर्णय घेण्यात यावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पुढील अधिवेशनापूर्वी माननीय मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन बैठक घेतली जाईल व याबाबत बोर्डाचा एक फॉरमॅट तयार करुन पुढील अधिवेशनात



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

मांडण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**उप सभापती** : ठीक आहे.

----

. . . .बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नगरपरिषदेमध्ये कार्यरत असलेल्या मेहतर समाजाची घरे अद्यापही त्यांच्या नावावर न होणे.

**मु.शी.** : पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नगरपरिषदेमध्ये कार्यरत असलेल्या मेहतर समाजाची घरे अद्यापही त्यांच्या नावावर न होणे यासंबंधी सर्वश्री.दीपकराव साळुंखे, हेमंत टकले, अनिल भोसले, किरण पावसकर,प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे,जयवंतराव जाधव,सुभाष चव्हाण वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सावर्जनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"पंढरपूर (जि.सोलापूर) येथील नगरपरिषदेकडे मंजूर असलेल्या एकूण 363 पदांमध्ये मेहतर समाजाचे 112 कर्मचारी कार्यरत असणे, हे कर्मचारी सध्या संत पेठ भागातील गुजराती कॉलनी व 197 ब रामबाग येथे रहात असून, राज्य शासनाच्या दिनांक 19 ऑगस्ट 1947 च्या परिपत्रकास अनुसरुन ज्या सफाई कर्मचाऱ्यांची सेवा 35 वर्षे व त्याहून अधिक झाली आहे अशा कामगारांना ती रहात असलेली घरे त्यांच्या नावे करणेबाबत पंढरपूर नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक 74 व्दारे दिनांक 5 जुलै 2012 रोजी मान्यता दिलेली असणे, याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभाग, मंत्रालय, आणि आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्याकडे दिनांक 20 नोव्हेंबर 2012 पासून प्रलंबित असणे, अद्याप सदर घरे तेथील मेहतर समाजाच्या कर्मचाऱ्यांच्या नावावर झालेली नसणे, यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .बी-4



**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

. . . .बी-5

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही



श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. पंढरपूर नगरपालिकेमध्ये 1889 मध्ये पंढरपूर शहरातील आणि आसपासच्या शहरातील

मैला उचलण्याचे काम करण्यासाठी पूर्वी गुजरात मधून मेहतर समाज येथे आला. त्यांना अशी कामे करण्यासाठी पंढरपूर येथे आणले. पंढरपूर नगरपालिकेने त्यावेळी एस.टी.स्टॅण्डच्या समोरच्या चाळीमध्ये त्यांना रहावयास तात्पुरता निवारा दिला. या मेहतर समाजाने गेल्या 150 वर्षांपासून पंढरपूर सारख्या शहरामध्ये टोपली संडास असताना डोक्यावरुन मैला उचलण्याचे काम केले. त्यावेळचे पंढरपूरचे आमदार कै.भाई राऊळ यांच्या प्रयत्नाने या समाजासाठी काही घरे बांधली. परंतु त्यांना ती घरे कायम स्वरुपी न देता भाडे तत्वावर देण्यात आली. या समाजाने अनेक वेळा घरांच्या बाबतीत मागणी केली. शासनाच्या 1985,1987,1989 मधील परिपत्रकानुसार महिला सफाई कामगार रहात असलेले निवासस्थान मालकी हक्काने ताब्यात देण्याचे आदेश झाले. त्या आदेशाच्या अधीन राहून पंढरपूर नगरपालिकेने सर्वसाधारण सभे मध्ये ठराव करुन सुध्दा आजपर्यंत देखील मेहतर समाजातील लोकांना घरे दिलेली नाहीत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, त्यांना सदरहू घरे तातडीने देणार आहात काय ?

त्याचबरोबर 1890 च्या प्लेगच्या मोठ्या साथीमध्ये एका धर्मशाळेच्या मैलाच्या टाकीत पडून 2 मुलांचा मृत्यू झाला होता.

यानंतर श्री.अ.शिगम .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे....

महाराष्ट्र शासनाने 1993 मध्ये मानवी मैला उचलण्यास प्रतिबंध करणारा कायदा केला. पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या वर्षातून तीन वाऱ्या होतात. पंढरपूर येथे वाकऱ्यांच्या वाऱ्या झाल्यानंतर तेथे 15 दिवस कोणी येऊ शकत नाही इतकी तेथे दुर्गंधी असते. त्या ठिकाणचा मैला उचलण्याचे काम मेहतर समाजातील लोक करीत असतात. माझे प्रश्न आहेत की, मेहतर समाजातील कर्मचारी शासकीय निवासस्थानामध्ये राहत आहेत ती त्यांच्या मालकीची करण्यात येतील काय, 25 वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशाप्रमाणे मोफत घरे बांधून देण्यात येतील काय, त्यांना शैक्षणिक अर्हतेनुसार पदोन्नती देण्यात येईल काय, त्यांना कालबध्द पदोन्नती देण्यात येईल काय, त्यांच्याकडून वारसा हक्क भरुन घेणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पंढरपूर नगरपरिषदेमध्ये मेहतर समाजाचे 112 कर्मचारी कार्यरत आहेत असे सांगितले. त्या कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने त्यांनी येथे काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या समाजातील कर्मचाऱ्यांची 25 वर्षे सेवा झालेली आहे त्यांना घरे देणार काय ? मी त्याबाबत सांगू इच्छितो की, यामध्ये दोन वेगवेगळ्या योजना आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, समाजकल्याण विभागाने 1987 साली जी.आर.काढला होता. त्या जी.आर.नुसार हे कर्मचारी घर मिळण्यासाठी पात्र होतात काय ? या कर्मचाऱ्यांना घरे मिळावीत म्हणून दिनांक 5 जुलै, 2012 रोजी नगरपरिषदेने ठराव केला आणि तो आमच्या विभागाकडे आणि आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालयास पाठविलेला आहे. या संदर्भात नमूद करु इच्छितो की, या जी.आर.प्रमाणे त्यांना घरे द्यावयाची झाल्यास त्यामध्ये एक मोठी तांत्रिक बाब आहे. सर्वच कर्मचाऱ्यांना ज्या सर्व्हीस क्वॉटर्स दिलेल्या आहेत त्या त्यांच्या नावावर कराव्यात अशाप्रकारचा तो जी.आर.आहे. म्हणून तो जी.आर.सर्वाथाने अडचणीचा ठरु शकतो. कारण हा प्रश्न एका विभागापुरता मर्यादित नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे की ज्या कर्मचाऱ्यांची सेवा 25 वर्षे झालेली आहे त्यांना घरे बांधून द्यावीत. त्याबाबत सांगू इच्छितो की, सन 2008 मध्ये शासनाने निर्णय घेतला आहे की, ज्या सफाई कामगारांची सेवा 25 वर्षे झालेली आहे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

किंवा जे सफाई कामगार सेवेत कायम स्वरुपी आहेत, किंवा ज्यांची सेवा 25 वर्षे झालेली असेल आणि ज्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना स्वत:च्या मालकीची घरे बांधून देण्याचे धोरण आहे. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना सरकारने अंमलात आणलेली आहे. या योजनेंतर्गत प्रस्ताव आल्यास आणि ते कर्मचारी पात्र ठरत असतील तर त्यांना घरे देण्यात येतील. या ठिकाणी 112 कर्मचारी असले तरी त्यातील 56 कर्मचारी हे सर्व्हीस क्वॉटर्समध्ये राहत आहेत म्हणून त्यांना घरे देण्यात येतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येईल काय असे विचारले. त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नती दिली तर त्यांना या नियमाचा आणि निर्णयाचा फायदा मिळेल काय याचा अभ्यास करावा लागेल.

सभापती महोदय, या नगरपालिकेला सहावा वेतन आयोग लागू आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. परंतु त्यांना वेतनवाढ देण्याचा किंवा वेतन आयोग लागू करण्याचा अधिकार हा पूर्णपणे नगरपालिकेचा आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पंढरपूर हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे श्रध्दास्थान आहे. सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी सांगितले की, पंढरपूरमध्ये वारीच्या निमित्ताने अनेक भाविक तेथे येतात. परंतु त्या ठिकाणी भाविकांच्या संख्येच्या प्रमाणात स्वच्छतागृहे असणे सध्या तरी शक्य दिसत नाही. त्यामुळे मोकळ्या जागांवर असा प्रकार घडतो. ती ठिकाणे चांगली रहावीत म्हणून तेथील साफसफाई करणारा हा छोटा आणि दुर्लक्षित समाज आहे. खरे म्हणजे त्यांना स्वत:ची हक्काची घरे नाहीत. तेव्हा या लोकांसाठी काही विशेष भत्ते व आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष तरतूद केली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एका ठिकाणी असा निर्णय घेतला तर इतर सर्व ठिकाणी तसा निर्णय घ्यावा लागेल. परंतु पंढरपूर सारखे ठिकाण जे महाराष्ट्राचे सर्वात मोठे देवस्थान आहे,

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

त्या ठिकाणची व्यवस्था आपल्याला चांगली करावयाची असेल तर नियमांना थोडासा अपवाद ठेवून या कामगारांना सवलती देण्याची आवश्यकता आहे. या कामगारांना निवास उपलब्ध करुन देण्यासाठी आणि चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या समाजावर अन्याय होत असेल तर मानवतेच्या दृष्टिकोनातून या समाजासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा शासन विचार करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाविक आल्यानंतर आणि तेथील यात्रा संपल्यानंतर त्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या साफसफाईच्या अनुषंगाने विचार करण्यात येईल काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत हे कामगार बसत असल्यामुळे त्यांना त्या योजनेत सामावून घेतले जाईल. तसेच या पलीकडे जाऊन एक खास बाब म्हणून त्यांचा विचार केला पाहिजे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ती बाब सुध्दा तपासून पाहण्यात येईल.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उल्हास नदीतून वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होण्यासाठी उद्‌चन केंद्र व जलशुध्दीकरण केंद्राची कामे पूर्ण करुनही केवळ जलसंपदा विभागामार्फत पाणी साठा आरक्षित न केल्यामुळे कल्याण-डोंबिवली महापालिका सदरहू प्रकल्प कार्यान्वित करण्यास असमर्थ ठरणे

**मु. शी.** : उल्हास नदीतून वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होण्यासाठी उद्‌चन केंद्र व जलशुध्दीकरण केंद्राची कामे पूर्ण करुनही केवळ जलसंपदा विभागामार्फत पाणी साठा आरक्षित न केल्यामुळे कल्याण-डोंबिवली महापालिका सदरहू प्रकल्प कार्यान्वित करण्यास असमर्थ ठरणे, या संबंधी श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत काही भागात जाणवत असलेली भीषण पाणी टंचाई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस वाढत्या लोकसंख्येसाठी लागणारे पाणी देणेबाबत मा.मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 16 नोव्हेंबर, 2005 रोजी झालेल्या बैठकीत तसेच, उच्चाधिकार समितीच्या दिनांक 31 ऑगस्ट, 2008 रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार नवी मुंबई महानगरपालिकेकरिता मोरबे धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारवी धरणातून या महानगरपालिकेस होत असलेले 140 दशलक्ष लीटर पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला उपलब्ध करुन देणेसाठी संबंधित विभागाने कार्यवाही करणे आवश्यक होते, त्याअनुषंगाने, महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुन:रुत्थान अभियान योजने अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना राबवून उल्हास नदीतून वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध होणेसाठी उद्‌चंन केंद्र व जलशुध्दीकरण केंद्राची कामे पूर्ण करुनही केवळ जलसंपदा विभागामार्फत पाणी साठा आरक्षित न केल्यामुळे ही महानगरपालिका सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यास असमर्थ ठरणे, परिणामी, महापालिका क्षेत्रातील

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवलीच्या गंभीर समस्येकडे आणि त्या भागातील लोकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आणि माननीय सभापती महोदयांचे धन्यवाद मानू इच्छितो.

महोदय, कल्याण-डोंबिवली हे मुंबईची डेव्हलपींग टाऊन आहे. सध्या या महापालिका क्षेत्राची लोकसंख्या 15 लाखांच्या आसपास आहे. सध्या या लोकसंख्येला 300 एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्षात केवळ 240 एमएलडी पाणी पुरवठा होतो. आपण दररोज बातम्या बघितल्या किंवा वर्तमानपत्र वाचले तर निदर्शनास येईल की, कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील जनता पाण्यासाठी रस्त्यावर उतरलेली आहे. कारण त्यांना पाण्याची समस्या प्रभावित करीत आहे.

महोदय, 2005 मध्ये हा मुद्दा शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आला होता. त्या वेळी शासनाने असा निर्णय घेतला की, नवी मुंबई येथील मोरबे धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्या भागातील पाण्याची आवश्यकता पूर्ण होईल आणि उल्हास नदीतून घेण्यात येणारे 140 एमएलडी पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला देण्यात येईल. तसेच उच्चाधिकार समिती गठीत करण्याचा सुध्दा निर्णय झाला. तत्कालीन जलसंपदा मंत्री व आताचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत झाली. त्या समितीच्या बैठका सुध्दा झाल्या. त्या बैठकांचे इतिवृत्त मी आपल्याला माहितीसाठी पाठवितो. उच्चाधिकार समितीचा निर्णय झाल्यानंतर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत 247 कोटी रुपये खर्च करुन सर्व इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले. त्या अंतर्गत ऐलिव्हेटेड सरफेस रिझरवॉयर, पाईप लाईन बांधली. हे सर्व काम झाल्यानंतर करारनामा करण्यास दिरंगाई केली जात आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्री नुकतेच कल्याण-डोंबिवली येथे येऊन गेले. त्या भागातील लोकप्रतिनिधी व शिष्टमंडळाची त्यांनी भेट घेतली. माननीय नगर विकास राज्यमंत्री हे सुध्दा संवेदनशील आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:15

श्री.संजय दत्त....

महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, सद्य:स्थितीत नवीन मुंबई महानगरपालिकेला बारवी धरणातील 100 एमएलडी पाणी दिले जात आहे. महोदय, त्या वेळी धोरणात्मक निर्णय झाला की, मोरबे धरण पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेला उल्हास नदीतील पाण्याची आश्यकता भासणार नाही. आता मोरबे धरण पूर्ण झाले असल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेला बारवी धरणातून 100 एमएलडी पाणी का दिले जाते ? दुसरी बाब गंभीर आहे. निवेदनात असेही नमूद आहे की, माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक झाली आणि त्यांनी पाण्याचे वाटप केले. या निमित्ताने माझा मूळ प्रश्न आहे की, उच्चाधिकार समितीने निर्णय घेतल्यानंतर उच्चाधिकार समितीच्या निर्णयाच्या विसंगत पाण्याचे वाटप करण्याबाबत पालकमंत्र्यांना कोणी अधिकार दिले ?

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ....

सभापती महोदय, या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे पाणी जलसंपदा विभागास परत करीत नाही. ते पाणी का परत करीत नाही या संदर्भात सुध्दा उत्तर अपेक्षित आहे. या बाबतीत त्वरित इरिगेशन खात्याला सूचना देऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे 140 एमएलडी पाण्याच्या बाबतीत जो हक्क आहे ते पाणी देण्याबाबत शासन त्वरित निर्णय घेणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे मला विशेष कौतुक करावयास पाहिजे. मी संपूर्ण अधिवेशनामध्ये पाहतो की, ते केवळ आपल्या मतदारसंघापुरता किंवा विशिष्ट भागापुरता प्रश्न उपस्थित करीत नाहीत तर चांगल्या प्रकारचे धोरणात्मक प्रश्न उपस्थित करुन तेथील लोकांना कसा न्याय मिळेल अशा पध्दतीने संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागाचे प्रश्न उपस्थित करतात, त्याबद्दल मला त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने पार्श्वभूमी सांगत असताना त्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले. पहिला प्रश्न त्यांनी जे 140 एमएलडी पाणी नवी मुंबईला देत होते त्यातील 100 एमएलडी किंवा 140 एमएलडी पाणी पुन्हा परत का घेतले जात नाही या संदर्भात उपस्थित केला. मला सांगितले पाहिजे की, सर्वांनीच नवी मुंबई महानगरपालिकेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. महानगरपालिका स्थापन झाल्याबरोबर स्वत:च्या मालकीचे मोरबे धरण म्हणून विकत घेऊन त्यांनी आपल्या शहराची पाण्याची व्यवस्था केलेली आहे. ती पाण्याची व्यवस्था होण्यापूर्वी त्यांना एमआयडीसीकडून 140 एमएलडी पाणी दिले जात होते. त्यांची स्वत:ची पाण्याची व्यवस्था झाल्यानंतर त्यांनी ते पाणी टप्प्याटप्प्याने कमी करावे म्हणजे एमआयडीसीकडून पाणी कमी घ्यावे आणि ते पाणी उर्वरित महानगरपालिकांना द्यावयाचे होते.

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हायपावर कमिटीचे अध्यक्ष या नात्याने तत्कालीन जलसंपदा मंत्री आणि राज्याचे विद्यमान उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये माझ्या माहितीप्रमाणे ते पाणी केवळ कल्याण-डोंबिवलीला द्यावे अशातील भाग नव्हता तर त्यातील काही पाणी मीरा-भाईंदरला सुध्दा द्यावे, काही पाणी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. भास्कर जाधव ....

उल्हासनगर महानगरपालिकेला द्यावे असा मूळ प्रस्ताव होता. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कल्याण-डोंबिवलीला पाणी कमी पडते ही गोष्ट खरी आहे. नवी मुंबई महापालिकेला त्या पाण्याची गरज नसताना त्यांनी ते पाणी अन्य महापालिकांना द्यावे याकरिता पुढाकार घेतला जाईल. नियम असा आहे की, ज्या महानगरपालिकेला पाणी नको असेल ते मूळ पाणी जलसंपदा विभागाकडे जाते आणि जलसंपदा विभागाकडून ते पाणी एमआयडीसीला मिळते. म्हणून जलसंपदा विभागाला तत्काळ या संदर्भात त्यांनी करार करावा अशा प्रकारची विनंती केली जाईल. तो करार देखील लवकरच करुन घेतला जाईल कारण तेथील नागरिकांना पाण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दोन प्रश्नांची उत्तरे मी दिलेली आहेत. त्यांनी तिसरा प्रश्न तेथील पालकमंत्र्यांना अधिकार कोणी दिला असा विचारलेला आहे. या प्रश्नाचे उत्तर देणे माझ्या आवाक्याच्या, माझ्या अधिकाराच्या पलीकडेचे आहे. मला या प्रश्नाचे उत्तर देणे अवघड आहे. पण सर्वसाधारणपणे जिल्ह्याचे जे कोणी पालकमंत्री असतात...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा मूळ मुद्दा असा होता की, हायपावर कमिटी ही हायेस्ट कमिटी आहे. त्या कमिटीने एकदा निर्णय घेतल्यानंतर जिल्ह्याजिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी जर त्याला ओव्हररुल करुन निर्णय घेतले तर मग शासनाचा निर्णय कसा अंमलात येणार ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी नवीन राज्यमंत्री आहे पण या ठिकाणी श्री. बाळासाहेब थोरात साहेब, श्री. शिवाजीराव मोघे साहेब, श्री. बबनराव पाचपुते साहेब असे ज्येष्ठ मंत्री उपस्थित आहेत. सर्वसाधारणपणे पालकमंत्री हे त्यांच्याकडे खाते जरी कोणतेही असले तरी त्या जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणपणे एखाद्या विषयाकरिता पुढाकार घेऊ शकतात, चर्चा करु शकतात, बैठक घेऊ शकतात. तेथील स्थानिक परिस्थिती बघून काय निर्णय असावेत या संदर्भातील निर्णय जरी संबंधित खाते घेत असले तरी पालकमंत्री त्या संदर्भात विचारविनिमय करु शकतात. आपला मूळ प्रश्न आहे की, बारवी धरणातील पाणी कल्याण-डोंबिवलीला मिळावे. नवी मुंबई महानगरपालिकेला विनंती करुन जलसंपदा विभागाने तत्काळ ठराव करावा आणि कल्याण-डोंबिवलीला पाणी द्यावे अशा प्रकारची कार्यवाही केली जाईल.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे. माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी काल आपल्या उत्तरामध्ये असे सांगितले की, मुंबईमध्ये लोकसंख्या निश्चितपणे वाढत आहे पण त्यातून जास्त म्हणजे 27 टक्क्याची ग्रोथ ठाणे, कल्याण-डोंबिवली या महानगरपालिकेमध्ये होत आहे. या महानगरपालिकांमध्ये 27 टक्क्यांची ग्रोथ होत आहे असे ज्यावेळी आपण म्हणतो त्यावेळी निश्चितपणे त्या मानाने त्यांना ज्या मूलभूत सुविधा पाहिजेत त्यामध्ये पाणीपुरवठा हा महत्वाचा विषय आहे आणि त्याची पूर्तता होणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे.....

सभापती महोदय, माझे 4 स्पेसिफिक प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या कल्याण (पूर्व) भागातील 'ड' प्रभागातील 6 दशलक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी कोरडी पडली असून, या परिसरात पाणी टंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, मोरबे धरण पूर्ण झाल्यावर नवी मुंबईला करण्यात येणारा 54 दशलक्ष लिटर पाणी पुरवठा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सन 2008 पासून सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय आणि त्याचे कारण काय आहे ? तिसरा प्रश्न असा आहे की, कल्याण (पूर्व) भागातील पाणी टंचाईच्या समस्येसंबंधी एमआयडीसीच्या कार्यालयावर दि.3.3.13 रोजी वा त्या सुमारास स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय ? चौथा प्रश्न असा आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण (पूर्व) भागातील विशेषत: चिंचपाडा परिसरात पाण्याचा व्यवस्थित पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या कल्याण (पूर्व) 'ड' प्रभागातील 6 दशलक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी कोरडी असल्याचा प्रश्न विचारलेला आहे. यासंबंधीची माहिती सध्या माझ्याजवळ उपलब्ध नाही. परंतु ती टाकी कोरडी पडली असेल तर ती टाकी कशी भरली जाईल यासंबंधीची काळजी घेण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी मोरबे धरण पूर्ण झाल्यावर नवी मुंबईला 54 दशलक्ष लिटर पाणी पुरवठा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस करण्याचा निर्णय घेतला होता. सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे सांगितले आहे. हा प्रस्ताव प्रलंबित असेल तर राज्य शासनाकडून त्याबाबत येत्या 15 दिवसात अंतिम निर्णय घेण्यात येईल. तसेच एमआयडीसीच्या कार्यालयावर लोकप्रतिनिधींनी मोर्चा काढला होता का असेही त्यांनी विचारलेले आहे. त्या मोर्चासंबंधी माझ्याजवळ माहिती नाही. कल्याण पूर्व भागातील चिंचपाडा परिसरातील पाण्याच्या व्यवस्थेसंबंधी त्यांनी शेवटचा प्रश्न विचारला होता. सभापती महोदय, आपणही त्या भागाचे

2....

श्री.भास्कर जाधव....

प्रतिनिधीत्व करीत आहात. आपण लक्षवेधीच्या उपप्रश्नांच्या शेवटच्या क्षणी मला निदेश द्याल असे वाटत आहे. त्यामुळे त्या परिसरात पाणी मिळण्यासाठी व तेथील पाण्याची नियोजन व्यवस्थितपणे करण्यासाठी हे अधिवेशन संपल्यानंतर आपल्या दालनात आपण जो दिवस सांगाल त्या दिवशी बैठक आयोजित करावी. त्या बैठकीला पाटबंधारे विभागाच्या, तेथील महानगरपालिकेच्या, नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलविले जाईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आणि मी स्वत: त्या बैठकीला उपस्थित राहीन. त्या बैठकीत आपण अंतिम स्वरुपाचा तोडगा काढू.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक मुद्दा मांडलेला आहे आणि त्याबाबत आमचेही वारंवार तेच म्हणणे आहे. शासनाने नुकतीच यशवंतराव चव्हाण यांची जन्म शताब्दी साजरी केलेली आहे. ते या राज्याचे द्रष्टे नेते होते. परंतु राज्यामध्ये पालक मंत्र्यांची नवीन सुभेदारी निर्माण झालेली आहे. ती थांबविली तर त्या त्या जिल्ह्यांना समान न्याय मिळेल. कारण अनेक पालक मंत्री हे आपापल्या मतदार संघापुरता विचार करतात. त्यामुळे शासनाने त्यांची सुभेदारी थांबविली तर न्याय्य पध्दतीने सर्वांना न्याय मिळेल. तसा विचार केला तर सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनाही न्याय मिळेल असा मला विश्वास वाटतो. मंत्री महोदयांना सुध्दा तसेच वाटत आहे. त्यामुळे पुढील आठ दिवसामध्ये हा प्रश्न मिटेल अशाप्रकारची शासनाने काळजी घ्यावी.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी महत्वाची लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. या राज्यात पाणी टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील प्रत्येक शहरी भागात पाणी टंचाई आहे. मंत्री महोदयांनी कालच कल्याण-डोंबिवली शहरातील लोकसंख्या वाढल्याचे सांगितले होते. या लोकसंख्येपेक्षा या महानगरपालिकेच्या हद्दीत बेकायदेशीर बांधकामांची संख्या त्याहून अधिक वाढत आहे. हे सत्य नाकारता येणार नाही. या अनधिकृत बांधकामांपैकी किती बांधकामाना पाणी पुरवठा चालू आहे, यापैकी किती बांधकामांना अधिकृतपणे मंजुरी मिळालेली आहे आणि किती इमारतींना ओ.सी.नसतानाही पाणी पुरवठा केला जात आहे याची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा असे मी म्हणणार नाही. मूळ प्रश्न हा 140 एमएलडी पाणी देण्यापुरता मर्यादित असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु खाजगीमध्ये मी त्यांना ही माहिती अवगत करीन.

श्री. जयप्रकाश छाजेड : माननीय उप सभापती महोदयांच्या दालनामध्ये जी बैठक होईल त्यामध्ये ती माहिती देण्यात यावी.

**उप सभापती** : ठीक आहे. कल्याण-डोंबिवली या भागातील सर्व सन्माननीय सदस्य, सन्माननीय विरोधीपक्षनेते तसेच या लक्षवेधी सूचनेवर ज्या सन्माननीय सदस्यांनी भाष्य केले त्या सर्वांना बैठकीसाठी बोलावण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : हा महत्वाचा प्रश्न आहे. बैठक केव्हा घेण्यात येईल ?

**उप सभापती** : पुढील आठवड्यामध्ये बैठक घेण्याचे ठरले आहे. ही बैठक माझ्या दालनामध्ये होईल आणि ती यशस्वी होईल.

श्री. दिवाकर रावते : सदरहू बैठकीस मला आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलवावे.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना त्या बैठकीस बोलावण्यात येईल असे मी सांगितले आहे. .

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पंढरपूरला जाणा-या संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : पंढरपूरला जाणा-या संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री विजयसिंह मोहिते-पाटील, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री सुभाष चव्हाण, दिपकराव साळुंखे, डॉख सुधीर तांबे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत व श्रध्दास्थान असलेले श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान पंढरपूर, जि.सोलापूर येथे दर वर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीस भरत असलेली यात्रा, यात्रेस साधारणपणे १० ते १५ लाख भाविकांचा सहभाग असणे सदर यात्रा सोहळ्यास वैष्णव पंथीय भाविक दिंड्यांसह येत असणे, श्री क्षेत्र आळंदी येथील ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आणि श्री क्षेत्र देहू येथील तुकाराम महाराज यांची पालखी या दोन्ही पालख्या अनुक्रमे आळंदी व देहू या ठिकाणाहून आळंदी-पुणे-सासवड-जेजुरी-निरा-लोणंद-फलटण-माळशिरस-वेळापूर-वाखरी मार्गे आणि देहू-पुणे-यवत-वरंवड-बारामती-इंदापूर-अकलुज-माळीनगर-महाळुंग-श्रीपूर-बोडले-वाखरी मार्गे पंढरपूरकडे जात असणे, सदर पालखी मार्गाने मोठया संख्येने चालणाऱ्या भाविकांना आणि त्यांच्यासमवेत असणारी वाहने व साधने यांना रस्ता फारच अरुंद पडत असल्याने होत असलेला अडथळा, त्यामुळे अपघाताच्या प्रमाणात होत असलेली वाढ, अनेक भाविकांचे दुदैवीरित्या झालेले मृत्यू, वारकरी सांप्रदाय, धर्मदाय न्यासाचे विश्वस्त व लोकप्रतिनिधी यांनी सन २००८-०९ पासून सदर पालखी मार्गाचे चौपदरीकरण करण्यात यावे अशी शासनाकडे सातत्याने केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे वारकरी साप्रंदायामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया."

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:30

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये पालखी रस्त्याचे खाजगीकरणातून चौपदरीकरण करणे शक्य नाही असे नमूद केलेले आहे. संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयाच्या प्रमुखांनी आणि लोकप्रतिनिधी म्हणून मी देखील पालखी रस्त्याच्या चौपदरीकरणाची मागणी केलेली आहे. इतकेच नाही तर माननीय मंत्री महोदय ह.भ.प.श्री.बबनराव पाचपुते यांनी आणि संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी पालखी रस्त्याच्या चौपदरीकरणाची मागणी केलेली आहे. या पालखी रस्त्याचे खाजगीकरणातून चौपदरीकरण करावे अशी आम्ही मागणी केलेली नाही. पंढरपूरला जाणारे भाविक असे असतात की त्यांची पायताण घेण्याची देखील परिस्थिती नसते. हा पालखी रस्ता खाजगीकरणातून केला तर पुन्हा टोल देण्याचा आणि तो कुणी द्यायचा असा प्रश्न निर्माण होईल. या पालखी रस्त्यावर दरवर्षी अपघात होत असतात. आपण आकडेवारी पाहिली तर असे दिसून येईल की, संत तुकाराम महाराज पालखी रस्त्यावर 10-15 अपघात होतात आणि 4-5 माणसे मृत्युमुखी पडतात. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रस्त्यावर देखील 300-400 अपघात होतात आणि 8-10 लोक मृत्युमुखी पडतात. एवढया मोठ्या प्रमाणावर या पालखी रस्त्यावर प्राणहानी होत असते. या पालखी रस्त्यांचे चौपदरीकरण करावे अशी अनेक वर्षापासूनची आमची मागणी आहे. या संदर्भात संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांनी देखील आश्वासन दिलेले होते. तेव्हा या पालखी रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी भूसंपादन करुन तीन वर्षाच्या आत हे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करावे अशा प्रकारचे आदेश आपण मंत्री महोदयांना द्यावेत अशी सभापती महोदय, मी आपणास विनंती करीत आहे.

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी दोन पालखी मार्गांचा उल्लेख केला. हे दोन पालखी मार्ग जवळपास 450 कि.मी.चे आहेत. निवेदनामध्ये या पालखी मार्गासंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग हा 230 कि.मी.चा आहे. त्यापैकी 52 कि.मी.चा मार्ग चौपदरी झालेला आहे, 135 कि.मी.मार्ग तीनपदरी झालेला आणि आणि उर्वरित 42 कि.मी.मार्ग दोनपदरी झालेला आहे.

संत तुकाराम महाराज पालखी मार्ग 227 कि.मी.चा आहे. त्यापैकी जवळपास 86 कि.मी. मार्ग चौपदरी झालेला आहे, 86कि.मी. मार्ग तीनपदरी आणि 75 कि.मी. मार्ग दोनपदरी झालेला आहे.

...नंतर श्री. भोगले..

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4..... श्री.रणजित कांबळे.....

तुकाराम महाराज पालखी मार्गावर 136 कि.मी.चे चौपदरीकरणाचे काम शिल्लक आहे. एवढ्या मोठ्या कामासाठी जवळपास 4500 कोटी रुपये इतकी रक्कम लागणार आहे. उर्वरित सेवा मार्ग बांधण्यासाठी 45 मीटरची जागा आवश्यक आहे. सध्या फक्त 24 मीटरची जागा शासनाच्या ताब्यात आहे. त्या ठिकाणी भूसंपादन करणे कठीण आहे. अनेक ठिकाणी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होईल तेथे भूसंपादन करण्याचा प्रयत्न केला आहे. शासनाने गरजेनुसार निश्चितपणे चौपदरीकरणाचे काम केले आहे. काही काम प्रगतीपथावर आहे. इतके मोठे काम तीन वर्षात करणे शक्य नाही. त्यामुळे गरज भासेल त्याप्रमाणे भूसंपादन करुन रस्त्याचे रुंदीकरण करीत आहोत.

श्री.विनोद तावडे : पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी हा विषय सभागृहात चर्चेला आला होता. वारीच्या मार्गावर पहिली अडचण म्हणजे सकाळी जेव्हा वारी निघते तेव्हा सोबत ट्रक निघतात, त्या ट्रकमधून बाहेर पडणारा धूर, वारी मार्गावर होणारे अपघात हे प्रश्न मुक्कामाच्या ठिकाणापासून उपस्थित होतात. वारीसोबतच्या वाहनांना बायपास देण्याविषयी 11 ठिकाणे आम्ही मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी स्पष्टपणे उत्तर दिले होते की, आळंदी ते पंढरपूर रस्त्यावर माऊलीच्या पालखी मार्गावर वळण रस्ते करण्याची गरज आहे. शासनाच्या रस्ते विकास योजना 2001 ते 2021 अंतर्गत रिंग रोड करण्याची तरतूद आहे. या 11 ठिकाणांची तपासणी करुन जागेची उपलब्धता विचारात घेऊन वळण रस्त्यांची व्यवस्था केली जाईल.

सभापती महोदय, रस्त्यांचे चौपदरीकरण करणे हा दुसरा टप्पा आहे. सकाळी मुक्कामाच्या ठिकाणाहून वारीला सुरुवात होते त्यावेळी एक ते दीड तास सोबत असणारे ट्रक, सामान हे टाळता आले तर 80 टक्के वारकरी आनंदीत होतील. भूसंपादन करणे सोपे नाही, कठीण आहे हे ठीक आहे. जी निकड आहे त्याबाबत शासनाने कोणता अभ्यास केला, कोणते नियोजन केले आहे? 11 ठिकाणांपैकी 3 ठिकाणी आता वळण रस्ते करु आणि उर्वरित 8 ठिकाणी नंतर वळण रस्ते करु असे धोरण ठरले आहे का? आम्ही हे जाणून घेण्यास उत्सुक आहोत. नाही तर स्पष्टपणे सांगावे की, करणार नाही. वारक-यांची काळजी घेण्यास पंढरपूरचा विठोबा समर्थ आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मागील वेळी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी 11 ठिकाणी गावांच्या जवळ बायपास करणे अत्यंत गरजेचे आहे असे सांगितले होते. त्याबाबत सर्व्हे करुन नियोजन करणार आहोत. मंत्री महोदयांनी हेही सांगितले होते की, रस्त्याबाबत 2001ते 2021 चा जो प्लॅन आहे, त्यात प्रत्येक मोठे शहर किंवा गावाच्या जवळ रिंग रोड असणे गरजेचे आहे. सर्व्हेप्रमाणे भूसंपादन करुन आम्ही काम करणार आहोत असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. तरतूद आहे असे सांगितले नव्हते.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदय चिठ्ठीच्या आधारे उत्तर देत आहेत. मी प्रोसिडिंगच्या आधारे प्रश्न विचारला आहे. मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते त्यातील भाग मी उद्धृत केला आहे. मान्य नसेल तर माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात येईपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवावा.

नंतर आय.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना चौपदरीकरणाच्या संदर्भातील आहे. त्यामुळे माझ्याकडे चौपदरीकरणाच्या संदर्भातीलच माहिती उपलब्ध आहे. यापूर्वी जेव्हा ही लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली होती त्यावेळी सुध्दा मी सभागृहात उपस्थित होतो. सन्माननीय सदस्य श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी चौपदरीकरणाच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला असल्यामुळे मी त्यासंदर्भातच माहिती देत आहे.

श्री. विनोद तावडे : पंढरपूरचा विठ्ठल हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे,विठ्ठलरुक्मिणी देवस्थान,कार्तिकी, आषाढी यात्रा असा उल्लेख या लक्षवेधी सूचनेमध्ये करण्यात आलेला आहे. आपल्या येथे त्याला वारी म्हणतात. माननीय मंत्रीमहोदयांकडे या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माहिती नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी अशी विनंती आहे. माननीय श्री. भुजबळ साहेब आल्यानंतर आपण ही लक्षवेधी सूचना पुन्हा घेऊ शकतो.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आपण जो उल्लेख केलेला आहे त्यामध्ये भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया करणे गरजेचे आहे.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय राज्यमंत्री महोदय उत्तर देत आहेत. गेल्या 7 वर्षात या ठिकाणी एक कि.मी.रस्त्याचे रुंदीकरण झ ालेले नाही. या रस्त्यावरील अनेक पुलांच्या रुंदीकरणाची आवश्यकता होती परंतु पुलांचे रुंदीकरण न झाल्यामुळे पुलांवर अनेक अपघात होऊन त्यात अनेक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. वारीच्या वेळेस वारकरी त्यांची वाहने रस्त्याच्या कडेला करतात व या उभ्या केलेल्या वाहनामुळे रस्त्यावरुन दुसरे वाहन जाऊ शकत नाही त्यामुळेही मोठया प्रमाणात अपघात होत असतात. या परिसरात 20-25 साखर कारखाने असल्यामुळे ऊसाची वाहतूक करणारी वाहने मोठया प्रमाणात या रस्त्यावरुन ये जा करीत असतात व त्यामुळे मोठया प्रमाणात अपघात होऊन गैरसोय होत असते. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी असे मी म्हणणार नाही. परंतु सन्माननीय राज्य मंत्री महोदयांनी अधिक सकारात्मक उत्तर द्यावे अशी अपेक्षा करतो.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या पूर्ण रस्त्याचे आपल्याला चौपदरीकरण करावयाचे आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या भूसंपादनासाठी 120 कोटी रुपये लागणार आहेत, तुकाराम महाराजांच्या पालखीच्या रस्त्याच्या 114 कोटी रुपये भूसंपादनासाठी लागणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. रणजित कांबळे....

आहेत. या ठिकाणी आपल्याला बायपास करावयाचे आहे, या ठिकाणचा रस्ता चौपदरी करावयाचा आहे तसेच काही रस्ता 3 लेनचा सुध्दा करावयाचा आहे. या सर्व कामासाठी भूसंपादन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे यासंदर्भातील भूसंपादनाचा प्रस्ताव कॅबिनेटपुढे नेणे अत्यंत गरजेचे असून हा प्रस्ताव आम्ही निश्चितपणे कॅबिनेटपुढे नेणार आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी दर वर्षी 3 ते 4 वेळा पंढरपूर येथे जात असते. विभागीय आयुक्त स्तरावर आढावा घेऊन त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, भूसंपादनाच्या कामामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. सोलापूर जिल्हयातील लोकांची सुध्दा भूसंपादनाबाबतचीच तक्रार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने न्याय पूर्व भूमिका घेणे गरजेचे आहे. माननीय उप सभापती महोदयांनी मांढरा देवीच्या यात्रेच्या अगोदर भेट दिली होती. पंढरपूरच्या आषाढी वारीच्या वेळेस रस्त्यांची कामे भराभर केली आहेत असे दाखवले जाते परंतु वारीच्या निमित्ताने पायी जाणाऱ्या लोकांना रस्त्यावरील दगड-धोंडयाचा त्रास होत असतो. भूसंपादनाच्या कामाच्या संदर्भात ज्या काही अडचणी असतील त्यासंदर्भात वारीच्या अगोदर एक महिना आढावा बैठक पंढरपूर येथे स्थानिक प्रतिनिधींच्या बरोबर घेतली जाणार आहे काय ? माननीय मुख्यमंत्री जेव्हा या विषयाच्या संदर्भात बैठक घेतात त्यावेळेला विभागीय आयुक्त स्तरावर माहिती दिली जाते परंतु विभागीय स्थ्तरावरील माहिती व स्थानिक स्तरावरील माहितीमध्ये प्रचंड तफावत असते. पंढरपूर नगरपालिकेचे जे प्रश्न आहेत त्यासंदर्भात अद्यापही मार्ग निघत नाहीत. त्यामुळे या आषाढी वारीच्या अगोदर बैठक घेऊन त्याची वस्तुस्थिती दिली जाईल काय ?

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, भूसंपादनासाठी किती पैसे लागतील याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी दिलेली आहे. चौपदरी रस्ता करण्याच्या संदर्भात पूर्वीच्या व आताच्याही मंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे. गेल्या 7-8 वर्षाच्या कालावधी मध्ये एकाही रस्त्यावर चार पदरी रस्त्याचे काम झालेले नाही. त्यामुळे भूसंपादन एक वर्षात करावे व 3 वर्षात सर्व रस्त्यांचे काम पूर्ण करावे अशी आमचे मागणी असून यासंदर्भात आपण डायरेक्शन्स द्यावे अशी विनंती करतो.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात व्यवस्थित चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये बहुतेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतलेला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

मी माननीय राज्यमंत्री महोदयांना दोन गोष्टी सांगू इच्छितो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम पंढरपूरचा पांडुरंग ही महाराष्ट्राची आराध्य दैवते आहेत. आषाढी कार्तिकेला लाखो वारकरी वारीला निघतात. ही प्रथा आज पासून नव्हे तर अनेक वर्षापासून सुरू आहे. मी आपल्याला मला आलेले अनुभव सांगत आहे. माननीय मंत्री हे त्या विभागाचे प्रमुख आहेत. आपण कितीही प्रयत्न केला तरी आपल्या हाताखाली काम करणारा अधिकारी वर्ग सक्षम आणि काम करण्याचा उत्साह असणारा लागतो. पीडब्ल्यूडीच्या बाबतीत ही उदासीनता पदोपदी आढळते. मग तो जिल्हा कुठलाही असो. आपल्या विभागाचे अधिकारी कार्यक्षम नाहीत असे मी म्हणणार नाही. मात्र, उच्चपदस्थ अधिकारी हे नक्कीच उदासीन आहेत. आपल्या विभागाचे सचिव श्री.मुखर्जी यांच्याकडे गेलेली कुठल्याही प्रोजेक्टची फाईल कधीही व्यवस्थित निकाली निघालेली नाही. पीडब्ल्यूडीच्या विकास कामामध्ये श्री.मुखर्जी हे मोठा अडथळा आहेत. मी मुद्दाम नाव घेऊन हे सांगत आहे. मला देखील या बाबत अनुभव आलेले आहेत. मी स्वत: सूचना दिल्या होत्या. त्या स्थानिक अधिकाऱ्यांनी पाळल्या नाहीत. पुणे विभागातील श्री.मळेकर या अधिकाऱ्यांना हायवे वरील एक चौक व्यवस्थित करायला सांगितला होता. ती जागा राज्य शासनाची आहे. तेथे अतिक्रमणे होत आहेत. गेले वर्षभर सांगून देखील त्या अधिकाऱ्याने काहीच केलेले नाही. यामध्ये बरेच मुद्दे निघतील. या राज्याच्या माजी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. त्यांचा पूर्वानुभव जमेस धरला पाहिजे. ते स्वत: सोलापूर जिल्ह्यातील आहेत. मला असे वाटते की, त्यांनी या लक्षवेधी सूचनेचा सांगोपांग विचार केला आहे. त्यांनी शासनाला विनंती केली आहे की, आपल्याला एका वर्षात काम करणे शक्य होत नसेल तर तीन वर्षात काम करावे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, श्री संत तुकाराम महाराज पालखी या दोन्ही पालखीच्या मार्गाच्या चौपदरी करणासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे. सदर चौपदरी करणाची कामे खाजगी कंत्राटदारा मार्फत हाती घेण्याबाबतची सूचना तपासण्यात आली. तथापि, येथे वाहतूक व वर्दळ कमी असल्यामुळे खाजगी कंत्राटदारा मार्फत प्रकल्प करणे सुसाध्य नसल्याचे आढळून आले आहे, असे आपण म्हटले आहे. आपणास हे काम सुसाध्य करावयाचे असेल तर ते काम पीडब्ल्यूडी मार्फत करण्यात यावे व त्याची पूर्तता येत्या तीन वर्षात करण्यात यावी, अशी मी आपणास सूचना करीत आहे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : होय.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, धन्यवाद.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आताच माननीय मंत्र्यांनी सांगितले की, 24 कि.मी.ची जागा उपलब्ध झालेली आहे. ती त्यांनी व्यवस्थित करून द्यावी. या मार्गावर निदान 40-40 कि.मी.अंतरावर महिलांसाठी स्वच्छतागृह-स्नानगृहे बांधण्याचे काम त्याच्या बरोबरीने किंवा आधी सुरू केले पाहिजे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, आपण निदेश दिल्यामुळे मी आपला मनापासून आभारी आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिल्याबद्दल त्यांना देखील मी धन्यवाद देतो.

..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलात नरभक्षक वाघाला मॅक्रोचिप न लावता सोडून देणे

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलात नरभक्षक वाघाला मॅक्रोचिप न लावता सोडून देणे यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभाद्वारे निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"तालुका व जिल्हा चंद्रपूर येथील आडेगांव व चोरगांव येथे दिनांक ११ एप्रिल, २०१३ रोजी वाघाने तेथील ग्रामस्थांवर केलेला हल्ला, या हल्ल्यात, आडेगांवाला सकाळी ७.०० वाजता ठार मारलेल्या सहाजणांचे पोस्टमार्टम होत असतांनाच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उपस्थित जनता, वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस खात्याचे अधिकारी यांच्यासमोर एका ७० वर्षाच्या महिलेला वाघाने ठार मारणे, दिनांक १२ एप्रिल, २०१३ रोजी चोरगांव येथे वाघाने सकाळी ८.०० वाजता १६ वर्षाच्या मुलीवर हल्ला करुन ठार मारणे, तसेच, तिच्या आईला जखमी करणे, पुन्हा १३ तारखेला सकाळी ८.०० ते ८.३० वाजता वाघ तिथे येणे, सादगड सावली येथे दिनांक २५ मार्च, २०१३ ला एका महिलेला वाघाने मारल्यानंतर त्या नरभक्षक वाघाला मॅक्रोचिप न लावता दुसऱ्या जंगलात नेऊन सोडणे, त्याच वाघाने आडेगांव व चोरगांव येथे हल्ला केल्याचा संशय निर्माण होणे, त्यामुळे जनतेत पसरलेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री.भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शासनाच्या लेखी उत्तराने हसावे की, रडावे हेच मला कळत नाही. यात म्हटले आहे की, "या परिसरात मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटना अधून-मधून घडत असतात". दिनांक 11 एप्रिल 2013 रोजी 2 घटना घडल्या आहेत, दिनांक 12 एप्रिल 2013 रोजी एक घटना घडली आहे आणि आज सकाळी 8.00 वाजता 10 वर्षाच्या मुलीला वाघाने सर्वांच्या समक्ष उचलून नेले. या छोट्या छोट्या घटना असतील व बडे बडे शहर में छोटे छोटे हादसे होते हैं अशारितीने याकडे आपण पाहत असाल तर ते चुकीचे आहे. आपण ग्रामीण भागातील आणि जंगलात राहणाऱ्या लोकांच्या जीवावर उठला असाल तर हे वाक्य आमच्या जखमेवर मीठ चोळल्या सारखे आहे. नरभक्षक वाघ एका जंगलातून दुसऱ्या जंगलात सोडताना त्याची सवय त्या जंगलात देखील तशीच राहणार आहे. असे वाघ आपण माइक्रोचिप लावून सोडले पाहिजेत अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये आहे. पण माइक्रोचिप न लावता आपण वाघ जंगलात सोडत आहात. लेखी उत्तरामध्ये माइक्रोचिपचा उल्लेख देखील करण्यात आलेला नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

सभापती महोदय, याठिकाणी जंगलामध्ये आजही वाघ फिरत आहे. त्याने 12 तारखेला 16 वर्षाच्या मुलीला मारले आणि तिच्या आईला जखमी केले. मी दुसऱ्या दिवशी 13 तारखेला गेल्यावर तो वाघ माझ्या समोरुन गेला. त्यानंतर मूल वरुन चंद्रपूर येथे जाताना आमच्या समोरुन पट्टेदार वाघ गेला. तेथील आडेगाव गावाच्या बाबतीत दिशाभूल करणारे उत्तर देण्यात आले आहे. याठिकाणी स्पष्टपणे म्हटले आहे की, जंगलामध्ये मोहाची फुले गोळा करण्यासाठी गेले असताना हमले झालेले आहेत. पण तसे नाही. मी ते ठिकाण पाहून आले आहे. आडेगावच्या रस्त्यावर वाघाने प्रथम एका माणसाला मारले. मग लोक तेथे धावत गेले. त्याठिकाणी फॉरेस्टचे लोक होते, पोलीस होते असे असताना दुसऱ्या बाईला त्या वाघाने सर्वांच्या समोर मारले आणि फॉरेस्टच्या लोकांसमोर उचलून नेले आणि चोरगावला सुध्दा स्वत:च्या शेतामध्ये मोहाची फुले गोळा करत असताना 16 वर्षांच्या मुलीला उचलून नेले आणि त्या मुलीची आई मदतीला धावली असता तिच्यावरही हल्ला केला. आज सकाळी चवळीच्या शेंगा गोळा करावयास गेली.

सभापती महोदय, अधिकाऱ्यांचे म्हणणे असते की, मोहाची फुले गोळा करताना माणसे वाकतात आणि मग वाघाला वाटते की, आपल्यापैकीच कुणीतरी आहे. पण तसे नाही. वाघाचे खाद्य म्हणूनच तुम्ही आमचा वापर करणार आहात काय? हा खरा प्रश्न आहे. तुमचे अधिकारी किती वाजता जातात? सकाळी 7.00 वाजता तेथे हमले झाले आणि गावातील लोक चिडले. संबंधित अधिकारी जेवून-खाऊन दुपारी 12.00 वाजता तेथे गेले. मग जर लोक असे म्हणाले की, आम्ही याला जाळून टाकतो तर याला रोश म्हणावयाचा की लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार म्हणावयाचे ? याठिकाणी जे लेखी उत्तर दिले आहे त्यामध्ये वाघाने लोकांना जंगलामध्ये मारले असे म्हटले आहे. पण प्रत्यक्षात त्यांना जंगलात नाहीतर रस्त्यावर मारले आहे, शेतात मारले आहे. आजही तो वाघ त्या भागात फिरत आहे.

सभापती महोदय, आज सकाळी 8.00 वाजता ज्या मुलीला मारले, तेथे जवळच तो वाघ लपून बसलेला होता. पण त्याला अजून फॉरेस्टच्या लोकांनी पकडलेला नाही. त्याठिकाणी दोन वाघ फिरत आहेत. मग याठिकाणी तुमचे बफर झोन, इको झोन तुम्ही करा. केवळ वाघांना वाचविण्यासाठी आपण जन्माला आला आहात काय आणि आम्ही मरायला आलो आहोत काय हा प्रश्न आहे. त्यामुळे याठिकाणी विशेषत्वाने मदत करण्याकरता आपण प्रयत्न करावा. पाथरी येथे एका बाईला वाघाने मारले म्हणून 25 हजार रुपये दिले जातात आणि बाकी ठिकाणी 10 हजार ...

. .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . .

रुपये देता. अशा प्रकारे फरक का केला जातो?

याठिकाणी असे लेखी उत्तर देण्यात आले की, आम्ही याठिकाणी वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक आदिवासात कृत्रिम पाणवठे तयार केलेले आहेत. पण आजही मी खात्रीने सांगते की, तेथील कोणत्याही पाणवठ्यात पाणी उपलब्ध नाही. म्हणून ते वाघ गावात येत आहेत आणि माणसांना मारत आहेत. तेथे तुम्ही रेंजर तरी ठेवले आहेत काय? मोहोलीचा रेंजर 70 कि.मी. अंतरावरुन चंद्रपूरचे काम पहातो. मूल येथे रेंजर नाही तर तेथील काम शिवणीचा रेंजर पहातो. मग बफरझोन कशासाठी करता ? तेथील 90 लोकांच्या पदोन्नतीची कागदपत्रे वर्षभर पडून आहेत आणि तुम्ही ती कागदपत्रे अजून क्लिअर केलेली नाहीत. जंगलाचे नुसते नाव घ्यावयाचे. परंतु, ते वाचवावयाचे नाही. माझे असे म्हणणे आहे की, जंगलातील पाणवठे भरले पाहिजेत. वाघाने ज्या लोकांना मारले, तेथील वाघाचा बंदोबस्त ताबडतोब केला पाहिजे. मायक्रोचीप लावून नंतरच वाघाला सोडले पाहिजे.

सभापती महोदय, तिसरी महत्वाची बाब म्हणजे शवविच्छेदन करण्याकरता किंवा प्राण्यांची तपासणी करण्याकरता तेथे पशु वैद्यकीय अधिकारी नाहीत. तेथे बफरझोन तयार केले आहेत. परंतु त्यादृष्टीने व्यवस्था केली नाही. त्यामुळे तेथे सर्व प्रकारची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. तशी ती करणार आहात काय हा प्रश्न आहे. शेवटचा प्रश्न म्हणजे गेले 9 महिने आम्ही मागे लागलो आहोत की, आमची बैठक घेऊन आम्हाला परिस्थिती समजावून सांगा किंवा आमचे म्हणणे ऐकून घ्या. नऊ महिने उलटून गेले परंतु आमच्या लोकांना रस्त्यावर बसविलेले आहे आणि हे मात्र थंडीत शेकोटीजवळ बसून आम्हाला सांगतात की, "असे छोटे-छोटे हादसे होत असतात." अशा पध्दतीने जर आमच्या जखमेवर मीठ चोळणार असाल तर तुम्हाला याचे प्रायश्चित वेगळ्या पध्दतीने भोगावे लागेल. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, त्या सर्व वाघांचा बंदोबस्त तुम्ही दोन दिवसांत करणार आहात काय? ते वाघ दुसरीकडे सोडणार नाही असे आम्हाला सांगणार आहात काय? तसेच आपण रेस्क्यु सेंटर तयार करणार होता, त्याचे काय झाले? या तीन प्रश्नांची उत्तरे द्यावीत. तसेच एका बाईला 25 हजार रुपये दिले आणि बाकीच्यांना दहा हजार रुपये दिले आहेत. त्यांना 15-15 हजार रुपये देण्यात यावेत आणि पाच लाखाचे वाटप करुन जनतेला या जंगलाच्या वाघांपासून वाचविण्याचे काम करणार आहात काय असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी शासन पूर्णत: सहमत आहे. हे शासन संवेदनशील आहे. कोणत्याही व्यक्तीचा अशाप्रकारे जीव जाणे हे आपल्यासाठी वेदनाकारक आहे तसेच आम्हाला देखील वेदनाकारक आहे. आपण त्या भागातील प्रतिनिधी म्हणून किंवा विरोधी पक्षातील सदस्या म्हणून प्रश्न उपस्थित करीत असाल, परंतु संपूर्ण राज्याचे राज्यकर्ते म्हणून सर्वांना संरक्षित ठेवण्याची जबाबदारी आमच्यावर आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य ज्या ज्या सूचना करतात त्या सूचनांचे ते आदराने व अगत्यपूर्वक कायद्यामध्ये रुपांतर करतात हे मला या ठिकाणी सांगायचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही जणांना 10 हजार रुपये आणि काही जणांना 25 हजार रुपये देण्यात आले. परंतु तसे नाही. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, याच सभागृहात मी सांगितले होते की, एखाद्या व्यक्तीचा अशाप्रकारे मृत्यू झाल्यास त्याला दोन लाख रुपये देण्यात येत होते, परंतु त्यामध्ये वाढ करुन ती रक्कम पाच लाख रुपये करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. जर कोणी कायमस्वरुपी अपंग झाल्यास त्याला दोन लाख रुपये देत होतो, परंतु आता चार लाख रुपये देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. गंभीररित्या जखमी झाला असेल तर त्याला 50 हजार रुपये देण्यात येते होते त्याऐवजी आता 1 लाख रुपये देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगण्यात आनंद होत आहे की, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचा अनुभव आणि त्यांचा अधिकार लक्षात घेऊन शासनाने मृत व्यक्तीस पाच लाख रुपये, कायम स्वरुपी अपंग झालेल्या व्यक्तीस चार लाख रुपये आणि गंभीर जखमी झ ालेल्या व्यक्तीस एक लाख रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या संदर्भातील जी.आर.दिनांक 30 मार्च मध्ये काढलेला आहे. जी.आर.प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून त्याची अंमलबजावणी होते. केंद्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांच्या मतदारसंघातील पाच लोकांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. त्यांना नोव्हेंबर महिन्यात पाच लाख रुपये द्यायचे होते. तेव्हा माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी निर्णय घेतला की, मार्च महिन्यामध्ये जी.आर.निघाला असला तरी 1 जानेवारी पासून ज्यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेला आहे त्या सर्वांना पाच लाख रुपये देण्यात येतील. ज्यांना

..2..

श्री.भास्कर जाधव ...

दहा हजार आणि पंचवीस हजार रुपये देण्यात आलेले आहेत त्यांना सुध्दा पाच लाख रुपये बरोबरी करुन देण्यात येतील.

सभापती महोदय, 80 टक्के महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेला आहे. कारण महिलाच जास्त करुन सरपणाकरिता जंगलात जातात आणि तेथे बिबटे त्यांच्यावर हल्ला करतात. तेव्हा माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी निर्णय घेतला आहे की, यापुढे वाघाच्या हल्ल्यात ज्याचा मृत्यू होईल, त्यामध्ये पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची पत्नी व त्याची मुले आणि महिलेचा मृत्यू झाल्यास तिचा पती व मुले यांच्या हातामध्ये एक लाख रुपये द्यायचे आणि चार लाख रुपये फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवायचे जेणेकरुन त्यांना दर महिन्याला व्याज मिळेल आणि मुले सज्ञान होईपर्यंत त्यांना ते पैसे मिळतील.

सभापती महोदय, मी या ठिक्ाणी सांगू इच्छितो की, मायक्रो चीपने सर्वेक्षण करण्यात येते. त्यामध्ये काही उणीव राहिली असेल तर ती देखील दूर करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्यावर विश्वास आहे. मग या विभागातील जागा माननीय मंत्री का भरु शकत नाहीत ? माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी विभागाला किती पैसे दिले ? नॅशनल फॉरेस्ट कमिशनच्या मते एकूण बजेटच्या 2.5 टक्के बजेट हे वन विभागावर खर्च झाले पाहिजे. गेल्या 25 दिवसात आज सकाळी कीर्ती काटकरच्या बाबतीत घडलेली घटना सातवी आहे. ताडोबा अभयारण्यात वाघांची संख्या वाढली त्या बद्दल माननीय वने मंत्री आणि त्यांच्या विभागाचे मी मनापासून अभिनंदन करतो. वाघांची संख्या वाढल्याबद्दल जसा माननीय मंत्र्यांना अभिमान आहे तसाच अभिमान त्या भागात राहणाऱ्या लोकांना सुध्दा वाटला पाहिजे. ज्यांच्या जीवावर बेतते त्यांच्या बाबतीत काळजी घेतली पाहिजे. वाघांमुळे त्या भागातील लोकांचे जीव जात असतील ते कदापि अभिमानास्पद नाही. या ठिकाणी मायक्रो चीपचा उल्लेख झाला. त्यातून जे ट्रॅकींग होणार आहे ते कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : महोदय, मायक्रो चीप लावूनच वाघ सोडले जातील. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयानंतर राज्यातील 6900 वन मजुरांना कायम करण्याचे काम पहिल्यांदा माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्वात वन विभागाने केले. 26-27 वर्षांपासून ज्यांनी फॉरेस्टर म्हणून काम केले होते त्यांना पदोन्नती देण्याचे कामही डॉ.पतंगराव कदम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. महोदय, वन विभागातील पदांचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे आहे. तो लवकरच मंजूर होईल, अशी अपेक्षा आहे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, या अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या नुकसानीच्या बाबतीत भरपाई देण्याबाबत आश्वासन दिले होते. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जीवित हानी होते, वित्त हानी होते. कोकणात हत्ती, गवे, रेडे यांच्या बरोबरच वानरांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मनुष्य व वित्त हानी होते. तसेच फळबागांचे सुध्दा मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, फळबागांना योग्य ती नुकसान भरपाई देण्याचे शासन मान्य करेल काय आणि त्याची अंमलबजावणी 1 जानेवारी पासून करणार काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान झाले तर त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ केली आहे. तसेच फळझाडांना रक्कम वाढवून देण्याचा प्रस्ताव लवकरच मंजूर करण्यात येईल.

---------

..3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ ST/ D/ पूर्वी श्री.भारवि.... 12:00

**पृ. शी.** : अनुसूचित जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेचे बहुतांश प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे

**मु. शी.** : अनुसूचित जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेचे बहुतांश प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे,या संबंधी श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात अनुसूचित जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेतील 466 प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, परिणामी मागासवर्गीय समाजात उद्योजक तयार व्हावेत आणि त्यातून लोकांना रोजगार मिळावा या संकल्पनेस बसलेली खीळ, राज्य भरातील या प्रलंबित प्रस्तावांमध्ये तब्बल 125 प्रस्ताव हे केवळ औरंगाबाद जिल्ह्यातील असल्याचे उघडकीस येणे, सदर प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यात यावेत, अशी विविध संघटनांनी शासनाकडे वारंवार केलेली मागणी, या संदर्भात अद्याप कोणतीच कारवाई न होणे, परिणामी, राज्यातील अनुसूचित जातीच्या लघु उद्योगात पसरलेले नैराश्याचे वातावरण, त्यांनी आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात समोरच्या बाजूकडून शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेतले जाते. त्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या लक्षवेधी सूचनेचे निवेदन वाचल्यानंतर खरोखरच त्यांचा अभिमान वाटतो काय, हे त्यांनी सांगावे. सन 2004 ते 2013 म्हणजेच गेल्या 9 वर्षांपासून अनुसूचित जातीचे लोक उद्योगांकडे आकर्षिक व्हावेत म्हणून विशेष घटक योजना सुरु केली. यंत्रमाग, सोसायट्या, गार्मेंट, साखर कारखाने, कृषी उत्पादन इ. उद्योग व्यवसाय करण्यासाठी ही योजना सुरु केली.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

या संपूर्ण 9 वर्षामध्ये या राज्यामध्ये आजही आपली सत्ता असताना, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावांचा रोज जयघोष करीत असताना आपण 372 संस्थांपुरता विचार केला आणि त्यापैकी 70 संस्थांना पूर्ण अर्थसहाय्य दिले. त्यांना हे अर्थसहाय्य कधी दिले ? उर्वरित संस्थांना निधी अभावी अर्थसहाय्य दिलेले नाही. या सभागृहामध्ये कोणताही प्रश्न विचारल्यानंतर प्रत्येक खात्याचे मंत्री उभे राहून निधीची कमतरता पडणार नाही, निधी कमी पडणार नाही असे उत्तर देतात. प्रत्येक खात्याचे हे उत्तर तयार असते. निधी कमी पडणार नाही असे उत्तर देत असताना 2004-2005 पासून या संस्था सुरु झाल्या 70 व्यतिरिक्त उर्वरित संस्थांना आपण निधी अभावी अर्थसहाय्य न दिल्यामुळे त्यांचा व्यवसाय सुरु झालेला नाही. या उर्वरित संस्थांना अर्थसहाय्य कधी देणार ?

या योजनेचे पुनर्विलोकन व योजनेत सुधारणा करण्यासाठी माननीय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. आपल्याकडे आतापर्यंत 446 प्रस्ताव प्रलंबित आहेत. आपले पुनर्विचाराचे धोरण येत नसल्यामुळे काम करु इच्छिणारे, महाराष्ट्रामध्ये उद्योग निर्माण करु इच्छिणारे अनुसूचित जातीचे जे तरुण आहेत त्यांना अपेक्षा आहे. शासनाकडे जे प्रस्ताव प्रलंबित आहेत त्यामध्ये औरंगाबाद विभागातील 235 प्रस्ताव आहेत, पुणे विभागातील 165 प्रस्ताव आहेत. त्यांच्या बाबतीत कधी कार्यवाही करणार ? जुन्यांना आपण अजूनही वाव देत नाही मग नवीन लोकांना केव्हा वाव देणार ? हे धोरण कधी पूर्ण करणार आणि बाकीच्या उर्वरित संस्थांना अर्थसहाय्य कधी देणार ? नवीन संस्थांच्या संदर्भात कधी धोरण घेणार आणि त्यांना केव्हा अर्थसहाय्य देणार ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, इतक्या वर्षात 372 संस्थांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले. परंतु हा पैसा सुध्दा जनतेचा पैसा आहे. त्या पैशाचा योग्य वापर झाला पाहिजे. यामध्ये असे लक्षात आले की, 118 संस्थांनी पहिला हप्ता घेतला पण पुन्हा ते आलेच नाहीत. त्यामुळे मुख्य सचिवांच्या पातळीवर एक बैठक झाली होती. त्यांनी सांगितले की, त्यांना काय मार्गदर्शन करावयाचे ते तुम्ही करा पण या संस्था पूर्ववत सुरु झाल्या पाहिजेत. पहिला हप्ता घेऊन जर ते परत येत नसतील किंवा दुरुपयोग करीत असतील तर रिकव्हरी करावी असा निर्णय घेतलेला आहे. आपण सांगितल्याप्रमाणे 70 संस्थांना पूर्ण अर्थसहाय्य दिलेले आहे. आमचा असा निर्णय झालेला आहे की, 372 संस्थांना अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. शिवाजीराव मोघे ....

त्यांना दुसरा हप्ता किंवा अंतिम हप्ता देण्याकरिता त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे युटिलायझेशन सर्टीफिकेट दिले पाहिजे. जेवढ्या संस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांचे युटिलायझेशन सर्टिफिकेट सादर केले त्यांना अर्थसहाय्य दिलेले आहे. या वर्षी म्हणजे 2012-2013 मध्ये 35 संस्थांनी युटिलायझेशन सर्टिफिकेट दिले त्या सर्व 35 संस्थांना अर्थसहाय्य दिलेले आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या वर्षी 150 कोटी रुपयांची व्यवस्था केलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या संस्थांनी ही योजना राबविण्यासाठी या योजनेतून पैसे घेतलेले आहेत त्यांनी 1 रुपया सुध्दा खर्च केला नाही. त्या ठिकाणी कोणतीही प्रॉपर्टी नाही, जमीन नाही. अशा संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार का ? काही ठिकाणी प्रॉपर्टी आहे, पहिला हप्ता मोठ्या प्रमाणावर घेतलेला आहे पण त्या ठिकाणी 10 टक्के सुध्दा काम झालेले नाही, त्यांची यादी माननीय मंत्र्यांकडे आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अशा बऱ्याच संस्थांवर तेथील डीडीआरने जप्तीच्या नोटिसेस काढून त्या प्रॉपर्टीज जप्त करुन व्यक्तिगत हानी अंतर्गत वसुली करण्यास सुरुवात केली आहे, ही गोष्ट खरी आहे का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे काही संस्था पहिला हप्ता घेतल्यानंतर तीन चार वर्षे दुसरा हप्ता घेण्यासाठी आल्या नाहीत. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे युटिलायझेशन सर्टिफिकेट दिले नाही. अशा 118 संस्थांना नोटिसेस दिलेल्या आहेत. त्यांना मार्गदर्शन केलेले आहे की, तुम्ही लवकर यावे. त्यांना नोटीस दिल्याचा परिणाम असा झाला की, त्यानंतर 35 संस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांचे युटिलायझेशन सर्टिफिकेट दिले. त्या 35 संस्थांना अर्थसहाय्य दिलेले आह. काही संस्थांना 7-7 कोटी रुपये दिलेले आहेत. त्याचा जर दुरुपयोग होत असेल तर ही योजना रिवाईज करण्याच्या दृष्टीकोनातून आता जी प्रलंबित प्रकरणे आहेत ती पुढच्या काळात निश्चितपणे निकाली काढणार आहोत. संस्थेला अर्थसहाय्य देण्याचे आपले धोरण आहे. परंतु आधी ज्यांना दिले त्यांना नीट करावयाचे आहे आणि नंतर नवीन संस्थांना अर्थसहाय्य द्यावयाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण : ही योजना शासनाने पहिल्यांदाच फूलप्रूफ करावयास पाहिजे होती.ज्या अधिकाऱ्यांनी हे प्रस्ताव मंजूर केले त्यावेळी त्यांना हे माहीत होते की, त्यांच्याजवळ काहीच नाही. तरीही त्यांना पैसे दिले गेले. आमचे त्याबद्दल काही म्हणणे नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्याविरुध्द फौजदारी खटले दाखल करावेत. परंतु ज्यांनी इमानदारीने पहिल्या हप्त्याचे पैसे वापरले आहेत त्यांनाही दुसरा हप्ता दिला जात नाही. आता त्या प्रकल्पाची किंमतही वाढलेली आहे. त्याची शासन चौकशी करणार आहे काय ? त्यावेळी प्रकल्पाची किंमत 10 कोटी, 15 कोटी होती, आता त्या प्रकल्पाची किंमत वाढल्यामुळे त्याच्या प्रमाणात त्या लाभार्थ्यांना दुसरा हप्ता दिला पाहिजे. शासनाने मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली आहे. त्या समितीचा अहवाल कधी सादर होणार आहे ? या समितीची तातडीने बैठक घेऊन शासनाने तातडीने अहवाल जाहीर करावा. तसेच नवीन प्रस्ताव केव्हापासून घेतले जाणार आहेत ? हजारो लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यांची छाननी करुन मागासवर्गीय समाजाला न्याय दिला जाणार आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, प्रकल्पाबाबत रिपोर्ट तयार केला जातो. त्यामध्ये सहकारी संस्थेचा 5 टक्के हिस्सा असतो. सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल 35 टक्के दिले जाते. विशेष घटक योजनेतून दीर्घ मुदतीचे कर्ज 35 टक्के दिले जाते. वित्तीय संस्थेकडून दीर्घ मुदतीचे कर्ज 25 टक्के दिले जाते. त्यामुळे प्रकल्प अयोग्य आहे असे म्हणता येणार नाही. परंतु पहिला हप्ता घेतल्यानंतर ते लाभार्थी फायनलला आले नाही किंवा दुसऱ्या हप्त्यासाठी न आल्यामुळे त्यांना नोटीस दिलेली आहे. शासनाने नियुक्त केलेल्या समितीचा रिपोर्ट 3 महिन्याच्या आत देणार आहे. नवीन संस्थांना त्यात वाव आहे.

--------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ. शी.** : परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे

**मु. शी.** : परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री अनिल भोसले, जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नर्सिंग संस्थांना मान्यता देणे, परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासून निकाल जाहीर करणे, आदी महत्वपूर्ण कामांची जबाबदारी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून काढून घेऊन परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव सप्टेंबर, 2012 पासून शासनाकडे प्रलंबित असणे, स्वतंत्र शिक्षण मंडाळाअभावी शिखर संस्थेचे नियम धुडकावून खासगी नर्सिंग संस्थांना परस्पर मान्यता देण्यापासून पेपरफुटीसारख्या गंभीर घटना राज्यात सातत्याने वाढीस लागणे, परिचारिका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र महाराष्ट्र परिचारिका शिक्षण मंडळ तत्काळ स्थापन करण्याची गरज, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री.डी.पी.सावंत ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....

NTK/ D/ ST/

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, आपल्या देशामध्ये आपले राज्य आरोग्याच्या सोयी सुविधा व सेवा पुरविण्याबाबत अग्रेसर मानले जाते. मुंबईत अनेक मोठमोठी हॉस्पिटल्स आहेत, या हॉस्पिटल्समध्ये संपूर्ण जगातून उपचार घेण्यासाठी रोगी येत असतात. दुर्दैवाने आपल्या राज्यात नर्सिंगची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींचा दर्जा व राज्यात नर्सेसचा जाणवत असलेला तुटवडा याचा विचार करता नर्सिंगच्या कारभारात प्रचंड गोंधळ निर्माण झालेला आहे. अनेक संस्थांमध्ये नर्सेस उपलब्ध नाहीत. अनेक संस्थांमध्ये दवाखाने नाहीत, इमारती नाहीत, मूलभूत सुविधा नाहीत. ज्या संस्थांना नर्सिंग कौन्सिलकडून मान्यता दिली जाते, तेच ह्या परीक्षा घेतात. त्याचा निकाल लावतात. पण त्यांच्या कारभारात प्रचंड भ्रष्टाचार सुरु आहे. त्यामुळे नर्सिंग कोर्सेसच्या परीक्षा घेण्यासाठी स्वतंत्र परीक्षा मंडळ स्थापन करावे, जेणे करुन नर्सिंगचा दर्जा सुधारावा यासाठी सतत मागणी केली जात आहे.

मुंबई शहरातही नर्सेसची प्रचंड चणचण आहे. ज्या महाविद्यालयातून नर्सेस उत्तीर्ण होतात त्यांना त्या हॉस्पिटलमध्ये नोकरी दिली जात नाही. त्यांना सरकारी हॉस्पिटलमध्ये नोकरी दिली जाते, पण खाजगी हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळत नाही. परळच्या महात्मा गांधी हॉस्पिटलमध्ये त्यांच्या नर्सिंग कॉलेजमध्ये पास झालेल्या नर्सेसना तेथे नोकरी देत नाहीत. जे.जे.हॉस्पिटलमध्ये मात्र त्यांच्या नर्सेसना तेथेच नोकरी दिली जाते. नर्सेसचे परीक्षा मंडळ कधी अस्तित्वात येणार आहे ? मंत्रिमंडळासमोर हा विषय गेलेला आहे असे उत्तर दिलेले आहे. परंतु याबाबत कधी निर्णय होणार आहे ? राज्य सरकारने परवानगी दिलेल्या नर्सिंग कॉलेजचा दर्जा तपासण्यासाठी संपूर्ण शैक्षणिक संस्थांची तपासणी केली जाईल काय आणि ज्या संस्था अयोग्य असतील त्या संस्थांची मान्यता रद्द केली जाईल काय ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, नर्सिंग कौन्सिलबाबत शासनाकडे काही महिन्यांपूर्वी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने नर्सिंग कौन्सिलवर शासनाने कारवाई केली आहे. नर्सिंग कौन्सिलकडून परीक्षा घेतल्या जातात. ही एकमेव संस्था आहे जी हे काम करीत आहे. त्यांचा अधिकार कमी करण्यासंबंधीची नोट मंत्रिमंडळासमोर ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य परिचारिका निमवैद्यकीय शिक्षण मंडळाची स्थापना करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर लवकरात लवकर जाणार आहे. जेणे करुन नर्सिंगच्या परीक्षा घेणे सोयीचे होईल व नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना चांगला न्याय देता येईल.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विशेष बैठकीच्या कामकाजाची वेळ लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ. रणजित पाटील : सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी जीएनएम आणि अेएनएम यांच्या संबंधी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. दिनांक 21.3.2005 रोजी या संबंधी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या कोर्सेला मान्यता घेण्यासाठी पहिल्यांदा युटिलिटी सर्टिफिकेट घ्यावे लागते, भारतीय परिचर्या परिषदेची मान्यता घ्यावी लागते,शासनाची परवानगी लागते आणि त्यानंतर शिक्षण शुल्क समिती शुल्क ठरवून देते. यासाठी किमान तीन वर्षाचा कालावधी लागतो आणि चौथ्या वर्षी कोर्स सुरु होतो. या राज्यामध्ये शासनाची कोणतीही मान्यता न घेता 418 कॉलेजेस पहिल्याच वर्षी सुरु करण्यात आली, विद्यार्थ्यांना अॅडमिशन देण्यात आले. तसेच या कॉलेजेसचे शिक्षण शुल्क ठरविण्यासाठी शिक्षण शुल्क समिती कधीच बसली नाही. महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे अध्यक्ष श्री. रामलिंगम माळी यांची पत्नी देखील त्या कौन्सिलची सदस्या होती. त्यांनी देखील 7 कॉलेजेस चालू केली होती हे खरे आहे काय ? या कॉलेजेसवर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे शासनाला 300 ते 400 कोटी रु.चा तोटा झाला हे खरे आहे काय ? अेआयसीटीने 52 टक्के आरक्षणाचे बंधन घातलेले आहे. या संस्थामध्ये मागासवर्गीयांच्या नावाने शिक्षण शुल्काची लूट केली गेली असून हे सर्व पैस संस्थाचालकांच्या खिशामध्ये गेलेले आहेत. अशा संस्थाचालकांवर आपण फौजदारी कारवाई करणार आहात काय ?

श्री. डी.पी.सावंत : मी उत्तरात सांगितल्या प्रमाणे यामध्ये भयंकर अनियमितता झाल्या होत्या म्हणून शासनाने नर्सिंग कौन्सिलवर कारवाई केली. नर्सिंग कौन्सिच्या अध्यक्षाचे अधिकार कमी करुन नवीन अध्यक्ष नेमलेले आहेत. या अनियमितता संबंधी रजिस्ट्रारला निलंबित केलेले आहे. याबाबतीत नर्सिंग आणि पॅरामेडिकलसाठी वेगळे शिक्षण मंडळ असावे अशी संकल्पना पुढे आली. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. म्हणूनच नर्सिंग कौन्सिलवर कारवाई केलेली आहे. या प्रकरणी कोर्ट केस झालेली आहे. नर्सिंग कौन्सिलने प्रोव्हिजनल सर्टिफिकेट देऊन कॉलेजेस सुरु करण्याची परवानगी दिली होती. ही परवानगी नियमाला धरुन नाही आणि ही चुकीची बाब आहे असे शासनाने त्यांना कळविले होते. ही अनियमितता नियमित करण्यासाठी आम्ही त्यांना वेळ दिला होता. परंतु ते करु शकले नाहीत. म्हणून रजिस्ट्रारला निलंबित केलेले आहे.

..2..

डॉ. रणजित पाटील : मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेमध्ये सांगितले की, एका महिन्यात या कॉलेजेसना मान्यता घ्या, अन्यथा फौजदारी कारवाई करण्यात येईल. 418 पैकी 273 कॉलेजेसनी शासनाची मान्यता घेतलेली नाही. याबाबतीत आपण काय करणार आहात ?

श्री. डी.पी.सावंत : हा या लक्षवेधीचा विषय नाही. या संदर्भात कोर्ट केस झालेली आहे. आजच त्यावर कोर्टाचा निर्णय अपेक्षित आहे. अनेक संस्था कोर्टामध्ये गेलेल्या आहेत. ज्या संस्थाची आयएनसी झालेली नाही, ज्या कॉलेजेसना परवानगी मिळालेली नाही अशा कॉलेजेस मधील विद्यार्थ्यांचे नुसान होऊ दिले जाणार नाही, त्यांना महाराष्ट्राचे रजिस्ट्रेशन दिले जाईल हे शासना तर्फे सांगितलेले आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार

मानकांची पूर्तता न केलेल्या शाळांना बचावाची संधी देण्याची आवश्यकता

**मु. शी.** : मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार मानकांची पूर्तता न केलेल्या शाळांना बचावाची संधी देण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकात पाटील व डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहे एप्रिल २०१० पासून राज्यामध्ये सहा ते चौदा वयोगटातील बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची अंमलबजावणी सुरु होणे, सर्व प्राथमिक शाळांनी या अधिनियमाच्या यशस्वीतेसाठी सुसज्ज इमारतीसह दहा मानकांची पूर्तता दिनांक ३१ मार्च, २०१३ पूर्वी करणे बंधनकारक असणे, सर्व शाळांनी या मानकांची पूर्तता केली अथवा नाही याबाबत शासनाने माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये प्रश्नावली स्वरुपात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे ज्या शाळांनी या मानकांची पूर्तता केलेली नाही किंवा एक मानक जरी कमी पडले तरी त्या शाळेची मान्यता काढणे, असे प्रकार सोलापूर जिल्ह्यात अधिक घडल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये सोलापूर शहरातील सेवासदन शिक्षण संस्थेच्या कन्याशाळेचा समावेश असणे, अशा शाळांना बचावाची संधी देण्याची असलेली आवश्यकता, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : या लक्षवेधीला माननीय मंत्री महोदयांनी निवेदनाच्या माध्यमातून जे उत्तर दिलेले आहे ते लक्षात घेता शासनाची खेड्यापाड्यातील अनुदानित शाळा आणि जिल्हा परिषदेच्या शाळांकडे वक्रदृष्टी असल्याचे दिसून येते. राईट टू एज्युकेशनच्या अंतर्गत जी मानके निश्चित केलेली आहेत त्यामध्ये सुसज्ज शाळा, मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र कक्ष अशी अनेक मानके दिलेली आहे. एका बाजूला 2600 शाळांची मान्यता काढण्याची प्रक्रिया सुरु आहे. दुस-या बाजूला 20 टक्क्यापासून 49 टक्क्यापर्यंतच्या शाळांवर पटपडताळणीच्या नावाखाली कारवाई चालू आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-8.... श्री.भगवान साळुंखे.....

आता सोलापूर जिल्हयातील 690 शाळा, सांगली जिल्हयातील 350 शाळा, अशा प्रत्येक जिल्हयातील किमान 50 टक्के शाळांना केवळ मुतारी नाही, अमुक गोष्ट नाही या कारणाकरिता मान्यता काढून घेण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. एका बाजूला वेतनेतर अनुदान दिले जात नाही, शाळा देणग्या घेऊ शकत नाही, पालक देणगी देऊ शकत नाहीत, संस्था चालक शिक्षक नेमू शकत नाहीत अशी अवस्था असताना या शाळांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. एकूणच मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडण्याकडे शासनाचा कल आहे का? असा हेतू यात लपला आहे का?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये दोन भाग आहेत. राईट टू एज्युकेशन ॲक्टप्रमाणे नियमावलीमध्ये हे बंधनकारक आहे की, ज्या शाळा या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षानंतर अधिसूचीमध्ये नमूद केलेली मानके पूर्ण करण्यात आणि पोटनियम 1 मध्ये नमूद केलेल्या शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करतील त्या शाळा कार्य करण्यास बंद होतील. राईट टू एज्युकेशन ॲक्टमध्ये कायदेशीर तरतूद आहे त्या तरतुदीप्रमाणे 31 मार्च, 2013 पर्यंत हे करणे आवश्यक होते. केले नाही तर कायद्यात तरतूद आहे की, फॉर्म 1 मध्ये त्यांनी सेल्फ डिक्लेरेशन करणे, त्यानंतर ते पब्लिक डोमेनवर ठेवणे, शिक्षणाधिकाऱ्यांनी त्याची समितीसोबत तपासणी करणे, पुन्हा पब्लिक डोमेनवर ठेवणे आणि नंतर 15 दिवसात निर्णय घेणे आणि डायरेक्टरच्या माध्यमातून शासनाकडे पाठविणे आणि नंतर शासनाने निर्णय घ्यायचा आहे.

सभापती महोदय, यामध्ये शाळांना दुरुस्ती करावयाची असेल तर त्यांना पूर्तता करण्यास वेळ दिलेला आहे. परंतु हे करणे बंधनकारक आहे. याबाबत शासनाकडून काही करता येत नाही. पट पडताळणीसंबंधीचा प्रश्न आहे. पट पडताळणीच्या वेळी ज्या शाळांमध्ये अनुपस्थिती 50 टक्क्यापेक्षा जास्त आढळून आली आहे त्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे की, त्या शाळा बंद कराव्यात, त्या शाळांची मान्यता काढण्यात यावी. सोलापूर जिल्हयात प्राथमिक शाळा 2872 आहेत. त्यापैकी 80 शाळांना नोटीस दिली आहे, त्यांची मान्यता काढलेली नाही. 9901 माध्यमिक शाळा असून त्यापैकी 10 शाळांना नोटीस दिली असून 10 शाळांमध्ये पट पडताळणीमध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त अनुपस्थिती आढळली त्यांची मान्यता काढण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी सेवासदन शिक्षण संस्थेचा उल्लेख केला. शिक्षण खात्याची मनमानी कशी चालते त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. सेवासदन शिक्षण संस्थेची ही कन्या शाळा आहे. त्या शाळेत मुलांसाठी पुरुषांचे शौचालय नाही या कारणास्तव कारवाई करण्यात आली आहे. या पध्दतीने जे काम चालले आहे ते आपल्यासमोर मांडले आहे. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात? शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांचे पालक हवालदिल झाले आहेत. या चुकीच्या कारवाईबाबत पायबंद घालणार आहात काय?

प्रा.फौजिया खान : कन्या शाळेचा उल्लेख केला त्या शाळेची मान्यता काढण्यात आलेली नाही. त्यांना नोटीस दिलेली आहे. खुलासा करण्याची संधी त्यांना आहे.

श्री.विनोद तावडे : नोटीस कशी दिली?

प्रा.फौजिया खान : खुलासा आल्यानंतर समिती तपासणी करेल. अधिका-यांकडून काही चुकीचे झाले असेल तर ते तपासता येईल. शाळांना खुलासा करण्याची संधी आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, आरटीई अंतर्गत मानांकने पूर्ण केल्याशिवाय वेतनेतर अनुदान मिळत नाही. कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी 4 ते 5 लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च येतो.

नंतर आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे ...

अशी मानांकने पूर्ण करण्याची मुदत वाढवून दिली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाचा निर्णय घेण्यात आला असून तो लवकरच निर्गमित होणार आहे. आता मी जी काही प्रक्रिया सांगितलेली आहे त्यामध्ये त्यांना कम्प्लाय करण्याची संधी मिळणार असून त्यांनी तशा प्रकारची संधी घेतली तर त्यांची मान्यता रद्द होणार नाही.

------------

**उप सभापती** : आता नियम 93 ची निवेदने घेतली जातील. सभागृहाची सदर वेळ निवेदनावरील चर्चा संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी./ मु.शी.** :अन्न अधिकारी अभियान व जन आरोग्य अभियान महाराष्ट्र या संघटनांनी विविध मागण्यांकरता सुरु केलेले आंदोलन याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. अनिल देशमुख : ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक एक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,ज्वारी, बाजरी व मका हे धान्य रेशन दुकानात उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात संघटना वारंवार मागणी करीत आहेत. केंद्रीय अन्न सुरक्षा कायदा अद्यापी प्रलंबित असून हा कायदा आणण्याच्या दृष्टिकोनातून माझा असा प्रश्न आहे की, अन्न सुरक्षा अभियान या संघटनेबरोबर अन्न व नागरी पुरवठा विभाग बैठक घेणार आहे काय ? या संघटनेला अन्न सुरक्षा अभियान कायद्याच्या संदर्भात ज्या दुरुस्त्या अपेक्षित आहेत त्यामुळे त्यांच्याबरोबर बैठक आयोजित केली जाणार आहे काय ?

सभापती महोदय, क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्टच्या संदर्भातील विषय राज्यसरकारच्या विचाराधीन आहे. या केंद्रीय ॲक्टमध्ये बऱ्याचशा त्रुटी आहेत. राज्यात क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करीत असतांना या कायद्याच्या संदर्भात राज्य पातळीवर दुरुस्त्या प्रस्तावित आहेत. या कायद्याला अद्यापपावेतो अंतिम स्वरुप मिळालेले नाही. त्यामुळे आरोग्याच्या संदर्भात काम करणारे डॉ. अनंत फडके व त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित केली जाणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, ज्या ज्या जिल्हयातून ज्वारीची मागणी आलेली आहे त्या त्या जिल्हयांना ज्वारी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मराठवाडयातून ज्वारीची मोठया प्रमाणात मागणी आल्यामुळे आम्ही मराठवाडयाला मोठया प्रमाणात ज्वारी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ज्या ज्या जिल्हयाची ज्वारीसाठी मागणी येईल त्या त्या जिल्हयांना ज्वारी उपलब्ध करुन दिली जाईल.

सभापती महोदय,अन्न सुरक्षा कायद्याच्या संदर्भात केंद्रशासनाने निर्णय घेतलेला असून या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात तसेच सर्व राज्यामध्ये केली जाणार आहे. या कायद्याअंतर्गत 2 रु. किलो गहू व 3 रुपये किलो तांदूळ या दराने अन्न सुरक्षा कायद्याच्या अंतर्गत धान्य उपलब्ध करुन दिले जाणार आहे. हे धान्य प्रती माणशी 5 किलो या प्रमाणे वाटप केले जाणार असून त्यांची अंमलबजावणी महाराष्ट्रात लवकरच सुरु केली जाणार आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट, 2010 या कायद्यानुसार राज्यात जे काही दवाखाने असतील त्यांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. हा कायदा राज्यामध्ये कशा पध्दतीने लागू करावा यासाठी शासन विचार करीत आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

सभापती महोदय,डॉ. अनंत फडके हे आरोग्याच्या संदर्भात काम करीत असतात त्यामुळे आरोग्य खात्याने डॉ. फडके यांच्याकडून सूचना घे्ंऊन हा कायदा महाराष्ट्रात कशा प्रकारे लागू करता येईल याबाबत त्यांच्या बरोबर बैठक आयोजित करावी अशी सूचना आरोग्य विभागाला करण्यात येईल.

------------------------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** :महाराष्ट्र कामगार मंडळाचा अध्यक्षांनी शासनाचे स्पष्ट निर्देश नसतांना व मंडळाची परवानगी न घेता 80 पदांच्या नोकरभरतीची जाहिरात देणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.चंद्रकात पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र गावित ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक दोन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे: सभापती महोदय, हुशार अधिकारी राजकीय नेत्यांचा कसा वापर करीत असतात याची माहिती मी या ठिकाणी आपल्याला देणार आहे. कामगार कल्याण मंडळाचे श्री. धोत्रे यांच्यावर कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी लैंगिक छळाची तक्रार केली होती. या विषयाच्या संदर्भात चौकशी समिती नेमण्यात आली व त्या समितीमध्ये श्री. धोत्रे हे दोषी आढळून आल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. धोत्रे यांना बडतर्फ करण्याचा आदेश दिला. माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष हे कामगार राज्यमंत्री असतात त्यांनी पत्रक काढून सांगितले की, अशा पध्दतीने मुख्यमंत्र्याना बडतर्फ करण्याचा अधिकार नाही. हा अधिकार कामगार कल्याण मंडळाच्या अध्यक्षांचा आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावीत : सभापती महोदय, 31 जानेवारी 2012 रोजी त्यांच्यावर महाराष्ट्र शासनाने बडतर्फीची कारवाई केली. परंतु मधल्या कालावधीमध्ये 28 फेब्रुवारी 2012 रोजी त्यांनी हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केला आणि त्याला त्यांनी स्थगिती दिली. परंतु त्याच्या विरोधामध्ये महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये स्पेशल रिट पिटीशन दाखल केला आणि प्रतिज्ञापत्रही दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे श्री.धोत्रे यांना महाराष्ट्र शासन पाठीशी घालत नाही. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : याठिकाणी श्री.धोत्रे या अधिकाऱ्यावरील आरोप शाबित झालेला आहे. त्यांना बडतर्फ करण्याच्या संबंधातील पुढील आवश्यक ती सर्व कारवाई राज्य शासनाने त्वरित करावी.

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, ऑलरेडी शासनाने त्यांना बडतर्फ केले आहे. परंतु त्यांनी सुप्रीम कोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केलेले आहे आणि सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अजून तो तेथे कार्यरत आहे की नाही? तुम्ही त्यांना कशासाठी पाठीशी घालत आहात.

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, श्री.धोत्रे हे काही माझे नातेवाईक नाहीत किंवा शासनाचे जावईही नाहीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, तो शासनाचा काय लागतो ते सांगू काय? माझ्याकडे पत्र आहे ते मी दाखवू काय?

श्री.राजेंद्र गावित : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडेसाहेब, सुप्रीम कोर्टाने त्याला स्थगिती दिलेली आहे आणि सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सध्या श्री.धोत्रे यांच्या कारवाईला स्थगिती दिलेली असली तरी शासनाकडे दुसरे अन्य मार्ग आहेत की नाही की, तो एकमेव मार्ग आहे? नाहीतर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी मघाशीच सांगितले की, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, मग विषय संपला.

. . .. टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक अधिकारी माननीय वित्तीय मंत्र्यांना चॅलेंज करतो. हे काय चालले आहे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्यांना निलंबित केले आहे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. असे शासनाचे मत झाले आहे. त्यामुळे त्याला सक्तीच्या रजेवर पाठवावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा मुद्दा पेंडींग ठेवावा आणि सदनामध्ये कॅबिनेट मंत्र्यांना बोलविण्यात यावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, संबंधितांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येईल.

-------

. . . .टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी/मु.शी : खामगाव नगरपरिषदेने शहीद भगतसिंग चौकाच्या

सौंदर्यीकरणाचे काम करणे याबाबत सर्वश्री.पांडुरंग
फुंडकर यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .सी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू प्रश्न या सदनामध्ये कमीतकमी चार वेळा आला आहे. ज्या माणसाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केले अशा शहीद भगतसिंग यांच्या पुतळयाच्या सौदर्यीकरणाच्या संबंधातील हा प्रश्न आहे. याठिकाणी उत्तरामध्ये असे सांगितले की, या कामासाठी जी निविदा मागविली होती, त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तीन निविदांपैकी श्री.बी.एन.जुनेजा यांचे दर सर्वात कमी असले तरी ते जास्त वाटत असल्याचे तत्कालीन अभियंत्यांनी निविदा मंजुरी संबंधीच्या कार्यालयीन टिपणीमध्ये नमूद केले आहे. हा पहिला आक्षेप आहे. अध्यक्षांनी त्यांच्या स्तरावर निधीचा विनियोग वेळीच होण्याच्या दृष्टीने सर्वात कमी दर असलेली निविदा मंजूर करण्यात येत आहे असा तातडीने आदेश दिला.

सभापती महोदय, वैशिष्ट्यपूर्ण निधीच्या बाबतीत कलेक्टर यांनी जे निकष घालून दिले होते, त्यामध्ये प्रस्तावित काम विहित कालावधीमध्ये पूर्ण करावे. तसेच कामाच्या गुणवत्तेविषयी कार्यान्वित अधिकाऱ्यांकरवी खात्री करुन घ्यावी व नंतरच कामाच्या मोबदल्याची रक्कम अदा करावी. प्रस्तावित केलेली सर्व कामे ही मंजूर बांधकाम नकाशामध्ये दर्शविलेल्या जागेवरच करावी. तसेच अट क्र. 14 क्रमांकामध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर कामाच्या बांधकामाबाबत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, बुलढाणा यांच्या कडून टप्पेनिहाय तपासणी करुन, संबंधितांचे प्रमाणपत्र घेऊन देयके अदा करावी.आणि कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग, अकोला यांच्याकडील कामाच्या गुणवत्ता दर्जाचे प्रमाणपत्र हे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, बुलढाणा यांचा अहवाल कार्यालयास सादर करुन या कार्यालयाची परवानगी घेतल्यानंतरच संबंधित देयके अदा करावीत."

सभापती महोदय,मी जीवन प्राधिकरणला पत्र लिहून विचारले की, याबाबतीत आपल्याकडून सर्टीफीकेट घेण्यात आले आहे काय? माननीय मंत्री महोदय श्री.भास्करराव जाधवसाहेब, माझ्याकडे जीवन प्राधिकरणाचे पत्र आहे. त्यात असे म्हटले आहे की, "उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सविनय कळविण्यात येते की, "2008-2009 या आर्थिक वर्षा करता विशेष अनुदान" या कार्यक्रमांतर्गत खामगाव नगरपरिषदेने केलेल्या शहीद भगतसिंग चौकाचे सौंदर्यीकरण करणे व इतर विकास कामाचे देयक अदा करण्यासाठी नगरपरिषद, खामगाव यांनी प्रस्ताव सादर केलेला नसल्यामुळे या कार्यालयाने कोणत्याही प्रकारचा अहवाल नगरपालिकेला दिलेला नाही."

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे )**

श्री.पांडुरंग फुंडकर...
त्यामुळे कामांच्या बांधक्‍ामाबाबत गुणवत्ता व दर्जाचे प्रमाणपत्र या विभागामार्फत देण्यात आलेले नाही" असे असताना त्या ठिकाणी एक वीट देखील रचण्यात आलेली नाही. माझ्याकडे त्या संदर्भातील फोटोग्राफ्स आहेत. त्या ठिकाणी सुरुवातीला जे काम झाले होते त्यानंतर काहीही काम झालेले नाही. साधी एक वीट सुध्दा रचण्यात आलेली नाही. तेथील नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी संगनमत करुन काहीही काम न करता दोन लाख रुपयांचा अपहार केलेला आहे.

सभापती महोदय, मी हा प्रश्न येथे चौथ्यांदा उपस्थित करीत आहे. मी आपल्याकडे त्या कामाचे फोटो पाठवितो. नगरपरिषदेने तेथे कोणत्याही प्रकारचे काम केलेले नाही. शहीद भगतसिंग यांनी देशासाठी बलिदान केले त्या शहिद भगतसिंगाच्या पुतळयाच्या सौंदर्यीकरणाच्या कामाचे पैसे हडप करण्यात येत असतील आणि अशा लोकांना पाठीशी घातले जात असेल तर आम्ही काय करायचे ? आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. माझी मागणी आहे की, संबंधित नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी काम न करता दोन लाख रुपये हडप केलेले आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य व माजी विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. त्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले. एम.बी.रेकॉर्ड करताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून एनओसी घेणे आवश्यक होते असे त्यांचे म्हणणे आहे. नगरपालिकेमध्ये इंजिनिअर नसतात. तेव्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून टी.एस. करुन घ्यावी अशी सोय आपण केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेक प्रकारची कामे असतात त्या तुलनेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कामे कमी असतात म्हणून त्यांच्याकडून टी.एस.करुन घेतली जाते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा दुसरा आक्षेप आहे की, 9.90 टक्के अबाव्ह दराने आलेली निविदा मंजूर करण्यात आली. त्या ठिकाणी स्पर्धा झालेली आहे. स्थानिक वर्तमानपत्रात

..2..

श्री.भास्कर जाधव...

जाहिराती दिलेल्या आहेत. 90 टक्के निविदा मंजूर करण्याचे अधिकार तेथील स्थायी समितीला असतात. करंट डीएसआरशी मॅच होणारी निविदा असेल तर ती मंजूर करण्याचे अधिकार त्यांना आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे की, तेथे कोणत्याही प्रकारचे काम न होता..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी जबाबदारीने सांगत आहे. मी त्या गावामध्ये राहतो. त्या रस्त्यावरुन माझी दिवसाला एकदा तरी फेरी होते. माननीय मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. माननीय मंत्री महोदय चुकीची माहिती देत असतील तर आम्हाला हक्कभंग समितीकडे जावे लागेल आणि हक्कभंग समितीला माझ्या गावी नेऊन प्रत्यक्ष काय स्थिती आहे ते दाखवावे लागेल. मी पुन्हा एकदा सांगतो की, त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे काम न करता दोन लाख रुपये हडप करण्यात आलेले आहेत. तेव्हा नगराध्यक्ष आणि मुख्य अधिकारी यांच्या विरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच माननीय सदस्य उभे राहिले. मी सांगत होतो की, तेथे कोणत्याही प्रकारचे काम न होता दोन लाख रुपये खर्च केल्याचे दाखविण्यात आले असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांच्याकडे फोटोग्राफ्स देखील आहेत असेही त्यांनी सांगितले. माननीय सदस्यांचा एकूण अनुभव व स्थानिक अधिकार आणि शहीद भगतसिंगांचे स्मारक असल्यामुळे या विषयाचे महत्व लक्षात घेऊन या प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल. आतापर्यंत चौकशी झाली नव्हती.माझ्याकडे विभागाकडून आलेली माहिती होती. त्या ठिकाणी चुकीचे काम झाल्याची बाब समोर आल्यास माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2009 पासून हे प्रकरण सुरु आहे. मागील डिसेंबरच्या अधिवेशनात मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्यावेळी जे उत्तर देण्यात आले होते तेच उत्तर आज देखील देण्यात आलेले आहे. त्यामध्ये काहीही बदल नाही. माझा प्रश्न आहे

..3..



AJIT/ D/ ST/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 12:40

श्री.पांडुरंग फुंडकर....

की, या सभागृहात चार-चार वेळा हा प्रश्न उपस्थित होत असेल तर शासनाने यापूर्वी चौकशी का केली नाही ? त्या ठिक्ाणी एक पैसाही खर्च न करता दोन लाख रुपये खर्च केल्याचे दाखविण्यात येत असेल आणि त्याबाबत तीच तीच उत्तरे मिळणार असतील तर ते बरोबर नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

माझा प्रश्न आहे की, किती दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांकडून चौकशी करुन व तो अहवाल प्राप्त करुन घेऊन संबंधितांवर कारवाई करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांकडून एक महिन्याच्या आत चौकशी करुन कार्यवाहीसह अहवाल उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.**: वांद्रे (प.) येथील नर्गीस दत्त नगर झोपडपट्टीमध्ये अवैध मजल्यांच्या वर बांधकाम करण्यात आल्याबाबत सर्वश्री ॲड.आशिष शेलार, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर (गृह निर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-4 ाभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, कालच या सभागृहामध्ये एका प्रस्तावावर चर्चा झाली आणि माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सरकारची भूमिका मांडताना सांगितले की, अनधिकृत बांधकामाला आम्ही कोणतेही संरक्षण देणार नाही. आज लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये त्या मथळ्याखाली बातमी छापून आली. महोदय, या विषयाच्या संदर्भात मी नागपूरच्या अधिवेशनात औचित्याचा मुद्दा मांडला होता. त्या अनधिकृत झोपड्या पॅरलली सी-लींक पर्यंत मागे वाढल्या आहेत. या अधिवेशनात अनधिकृत झोपड्यांवर कारवाई होईल असे वाटल्यावर आता त्या सी-लींकच्या वर झाल्या आहेत. आता तर तीन-तीन मजल्यांच्या झोपड्या झाल्या आहेत. सी-लींकच्या राऊंडची जेवढी उंची आहे तेवढ्या उंचीच्या तीन-चार मजल्यांपर्यंत झोपड्या वाढल्या आहेत. ती एमएसआरडीसीची जागा आहे. प्लॅनिंग ऑथॉरिटी एमएमआरडीए आहे. ॲनेक्श्चर-2 म्हाडा देणार आहे, रिझर्व्हेशन पीजी व कन्व्हेंशन सेंटरचे आहे. परंतु कारवाई मुंबई महानगरपालिकेने करावी अशी अपेक्षा माननीय मंत्र्यांनी व्यक्त केली आहे. आज सी-लींकच्या मागे, पुढे आणि आता वर अनधिकृत झोपड्या बांधल्या आहे. दोन-तीन मजल्यांच्या झोपड्या अनधिकृत असल्याचे सरकारने मान्य केले आहे. त्यामुळे सरकार त्या झोपड्या कधीपर्यंत पाडणार आहे आणि त्या बाबतचे आदेश कधी पर्यंत देणार आहे ?

श्री.सचिन अहिर : महोदय, तीन महिन्यांच्या आत म्हाडा, महानगरपालिका, आणि पोलीस यांची संयुक्त टीम करुन या संदर्भात कारवाई करण्याचे काम करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : महोदय, हा विषय गंभीर आहे. नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी औचित्याचा मुद्दा मांडला होता. त्यावर माननीय उप सभापतींनी निदेश दिले होते. ज्या जागेवर झोपड्या झाल्या आहेत ती जागा एमएसआरडीसीची आहे. मुंब्रा येथे घटना घडल्यानंतर ती जागा वन विभागाची आहे, ठाणे महापालिकेची आहे की महसूल विभागाची आहे हा प्रश्न निर्माण झाला आहे. माननीय मंत्री महोदयांनी कारवाई करण्यासाठी 3 महिन्यांचा अवधी सांगितला आहे. माननीय राज्यमंत्र्यांचा उद्देश साफ आहे. परंतु पावसाळ्यात ही कारवाई करता येणार नाही. माझी मागणी आहे की, ही कारवाई एक महिन्याच्या आत केल्यास, या संदर्भातील काम लवकर होईल.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : महोदय, एखाद्या बाबतीत महापालिकेने कारवाई करावी असे सांगितल्यानंतर महापालिका सांगते की, हा आमचा प्लॉट नाही, तो म्हाडाचा प्लॉट आहे. त्या बाबत म्हाडाने कारवाई करावी. हे खरे आहे की, म्हाडाकडे काही प्लॉट एमएसआरडीसीचे आहेत. त्यामुळे तिघांची संयुक्त टीम करुन कारवाई करण्याचे मी सांगितले आहे. मी यामध्ये स्कोप ठेवला आहे. याचा अर्थ तीन महिन्यानंतर कारवाई करणार नसून, अधिवेशन संपल्यानंतर कारवाईला सुरुवात करु. परंतु यासाठी मला तीन महिन्यांचा कालावधी हवा आहे.

---------------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** :मनोरा आमदार निवास व सह्याद्री अतिथिगृह येथील विविध विभागात रोजंदारीवर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील दुरुस्ती करतो की, या निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदातील शेवटून दुसऱ्या ओळीमध्ये "नस्ती हरविलेली नाही" या ऐवजी "वित्त विभागाची नस्ती हरविलेली नाही" असे वाचावे.

**तालिका सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी हा विषय उपस्थित केला होता. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना सामावून घेण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय ? या निवेदनात नमूद केले आहे की, रोजंदारी कर्मचाऱ्यांना कालेलकर करारातील तरतुदीनुसार वित्त विभागाच्या मान्यतेते रुपांतरित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, या संदर्भात नेमकी कोणती कार्यवाही सुरु आहे आणि त्या कर्मचाऱ्यांना कधीपर्यंत सेवेत सामावून घेतले जाईल ?

श्री.छगन भुजबळ : महोदय, दि.16/9/2005 रोजी 508 कर्मचाऱ्यांना रोजंदारी आस्थापनेवर घेण्यात आले होते. कालेलकर समितीचा अहवाल आपल्यावर बंधनकारक आहे. पाच वर्षे त्या आस्थापनेवर काम केल्यानंतर जे पद धारण केले असेल ते पद रुपांतरित आस्थापनेवर रुपांतरित करण्यात येते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ...

त्यासाठी ही फाईल वित्त विभागाकडे गेली होती. त्यांनी आणखी काही क्वेरीज काढलेल्या आहेत आणि काही कागदपत्रे मागविलेली आहेत. मी स्वत: माननीय वित्त मंत्र्यांबरोबर चर्चा करुन त्यांना निश्चितपणे न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे आणि त्यांना न्याय देणार आहे. त्यांचा तो अधिकार आहे हे मी मान्य करतो आणि त्याप्रमाणे ही कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**पृ. शी./ मु.शी.** : आदिवासी विकास विभागांतर्गत मुला-मुलींसाठी टॉप व पायजमा खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. विक्रम काळे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी नाईट ड्रेस देण्याचे ठरविले होते. त्यावेळी आपण निविदा काढल्या होत्या. यंत्रमाग महामंडळातर्फे त्या निविदांचे प्रयोजन केले होते. त्यानंतर माननीय आयुक्तांनी निविदा काढण्याची ऑनलाईन प्रक्रिया सुरु केली. यामध्ये महत्वाची गोष्ट अशी आहे की, पहिल्या वेळी एकच निविदाकार होता. त्यानंतर दुसऱ्यांदा निविदा काढण्याचे ठरविले त्यामध्ये पाच निविदाकार आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या सर्व एकाच निविदाकाराच्या सिस्टर कन्सर्न होत्या का ? आज खुल्या बाजारामध्ये 300-400 रुपयांमध्ये नाईट ड्रेस उपलब्ध आहेत. तरी देखील आपण हे सर्व नाईट ड्रेस चढ्या भावाने विद्यार्थीनींसाठी खरेदी केले आहेत. यामध्ये घोटाळा नाही असे स्पष्ट म्हटले आहे. पण हा घोटाळा नाही का ? आपण हे ड्रेसेस कोठे कोठे दिले, कोणकोणत्या भागामध्ये हे ड्रेसेस दिलेले आहेत. आपण माझ्याबरोबर या. हे ड्रेसेस कोठेही आढळून आले नाहीत. मी आपल्याला आश्रमशाळांची माहिती घेऊन सांगतो. मी आपल्याला आश्रमशाळांची नावे सांगतो. वाडा, मोखाडा येथील आश्रमशाळेत हे ड्रेस नाहीत. मेळघाटमधील आश्रमशाळांमध्ये हे ड्रेस नाहीत. अक्कलकुवा येथील आश्रमशाळेमध्ये ड्रेस नाहीत ही ऑथंटिक माहिती आहे. ही गोष्ट खरी आहे का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण जे नाईट ड्रेस देतो त्यासाठी दोन वर्षापूर्वी कापड खरेदी केले होते. त्या संदर्भात निविदा मागविली होती. त्यानंतर आता एकूण 2 लाख 7 हजार विद्यार्थीनींना ड्रेस दिलेले आहेत. ज्या निवासी विद्यार्थीनी आहेत त्यांना 2 ड्रेसेस दिलेले आहेत आणि ज्या निवासी विद्यार्थीनी नाहीत, ज्या विद्यार्थीनी आश्रमशाळेत शिकतात परंतु घरी राहतात त्यांना एक ड्रेस दिलेला आहे. पूर्वी आपण दरकराराप्रमाणे खरेदी करीत होतो. आता ई-टेंडरींग केलेले आहे. ई-टेंडरींगमध्ये एक निविदा आली त्यामुळे परत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन निविदा मागविल्या. त्यामध्ये पाच निविदा आल्या. खरेदी करण्यासाठी आदिवासी विभागामध्ये ज्या 4 समित्या आहेत त्यातील 2 नंबरच्या समितीला याचे अधिकार दिलेले आहेत. त्या पध्दतीने निविदा आल्या. त्या निविदा सिस्टर कन्सर्न नव्हत्या. त्यांना विभागून दिलेले आहे. सर्व ड्रेसेस पोहोचलेले आहेत. कोणत्या ठिकाणी ड्रेसेस पोहोचले नाहीत हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर त्याची चौकशी करण्यात येईल. माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार सगळीकडे ड्रेसेस

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ....

पोहोचलेले आहेत. आपणच नाही तर या मुलांसाठी नाईट ड्रेसची खरेदी सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाने केलेली आहे. त्यांचे दर सुध्दा मी पाहिलेले आहेत. आपण बैठकीमध्ये वाटाघाटी करुन दर कमी केलेले आहेत. इयत्ता पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी आणि दहावी यांचे वेगवेगळे ड्रेसेस आहेत. त्याप्रमाणे खरेदी केलेली आहे. सामाजिक न्याय विभागापेक्षा आपले दर कमी आहेत. सन्माननीय सदस्यांनी घोटाळ्याच्या संदर्भात किंवा ड्रेसेस मिळाले नाहीत असे सांगितले. ते का मिळाले नाहीत याची चौकशी करण्यात येईल.

**तालिका सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.54 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.**: राज्यातील बोगस शिधापत्रिकांवर कारवाई करणे

**मु.शी.**: राज्यातील बोगस शिधापत्रिकांवर कारवाई करण्यासंबंधी माननीय अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे निवेदन

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KTG/ D/ D/

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबईतील प्रतिक्षानगर येथे शाळेसाठी म्हाडाने राखीव ठेवलेल्या भूखंडावर शाळा बांधण्याबाबत**

**(1) * 38208 श्री. विजय गिरकर , श्री.चरणसिंग सप्रा, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील प्रतिक्षानगर येथे शाळेसाठी म्हाडाने 2496 चौ.मी.चा भूखंड राखीव ठेवण्यात आला असतानाही महानगरपालिकेच्या उदासीनतेमुळे या भूखंडावर अद्यापी शाळा बांधण्यात आली नसल्यामुळे या परिसरातील विद्यार्थी शाळेच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, म्हाडाने शाळेसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या भूखंडावर त्वरित शाळा बांधण्याबाबत तसेच शाळा बांधण्यास उदासिनता दाखविणाऱ्या महानगरपालिका अधिकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही. कारण सदर भूखंडावर BEST चे सब स्टेशन बांधण्यात आले असून त्यामुळे सदर भूखंड शाळा म्हणून विकसित झाल्यानंतर तेथील शालेय विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका संभवतो. म्हणून त्याचे स्थलांतर इतर ठिकाणी करण्याबाबत म्हाडा कार्यालयास वारंवार कळविण्यात आले असून म्हाडा कार्यालयाने असमर्थता दाखविली आहे. तथापि, या संदर्भात दिनांक 16.02.2013 रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडील बैठकीत ठरल्यानुसार बेस्ट उपक्रमाकडून इलेक्ट्रीक (Transformer) ट्रान्सफॉर्मर वीजग्रहण केंद्राजवळ रस्त्यालगत स्थलांतरित करुन घेण्यात आले असून वीजग्रहण केंद्राभोवती संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी आरक्षित 2328.81 चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(2) व (3) याबाबत म्हाडा कार्यालयाकडे कार्यवाही प्रलंबित होती त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, प्रतिक्षानगर येथे संक्रमण शिबिरांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या 1 लाखापेक्षा अधिक झालेली आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या शाळेची आवश्यकता असताना महानगरपालिकेच्या शाळेचा प्लॉट बेस्टला कोणाच्या परवानगीने देण्यात आला आहे ? लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "म्हाडा कार्यालयाकडे कार्यवाही प्रलंबित होता." ही कार्यवाही म्हाडाकडे केव्हापासून प्रलंबित होती ? त्या भागात दुसरी शाळा नसल्यामुळे व खाजगी शाळांमध्ये सुविधा नसल्यामुळे तेथे मुंबई महानगरपालिकेची शाळा सुरु केली जाईल का ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38208...

श्री. भास्कर जाधव : हा शाळेचा विषय प्रलंबित होता ही गोष्ट खरी आहे. हा 2496 चौ.मी.चा प्लॉट होता. या संदर्भात 15 एप्रिल 2013ला अंतिम निर्णय झालेला आहे. अंतिम मोजणी नुसार 2315.80 चौ.मी. जागा महापालिकेने ताब्यात घेतलेली आहे. तेथील ट्रान्सफॉर्मर शिफ्ट केलेला आहे. 2315 चौ.मी.वर 8 फूट उंचीची कंपाऊडवॉल बांधलेली आहे. उर्वरित 180 चौ.मी. जागेवर कशा प्रकारे सबस्टेशन झाले यासंबंधीचा विचार केला जाईल. ही महापालिकेची जागा असल्यामुळे शाळा उभी करण्याचे काम महापालिकेतर्फे होईल.

ॲड. आशिष शेलार : 2315.80 चौ.मी.चा प्लॉट ताब्यात घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्या ठिकाणी शाळेची आवश्यकता मान्य केलेली आहे. शाळा बांधण्यासाठी बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेली आहे काय, नसल्यास ती करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : शिक्षण विभागाकरिता बजेट प्रोव्हिजन केलेली आहे. मी आजच सकाळी यासंबंधीची माहिती घेतली. या वर्षासाठी लागणा-या निधीची पूर्ण तरतूद केलेली आहे.

श्री. कपिल पाटील : उपनगरामध्ये जेथे म्हाडाचे प्लॉट आहेत तेथे वस्ती वाढलेली आहे. त्याठिकाणी महापालिका शाळा बांधत नाही. महापालिकेच्या शाळांमध्ये मुले जात नाहीत. त्या भूखंडाच्या आजूबाजूला ज्या खाजगी संस्था शाळा चालवित आहेत त्या संस्थांना शाळा काढण्यासाठी जागा मिळत नाही. तेव्हा ही जागा अशा खाजगी शिक्षण संस्थेला देण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : तशा प्रकारचा कोणताही विचार नाही.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विरार-बोळींज (जि.ठाणे) येथे म्हाडामार्फत राबविण्यात येत असलेल्या महाप्रकल्पाबाबत**

**(२) * ३८०९४ श्रीमती विद्या चव्हाण , श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील विरार येथे म्हाडाने विरार-बोळिंज हा ५००० घरांचा महाप्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, या प्रकल्पावर किती खर्च करण्यात येणार आहे व या प्रकल्पाच्या कामास केंव्हा सुरुवात करण्यात येईल ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) व (२) म्हाडामार्फत विरार-बोळींज येथे अल्प उत्पन्न गटासाठी ३६५८ व मध्यम उत्पन्न गटासाठी १७२९ अशा एकूण ५३८७ गाळयांचा प्रकल्प स्टिल्ट + २२/२४ मजल्यांमध्ये इमारतीत प्रस्तावित आहे. यातील अल्प उत्पन्न गटांच्या गाळ्यांचे ३२८.०० चौ.फू. व मध्यम उत्पन्न गटाच्या गाळ्यांमध्ये ६२८.०० चौ.फू. चटई क्षेत्र आहे. या प्रकल्पांतर्गत या योजनेसाठी लागणारे रस्ते, गटार व पाणी पुरवठा व्यवस्था, नाला ट्रेनिंग, सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट, वीजकेंद्र इत्यादी पायाभूत सुविधांचा समावेश आहे.
(३) म्हाडामार्फत विरार-बोळींज येथे राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाकरिता अंदाजे रु.१३५७.७६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरु करण्यासाठी दि.२८/३/२०१२ रोजी व दुसऱ्या टप्प्याचे काम सुरु करण्यासाठी दि.११/२/२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

श्री. विक्रम काळे : म्हाडातर्फे सुरु होणा-या या प्रकल्पाचा कालावधी किती आहे ? या प्रकल्पाची आजची स्थिती काय आहे ?

श्री. सचिन अहिर :दोन टप्प्यामध्ये प्रकल्प पूर्ण होणार आहे. आजच्या स्थितीत प्लिंथचे काम सुरु आहे. 2014ला पहिला टप्पा आणि 2015ला दुसरा टप्पा पूर्ण करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : या प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे काय ? मुंबईमध्ये 15-20 वर्षे वास्तव्य केलेल्या नागरिकांना आणि महाराष्ट्रातील ज्या लोकांना घरांची निकड आहे त्यांना सदनिका देण्यात येतील काय ?

श्री. सचिन अहिर : पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. नियमाप्रमाणे ज्यांचे 15 वर्षाचे वास्तव्य महाराष्ट्रामध्ये आहे त्यांना घरे वितरित करण्यात येतात. हे वितरण पारदर्शक पध्दतीने,लॉटरी पध्दतीने केले जाते.

---

...3..



**नाशिक महानगरपालिकेतील विविध कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(३) * ३७३७८ श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले :**
सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमधील एस.टी.पी प्लॅन्ट जमीन प्रकरणात ३६ कोटी, खत प्रकल्पात १० कोटी, कमान बांधकाम न्यायालयीन प्रकरणामध्ये साडेतीन कोटी, गोदाकाठावरील बांधकामाबाबत पावणेतीन कोटी तसेच पेलीकन पार्क प्रकरणी ठेकेदाराने न्यायालयामार्फत केलेली १५ कोटीची मागणी या प्रमाणे महानगरपालिकेला कोट्यवधी रूपयाचा भुर्दंड सहन करावा लागल्याचे माहे डिसेंबर, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) तपोवन येथील एस.टी.पी. प्लँट प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आलेल्या जमिनीकरिता अद्याप वाढीव मोबदला अदा करण्यात आलेला नाही. सदर प्रकरणी रोख रकमेऐवजी बँक गॅरंटीद्वारे रक्कम जमा करण्याची बाब मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. खत प्रकल्पाकरिता भूसंपादनासंदर्भात वाढीव मोबदला देण्याबाबत मा.जिल्हा न्यायालयाच्या आदेशानंतर महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. कमान प्रकरणी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार रु.२ कोटी ६६ लाख इतक्या रकमेच्या भरणा नाशिक महानगरपालिकेकडून मा.जिल्हा न्यायालयात करण्यात आला. गोदाकाठ बांधकाम आणि पेलीकन पार्कबाबतची न्यायालयीन प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्यामध्ये मा.न्यायालयाने अंतिम आदेश पारित केले नसल्याने महानगरपालिकेकडून अद्याप रक्कम अदा करण्यात आलेली नाही.
(२), (३) व (४) मा.न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने संबंधितांना नुकसान भरपाई द्यावी लागत आहे. याबाबत शासनाने चौकशी केलेली नाही.

श्री. जयवंतराव जाधव : नाशिक महानगरपालिकेच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधितांना नुकसान भरपाई द्यावी लागते. संबंधित व्यक्ती हया न्यायालयामध्ये का जातात ? न्यायालयामध्ये दावा दाखल केल्यानंतर करोडो रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायालया तर्फे महापालिकेला दिले जातात. यासंदर्भातील मी एक उदाहरण सांगतो. पेलीकन पार्क संबंधीच्या विषयामध्ये ठेकेदाराने महापालिकेचे सर्व फायदे घेऊन १५ कोटी रु.ची मागणी केली. महापालिका ५ कोटी रुपये देण्यात तयार होती. परंतु ॲड. रेवती कोतवाल यांनी महापालिकेची बाजू कोर्टामध्ये मांडून ती केस महापालिकेला जिंकून दिली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.शिगम 13:10

ता.प्र.क्र.37378...... श्री.जयवंतराव जाधव....

महापालिकेचे प्रशासन आणि संबंधित ठेकेदार यांच्यात साटेलोटे असल्यामुळे महापालिकेला भूर्दंड सहन करावा लागत आहे. यासाठी उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, अशा पध्दतीने लोक कोर्टात का जातात? लोकशाहीमध्ये ही व्यवस्था केलेली आहे. म्हणून त्या मार्गाचा अवलंब केला जातो. संबंधित ठेकेदार आणि प्रशासन संगनमताने समोरच्या पक्षकाराला कोर्टात जायला भाग पाडतात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे नुकसान करतात, अशा प्रकारचे विधान माननीय सदस्यांनी केले आहे. हे प्रकरण सिव्हिल कोर्टातून जिल्हा कोर्टात, नंतर हायकोर्टात आणि पुढे सुप्रीम कोर्टात गेले होते. जमीन मालकाला नुकसान भरपाई देण्यात यावी, असा सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला. सुप्रीम कोर्टाचा निर्णय लक्षात घेता दुसरा पर्याय दिसत नाही. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल की, संगनमताने झाले आहे तर त्या प्रकारचा ठोस पुरावा सादर करता आला तर त्या अँगलने बघता येण्यासारखे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक नुकसान होणे बरोबर नाही. परंतु आज तरी तसा पुरावा उपलब्ध नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिक महापालिकेच्या आर्थिक कारभारामुळे या अडचणी निर्माण होतात. ज्या नाशिक शहरामध्ये सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे, त्या दृष्टीने तपोवन आणि इतर ठिकाणच्या जागी एसटीपी लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. न्यायालयीन कारणे दाखवून विषय प्रलंबित ठेवल्यामुळे सोयी सुविधा उपलब्ध होणार नाहीत, गैरसोय निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याकरिता शासनाने मध्यस्थी करुन महापालिकेच्या ज्या अधिकाऱ्यांकडून चुका झाल्या असतील त्यांची चौकशी करुन ते दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : ब-याचदा असे दावे प्रतिदावे, वाद प्रतिवाद केले जातात. कधी तरी समंजसपणाने तोडगा निघतो. निघत नाही असे नाही. दोन्ही पक्षकारांची हौस फिटलेली असते. मध्यस्थी करुन महापालिकेचे समोरच्या लोकांकडून होणारे आर्थिक नुकसान कमी करण्याचे प्रयत्न झाले तर ते करण्यास हरकत नाही. दोन वर्षानंतर होणाऱ्या कुंभमेळ्यावर याचा विपरित परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : हा प्रश्न सहज सुटणारा दिसत नाही. ठेकेदाराला कोर्टात जाण्याचा अधिकार आहे. कोणत्याही नागरिकाचा अधिकार डावलण्याचे कारण नाही. वारंवार असे निदर्शनास आल्यानंतर संशयाला जागा उरते. जाणीवपूर्वक त्रुटी ठेवून त्यांनी कोर्टात जावे, कोर्टात नुकसान भरपाईची मागणी करावी. यामुळे कोट्यवधी रुपयांचा भूर्दंड स्थानिक स्वराज्य संस्थेला सहन करावा लागतो. मंत्री महोदयांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाने पैसे द्यावेत असे आदेश दिले आहेत. अशी अनेक प्रकरणे आहेत. प्रथमदर्शनी संशयाचे वातावरण वाटते म्हणून याबाबत चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कारवाई करणार आहात काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दोन एस.टी.पी.प्लँट आहेत. याकरिता काही जमीन संपादित करावयाची होती. जमीन संपादित करीत असताना जमिनीचा मोबदला भूसंपादन अधिकारी निश्चित करीत असतात. या प्रकरणामध्ये जमिनीचा मोबदला म्हणून रु.1,28,07,478 एवढी रक्कम निश्चित केली होती. अंडर प्रोटेस्ट कोर्टात रक्कम जमा करुन घेतली जाते. या जमिनीबाबत 60 मालक होते, त्यापैकी 43 जमीन मालक कोर्टात गेले. जिल्हा कोर्टात महापालिकेच्या विरुध्द निर्णय आला. त्या निर्णयाच्या विरोधात महापालिकेने हायकोर्टात अपील दाखल केले. हायकोर्टात महापालिकेच्या विरुध्द निर्णय आला. त्या निर्णयाच्या विरोधात महापालिकेने सुप्रीम कोर्टात अपील दाखल केले. सुप्रीम कोर्टाने सुध्दा महापालिकेच्या विरोधात निकाल लागला अशी परिस्थिती आहे.

ॲड.आशिष शेलार : एस.टी.पी.प्लँटबाबत मी प्रश्न विचारु इच्छितो. जागा ही सर्वात किंमती आहे.

नंतर 2ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37378** ......

ॲड.आशिष शेलार...

जागेच्या किंमती जास्त असल्यामुळे एसटीपीसाठी जागा संपादन करण्यासाठी वाद सुरु झाले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, जगभरात आज एसटीपीच्या बाबतीत अशा काही टेक्नॉलॉजी विकसित झाल्या आहेत की, त्यामध्ये जागा कमी लागते, विजेचा वापर कमी होतो व टर्चरी लेव्हलची ट्रिटमेंट चांगली होते. त्यामुळे अशा प्रकारच्या टेक्नॉलॉजी नाशिक महानगरपालिकेने घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अशी टेक्नॉलॉजी नाशिक महानगरपालिकेने घ्यावी असे आपण निर्देशित करणार आहात काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी अतिशय चांगल्या प्रकारची माहिती दिलेली आहे. नाशिक महानगरपालिकेत सन्माननीय सदस्यांच्या पक्षाची व मनसेची सत्ता आहे असे कळाले आहे. त्यामुळे ते नाशिक महानगरपालिकेचे प्रबोधन करण्यासाठी गेले तर त्यामध्ये शासनाच्या वतीने पुढाकार घेतला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अद्यापपर्यंत पुरावे उपलब्ध झालेले नाहीत अशी माहिती माननीय मंत्री महोदयांनी येथे दिलेली आहे. पुरावे देण्याची आणि बघण्याची जबाबदारी कोणाची आहे ? स्थायी समितीमध्ये सुध्दा यावर आक्षेप घेतले गेले आहेत. एसटीपी प्लँटच्या संदर्भात एक सिंधी व्यक्ती शेतकरी नसतांना त्याने त्या ठिकाणची जमीन घेतली व शेतीचा झोन बदलला. अशा प्रकारचे सर्व पुरावे असतांना यामध्ये चूक नसेल तर सोडून द्या परंतु चूक असेल तर यासंदर्भात आपण चौकशीचे आदेश देणार आहात काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाच्या प्रथे प्रमाणे सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ग्राहय धरुन सदर प्रकरणाची चौकशी करता येईल. परंतु या क्षणाला ही बाब सुप्रीम कोर्टात आहे. असे असतांनाही प्रशासकीय पातळीवर चूक झाली असेल तर निश्चितपणे उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील बेरोजगार महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) * ३७९०९ डॉ.नीलम गोऱ्हे , श्री.विनायक राऊत, ॲड.आशिष शेलार, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.मोहन जोशी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील बेरोजगार महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या नावाखाली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून प्रत्येकी ३० लाख रुपयांचे अनुदान आणि बँक ऑफ बडोदाकडून ५० लाख रुपयांचे कर्ज घेऊन प्रत्यक्षात एकाही महिलेला रोजगार मिळवून न देणाऱ्या चारपैकी दोन बचत गट अखिल संघाना कर्ज थकविल्याप्रकरणी कर्जवसुली न्यायाधिकरणाने नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीन गटांनी प्रकल्प सुरु करण्याची कागदोपत्री जागा दाखवली असून प्रत्यक्षात प्रकल्प उभारलेला नसल्याचे आढळून आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बचत गटांची नावे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार सदर बचत गटाकडून कर्जवसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (१) होय.
(२), (३), (४) व (५) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत याप्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून स्वाधारा महिला बचत गट अखिल संघ व चिनार महिला बचत गट अखिल संघ पिंपरी यांनी प्रकल्प उभारले नसल्याचे आढळून आले तसेच बँक ऑफ बडोदाने बँक एन्ड सबसिडीच्या कार्यपध्दतीप्रमाणे महानगरपालिकेने दिलेल्या अनुदानाची रक्कम अनुदान आरक्षित निधीत ठेवली नसल्याने आढळून आल्यामुळे बँक विरुध्द गुन्हा दाखल का करु नये याबाबत बँकेस नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच बँकेचे कर्ज परतफेडीपुर्वी अनुदानाची रक्कम बँकेने संबंधीत बचतगटांना अदा केल्यामुळे सदर रक्कम महानगरपालिकेस परत करण्याबाबत बँक ऑफ बडोदा पिंपरी शाखा यांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,४ वर्षापूर्वी २.५ कोटी रुपये विविध बचतगट महासंघांना बँकेनी दिलेले असून महानगरपालिकेने यामध्ये अनुदान सुध्दा दिलेले आहे. यामध्ये प्रत्यक्षात महिलांना कोणताही रोजगार मिळालेला नाही किंवा कोणताही प्रकल्प उभारला गेला नाही. एका बाजूला १००० कोटी रुपयांची गुंतवणूक करुन निर्भयासारखी बँक केंद्र सरकार उभी करणार आहे. बचत गटामध्ये सामान्य महिला विश्वासाने आपले पैसे गुंतवित असतात. बचत गटांच्या नावाने सुमेत पॉलिमर कंपनीने महिलांना रोजगार मिळवून दिला जाईल व त्यासाठी आम्ही

...३...

**ता.प्र.क्र. : ३७९०९** ......

डॉ. नीलम गोऱ्हे....

प्रकल्प उभारतो असे आश्वासन दिले होते. माझ्या माहिती प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे नातेवाईक सुध्दा सुमेत पॉलिमर मध्ये आहेत. बचत गटांना पुढे करुन अशा प्रकारे २.५ कोटी रुपये अनुदान लाटण्याचा प्रकार झालेला आहे त्यासंदर्भात चौकशी करुन सुमेत पॉलिमरच्या लोकांवर खटला चालवून हे पैसे या महानगरपालिकेला परत मिळण्याच्या दृष्टिकोनातून व बचत गटांची फसवणूक होऊ नये यादृष्टिकोनातून आपण कोणती पाऊले उचलणार आहात ? असे मोठ मोठे प्रकल्प महानगरपालिकेचे अनुदान घेऊन उभारले जातात तेव्हा त्या प्रकल्पाची फिजिबिलीटी काय आहे हे पाहिले गेले पाहिजे. या कंपनीकडे विक्री कर क्रमांक नसतांना या कंपनीला हे काम देण्यात आलेले आहे. अशी परिस्थिती असतांनाही महापौर शिफारस करतात त्यावेळेला त्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आलेल्या प्रकल्पांची योग्य-अयोग्यता ठरविण्यासाठी नगरविकास विभाग कोणत्या स्वरुपाची देखरेख ठेवणार आहे ?

श्री. भास्कर जाधव :सभापती महोदय,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महिलांना रोजगार देण्याच्या उद्देशाने हा अतिशय स्तुत्य कार्यक्रम राबविला होता. हे काम एका कंपनीला देण्यापेक्षा चार बचत गटांना द्यावे यासाठी चार बचत गटांची स्थापना करण्यात आली होती. चार महिला बचत गटांना व्यवसाय मिळावा यासाठी प्रोत्साहन अनुदान किंवा सबसिडी महानगरपालिका देते ते पैसे या महानगरपालिकेने या व्यावसायिकाच्या हातामध्ये दिले नाहीत. प्रत्येक ३० लाखाप्रमाणे १.२० कोटी रुपयांचा बँक ऑफ बडोदा मध्ये भरणा केला होता.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37909...

श्री.भास्कर जाधव...

तो प्रोजेक्ट सुरू झाल्यानंतर बँकेने त्यांना पेमेंट करायला पाहिजे होते. बँकेने त्या बचत गटांना सबसिडी दिली. त्यातील दोन बचत गटांनी आपले व्यवसाय प्रत्यक्षात सुरूच केले नाहीत. पॉलिथीन फायबर पासून पॉलिथीन बॅगा बनविण्याचा त्यांचा व्यवसाय होता. त्यातील दोन गटाने हे काम सुरू केले. उरलेल्या दोन गटाने काम सुरू केले नाही. हा विषय आमच्या समोर आला त्यावेळी गांभीर्याने दखल घेण्यात आली. कालच या दोन्ही गटांकडून रक्कम वसूल करण्यात आली आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, 1 कोटी 20 लाख रूपयाचे अनुदान महापालिकेने किती वर्षापूर्वी बँक ऑफ बडोदामध्ये जमा केले होते ? आम्ही तारांकित प्रश्न उपस्थित केल्यामुळे काल पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने हे पैसे वसूल केलेले आहेत. आम्ही महानगरपालिकेचा फायदा करून दिलेला आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, आपण 1 कोटी 20 लाख रक्कम किती वर्षापूर्वी दिली होती त्यातील किती रककम काल बँक ऑफ बडोदाने परत केली आहे व उर्वरित रक्कम आपण बँकेकडून किती दिवसात वसूल करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आम्ही प्रश्न उपस्थित केल्यामुळे महानगरपालिकेचा फायदा झाला असे सांगितले आहे. हे जरी खरे असले तरी या खात्याचा कारभार आदरणीय मुख्यमंत्री महोदयांकडे आहे. त्यामुळे थोडेसे क्रेडिट त्यांना आणि जमले तर मला द्यावे. हा विनोदाचा भाग आहे. तो आपण सोडून द्यावा. 1 कोटी 20 लाख रूपये दिल्याचे मी सांगितले आहे. काल 60 लाख रूपये म्हणजे 100 टक्के रक्कम भरण्यात आलेली आहे. सन 2008 मध्ये ही रक्कम देण्यात आली होती.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रक्कम काल जमा झाली आहे. त्यामागे काय दक्षता आहे हे जगजाहीर आहे. प्रश्न लागल्यामुळे सदर रक्कम जमा झालेली आहे. या बचत गटाची फसवणूक सुमेध पॉलिमर या कंपनीने केली आहे. त्याच्या पाठीमागे कोण सूत्रधार आहेत व सुमेध पॉलिमरवर आपण कोणती कारवाई केली आहे हा माझा त्यातील मूळ प्रश्न आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37909...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण वसुली संबंधातील प्रश्न विचारला आहे. आता आपण सुमेध पॉलिमरवर काय कारवाई केली असा प्रश्न विचारला आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी मूळ रक्कम दिली आहे ती व्याजासह दिली काय, असा देखील प्रश्न उपस्थित केला होता. त्याला मी आपल्या अनुमतीने उत्तर देत आहे. त्यांनी व्याजासह रक्कम दिली नसेल तर ती व्याजासह वसूल करण्यासंबंधीचा पुन्हा एकदा तगादा त्याच्याकडे लावण्यात येईल. सुमेध पॉलिमर कंपनीने चुकीची गोष्ट केली असेल तर या कंपनीला या महानगरपालिकेमध्ये पुन्हा काम द्यावे काय यासंबंधी देखील गांभीर्याने विचार करावा लागेल.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या हद्दीतील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीस मंजूरी देण्याबाबत**

**(5) * 37280 ॲड.जयदेव गायकवाड, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या हद्दीतील म्हाडा वसाहतींना अडीच एफएसआय (चटई क्षेत्र निर्देशांक) शासनाने लागू केल्याचे दिनांक 24 जून,2012 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यासाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करुन नियमावलीचे प्रारुप माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्या दरम्यान मंजुरीसाठी पाठविण्यात आले असून अद्यापही शासनाने त्यास मंजुरी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(4) तसेच, म्हाडा वसाहतीचे पुनर्विकासांची कामे प्रलंबित राहिल्यामुळे नियमावलीच्या प्रारुपास मंजुरी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या हद्दीतील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी 2.5 एफ.एस.आय. मंजूर करण्याबाबत नगर विकास विभागाने दि.24/06/2011 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

(2), (3) व (4) मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरातील म्हाडा वसाहतींसाठी लागू केलेल्या 2.5 एफ.एस.आय. चा लाभ मूळ सदनिकाधारकांना तसेच म्हाडाला परवडणाऱ्या घरांचे स्वरुपात होण्याच्या दृष्टीने विकास नियंत्रण नियमावलीत काही सुधारणा करण्याचा प्रस्ताव म्हाडा स्तरावर विचाराधीन आहे. म्हाडाचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यावर, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या हद्दीतील म्हाडा वसाहतीच्या पुर्नविकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये योग्य ती सुधारणा करण्याबाबत शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील म्हाडा वसाहतींना 2.5 एफएसआय देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यास जवळ जवळ 9 महिने उलटून गेले आहेत. त्याची नियमावली न केल्याने विकासाची सर्व कामे थांबलेली आहेत. तेव्हा या नियमावलीला अधिकृत मान्यता कधी मिळणार आहे व घरांच्या पुनर्विकासाचे काम कधी सुरू होणार आहे ? सामान्य नागरिकांना परवडणारी घरे बांधणे हा म्हाडाचा मुख्य उद्देश आहे. परंतु, आज हे काम रखडल्या सारखी परिस्थिती आहे. तेव्हा यास कधी चालना मिळणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37280..

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, कालच या प्रश्नासंबंधी विधानसभेच्या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन उत्तर देण्याचा प्रयत्न केला होता. आपण 24 जून 2011 रोजी नोटीफिकेशन काढले होते. पण ते प्रॅक्टीकल होत नाही असे लक्षात आले. मुंबई शहरासाठी 33(5) चे धोरण देखील प्रलंबित होते हे आपणा सर्वांना माहीत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, याच अधिवेशनात धोरण जाहीर करण्यात येईल. त्याला अनुसरून पुण्यासाठी आपल्याला बेस तयार करता येईल काय, असाही एक प्रस्ताव विचाराधीन आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, येत्या 3 महिन्याच्या आत गृहनिर्माण विभागाकडून धोरणामध्ये जे प्रस्तावित बदल आहेत ते करण्यात येतील. आज प्रॅक्टीकल काही होत नाही. मुंबईचा नियम आपण पुण्याला लागू करण्याचा प्रयत्न केला तरी दोन वर्षात तेवढा प्रतिसाद आपल्याला मिळालेला नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37280 . . . .

श्री.सचिन अहिर . . ..

सभापती महोदय, याबाबत एक समिती मुख्य अधिकाऱ्यांच्या अंतर्गत गठीत केली होती. याठिकाणी 3 महिन्याच्या आत तो प्रस्ताव विभागाकडून तयार केला जाईल.

------

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**नागपूर शहरात होत असलेल्या अवैध वाहतुकीबाबत**

**(6) *38504 श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ऑल्टो, ॲपे, मॅलिक, विक्रम आणि सहा सीटर या वाहनांना वाहतुकीकरिता केवळ ग्रामीण भागातच परवानगी असतानाही नागपूर शहरात सर्रासपणे ही वाहने वाहतूक करीत असल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, प्रत्येक वाहन चालक आपल्या मार्गावरील वाहतूक पोलीस विभागाला प्रति महिना 1200 रुपये देत असल्याचेही व हे पैसे न दिल्यास सहा सीटर वाहने वाहतुकीकरिता चालू देत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने अवैध वाहतुकीला पाठिंबा देणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(३) व (४) शहर भागात बंदी असताना देखील वाहतूक करणाऱ्या सहा आसनी ऑटोरिक्षांच्या विरोधात प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर) यांच्या भरारी पथकामार्फत माहे एप्रिल, २०१२ ते फेब्रुवारी, २०१३ मध्ये तपासणीत दोषी आढळून आलेल्या ४५५ ऑटोरिक्षा चालक/धारकांकडून दंडाच्या स्वरुपात रु.१४.९९ लाख वसूल केले तसेच ८१ ऑटोरिक्षांचे परवाने निलंबित केले.

तसेच पोलीस उप आयुक्त, नागपूर शहर यांनी माहे जानेवारी ते फेब्रुवारी, २०१३ मध्ये ३३४ ऑल्टो, ॲपे, मॅजिक, विक्रम ॲपे वाहनांवर कारवाई करुन रु.४,०३,५०० दंड वसूल केला असून १७ सहा सीटर वाहनांवर कारवाई करण्यात येऊन रु.१८,६०० वसूल केले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, नागपूर शहरातील वाहतुकीचा प्रश्न हा फार महत्वाचा प्रश्न आहे. ऑटो रिक्षा, कॅब आणि तीन सीटर वाहनांना ग्रामीण भागात वाहतूक करण्याची परवानगी असतानाही तेथे सर्रासपणे बेकायदेशीरपणे वाहतूक सुरु असते.या वाहतुकीच्या बाबतीत प्रत्येक वाहन चालकाकडून 1200 रुपयापर्यंतचा हप्ता वसूल केला जातो अशी माहिती समोर आली आहे आणि शासनाने उत्तरामध्येही तशा प्रकारचा दंड वसूल केल्याची कबूली देखील दिली आहे. त्यामुळे नागपूर शहरामध्ये वाहतुकीच्या बाबतीत जटील प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याठिकाणी ऑटो रिक्षा देखील मीटर वापरत नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी प्रश्न विचारावा.

. . . .2 सी-3



असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.38504 . . . .

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, याबाबतीत सखोल चौकशी करुन नागपूर शहरामध्ये ऑटो, कॅब, मॅजिक आणि तीन सीटर वाहनांना शहरामध्ये वाहतूक करण्याची परवानगी नसतानाही जे शहरामध्ये वाहतूक करतात, त्यांच्यावर आपण कायदेशीर कारवाई करणार आहात काय आणि संबंधितांचे परवाने रद्द करणार आहात काय ? तसेच जे पोलीस हप्ते वसूल करतात त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार आहे काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, शहरामध्ये सहा आसनी रिक्षांना वाहतुकीसाठी बंदी घालण्यात आली आहे. त्यानुसार सातत्याने त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे धोरण पोलीस विभाग आणि परिवहन विभागाच्या माध्यमातून केले जाते. आतापर्यंत नागपूर शहरातील ज्या सहा आसनी ऑटो रिक्षा आहेत, त्या 3085 वाहनांची तपासणी एप्रिल 2012 ते मार्च 2013 या कालावधीमध्ये केली आणि किमान 801 वाहनांना मेमो देण्यात आला आहे. त्यामधून 22 लक्ष 49 हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे आणि जवळपास 90 परवाने निलंबित करण्यात आले आहेत. याच पध्दतीने यामध्ये खाजगी संवर्गातील ज्या रिक्षा आहेत, त्यामध्ये सुध्दा 567 वाहनांना मेमो देण्यात आला आहे आणि त्यांच्याकडूनही 10 लाख 96 हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे आणि 331 वाहनांची नोंदणी निलंबित केली आहे आणि 53 वाहनांचा परवाना निलंतबत केला आहे. तसेच नागपूर ग्रामीण कार्यालयाकडून जवळपास 225 वाहने तपासण्यात आली. त्यापैकी 46 वाहनांना मेमो देण्यात आला आहे आणि 126 वाहनांचा परवाना निलंबित केला आहे आणि जे 7 वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित केलेली आहे. त्याच पध्दतीने

पोलीस विभागाकडून सुध्दा वारंवार कारवाई करण्यात येत असते. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थत केला की, पोलीस विभागामार्फत कोणती चौकशी करण्यात येणार आहे? तर याबाबतीत निश्चितपणे गृह विभागाकडे यासंदर्भात रिपोर्ट करण्यात येईल आणि कडक कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या जातील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, नागपूर मध्ये एकाच परमिटवर दोन-दोन, तीन-तीन रिक्षा चालविल्या जातात असे दिसून आले आहे. अशा परमिट धारकांवर कारवाई केलेली आहे काय आणि अशा बनावट परमिट धारकांची एकूण संख्या किती आहे? दुसरा प्रश्न असा आहे की, नागपूरमध्ये रिक्षामधून शाळेतील मुलांना सोडले जाते. स्कूल बसचा जो कायदा आहे तो धाब्यावर

2 सी-4...



असुधारीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38504 . . . .

डॉ.दीपक सावंत ....

बसवून रिक्षातून मुलांना सोडले जाते ही गोष्ट खरी आहे काय आणि आपण अशा रिक्षांवर कारवाई करणार आहात काय? मुंबईमध्ये देखील तीच परिस्थिती आहे.टॅक्सीवाल्यांची अनेक परमिट आहेत आणि ती गिरणी कामगारांना देण्याच्या बाबतीतील संकल्पना पुढे आली आहे. अशा वेळी ही परमिट गिरणी कामगारांच्या मुलांना प्राथम्याने देणार आहात काय असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . .

..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38504...

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एकाच लायसन्सवर दोन-तीन ऑटो रिक्षा चालविल्या जातात. मी अगोदरच सांगितले आहे की, आम्ही ज्या ज्या कारवाया केल्या, तपासण्या केल्या त्यामध्ये आपण उल्लेख केलेल्या बाबीचा देखील समावेश आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की गिरणी कामगारांच्या मुलांना निलंबित झालेली लायसेन्स देण्यात येतील काय ? त्या संदर्भात सांगू इच्छितो की, जे काही परवाने निलंबित झालेले आहेत त्याबाबत पुन्हा जाहिरात काढणार आहोत. त्यामध्ये आपण विविध प्रकारचे रिझर्व्हेशन ठेवलेले आहे.मग त्यामध्ये महिला, अपंग किंवा इतर संवर्गाचा समावेश आहे. त्यामध्ये गिरणी कामगारांचा समावेश करता येईल किंवा कसे या बाबत तपासून निर्णय घेण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लेखी उत्तरातील क्रमांक 1 व 2 मध्ये नमूद केलेले आहे की, "हे खरे नाही." आणि पुढे कारवाई करण्याचे म्हटलेले आहे. एप्रिल 2012 ते फेब्रुवारी 2013 या कालावधीत कारवाई झालेली आहे. ही कारवाई भरारी पथकाने केलेली आहे. तेव्हा आपले पोलीस आणि अधिकारी काय करीत होते असा प्रश्न निर्माण होतो. उत्तरामध्ये किती रक्कम वसूल करण्यात आली याची माहिती दिलेली आहे. परंतु त्यामध्ये काही हशील नाही. जे चुकीचे केले जात आहे ते होऊ नये असे आम्हाला आणि कायद्याला अभिप्रेत आहे. भरारी पथकाने जी कारवाई केली ती आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी करावयास पाहिजे होती. तेव्हा संशयाला जागा राहते. कोणाच्या तरी मेहरबानीने हे चालले आहे काय ? या संदर्भात चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या प्रकरणी दोन-तीन विभागांनी कारवाई केलेली आहे. भरारी पथकाने केलेल्या कारवाईची माहिती दिलेली आहे. नागपूर शहरातील अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईची माहिती दिलेली आहे. नागपूर ग्रामीण परिवहन अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेल्या कारवाईची देखील माहिती दिलेली आहे. जर अधिकारी कोणाला पाठिशी घालत असतील किंवा दुर्लक्ष करीत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38504...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी लायसेन्स जप्त केलेली आहेत ती गिरणी कामगारांना देण्यात येतील काय असा प्रश्न विचारला होता. आपण उत्तर देताना सांगितले की, त्यामध्ये गिरणी कामगारांच्या सवंर्गाचा विचार करावा लागेल. मला सांगायचे आहे की, गिरणी कामगार हा सवंर्ग होऊ शकत नाही. आपणास तसा स्पेसिफीक उल्लेख करावा लागेल. तेव्हा या रिझर्व्हेशनमध्ये गिरणी कामगारांचा समावेश करण्यात येईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी अगोदर सांगितलेले आहे. आम्ही ज्या ज्या संवर्गाचा समावेश केलेला आहे त्या व्यतिरिक्त गिरणी कामगारांचा समावेश करायचा असेल तर ती बाब तपासावी लागेल. या प्रकरणी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाकडे सहानुभूतीपूर्वक पहावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मुंबई शहरामध्ये 30 हजार बोगस लायसेन्स आढळून आली आहेत. या ठिकाणी दोन्ही बाजूच्या सदस्यांचा आग्रह आहे. गिरणी कामगार आज देशोधडीला लागले आहेत, त्यांना घर देण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे त्याबद्दल आम्ही नेहमीच स्वागत केलेले आहे. माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या संदर्भात आपणास धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. प्रवर्गामध्ये गिरणी कामगाराचा समावेश होणार नाही आणि ते या सुविधेपासून वंचित राहतील. तेव्हा मुंबई किंवा नागपूर शहर असो एक विशेष बाब म्हणून गिरणी कामगारांना किंवा त्यांच्या मुलांना लायसेन्स मिळवून देण्यासाठी शासन मदत करणार काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या प्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

--------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**डहाणू (जि.ठाणे) येथील राज्य परिवहन मंडळाच्या डहाणू मध्यवर्ती बस स्थानकासमोर कचऱ्याचे ढीग साचल्याबाबत**

**(७) * ३८८१६ श्रीमती अलका देसाई , श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.ठाणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या डहाणू मध्यवर्ती बस स्थानकासमोर कचऱ्याचे ढीग साचले असल्याने त्या भागात दुर्गंधी व डासांचा उपद्रव वाढला असल्याचे माहे जानेवारी, २०१३ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू बस स्थानकातून राज्यातील विविध भागात बससेवा होत असल्याने तेथे नेहमीच गर्दी असते, या स्थानकालगतच असलेल्या भिंतीच्या पलीकडे मुख्य रस्त्यालगत कचरा टाकला जात असल्याने तेथे डास, उंदराचा त्रास वाढल्यामुळे जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन चौकशी करुन आवश्यक ती काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४) डहाणू (जि.ठाणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या डहाणू मध्यवर्ती बस स्थानकासमोर कचऱ्यांचे ढीग साचले असल्याने त्या भागात दुर्गंधी व डासांचा उपद्रव वाढला असल्याची तक्रार डहाणू नगरपालिकेकडे प्राप्त झाल्यावर माहे फेब्रुवारी-२०१३ पासून नगरपरिषदेने सदरची जागा बदलून मल्याण सेंग्रीगेशन सेंटर येथे घंटागाडीद्वारे गोळा केलेला कचरा संकलनाचे काम सुरू केले आहे. डहाणू मध्यवर्ती बस स्थानकासमोरील कचरा टाकण्यांत येणारी जागा नगरपरिषदेने बदलली असून सदर ठिकाणी संभाव्य दुर्गंधी, डासांचा त्रास व उपद्रवास प्रतिबंध केलेला आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी या विषयावर तारांकित प्रश्न दिल्यानंतर डहाणू नगरपालिकेने बस स्थानकासमोरील कचरा दुसरीकडे टाकण्याचे प्रावधान केले आहे. परंतु त्यामुळे माझे समाधान झाले नाही. डहाणू बसस्थानकातून सबंध राज्यात बसेस सुटतात. तेथून सुटणाऱ्या बसेसमधून अनेक प्रवाशी प्रवास करतात. त्या प्रवाशांनी संपूर्ण महाराष्ट्रभर आजार घेऊन जावे असे आपल्याला वाटते काय ? मी हा प्रश्न उपस्थित करेपर्यंत डहाणू नगरपरिषदेचे वरिष्ठ अधिकारी काय करीत होते, तसेच त्यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38816....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, डहाणू नगरपालिकेने कचरा उचलण्याच्या कामाचे आऊटसोर्सींग केले आहे. त्यांनी कंत्राटदाराला ठराविक जागा ठरवून दिलेली आहे. कंत्राटदार तेथून कचरा गोळा करुन ज्या ठिक्‍ाणी त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते त्या ठिकाणी नेत होते. फेब्रुवारी महिन्यापासून बस स्थानकासमोरील कचरा उचलण्यात आलेला आहे. तसेच मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बस स्थानक हे आजाराची वाहतूक करण्यासाठी नसून माणसांची वाहतूक करण्यासाठी आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, बस स्थानकासमोरील कचरा दुसरीकडे नेल्याचे लेखी उत्तरात नमूद आहे. परंतु लोकांना सवय लागली की ते त्याच ठिकाणी कचरा टाकतात बस स्थानकामध्ये हजारो लोक येत असतात. बस स्थानकाच्या परिसरात मोठी बाजारपेठ झालेली असते. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, प्रवाशांना विशिष्ट ठिकाणीच कचरा टाकण्याची सवय लावण्यासाठी तेथे कचरा डबे उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, बस स्थानकासमोर कचरा टाकला जातो म्हणून हा प्रश्न आलेला आहे. त्या बस स्थानकासमोर कचरा डबे उपलब्ध करुन दिले तर पुन्हा त्या परिसरात कचरा टाकला जाईल. त्यामुळे या संदर्भात सर्वांनी स्वयंशिस्त लावून घेतली पाहिजे. कारण प्रत्येक ठिकाणी आपण घाण करीत बसलो तर ती घाण शेवटी कोण उचलेल ? त्यामुळे पुढील काळात सार्वजनिक ठिकाणी जो घाण करेल त्याच्या दंडात्मक कारवाई करावी लागेल असे मला वाटते.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे शहरातील आग विझविताना जखमी झालेल्या दोन अग्निशमन दलाच्या जवानांना केईएम रुग्णालयामध्ये उपचार न मिळाल्याबाबत**

**(८) * ३८८८२ श्री.मोहन जोशी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मार्केटयार्ड येथील एका गोदामाला लागलेली आग विझविताना जखमी झालेल्या दोघा अग्निशमन दलाच्या जवानांना दिनांक १ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास रात्री तातडीने केईएम रुग्णालयामध्ये नेण्यात आले, त्यावेळी रुग्णालय प्रशासनाकडून त्यांना महापालिकेचे पत्र आणा नाहीतर आधी पैसे भरा मगच उपचार करू असे सांगून अडवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालय प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माननीय नगर विकास राज्यमंत्री महोदय कार्यक्षमपणे उत्तर देतात. परंतु या प्रश्नाला जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे त्यावर माझा आक्षेप आहे. पुणे शहरातील मार्केटयार्ड येथील एका गोदामाला लागलेली आग विझविताना जखमी झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांना रुग्णालयात दाखल करुन घेण्यात आले नाही. त्यांना महापालिकेकडून पत्र आणण्यास सांगण्यात आले. त्यांच्यावर नंतर उपचार केला ते ठीक आहे.

महोदय, पुण्याचे भौगोलिक क्षेत्र 243.81 स्क्वेअर किलो मीटर आहे. शासनाच्या नॉर्म्सप्रमाणे एवढ्या क्षेत्रफळाला 25 फायर स्टेशनची आवश्यकता असताना त्या ठिकाणी केवळ 12 फायर स्टेशन आहेत. त्यामुळे एकूण 25 फायर स्टेशन तेथे करण्यात येतील काय ? महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये टीपी योजनेनुसार 10 कि.मी. परिसर त्या त्या महापालिकेला जॉईन करुन दिला आहे. मुळात आम्हाला फायर स्टेशनसाठी जागा हवी आहे. पुणे शहराचा नवीन डीपी लवकरच येणार आहे. त्यामध्ये आपण फायर स्टेशनसाठी जागा आरक्षित करणार काय किंवा डीपीमध्ये फायर स्टेशनसाठी विशेष जागा उपलब्ध करुन देणार काय ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38882 .... श्री. मोहन जोशी .....

सभापती महोदय, 2009 पासून शेड्युलमान्य सेवक भरतीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने राज्य शासनाकडे म्हणजे नगरविकास विभागाकडे पाठविलेला आहे. त्या प्रस्तावाला किती दिवसात मान्यता देण्यात येईल ? 2009 नंतर आता 2013 साल आलेले आहे. पुणे शहर मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे आणि आगीचे जे प्रमाण असेल त्यासंदर्भात त्या सेवकांना काम करावे लागते. त्यामुळे मी विचारलेल्या दोन स्पेसिफिक प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्र्यांनी द्यावीत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या आणि त्या अनुषंगाने त्या ठिकाणी जे फायर स्टेशन्स असावयास पाहिजेत त्यानुसार फायर स्टेशन्सची संख्या 12 वरुन 25 करणार का असा पहिला प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. नुकतेच माननीय मुख्यमंत्र्यांनी नगरविकासच्या संदर्भात खूप चांगल्या प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये हाही निर्णय घेतलेला आहे की, केवळ पुण्याचाच नाही तर कोणत्याही शहराचा नवीन डी.पी. तयार करीत असताना त्या ठिकाणी अंत्यविधीकरिता क्षेपणभूमी असली पाहिजे, कब्रस्ताने असली पाहिजेत, क्रीडांगणे असली पाहिजे. त्याच पध्दतीने फायर स्टेशन्स असले पाहिजेत. पुण्याच्या नवीन डी.पी.मध्ये किती फायर स्टेशन्सचा अंतर्भाव आहे हे मला आता सांगता येणार नाही. कारण नवीन डी.पी. पूर्णपणे मंजूर झालेला नाही. पार्टली डी.पी. मंजूर झालेला आहे. त्यामध्ये किती फायर स्टेशन्सचा अंतर्भाव आहे हे पाहिले जाईल आणि त्यामध्ये अधिकचे फायर स्टेशन्स दाखल करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याची सध्या काय स्टेज आहे ती बघून त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना ताबडतोब अवगत करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये फायर ऑडीट करण्यात येईल असे पुणे महानगरपालिकेने सांगितले होते आणि ते काम आऊटसोर्स केलेले आहे. आऊटसोर्स करण्याचा परिणाम असा झालेला आहे की, प्रत्यक्षात किती इमारतींचे फायर ऑडीट झाले आणि किती इमारतींचे झाले नाही, ज्या ठिकाणी आग लागते त्याचे ऑडीट झाले आहे की नाही, याचा कोणालाही थांगपत्ता नाही. पुणे महानगरपालिकेने जे फायर ऑडीट केलेले आहे त्यामधून काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38882 .... डॉ. नीलम गोऱ्हे .....

समोर आले आणि त्यानुसार काय उपाययोजना केल्या ? या संदर्भात पाहणीचा अहवाल मागवून घेऊन नगरविकास विभाग त्यानुसार पुढची उपाययोजना करील का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, राज्यात मध्यंतरी जी दुर्घटना घडली त्या अनुषंगाने सर्वच इमारतींचे फायर ऑडीट करावे असा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला. त्याच पध्दतीने पुणे महानगरपालिकेती इमारतींचे सुध्दा फायर ऑडीट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता माझ्याकडे स्पेसिफिक पुण्याबद्दलची माहिती उपलब्ध नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांना ती माहिती दिली जाईल.

---

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबईत राज्य शासनाकडे धान्य ठेवण्यासाठी गोदामे नसल्याबाबत

**(९) * ३८९४५ श्री.रामदास कदम , डॉ.दीपक सावंत :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून मिळणारे धान्य ठेवायला राज्य शासनाकडे मुंबई क्षेत्रामध्ये ५ आणि ठाणे क्षेत्रामध्ये ४ गोदामे कार्यरत होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई क्षेत्रात डेपोतील स्प्रिंग मिल डेपो, बोरीवली डेपो, शिवडी डेपो आणि न्यू परेल डेपो या डेपोतील सुमारे १८ गोदामे शासनाने बिल्डरांना देऊन ती मोडीत काढली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळही दिनांक १ जुलै, २००१ पासून बरखास्त करुन हजारो कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्य शासनाकडे धान्य वितरित करण्यासाठी कोणतेही व्यवस्थापन आणि खर्च नसतानाही शासनास गेल्या १२ वर्षापासून गहू व तांदुळाच्या किलो मागे ६० ते ७० पैसे कमिशन द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत प्राप्त धान्य साठविण्यासाठी वर्ष २००१ पर्यंत मुंबई शिधावाटप क्षेत्रामध्ये ४ आणि ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये ४ गोदामे कार्यरत होती.

(२) हे खरे नाही.

मुंबई शिधावाटप क्षेत्रातील ४ गोदामांच्या १६ छपऱ्या संबंधित गोदामांच्या मालकांना परत करण्यात आलेल्या आहेत.

(३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंबंधी केंद्र शासनाच्या बदललेल्या धोरणानुसार मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्राकरिता सन १९९७ पासून अन्नधान्याचे नियतन, उचल व खप कमी झाल्यामुळे असलेल्या कामकाजाची वस्तुस्थिती लक्षात घेऊन मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शासकीय गादामांचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ व केंद्रीय वखार महामंडळाकडून काढून घेवून संचालनालय, नागरी पुरवठा (गो/वा) या कार्यालयाकडे दिनांक ०१.०७.२००१ पासून सोपविले.

तसेच सदर गोदामात कार्यरत असलेल्या ७२३ माथाडी कामगारांच्या सेवा दिनांक ३०.०६.२००१ पासून समाप्त केल्या आहेत.

(४) हे खरे नाही. भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून अन्नधान्याची उचल करुन अधिकृत शिधावाटप दुकानांना थेट अन्नधान्याचे वितरण करण्याची कार्यप्रणाली राबवितांना भारतीय खाद्य निगमच्या गोदामात नागरी पुरवठा संचलनालयाचे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन अन्नधान्याची गुणवत्ता तपासणे, भारतीय खाद्य निगमला अन्नधान्याची अग्रीम रक्कम प्रदान करणे, लेखा विषयक कामकाज हाताळणे इत्यादीबाबतच्या व्यवस्थापनावरील खर्च शासनास सोसावा लागतो. त्यामुळे धान्य वितरण करण्यासाठी व्यवस्थापन व खर्च नाही असे म्हणणे वस्तुस्थितीवर आधारीत नाही. तथापि स्वस्त धान्य दुकानदारांकडून शासनास कोणतेही कमिशन द्यावे लागत नाही. स्वस्त धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल रु. ५० इतके मार्जीन देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

...4...

RDB/ D/ KTG/

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाकडे धान्य साठविण्यासाठी जी गोदामे होती त्यामध्ये मुंबई क्षेत्रात स्प्रिंग मिल डेपो, बोरीवली डेपो, शिवडी डेपो आणि न्यू परेल डेपो या सर्व डेपोमधील 18 गोदामे महाराष्ट्र शासनाने कोणत्या बिल्डरला विकली आहेत का किंवा विकासकाला दिलेली आहेत का ? एका बाजूला मुंबई आणि ठाण्यामध्ये एकही डेपो शिल्लक नाही का ? गोदामे नसल्यामुळे धान्याची साठवणूक होत नाही. धान्याची साठवणूक होत नसल्यामुळे त्या ठिकाणी कामगार नाहीत. वखार महामंडळ बरखास्त केल्यामुळे त्या ठिकाणी कोणतेही व्यवस्थापन नाही. तरी देखील गेल्या 12 वर्षापासून गहू आणि तांदुळाच्या पाठीमागे जे 60 ते 70 पैसे कमिशन देतो ते आजही चालू ठेवलेले आहे. 12 वर्षाचे किती पैसे झाले आणि त्याचे नेमके काय झाले ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मुंबई आणि ठाण्यातील 18 गोदामांबाबत विचारले. 18 गोदामे नसून 4 गोदामे होती. त्या गोदामांचे जे मालक होते त्यांना 18 छपऱ्या परत केल्या. त्यांच्याकडून आपण ती गोदामे भाड्याने घेतली होती. केंद्रीय वखार महामंडळ आणि राज्य वखार महामंडळ यांच्याकडे त्याचे व्यवस्थापन होते. सन्माननीय सदस्य राज्यमंत्री असताना त्याच काळामध्ये निर्णय घेतला होता. पूर्वी आपल्याकडे सरसकट एकच कार्ड होते. 1 लाख रुपयांच्यावर उत्पन्न असेल त्यालाही तेच कार्ड आणि 500 रुपये उत्पन्न असेल त्यालाही तेच कार्ड होते. त्यानंतर आपण 2001 मध्ये टार्गेटेड डिस्ट्रिब्युशन सिस्टिम चालू केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38945.... श्री.अनिल देशमुख....

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे या खात्याचे राज्यमंत्री असताना त्यांचाही त्यावेळी या निर्णयाला हातभार लागला असेल. टार्गेटेड पब्लिक डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम सुरु केल्यामुळे वितरण व्यवस्थेत बदल झाला आहे. त्यामुळे केंद्रीय व राज्य शासनाच्या वखार मंडळाकडे ती गोदाम होती ती राज्य शासनाने ताब्यात घेतली होती. त्या ठिकाणीच्या 723 कामगारांच्या सेवा दिनांक 30.6.2001 पासून बंद केल्या आहेत. त्या कामगारांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून तेथे कार्यवाही सुरु आहे. राज्य शासन दुकानदारांकडून कमिशन घेत नाही तर दुकानदारांना प्रति क्विंटल 50 रुपये कमिशन दिले जाते.

श्री.प्रकाश शेंडगे : शासनाने अचानकपणे 723 कामगारांना 2001 साली कामावरुन कमी केले आहे. या कामगारांमध्ये 1966 साली कायम झालेले कामगारही होते. त्यांना एक महिन्याची नोटीस देऊन पगार दिला व कामावरुन काढून टाकले आहे. त्यामुळे 723 कुटुंबे रस्त्यावर आलेली आहेत. आम्ही या संदर्भात वारंवार शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. त्या कामगारांना लाल पास व पिवळा पास असे म्हटले जाते. शासनाकडून एफसीआयला व एमएसडब्ल्यूला 4 टक्के प्रशासकीय खर्च म्हणून दिले जात होते. त्या कामगारांना कामावरुन काढून टाकल्यामुळे त्यांना न्याय मिळावा म्हणून ते शासनाकडे वारंवार याचना करीत आहेत. 723 कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत. एका रात्रीमध्ये गोदामे बंद केली आहेत. शासनाला अन्नधान्य ठेवण्यासाठी गोदामांची आवश्यकता आहे. कामगार संघटना सातत्याने या 723 कामगारांबाबत शासनाकडे पाठपुरावा करीत आहेत. कामगारांची आवश्यकता आहे. त्यांच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार करुन त्यांना इतर व्यवस्थापनामध्ये समाविष्ट करुन घेतले जाणार आहे काय आणि त्या कामगारांची नुकसान भरपाई मिळण्याची मागणी आहे, त्यांना नुकसान भरपाई केव्हा दिली जाणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना एखाद्या दिवशी वेळ देऊन बैठक आयोजित केली जाईल. त्या बैठकीला त्यांच्या प्रतिनिधींना बोलविले जाईल आणि सविस्तर चर्चा करुन त्यातून काय मार्ग काढता येईल यादृष्टीने कार्यवाही केली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

ता.प्र.क्र.38945....

श्री.जयंत प्र.पाटील : लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, मुंबई शिधावाटप क्षेत्रातील 4 गोदामांच्या 16 छपऱ्या संबंधित गोदामांच्या मालकांना परत करण्यात आलेल्या आहेत. मुंबईत एक झोपडी कोणाला द्यावयाची असेल त्यासाठी 1 कोटी रुपये मिळतात अशा प्रकारची लोकांमध्ये चर्चा आहे. परंतु शासनाकडून आपल्या मालकीची गोदामे परत दिली जातात. त्याच्या बदल्यात शासनाला किती जागा मिळाली आहे किंवा कोणते बांधकाम मिळाले आहे ? कोणतेही बांधकाम न घेता ती गोदामे परत केली असतील तर कोणत्या संबंधित अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आणि तो निर्णय चुकीचा असेल तर शासन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : ही 4 गोदामे आहेत. ती 2005 ते 2008 सालापर्यंत मूळ मालकांना परत केली आहेत. ती गोदामे शासनाने त्यांच्याकडून भाड्याने घेतली होती. राज्यात टार्गेटेड पब्लिक डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम सुरु केल्यामुळे त्या गोदामांची आवश्यकता नव्हती. त्यामुळे ती गोदामे रिकामी होती. त्यामुळे 2005 ते 2008 च्या दरम्यान मूळ मालकांना परत केली आहेत.

श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, सदर गोदामे रिकामी असल्यामुळे ती मूळ मालकांना परत केली आहेत. परंतु अन्नधान्याचा साठा ठेवण्यासाठी विभागाकडे पर्यायी व्यवस्था वखार मंडळाने केली आहे काय, वखार महामंडळाने पर्यायी व्यवस्था केली असल्यास ते काम कोणाकडून केले जात आहे, अन्य कामगारांकडून ते काम केले जात असेल किंवा कंत्राटदाराकडून केले जात असेल तर जुन्या कामगारांना प्रथम प्राधान्य का दिले गेले नाही ?

श्री.अनिल देशमुख : केंद्रीय व राज्य वखार महामंडळ बंद झाल्यामुळे शासनाकडे ते काम आले. शासनाकडे काम आल्यानंतर ज्या ज्यावेळी लोडिंग व अन्लोडिंगच्या कामासाठी कामगारांची आवश्यकता असते त्यावेळी त्यातीलच कामगारांकडून हे काम करुन घेतले जाते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे दोन भाग आहेत. 4 गोदामे व 16 छपऱ्या परत करणे व 723 कामगारांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या या दोन मुद्यांबाबतचा हा प्रश्न आहे. ही गोदामे बंद होती म्हणून ती मूळ मालकांना परत केली आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:50

ता.प्र.क्र.38945... डॉ. दीपक सावंत...

ही गोदामे शासनाच्या ताब्यात किती वर्षापासून होती, त्या गोदामांचे भाडे किती होते, ही गोदामे परत केल्यानंतर राज्य शासनाला किती महसूल प्राप्त झाला ?

श्री. अनिल देशमुख : 2005 ते 2008 या दरम्यान ही गोदामे मूळ मालकाला परत करण्यात आली. ही गोदामे शासनाच्या ताब्यात किती वर्षापासून होती, त्यांचे भाडे किती होते, शासनाला किती महसूल मिळाला यासंबंधीची संपूर्ण माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

**सभापती** : या प्रश्नाची सविस्तर माहिती घेणे गरजेचे आहे. कारण हा वखार महामंडळाचा व्यवहार आहे. वखार महामंडळामध्ये जे कामगार अनेक दिवस काम करीत होते त्यांना एक महिन्याचा पगार देऊन काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्याठिकाणी कोणत्या तरी कंत्राटदाराला काम देण्यात येत असेल तर राज्याचे जे कामगार विषयक धोरण आहे त्याला कोठे तरी बाधा आणल्यासारखे होईल. म्हणून या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देण्याची गरज आहे.

श्री. अनिल देशमुख : हा 723 कामगारांचा प्रश्न आहे. या कामगारांना 8 कोटी रु. नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. त्यांच्या ज्या काही मागण्या आहेत त्या संबंधी कामगारांचे प्रतिनिधी, सन्माननीय सदस्य यांच्याशी सविस्तर चर्चा करुन काय मार्ग काढता येईल हे पाहू आणि निर्णय घेऊ.

श्री. रामदास कदम : संशयाचा भाग असा आहे की, ही गोदामे शासनाकडे केव्हापासून होती ? ही गोदामे शासनाकडे 100 वर्षापासून असतील तर ती मालकांना का परत करण्यात आली ? ही जागा बिल्डरच्या घशात टाकलेली आहे. एका बाजूला राज्यामध्ये गोदामाअभावी धान्य सडत आहे आणि दुस-या बाजूला शासनाकडे असलेली गोदामे मूळ मालकाला परत देऊन टाकलेली आहेत. या प्रश्नाची सविस्तर माहिती सभासदांना मिळणे आवश्यक आहे. म्हणून हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री या प्रश्नामध्ये जरुर लक्ष देतील, त्याचा पाठपुरावा करतील, कामगारांना न्याय मिळेल असा प्रयत्न करतील आणि त्याचा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38945...

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा कामगारांचा देखील प्रश्न आहे. कामगारांना 8 कोटी रु. नुकसान भरपाई दिलेली आहे. 8 कोटी रु. ही मोठी रक्कम वाटत असली तरी कामगारांची संख्या देखील 723 इतकी आहे. आता तेथे जर कंत्राटी कामगार काम करत असतील तर मग ज्या कामगारांनी तेथे आयुष्यभर काम केलेले आहे त्यांना काम मिळावे म्हणून त्यांना तेथे ॲडजस्ट केले जाईल काय ?

श्री. अनिल देशमुख : जेव्हा जेव्हा तेथे काम निघते त्या त्या वेळी या कामगारांना बोलावून तेथे ॲडजस्ट करण्यात येते...(अडथळा)..सभापती महोदय, ही 4 गोदामे गेल्या 50/60 वर्षापासून शासनाने मूळ मालकाकडून भाड्याने घेतली होती. जेव्हा नव्याने टार्गेटेड पब्लिक डिस्ट्रिब्यूशन सिस्टिम सुरु झाली त्यावेळी 2005 ते 2008 या दरम्यान ही गोदामे मूळ मालकाने मागितल्यामुळे त्यांना वापस करण्यात आली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38945...... श्री.अनिल देशमुख.....

टार्गेटेड पब्लिक डिस्ट्रिब्यूशन सिस्टीम चालू केल्यामुळे या गोदामांची आपल्याला आवश्यकता नव्हती त्यामुळे 2005 ते 2008 या दरम्यान ज्या मालकांकडून गोदामे भाड्याने घेतली होती त्या मालकांना गोदामे परत करण्यात आली.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय मिळत नसल्यामुळे आम्ही निषेध करुन सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे मुळगाव (ता.खालापूर,जि.रायगड) येथील झाडांची वन खात्याची कोणतीही पूर्व परवानगी न घेता कत्तल केल्याबाबत**

**(१०) * ३९५०७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मुळगाव (ता.खालापूर,जि.रायगड) येथील सिटी सर्व्हे नं.१७७४ मधील ३६२ झाडांची वन खात्याची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे कत्तल केल्याबाबत श्रेम रिॲलिटी प्रा.लि. कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास संबंधित कंपनी विरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद यांनी केलेल्या तक्रार अर्जानुसार खोपोली पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गु.रं.नं. ३२/२०१३ महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम २१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर अदखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्यासाठी मा.न्यायालयाची मंजूरी घेण्यात आलेली असून सदर प्रकरणाचा पोलीसामार्फत तपास सुरु आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ३६२ झाडांची कत्तल झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. ही झाडे कोणत्या कंपनीने परवानगीशिवाय तोडली, नगरपालिकेची भूमिका काय होती, संबंधित अधिकारी काय करीत होते आणि तोडलेली झाडे सध्या कोणाच्या ताब्यात आहेत?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, श्रेम रिॲलिटी प्रा.लि. ही खाजगी कंपनी असून त्या कंपनीच्याच प्रिमायसेसमधील आणि कंपनीच्या मालकीची असलेली झाडे तोडली गेली आहेत. नगरपालिकेला हे कळल्याबरोबर तक्रार करण्यात आली. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण, जतन अधिनियम, १९७५ च्या कलम २१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कलमाखाली गुन्हा सिध्द झाल्यास द्रव्य दंडाच्या शिक्षेसह कारावासाची सुध्दा तरतूद केलेली आहे. सध्या तोडलेली झाडे कंपनीच्या आवारात असून ती शासनाने जप्त केलेली आहेत.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..३..

**मुंबईतील मलनि:सारण खात्यातील कामांसाठी कंत्राटदारांनी**
**बोगस बिले बनवून केलेली फसवणूक**

**(११) * ३९५४८ श्री.किरण पावसकर , श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मल:निसारण खात्यातील कामांसाठी कंत्राटदारांनी सुमारे ९६ कोटीची बोगस बिले बजावून फसवणूक केल्याची घटना माहे जानेवारी, २०१३ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस बिले बनवून भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) हे अंशत: खरे आहे. सदर घटना माहे फेब्रुवारी, २०१० च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली. परंतु निदर्शनास आल्यानंतर या प्रकरणी कोणतेही अधिदान करण्यात आलेले नाही.
(२) होय, सदर प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक खाते Suo Moto Case No. ३०/२०११, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. याशिवाय सदर प्रकरणाची मुंबई महानगरपालिकेतर्फे खात्यांतर्गत सखोल चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त महानगरपालिका उपायुक्त (दक्षता) यांची विशेष अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे व याबाबत सखोल चौकशी सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवालानुसार एकूण १० कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला असून त्यापैकी सध्या कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची इतरत्र विभागात बदली करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणात ३२ कंत्राटदारांपैकी सहभागाची दाट शक्यता असलेल्या १७ कंत्राटदारांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. या १७ कंत्राटदारांना उपरोल्लेखित चौकशी पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेमध्ये कोणतेही नवीन काम करण्यास तसेच कोणतीही नवीन निविदा भरण्यास प्रतिबंध लादण्यात आलेला आहे. सदरची चौकशी पूर्ण झाल्यानंतर ठपका ठेवलेले अधिकारी तसेच संबंधित कंत्राटदार यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या भ्रष्टाचारासंबंधी असंख्य प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. मुंबई महापालिकेमध्ये २००७-०८ या वर्षात मलनि:स्सारण खात्यातील कामासाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराने कार्यादेश नसताना काम केले आणि ९६ कोटी रुपयांचे देयक सादर केले. शासनाने २००७-०८ मधील वस्तुस्थिती अंशत: खरी असल्याचे म्हटले आहे. फेब्रुवारी, २०१० च्या शेवटच्या आठवड्यात ही बाब निदर्शनास आली म्हणून सू मोटो केस नं.३०/२०११ अन्वये महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत चौकशी सुरु आहे. २००७-०८ मध्ये मुंबई ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..४....

श्री.किरण पावसकर........... ता.प्र.क्र.३९५४८.....

महापालिकेच्या मलनि:स्सारण खात्यात भ्रष्टाचार होतो आणि शासन म्हणते की, अंशत: खरे आहे. परंतु या प्रकरणी २०१३ पर्यंत कारवाई काय केली हे स्पष्ट केले जात नाही याची कारणे काय आहेत? मलनि:स्सारण खात्यातील कंत्राटदाराच्या भ्रष्टाचार प्रकरणी गटनेत्यांच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. एसीबीच्या अधिकाऱ्यांनी आपल्याला चौकशीसाठी बोलावले होते असे माजी महापौरांनी सांगितले आहे. सध्याचे महापौर त्यावेळी गटनेते म्हणून काम करीत होते.

सभापती महोदय, ९६ कोटी रुपयांची बोगस बिले सादर केली हे आपल्याला कळलेले आहे. २००७-०८ मधील हे प्रकरण आहे. उत्तरामध्ये हे मान्य केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई न करता फक्त त्यांची बदली करण्यात आली. कंत्राटदाराला काळ्या यादीत न टाकता यापुढे काम दिले जाणार नाही असे सांगितले. महापालिकेचे अधिकारी आणि कंत्राटदाराने संगनमत केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. चौकशी जाणीवपूर्वक पुढे का ढकलली जाते?

नंतर २जे.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर .....

जर चौकशी जाणूनबुजून पुढे ढकलली जात नसेल तर ही चौकशी किती कालावधीत पूर्ण होणार आहे व संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराची नवीन नवीन प्रकरणे आता पुढे येत आहेत. कचरा उचलणे, कचरा प्रक्रियेच्या ठेक्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात एसआयटीची नेमणूक केलेली आहे. मिठी नदीच्या रुंदीकरणामध्ये व खोलीकरणामध्ये 107 टक्के व्हेरिएशन झालेले आहे व हे प्रकरण सुध्दा उघड झालेले आहे. सन 2009-2010 मध्ये रस्त्यांची 400 कोटी रुपयांची कामे 700 कोटी रुपयांना देण्यात आल्याचे, 200 कोटी रुपयांची कामे 450 कोटी रुपयांना देण्यात आली असून यामध्ये जे व्हेरिएशन झालेले आहे त्याची चौकशी सुरु झालेली आहे.

सन्माननीय सदस्यांनी आज मुंबई महानगरपालिकेचा दुसरा मोठा घोटाळा प्रश्नाच्या रुपाने उघड केलेला आहे. अशा पध्दतीने नवीन नवीन घोटाळे येणे हे सत्ता चालवित असतांना मोठे अवघड काम होऊन बसले आहे. हे प्रकरण सन 2010 च्या शेवटी नजरेस आले आहे. 96 कोटी रुपयांची बिले 32 कंत्राटदारांनी अचानक सबमिट केली. सुदैवाने यामधील एका पैशाचे सुध्दा बिल देण्यात आलेले नाही. यामध्ये एकंदर 17 अधिकारी दोषी दिसतात त्यातील काही अधिकारी निवृत्त झालेले आहेत. परंतु जे अधिकारी प्रत्यक्षपणे कार्यरत आहेत त्यांना नॉन एक्झिक्युटीव्ह पोस्टवर ठेवलेले आहे. यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने त्यांच्यावर सुमोटो चौकशी सुरु केलेली आहे. एक निवृत्त काकार्यकारी अभियंता(दक्षता) यांची नेमणूक केलेली आहे. यामध्ये जे कोणी कंत्राटदार आहेत त्यांना महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामध्ये काम देऊ नये अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या प्रकरणाला कितीही वेळ लागला तरी या भ्रष्टाचाराच्या पाठीशी जे अधिकारी आणि कंत्राटदार आहेत त्यांच्यावर कठोरातल्या कठोर कारवाई केली जाईल हे eh शासनाच्या वतीने मुंबईच्या नागरिकांना आश्वासित करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय,मुंबईच्या प्रथम नागरिकाला एसीबी ने चौकशीसाठी बोलवावे किंवा या भ्रष्टाचार प्रकरणी चौकशी करावी. अशी परिस्थिती असतांनाही मंत्री महोदय सांगत आहेत की, यामध्ये पैसे वाचले आहेत. सन 2007-2008 मध्ये अशा प्रकारची बिले दिली गेली हे आपल्या निदर्शनास आलेले आहे. परंतु अशा प्रकारची किती तरी बिले यापूर्वी निघून गेली असतील. त्यामुळे यासंदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ? मलनि:स्सारणामध्ये सुध्दा पैसे खाल्ले जात आहेत ही पैसे खाण्याची हद्द झाली आहे. या विभागाचेही पैसे खायचे असतील तर ते योग्य नाही. हा प्रकार सन 2004-2005,2005-2006 मध्ये सुध्दा झाला असेल. ही बिले काम न करता देण्यात आलेली आहेत याचा अर्थ त्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने हे सर्व झालेले दिसते. यासाठी अजून वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु आपण यासंदर्भातील चौकशी अजून किती दिवस पुढे ढकलणार आहोत ? मुंबई महानगरपालिकेच्या घोटाळयांचे या सभागृहात प्रुफ आणायचे, एसीबीचे पेपर्स दाखवायचे, कोर्टाचे पेपर्स दाखवायचे असे असतांनाही आपण यावर कधी तरी का होईना कारवाई करणार आहात की नाही ? या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. आम्ही मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचाराची असंख्य प्रकरणे या सभागृहात उपस्थित केलेली आहेत. त्यामुळे या भ्रष्टाचाराच्या संदर्भात शासन कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मिठी नदीच्या भ्रष्टाचाराची माहिती मी येथे दिलेली आहे,रस्त्यांच्या खड्डयांच्या प्रकरणाची, कचऱ्याच्या प्रकरणाची, रस्त्याच्या नवीन बांधकामाची प्रकरणे मी येथे दिलेली आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी नवीन प्रकरण उपस्थित केलेले आहे. माननीय मुख्यमंत्री अतिशय शिस्तप्रिय असल्यामुळे हे प्रकरण सहजासहजी सोडले जाणार नाही हे मी पुन्हा एकदा सभागृहाला आश्वासित करु इच्छितो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील पापाचा वाढा माननीय मंत्री महोदयांनी वाचून दाखविला आहे. परंतु हा पाढा आम्ही सर्व प्रूफ सहीत आपल्याला दिलेला आहे. "या विषयातील पैसे वर्ग केलेले नाहीत" अशी माननीय मंत्री महोदयांनी आताच माहिती दिलेली आहे. परंतु हे पैसे वर्ग झाले असते तर काय झाले असते ? याचा अर्थ या अधिकाऱ्यांना अशा प्रकारे पैसे खाण्याची सवय आहे. तसेच महापौर असतील किंवा आणखीन कोणी असतील. या अगोदर सुध्दा .....आता तर ते घाणीमध्ये सुध्दा पैसे खायला लागले,

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39548...

श्री.भाई जगताप...

हे सगळे त्यांनी करून दाखविले आहे. .... (गोंधळ)..... या सगळ्या गोष्टी निदर्शनास आल्यानंतर आपण त्यांच्या फक्त बदल्या केलेल्या आहेत. त्या न करता प्रथमदर्शन त्यांचा गुन्हा दिसलेला असल्यामुळे त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यात येणार आहे काय, त्यांना निलंबित करण्यात येणार आहे काय ? ..... (गोंधळ).... अरे, आपण कचऱ्यामध्ये पैसे खातात, अरे, साला गुवामध्ये पैसे खातात.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी खाली बसावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी मुंबई महानगरपालिकेमधील अनेक प्रकरणांचा उल्लेख येथे केला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महौपारांसंबंधातील वक्तव्य आपण पटलावरून काढून टाकावे अशी मी विनंती करीत आहे.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण बोलावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या अनेक प्रकरणांचा उल्लेख येथे केला आहे. अनेक प्रकरणे बाहेर आल्यामुळे त्यावर मुंबई शहरासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळा खाजगी लोकांना देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. मुंबईतील मार्केटच्या जागा खाजगी लोकांना देण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे. ही फार मोठी प्रकरणे आहेत. तेव्हा या प्रकरणासाठी उच्चस्तरिय समिती झाली पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महापौरांचा उल्लेख कामकाजातून काढून टाकावा. ही प्रशासकीय बाब आहे.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी येथे उप प्रश्न विचारताना जे भाष्य केले आहे.....

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या निर्णय देण्यापूर्वी मला सभागृहाच्या पुढे एक गोष्ट निदर्शनास आणावयाची आहे. आपण सौजन्यमूर्ती आहात. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जे भाष्य केले आहे त्यासंबंधी आपण निर्णय देणार आहात हे मला माहीत आहे. मुंबई महानगरपालिका ही लोकशाहीची संस्था आहे. या संस्थेसंबंधातील काही विषय सभागृहासमोर आले आहेत. त्यासंबंधात जे कोणी आहेत त्यांचे नाव घेण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी "घाणीतील पैसे" असा शब्द प्रयोग केला आहे. कदाचित तो विषय त्यांना आवडला नसेल. येथे आपले उभे आयुष्य गेले. रोज सभागृहात व सभागृहाच्या बाहेर असा कुठला शब्द सन्माननीय सदस्य किंवा त्यांचे नेते सत्ताधारी पक्षाबद्दल बोलत नाही. जेणे करून त्यांना हा शब्दप्रयोग खटकावा. ते माननीय मंत्री, नेते यांना सोडत नाही. वाटेल ते बोलण्यासाठी यांना कोणी लायसेन्स दिले आहे. बाकीच्यांनी संस्कृती म्हणून, सौजन्य म्हणून, संस्कार म्हणून सहन करावे. यांना मात्र वाटेल ते बोलण्याचा अधिकार कोणी दिलेला आहे ? तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा शब्द रेकॉर्डवरून काढून टाकू नये.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : मी या क्षणी शब्द कामकाजातून काढलेला नाही.

काही सन्माननीय सदस्य : धन्यवाद.

श्री.भाई जगताप : ते शब्द काढता येणार नाहीत. . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय महापौरांना कोणते अधिकार असतात हे सन्माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सांगावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला विचारतो की . . ..

**सभापती** : सभागृह हे कायद्याने चालते. याबाबत जे नियम आहेत, त्याप्रमाणेच सभागृह चालते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महापौरांना कायद्यानुसार कोणते अधिकार असतात हे मला ऐकावयाचे आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामु मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 11 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी तहकूब झाली.)

----

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**<u>महापौर यांचा उल्लेख कार्यवाहीतून काढण्याबाबत हरकतीचा मुद्दा</u>**

श्री.दिवाकर रावते : माझा अतिशय गंभीर हरकतीचा मुद्दा आहे. या सदनाला आपला सन्मान आहे. मुंबईचे महापौर हे प्रथम नागरिक असतात, त्यांचा एक वेगळा प्रतिष्ठेचा भाग असतो. त्यांच्या संदर्भात अकारण अप्रतिष्ठा निर्माण होत असेल तर ते या सभागृहाला शोभणारे नाही. माझा अधिकृत दावा आहे की, महापौरांना प्रशासकीय यंत्रणेमध्ये काही अधिकार नसतात. कारण मी महापौर होतो. मला त्यांच्या अधिकाराची कल्पना आहे. या ठिकाणी जी काही चर्चा सुरु होती त्यावर मी एकही शब्द बोललो नाही. किंबहुना सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मांडलेल्या मुद्यावर आजच्या आज तातडीने निर्णय घ्यावा, त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. भ्रष्टाचार तुम्हालाही झाकायचा नाही आणि आम्हालाही झाकायचा नाही. त्यांनी दहा वेळा येथे वेगवेगळ्या पध्दतीने सांगितले की, महानगरपालिका युतीकडे असल्यामुळे चौकशी करावी. त्यावर देखील मी काही बोललो नाही. जर काही झाले असेल तर चौकशी करावी. आम्ही तुमच्या शासनाबद्दल बोलतो तेव्हा तुम्ही देखील तसे बोलणार हे अभिप्रेत आहे. परंतु महापौर हे पद ही एक वेगळी संज्ञा आहे. या पदाला एक वेगळी प्रतिष्ठा आणि गरिमा घटनेने दिलेली आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जगातील कोणतेही मोठे व्यक्तीमत्व आले असेल किंबहुना माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान आले तरी माननीय राज्यपालांनंतर त्यांचे आसन असते. या ठिकाणी चर्चा करताना ओघाने तसा उल्लेख झाला असेल, तो उल्लेख कोणी मुद्दाम केला असे मी म्हणत नाही. आपण कितीही काही म्हटले तरी महापौरांना काही अधिकार नसतात. आपण फक्त महापौर हा शब्द कामकाजातून काढून टाकावा एवढेच माझे म्हणणे होते.

सभापती महोदय, मला एका गोष्टींचा अत्यंत खेद होतो की, या सदनामध्ये आमची काहीही भांडणे झाली तरी त्याचा सभापती आसनाचा काहीही संबंध नसतो. या सदनातील प्रत्येक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सदस्याला संरक्षण देण्याची जबाबदारी आपली आहे. माननीय सभापतींकरिता सत्ताधारी आणि विरोधी असा भेदभाव नसतो, आपणास दोघेही सारखेच असता.

सभापती महोदय, आपल्या आसनाबद्दल मला कितीही वाटले तरी त्यावर बोलणे अयोग्य असते. कारण ते या सभागृहातील सर्वोच्च पद आहे. आपण घेतलेला निर्णय मला पटो किंवा न पटो तो आम्ही शिरसावंद्य मानायचा असतो अशी प्रथा आणि परंपरा आहे. त्यामुळे मला त्या संदर्भात काही भावना व्यक्त करता येत नाहीत. तेव्हा अशाच प्रकारे आपण मुंबईच्या महापौर पदा बाबत आदर ठेवला पाहिजे. आपण फक्त महापौर हा शब्द काढून टाकावा. बाकी मला काहीही बोलायचे नाही. समोरच्यांनी गोंधळ करणे हे त्यांचे काम आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 14:30

श्री.दिवाकर रावते....

पीठासीन अधिकाऱ्यांनी मला विचारले की, या बाबत माझे काय म्हणणे आहे. मी माझे म्हणणे मांडले. बाकी मी काहीच बोललो नाही. त्यांनी ठणकावून सांगितले की, मी हे शब्द कामकाजातून काढले नाहीत. महोदय, ते अयोग्य आहे. मुंबईच्या महापौरांच्या प्रतिष्ठेच्या संदर्भात आपण घेतलेला निर्णय आम्हाला योग्य वाटत नाही हे मी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून निदर्शनास आणून देत आहे. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, 'महापौर' हा शब्द कामकाजातून काढून टाकावा.

श्री.भास्कर जाधव : महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, ही वेळ हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची नाही. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहात एखाद्या कामकाजाला सुरु केल्यानंतर त्या कामकाजाबाबत काही आक्षेप असेल तर त्या वेळी हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येतो. अन्यथा उपस्थित करता येत नाही. हा विषय प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित झाला होता. माननीय सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास संपविला आहे. ज्या विषयावर सध्या चर्चा सुरु आहे तो प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित झाला होता. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर त्या विषयावर पुन्हा चर्चा होणे उचित नाही.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महापौरांचे नाव कामकाजात असावे की नसावे अशा प्रकारचा घटनात्मक मुद्दा मांडला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण संसदीय लोकशाही पध्दती स्वीकारलेली आहे. गावच्या ग्रामपंचायतीचा प्रमुख सरपंच असतो, पंचायत समितीचा प्रमुख सभापती असतो, जिल्हा परिषदेचा प्रमुख अध्यक्ष असतो, राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री असतात. नगरपालिकेचे प्रमुख जसे नगराध्यक्ष असतात तसेच महानगरपालिकेचे प्रमुख महापौर असतात. सन्माननीय सदस्यांनी व्यवस्था म्हणून महापौरांना कसे बोलाविले याचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्य राज्याच्या प्रमुखांचा नावानिशी उल्लेख करताना हा विधिनिषेध पाळत नाहीत. तसेच उप मुख्यमंत्र्यांचा, मंत्री महोदयांचा उल्लेख करताना सुध्दा पाळत नाही. मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हा विषय प्रतिष्ठेचा करता कामा नये. व्यवस्थेचा भाग म्हणून महापौरांचा त्या ठिकाणी उल्लेख आलेला आहे. त्यामुळे तो बरोबर आहे असे माझे मत आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,.....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, हा विषय आता सभागृहापुढे नाही. तसेच दुसरी बाब अशी की, आज सन्माननीय सदस्या सर्वश्री डॉ.नीलम गोऱ्हे, शोभा फडणवीस यांनी राज्यातील आदिवासी, शिक्षण, उच्च शिक्षण, समाजकल्याण, महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना दिली होती. यावरील निर्णय माननीय सभापती नंतर जाहीर करतील.

आता पुढील कामकाज घेण्यात येतील.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सोमवार, दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शुक्रवार, दिनांक 12 एप्रिल, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** : शुक्रवार, दिनांक 12 एप्रिल, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महापौरांचा उल्लेख कार्यवाहीतून काढण्याबाबत**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना विनंती आहे. नगरविकास मंत्री हे पद असे आहे की, जे चुकीचे झाले आहे, जे घोटाळे झाले आहेत ते तुम्हाला बाहेर काढता येतील, कारवाई करता येईल, याबाबत तुम्हाला अधिकार आहेत. काही पदे अशी आहेत की ज्या पदाची गरिमा या सभागृहामध्ये राखण्याचे काम आपण केले पाहिजे. जर महापौर दोषी असतील तर आपण चौकशी करणारच आहात. या प्रकरणाच्या जर खोलात जावयाचे झाले तर कोणकोणत्या पक्षाच्या गटनेत्याने काय केले, तो कोणत्या गटाचा होता हे सर्व आम्ही रेकॉर्डवर आणावे का ? आम्हाला ते रेकॉर्डवर आणावयाचे नाही कारण त्याचा आणि याचा काही संबंध नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना माहीत आहे कारण त्यांच्या गटाचा काँग्रेस पक्षाचा गटनेता नाही. मला असे म्हणावयाचे आहे की, कार्यवृत्तातून फक्त 'महापौर' हा शब्द काढल्यामुळे माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांचाच सन्मान होणार आहे. बाकीचे सर्व प्रोसीडींग ठेवा, सर्व चौकशी करा, जे चूक आहे त्यावर कारवाई करा असे आमचे मत आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते काय म्हणाले ते आपण रेकॉर्ड काढून बघावे. त्यांनी सांगितले की, जे सर्व अधिकारी आहेत त्यांचा दोष असेल तर कारवाई करा. सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत सुध्दा तसे म्हणाले. मला हेच सांगावयाचे होते की, आपल्या संसदीय कार्यप्रणालीमध्ये हीच व्यवस्था आहे. ज्यावेळी आपण आमच्याकडे बोट दाखविता त्यावेळी जर एखाद्या खात्याची चूक झाली तर आपण डायरेक्ट मंत्र्यांना नेम करता, मंत्र्यांना दोषी धरता. त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकारी चुकले असे आपण का म्हणत नाही ? आपल्याला ही सुरुवात करावी लागेल. ज्या ठिकाणी चुकते त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकारी, सरकार चुकले की फक्त मंत्री आणि त्या ठिकाणी अधिकारी चुकले तर महापौराचा उल्लेख करावयाचा नाही हे कसे होऊ शकते ?

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना नम्र विनंती आहे. माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या निर्णयावर आपल्याला आता पुन्हा चर्चा करता येणार नाही. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे आणि आपण पुढचे कामकाज सुरु केले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोली यांचा सन 2010-2011 या वर्षाचा चोविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन 2011-2012 या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष अहवाल आणि दिनांक 3 सप्टेंबर, 2011, 9 सप्टेंबर, 2011, 30 नोव्हेंबर, 3011, 8 डिसेंबर, 2011, 22 डिसेंबर, 2011 व 27 जून, 2012 रोजीचे सहा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन 2011-2012 चा चौदावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सदस्य वेलमध्ये एकत्र येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-2 यांचा सन 2008-2009 या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

श्री.डी.पी.सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबई विद्यापीठ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांचे 2009-2010, 2010-2011 व 2011-2012 या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

-------

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून तालिका सभापतींशी बोलत असतात. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती अलका देसाई ( समिती सदस्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा अहवाल सादर करते.

**तालिका सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा बारावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

सभागृहामध्ये गोंधळाचे वातावरण असल्यामुळे सभागृहाची बैठक मी दुपारी 3 वाजून 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.41 ते 3.10 पर्यंत स्थगित झाली. )

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निर्णय काय झाला ?

**उप सभापती** : मघाशी सभागृहात काय घडले याची मला माहिती नाही. नंतर जी चर्चा झाली त्यावेळी मी हजर होतो. सन्माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सभापती सभागृहात उपस्थित होतील त्याच वेळी सभागृहात झालेल्या प्रकाराबद्दल जो काही व्हायचा तो निर्णय होईल. तोपर्यंत सभागृहाच्या अनुमतीने मी पुढील कामकाज सुरु करीत आहे.

--

....नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.पांडुरंग फुंडकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा "राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा, 2008 करिता पायाभूत सुविधा विकास" या विषयावरील अहवाल सभागृहाला सादर करतो.

(प्रेस : येथे सोबतचा अहवाल छापावा)

नंतर 2एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : लोकलेखा समितीचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागावरील अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहा समोर ठेवणे.

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "क्रिकेट कल्चर अकादमी या संस्थेस दिलेल्या भूखंडाचा वापर वेगळ्याच व्यक्तीने कल्चर क्रिकेट अकादमी या नावाने ट्रस्ट स्थापन करून भूखंड लाटण्याचा घडलेला प्रकार" या विषयासंबंधी दिनांक 8 ऑगस्ट 2011 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहा समोर ठेवीत आहे.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहा समोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : सीआरझेडमुळे रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात सागरस्तरीय किनारे येथे कच्चे अगर पक्के बांधकाम करण्यास बंदी असणे याबाबत श्री जयंत पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.संजय देवतळे (पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील व त्याच्या आजूबाजूला असलेल्या कोळीवाड्यांमध्ये मासे सुकविण्यासाठी ओटे बांधण्यासाठी अडचणी येत आहेत. सदर भाग सीआरझेडमध्ये येत असल्यामुळे केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे मासे सुकविण्यासाठी ओटे कुठे बांधायचे हा माझ्या समोर प्रश्न आहे. हे ओटे डोंगरावर बांधायचे काय ? आज मच्छीमारांना जेट्टी व ओटे बांधण्यासाठी अडचणी येत आहेत. त्याची दखल राज्य शासनाने घेणे आवश्यक आहे. ज्या हरकती केंद्र शासनाकडे घेणे आवश्यक होते त्या गोवा व केरळ सरकारने घेतल्या व आपली बाजू समर्थपणे मांडली. गोव्यामध्ये मच्छीमारांसाठी ओटे बांधायला व अन्य सुविधा पुरविण्यासाठी परवानगी आहे. मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सांगितले आहे की, आपण हरकती घेतल्या आहेत, कारवाई सुरू आहे, प्रयत्न सुरू आहे. शासनाचे प्रयत्न अजून किती दिवस सुरु राहणार आहे ? केंद्र सरकारकडून गोवा व केरळ सरकारने ज्याप्रमाणे परवानगी घेतली आहे त्याप्रमाणे आपले राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी गोवा आणि केरळ राज्याचे उदाहरण दिले आहे. मुंबईचा सुद्धा एरिया रिकरिंग स्पेशल कन्सीडरेशनमध्ये समावेश केला आहे. दिनांक 24 डिसेंबर 2010 रोजीच्या पत्रान्वये आपण आपल्या सूचना/हरकती केंद्र शासनाकडे पाठविल्या आहेत. त्यापूर्वी सन 2009 आणि 2010 मध्ये प्रारूप सादर झाले होते. तेव्हा सुद्धा शासनाने विविध विभागांकडून सूचना व हरकती मागवून त्या केंद्र शासनाकडे पाठविल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणतारू ग्रामपंचायत, तालुका गुहागर जिल्हा रत्नागिरी येथील मच्छीमारांच्या निवेदनामध्ये लक्ष घालून सदर प्रकरण केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांच्याकडे पाठविले आहे. त्यामुळे यातील ज्या तरतुदी आहेत त्यामध्ये शिथिलता दिलेली आहे. 1991 मध्ये अधिसूचना काढण्यात आली होती. त्यानंतर 6 जानेवारी 2011 रोजी दुसरी अधिसूचना निघाली आहे. त्यास 25 सुधारणा सुचविल्या होत्या. ही अधिसूचना नवीन आहे. त्यामुळे मॅपिंग सुरू आहे. मॅपिंग झाल्यानंतर आपण प्रारूप जाहीर करणार आहोत. त्यावेळी ज्या हरकती/सूचना येतील त्या केंद्रीय पर्यावरण विभागाकडे पाठविण्यात येतील.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR पूर्वी श्री.भारवी . . . . 3.30

पृ.शी./मु.शी.: कुकडी धरणाचे पाणी करमाळा तालुक्याला
मिळण्यासाठी होत असलेली मागणी याबाबत
श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी नियम 93
अन्वये दिलेली सूचना.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर (जलसंपदा, कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 8 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. कारण त्यांनी लेखी स्वरुपामध्ये सविस्तर उत्तर दिले आहे. त्यांनी कुकडी धरणाचे पाणी देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. पण स्थानिक लोकांचे म्हणणे आहे की, त्यांना अजून पाणी मिळालेले नाही. त्यामुळे कुकडी धरणाचे किती पाणी सोडले आणि किती मिळाले आहे हा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न माळढोक येथे प्रत्यक्षात किती पक्षी आहेत आणि त्यासाठी किती क्षेत्र आवश्यक आहे ते स्पष्ट झालेले नाही आणि अंतिम निर्णय होईपर्यंत किमान खरेदी-विक्रीवर जी बंदी आहे, त्यामध्ये सवलत मिळाली पाहिजे आणि तिसरा प्रश्न म्हणजे परांडा मधील दूषित पाण्याचे 40 नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत. त्याचा काय अहवाल आला आहे? तेथे असंख्य रुग्ण दाखल आहेत.

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्यामध्ये माझ्या खात्याशी संबंधित असा कुकडी धरणामध्ये पाणी पोहोचले आहे की नाही एवढ्यापुरता मर्यादित प्रश्न आहे. याशिवाय माळढोक अभयारण्याचा उल्लेख केलेला आहे. यासंबंधात माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर देईन. तसेच नगरपालिकेच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांचा जो दूषित पाण्याच्या नमुन्यासंबंधीचा प्रश्न आहे, त्याची माहिती आता माझ्याकडे आता उपलब्ध नाही. सदरहू अहवाल पटलावर ठेवण्यात येईल. तसेच कर्जत आणि करमाळा या भागात पाणी सोडण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. मांगी तलावात 2012-13 च्या हंगामात कर्जत शाखा तलावाव्दारे 85 दशलक्ष घ.फू.पाणी सोडण्यात आले होते. सद्य:स्थितीत होणाऱ्या आवर्तन क्रमांक एकच्या नियोजनानुसार जिल्हाधिकारी,सोलापूर यांनी जी मागणी केली. त्याप्रमाणे 110 टीएमसी पाणी देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे मांगी तलाव जरी लाभक्षेत्रात येत नसला तरी आपण पाणी सोडलेले आहे आणि कर्जतमध्ये जेवढा पाणी पुरवठा आपल्याला अपेक्षित आहे. तसेच जी सिंचन क्षमता आहे आणि सिंचनामध्ये जेवढी आम्हाला अपेक्षा आहे तेवढे पाणी लायनिंग न झाल्यामुळे अजून आपल्याला देता आलेले नाही.

----

2 यु-3 . . . .





असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांबाबत

**उप सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.किशनचंद तनवाणी, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य आता सदनामध्ये उपस्थित नाहीत.

तसेच मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगू इच्छितो की, त्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे, परंतु त्यासंदर्भात उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्याने सदरहू सूचना उद्या चर्चेसाठी घेण्यात येईल. तसेच क्र.10 नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनाशी संबंधित आहे. माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव आता सभागृहात उपस्थित नाहीत.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ठीक आहे. धन्यवाद. सभापती महोदय, आपण माननीय मंत्री महोदयांना त्याबाबत सांगावे.

**उप सभापती** : होय. नक्की. मी माननीय मंत्री महोदयांना उद्या स्वतः घेऊन येईन. तसेच सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. पण सन्माननीय सदस्य येथे उपस्थित नाहीत. ठीक आहे.

मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, माननीय महसूल मंत्री यांनी विनंती केली असल्याने आजच्या कामकाज पत्रिकेवरील अनु.क्र.6 वरील (ब) (1) हे विधेयक अगोदर चर्चेसाठी घेण्यात येत आहे. त्यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

2 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. X OF 2013**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ENTERTAINMENTS DUTY ACT.)**

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक - 10 महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

सभापती महोदय, चित्रपट हा महाराष्ट्रातील एक महत्वाचा उद्योग असून या राज्यातील जी सिनेमागृहे आहेत आणि विशेषत: ग्रामीण भागातील जी सिनेमागृहे आहेत तेथील तिकीटांचे दर परवडत नाही म्हणून ही सिनेमागृहे मोठ्या प्रमाणात बंद करण्याची वेळ आली होती. ग्रामीण भागातील आणि नगरपालिका हद्दीतील जवळजवळ 200 सिनेमागृहे बंद झाली आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत झाली पाहिजे या उद्देशाने शासनाने हे विधेयक आणलेले आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील आणि ग्राम पंचायत क्षेत्रातील जी सिनेमागृहे आहेत, त्या सिनेमागृहांना आम्ही सात वर्षाकरता कर माफी दिलेली आहे. अ, ब व क या नगरपालिकांमध्ये पाच वर्षासाठी ही माफी देण्यात आली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

मोठ्या महानगरांतील चित्रपटगृहांतील सेवा शुल्कामध्ये वाढ केलेली आहे. शासन एक-पडदा चित्रपटगृहांच्या मालकांना करमणूक शुल्क भरण्यापासून सूट दिल्यामुळे राज्यावर दरवर्षी पाच कोटी रुपयांचा भार पडणार आहे. परंतु या निर्णयामुळे चित्रपटगृहांना ऊर्जित अवस्था येण्याकरिता आणि चित्रपटगृहे सुरु राहण्याकरिता निश्चितपणे मदत होणार आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा आहे. त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा प्रस्ताव आहे. त्यांनी तो मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन वि.स.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, 2013 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव यावर एकत्रित चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, आपण या विधेकान्वये एक-पडदा चित्रपटगृहांच्या मालकांना करमणूक शुल्क माफ केलेले आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भारनियमन आहे. आपण करमणूक शुल्क माफ करीत असताना त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेची काय दक्षता घेतली जाणार आहे ? ज्या बाबींसाठी ही परवानगी घेतलेली असते त्याची अंमलबजावणी न करता काही चुकीच्या गोष्टी देखील चालू असतात असे आपण अनेक ठिकाणी पाहिलेले आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, ग्रामीण भागाच्या संदर्भात जे नियम लावलेले आहेत त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे करणार आहात ? कारण आपणास अनेक ठिकाणी पळवाटा काढलेल्या दिसून येतात.

सभापती महोदय, आपण कायदा करीत असताना कायद्यांच्या मूळ बाबी बरोबरच केलेल्या बदलाचा काय परिणाम होणार आहे यावर सखोल चर्चा केली पाहिजे. त्यासाठी या विषयाशी संबंधित असलेल्या मान्यवरांशी चर्चा केली पाहिजे. त्याच बरोबर त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींना जाणवलेल्या त्रुटींबाबत देखील चर्चा केली पाहिजे. आपण असे केले तरच चांगल्या प्रकारे कायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, हे कायदे मंडळ असताना शासन दर चार-सहा महिन्यांनी अध्यादेश काढत आहे. त्या अध्यादेशाचा काय परिणाम होणार आहे त्याबाबतचे धोरण पुरेसे स्पष्ट नसते. करमणुकाच्या संदर्भात पूर्वी काय धोरण होते व आता कोणते नवीन बदल करायचे आहेत यावर सखोल चर्चा करण्यासाठी हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी विनंती करते.

--------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, चित्रपटगृहांची गुणवत्ता सुधारणा व त्यांना ऊर्जित अवस्था आणणे हा उद्देश या विधेयकामध्ये ठेवलेला आहे. चित्रपट उद्योगामध्ये खूप अडचणी आल्या होत्या. त्यामुळे जवळपास 200 चित्रपटगृहे बंद पडली होती असे मी अलीकडेच सांगितले होते. आपण चित्रपटगृहांना मदत करीत आहोत. काही ठिकाणी आपण सेवाशुल्कामध्ये वाढ केलेली आहे. जर चित्रपटगृह संपूर्ण वातानुकुलित असेल तर नऊ रुपये सेवाशुल्क, वातशीतल चित्रपटगृह असेल तर सात रुपये सेवाशुल्क आकारले जाणार आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सॅटेलाईटद्वारे संगणकीकृत तिकीट टर्मिनल नेटवर्कशी जोडलेल्या स्थायीवत चित्रपटगृहांच्या बाबतीत सेवा शुल्क प्रत्येक तिकिटामागे एक रुपया आकारणार आहोत. मराठी चित्रपट प्राईम टाईम वेळेत दाखविला तर दोन रुपये सेवाशुल्क आकारणार आहोत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:40

श्री.बाळासाहेब थोरात....

फिरत्या चित्रपटगृहांना 1 रुपये सेवा शुल्क घेण्यास परवानगी दिली आहे. वास्तविक पाहता सेवा शुल्क कराच्या कक्षेत येत नाही. हे सेवा शुल्क पूर्णपणे चित्रटपगृहांना मिळते. मुळात या माध्यमातून चित्रपटगृहांना जो फायदा होणार आहे त्यातून त्यांनी चांगले प्रक्षेपण करावे अशी अपेक्षा आहे. तसेच चित्रपटगृहांच्या माध्यमातून स्वच्छता, शौचालय इ. सेवा उत्तम दर्जाच्या मिळाल्या पाहिजेत. या बाबतचा उल्लेख जी.आर. मध्ये केला आहे. शिवाय या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा निर्माण केली आहे.

मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या सर्व बाबी एक पडदा सिनेमागृहांसाठी आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी अपेक्षा व्यक्त केलेली आहे त्या अनुषंगानेच हे विधेयक तयार केलेले असल्यामुळे ते संयुक्त समितीकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना विनंती करतो की, त्यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घ्यावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, चित्रपटगृहांची गुणवत्ता चांगली राहील अशी हमी माननीय मंत्र्यांनी दिलेली आहे. मुळात गुणवत्ता काय असते याची जाणीव ग्रामीण भागातील लोकांना चांगली आहे. भारनियमन असेल तर लोकांना काय फायदा होईल हे माहीत नाही. या विधेयकाच्या अनुषंगाने या पुढे जी सुधारणा करण्यात येईल त्या वेळी ते विधेयक संयुक्त समितीकडे जाण्यापूर्वी त्या विधेयकावर ऊहापोह करुन संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपटगृहांच्या काय समस्या आहेत त्या समजून घेऊन सुधारणा कराव्यात, एवढेच मी या निमित्ताने सांगते.

महोदय, मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे.  आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** :  सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-10 संमत झाले आहे.

----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजाबाबत हरकतीचा मुद्दा

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये कामकाज पत्रिकेप्रमाणे कामकाज चालत नाही. आम्ही मघाशी सचिवांना विचारले की, आज विशेष उल्लेख होणार आहेत का ? त्यांनी सांगितले की, आज विशेष उल्लेख होणार नाहीत. या सभागृहामध्ये नियमाप्रमाणे कामकाज चालले पाहिजे, अनुक्रमाप्रमाणे कामकाज चालले पाहिजे. कोणाच्या मनाप्रमाणे कामकाज चालू नये. या सभागृहामध्ये अनुक्रमाप्रमाणे कामकाज चालते. काही कामकाजाच्या बाबतीत मला भाग घ्यायचा नसेल तर बाहेर जाऊन मी परत सभागृहामध्ये येऊ शकतो. कोणता विषय कधी होतो हे आम्हाला कळत नाही. मी सचिवांना मघाशी विचारले की, आज विशेष उल्लेख होणार आहेत का ? त्यांनी सांगितले की, आज विशेष उल्लेख होणार नाहीत असे माननीय सभापतींनी सांगितले आहे. या ठिकाणी अशा पध्दतीने कामकाज होत आहे की, आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये माननीय सभापती महोदय कालचे प्रश्न वाचावयास लागले. हे काय चालले आहे ? या सभागृहामध्ये सभापती महोदयांकडे कालच्या प्रश्नोत्तरांची यादी दिली. त्यांनी कालचाच प्रश्न वाचून दाखविला आणि आम्ही या ठिकाणी खाली मान घालून बसावयाचे का ? यासाठीच लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे का ? या सभागृहामध्ये काय चालले आहे ?

सभापती महोदय, या सभागृहामध्ये आश्वासने दिली जातात. मी पहिल्या आठवड्यामध्ये नियम 93 च्या सूचनेव्दारे एक प्रश्न उपस्थित केला. त्या संदर्भात माननीय मंत्र्यांकडून मला उत्तर मिळाले. मी या ठिकाणी गंभीरपणे बोलत आहे. नियम 93 च्या सूचनेव्दारे मी आरसीएफ थळ च्या पाईपलाईनबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर सुदैवाने माझा प्रश्न सुध्दा चर्चेला आला. त्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी या सभागृहामध्ये असे सांगितले की, पुढील आठवड्यात संबंधित लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन आपण त्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करु.

सभापती महोदय, खडकवासला येथील शासनाच्याच संशोधन संस्थेने अहवाल दिलेला आहे की, जर ती पाईपलाईन फुटली तर संपूर्ण गावांना धोका आहे. या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी सुध्दा ते कबूल केले. काल दोन्ही माननीय मंत्र्यांनी कबूल केले की, उद्या सकाळी 9.00 वाजता आपण पाहणी करण्यासाठी जाऊ. मी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना सांगितले की, आपण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

सुध्दा ते बघण्यासाठी यावे. ते सकाळी 8.30 वाजता गेट वे ऑफ इंडिया येथे आले. दोन्ही मंत्र्यांनी मला रात्री कळविले की, आम्ही येऊ शकत नाही. या सभागृहाला काही बांधिलकी आहे की नाही ? या ठिकाणी आपले कार्यालय काय करते ? जे आश्वासन दिलेले आहे त्याची अंमलबजावणी अधिवेशनाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत कशी होणार ?

उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होत नसेल तर या सभागृहात चर्चा करण्याला काय अर्थ आहे ? आम्हाला मिळालेल्या आश्वासनाबाबत काय झ ाले हे आम्हाला कळत नसेल तर आम्ही चर्चेमध्ये भाग घेणार नाही. आम्हाला जी आश्वासने दिली जातात त्याला काही अर्थ राहणार नाही. राज्य शासनाला जर गांभीर्य नसेल तर या ठिकाणी दिलेली आश्वासने चुकीची आहेत. त्याची अंमलबजावणी होणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 15:50

श्री.जयंत प्र.पाटील....

याची जाणीव मला झालेली आहे. मला अत्यंत खेदाने बोलावे लागते की, मंत्री महोदयांनी या अधिवेशनामध्ये मला सभागृहात आश्वासन दिलेले आहे. सभागृहात दिलेल्या आश्वासनाची आजपर्यंत पूर्तता होत होती. शासन याची गंभीरपणे दखल घेणार आहे की नाही, हे अधिवेशन पक्षीय दृष्टीकोन ठेवून चालणार आहे काय ? सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून आमच्या अपेक्षा आहेत. या अधिवेशनाचे कामकाज पक्षीय दृष्टीकोन ठेवून चालणार आहे काय ? असे असेल तर आम्ही आमचे प्रश्न मांडणार नाही, आम्ही काही बोलणार नाही. (अडथळा)

सभापती महोदय, आम्ही सभागृहात पोटतिडिकीने बोलत असतो. परंतु त्याबाबत मंत्री महोदयांकडून आश्वासन दिल्यानंतर त्याची पूर्तता होणार नसेल, दिलेल्या उत्तराची दखल घेतली जाणार नसेल व कोणी या पध्दतीने वागत असेल तर ते चालणार नाही. आम्ही खपवून घेणार नाही. मी या सभागृहाचा सदस्य असल्यामुळे आम्हालाही अधिकार प्राप्त आहेत. कोणी व्यक्ती सभागृहाचे कामकाज ठरवू शकत नाही. सदस्य म्हणून अधिकार प्राप्त झालेले असताना त्याला कोणी बंधन घालत असेल तर ते आम्ही सहन करणार नाही. म्हणून मी गंभीरपणे बोलत आहे. मी सभागृहात 14 वर्षे घालविली आहेत. संसदीय लोकशाहीमध्ये काम करीत आहे.

मंत्री महोदयांनी सभागृहात कबूल केल्यानंतरही ते मी येऊ शकणार नाही असे मला कळवितात. शासन म्हणजे खाजगी मालमत्ता आहे काय ? शासन कोणत्याही पक्षाची खाजगी मालमत्ता नाही. या सभागृहात दिलेले आश्वासन मंत्री महोदयांकडून पाळले जात नसेल तर ते आम्ही सहन करणार नाही. या ठिकाणी कशासाठी व कोणते राजकारण केले जात आहे ? शासनाकडून लोकांच्या जीवनाशी खेळ केला जात असेल तर ते खपवून घेणार नाही. (अडथळा) त्या कोळीवाड्यामध्ये टाकलेली पाईप लाईन फुटली तर तेथील 3 गावांना धोका निर्माण होईल असे केंद्रीय संशोधन केंद्राने सांगितलेले आहे. मंत्री महोदयांनी सुध्दा ते कबूल केलेले आहे. ही वस्तुस्थिती असताना मंत्री महोदय भेट देण्यासाठी येत नाहीत, ही गोष्ट गंभीर आहे. तेथे 5 हजार लोकांची वस्ती आहे. तेथील फॅक्टरी खाजगी मालमत्ता सारखे काम करीत आहे, सीआरझेडचे उल्लंघन करीत आहे. पर्यावरणाचे कोणतेही निकष पाळत नाही. त्या फॅक्टरीवर शासन कोणतीही कारवाई करणार नाही ? या संदर्भात शासनाने आज संध्याकाळपर्यंत मला आश्वासन दिले पाहिजे. सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करणार की नाही ते मला कळले पाहिजे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, गेल्या 12 वर्षात मला कळलेले नाही. सभागृहात दिलेली आश्वासने विधिमंडळ कार्यालयाचे सचिव मंत्री महोदयांना कळवितात की नाही ? आश्वासन दिल्या प्रमाणे दालनात बैठक बोलविलेली आहे, असे मंत्री महोदयांना सांगतात की नाही ? याबाबत प्रोसिजर काय आहे ते मला कळलेले नाही. हरकतीच्या मुद्याच्या निमित्ताने मला कळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करीत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आता आपले मत मांडलेले आहे. मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांना कबूल केल्यानंतरही संबंधित खात्याचे दोन्ही मंत्री महोदय भेट देण्यासाठी येऊ शकले नाहीत. परंतु सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा गंभीर असल्यामुळे व त्यांनी ते निदर्शनास आणून दिल्यामुळे पुढील आठवड्यामध्ये दोन्ही मंत्री महोदयांबरोबर मी स्वत: तेथे येईन. एवढेच आता मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या सदनाच्या कामकाजामध्ये अनेकदा अडचण निर्माण झाली आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना शासनाकडून पाहिजे तशी उत्तरे मिळत नसतील तर माननीय सभापती त्यांच्या दालनात बैठक घेण्यात येईल असे सांगत असतात. असे अनेकदा त्यांनी सभागृहात सांगितलेले आहे. आताच सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत पाटील यांनी काही गोष्टी आपल्यासमोर मांडल्या आहेत. त्यांनी माननीय सभापतींच्या वागण्यावर हरकत घेतली आहे. दोन मंत्री भेट देण्यासाठी आले नाहीत हा भाग वेगळा आहे. परंतु त्यांनी विधिमंडळाच्या कामकाजाबाबत काही वक्तव्य केलेले आहे. सभागृहात कामकाजाचा क्रम सांगितला जातो तो आम्हाला कळत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

मी पाहिलेले आहे की प्रत्येक वेळी कामकाजामध्ये हा प्रश्न माननीय सभापती महोदयांनी घेतलेला आहे. दालनामध्ये माझी बैठक झाली, गट नेते आले, चर्चा झाली असे माननीय सभापतींनी अनेक वेळा सदनामध्ये सांगितलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा मांडला त्याचा अर्थ असा होतो की, आपण माननीय सभापतींच्या निर्णयाला चॅलेंज करीत आहोत. अशी कामकाजाची पध्दत राहाणार आहे काय ? दोन मंत्री आले नाहीत, त्यासंबंधी माननीय सभापतींनी निर्देश दिलेले असून त्याबाबतीत आपणाला न्याय देखील मिळेल. पण त्याबाबतीत माननीय सभापतींनी दिलेल्या निर्देशाबाबत हरकत घेणे आवश्यक होते काय ? सभापती महोदय, आता आपण सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी 10 मिनिटे बोलण्याची परवानगी दिली. सन्माननीय सदस्य 10 मिनिटे बोलणार आहेत हे आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविलेले आहे काय ? माहितीच्या मुद्याखाली आपण आपले म्हणणे मांडले असेल. परंतु माझा मुद्दा असा आहे की, आपण ज्येष्ठ सदस्य आहात, आम्ही तेवढे ज्येष्ठ नाही. सभापतीनी दिलेल्या निर्देशाबाबत येथे चर्चा करुन हरकत घेणे किंवा त्यांच्या निर्देशांना न मानने हे सभागृहाच्या दृष्टीने उचित नाही असे मला वाटते.

**(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. मोहन जोशी)**

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशनच्या अनुषंगाने मी या ठिकाणी एका गोष्टीची नोंद करु इच्छितो.

सभापती महोदय, 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना 2 आठवडयापूर्वी मांडली. मुंबईतील अडीच लाख प्रॉपर्टीवर वाढलेला प्रॉपर्टी टॅक्स, त्या प्रॉपर्टी टॅक्सचे 60 हजार लोकांना तिपटीने येणारे बिल या संदर्भात 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. त्याबाबतीत माननीय सभापतींनी निर्देश दिले आणि सांगितले की सन्माननीय सदस्यांनी ही सूचना मागे घ्यावी. त्यावेळी सभागृहामध्ये शासनाच्या वतीने माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. त्यांना माननीय सभापतींनी सांगितले की, आपल्या दालनामध्ये मिटींग घ्यावी. तत्कालीन मंत्री महोदयांनी उभे राहून सांगितले की, माझ्या दालनामध्ये संबंधित अधिका-यांची मी बैठक घेईन. अडीच आठवडे झाले तरी अद्याप बैठक झाली नाही. मुंबईतील नागरिकांवर कराचा मोठा बोजा पडत आहे. जवळ जवळ 50 टक्के मुंबईकरांवर प्रॉपर्टी टॅक्सचा बोजा पडलेला आहे. यामध्ये महानगरपालिकेची देखील चूक असेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार....

हा महानगरपालिकेने घेतलेला निर्णय असला तरी तो रिव्हाईज करण्याची आवश्यकता आहे. जो कायदा करण्यात आला त्यासंबंधी दालनामध्ये चर्चा करु असेही सांगण्यात आले. माझा मुद्दा एवढाच आहे की, माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिल्यानंतर मंत्री महोदयांनी आपल्या दालनात बैठक घेतलेली नाही. त्या संबंधी आपण पुन्हा एकदा मंत्री महोदयांना निर्देश द्याल काय ?

**तालिका सभापती** : आता विशेष उल्लेख घेण्यात येतील.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी./मु. शी.** : अंगणवाडीतील मुलांना महिला बचत गटातर्फे पुरविले जाणारे निकृष्ट दर्जाचे भोजन याबाबत प्रा. सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"राज्यात अंगणवाडीतील मुलांना महिला बचत गटातर्फे पुरविल्या जाणा-या भोजनाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून ते जनावरांसही खाण्यास योग्य नसल्याची धक्कादायक बाब महाराष्ट्र विधानसभेच्या लोकलेखा समितीने केलेल्या पाहणीत समोर आलेली आहे. या प्रकरणाची चौकशी करावी व तीन महिन्यात सदरचा अहवाल सादर करावा असे आदेश सदर समितीने महिला व बालकल्याण विभागाला दिलेले आहेत. अंगणवाडीतील सहा महिने ते तीन वर्षापर्यंतच्या मुलांना महिला बचत गटातर्फे अन्न पुरविले जाते. तसेच जी मुले अंगणवाडीत येत नाहीत त्यांना अन्नाची पाकिटे घरी पाठविली जातात. या अन्नात प्रथिने आणि उष्मांक असणे गरजेचे आहे. मात्र सरकारी प्रयोगशाळेत याचा दर्जा तपासला असता ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे आढळून आले आहे. राज्य शासन सदर प्रकरणी कोटयवधी रुपये खर्च करीत असून अशा घटनांमुळे राज्यातील मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या मनात नाहक असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करावी व अशा घटना विरुध्द शासनाने तातडीने कारवाई करुन राज्यातील अंगणवाडीतील मुलांना चांगल्या प्रकारे आहार देण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन द्याव्यात यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे."

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : दिवा जिल्हा ठाणे (पश्चिम) नागवाडी येथील नागरिकांना पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"दिवा जिल्हा ठाणे (पश्चिम) नागवाडी येथील नागरिकांना पाणी पुरवठा होत नसल्याने त्या ठिकाणी रु. 97 कोटी 41 लाखाच्या खर्चाला मंजुरी देऊन पाणी पुरवठा नियमित व भरपूर करण्यात येईल असे आश्वासन विधिमंडळामध्ये देण्यात आले होते. परंतु आत 2013 साला पर्यंत कोणतीही पाणी पुरवठा योजना दिवा नागवाडी या ठिकाणी राबविण्यात आलेली नाही, त्यामुळे स्थानिक जनता पाण्यासाठी वणवण फिरत आहे, म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणत आहे."

--

...नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबई शहरातील साकीनाका परिसरात दि.27.3.2013 रोजी ॲल्युमिनियम कारखान्यात स्फोट होऊन 10 कामगार गंभीर रित्या जखमी होणे याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबई शहरातील साकीनाका परिसरातील दि. 27.3.2013 रोजी एका ॲल्युमिनियम कारखान्यात स्फोट होऊन कारखान्यातील 10 कामगार गंभीररित्या जखमी होणे, साकीनाका येथे अशा प्रकारचे शेकडो अनाधिकृत कंपन्या असल्यातरी वरील अनधिकृत कारखान्यांना मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे अभय उसल्याचे उघडकीस येणे, या परिसरात शेकडो अनधिकृत कंपन्या असतांना पालिकेने गेल्या सात वर्षात केवळ आठच रासायनिक कंपन्यांवर कारवाई केल्याचे उघडढकीस येणे, पालिकेच्या एल विभागाच्या दप्तरी एकूण 24 कारखाने व 8 गोदामे असून, अनुज्ञ ापन खात्याच्या अखत्यारीतील महानगरपालिका अधिनियम कलम 394 अन्वये त्यांना अनुज्ञ ापनाद्वारे औद्योगिक वसाहतीत परवानगी दिलेली असणे, तसेच 8 अनुज्ञापने बडया शेतकऱ्यांना दिलेले असणे, प्रत्यक्षात मात्र या विभागाच्या अंतर्गत छोटे-मोठे असे शेकडो विविध अनधिकृत कारखाने राजरोसपणे सुरु असल्याने उघडकीस येणें, तथापि पालिका अधिकाऱ्यांचे त्याकडे दुर्लक्ष, त्यामुळे त्यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार व त्यामुळे अशा घटनात होत असलेली वाढ या गंभीर विषयाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष व याबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी या विशेष उल्लेखाद्वारे मी सूचना देत आहे."

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :मुंबई कांदिवली (प) येथील असंघटित कामगार व फेरीवाल्यांसाठी को.ऑ.क्रेडीट सोसायटी स्थापन करणारे कै.कपूरचंद गुप्ता यांची गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी हत्या करणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"मुंबई कांदिवली (प) येथील असंधटीत कामगार व फेरीवाले यांच्यासाठी कै.कपूरचंद गुप्ता यांनी हॉकर्स को. ऑप. क्रेडीट सोसायटीची स्थापना करण्यात येणे, त्यामुळे सदर परिसरातील असंघटीत कामगार, फेरीवाले यांना कमी व्याजात कर्ज पुरवठा होत असणे, तथापि त्याच विभागात राहणारे गुंड प्रवृत्तीच्या लोकांना असंघटीत कामगार व फेरीवाल्यांकडून मिळत असलेले व्याजरुपी जादाचे पैसे मिळण्याचे संपुष्टात येणे, त्यामुळे नैराश्य प्राप्त झालेलया गुंडानी कामगार नेते कै. कपूरचंद गुप्ता यांचे दि. 20 नोव्हेंबर, 2012 रोजी हत्या करण्यात येणे, मृत्युपूर्वी एक वर्ष अगोदर कै. कपूरचंद गुप्ता यांनी पोलीस संरक्षण मागणे, तथापि पोलीस खात्याकडून संरक्षण देण्यात न येणे, परिणामी गुंडाकरवी त्यांची हत्या करण्यात आल्याचा व यात मोठे षडयंत्र असल्याचा संशय, याबाबत सदर हत्या प्रकरणाचा सखोल तपास करुन हत्या करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्हयातील प्रचंड प्रदूषणामुळे नागरिकांना जीवघेण्या आजाराला सामना करावा लागणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"मध्य भारतात चंद्रपूर जिल्हा हा प्रदूषणात आघाडीवर असणे, चंद्रपूर जिल्हयात दिवसरात्र प्रदूषण असल्यामुळे अस्थमासह श्वसनाशी संबंधित रुग्णांची संख्या वाढणे, देशात प्रदूषणाच्या बाबीत दुसऱ्या क्रमांकावर चंद्रपूर जिल्हा असणे, प्रदूषणाने धूळ, वायू आणि जल यांनी उच्चांक गाठणे, त्यामुळे परिणामी दमा, हृदयविकार, कॅन्सर यासारख्या जीवघेण्या आजाराशी नागरिकांना नेहमी सामना करावा लागणे, चंद्रपूर जिल्हयासह यवतमाळ जिल्हयात प्रदूषण वाढलेले असल्यामुळे 100 बालकांपैकी 99 बालके दमा आजार घेऊनच जन्माला येत असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे."

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : स्टाफ सिलेक्शनच्या परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहणे याबाबत श्री.जयंतवराव जाधव,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"स्टाफ सिलेक्शन परीक्षेच्या टपालाने पाठविण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर बीवायके (सिन्नर)महाविद्यालय" असा चुकीचा पत्ता टाकल्यामुळे दि. 23 मार्च रोजी झालेल्या नाशिक येथे शेकडो विद्यार्थ्यांची फसगत होवून त्यांना या परीक्षापासून वंचित रहावे लागले आहे. यात अनेक अंध व मूकबधिर विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पत्रातील सिन्नरच्या उल्लेखामुळे शेकडो विद्यार्थ्यांनी सकाळी सिन्नर गाठले. तेथे कोणतीही परीक्षा नसल्याचे कळल्यावर पुन्हा धावपळ करत त्यांना नाशिक गाठावे लागले. वेळेच्या अपव्ययामुळे अनेक विद्याथी परीक्षेपासून वंचित राहिले, या विद्यार्थ्यांनी मदतीसाठी परीक्षा प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु सदर क्रमांकही स्विच ऑफ असल्याचे उत्तर मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या संतापात अधिकच भर पडली, सदर प्रकरणी स्टाफ सिलेक्शन कमिशननरे संबंधितांवर कारवाई करण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपायोजना करावी अशी मागणी हया विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी करीत आहे."

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : दि.2 मे, 2012 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक भरतीवर बंदी घालणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दि. 2 मे,2012 च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक भरतीवर बंदी घालणे, भरतीवरील बंदी दूर करण्यासाठी नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी व भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तातडीने निर्देश देणे, अल्पसंख्यांक शाळांसाठी अतिरिक्तांना सामावून घेण्याची तरतूद नसल्याने त्यांना तातडीने पदे भरण्यास अनुमती देण्याची आवश्यकता, 2मे 2012 पूर्वी ज्यांनी भरती प्रक्रिया सुरु केली होती त्यांच्या भरतीस परवानगी देणे, विद्यार्थ्यांचे 2012-2013 मध्ये शिक्षकांअभावी शैक्षणिक नुकसान झाले असून किमान 2013-2014 मध्ये याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

------

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातील लहान पशुधन धोक्यात येणे याबाबत श्री.दीपक साळुंके,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढली असून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्या बरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. सदर दुष्काळामुळे पशुधन धोक्यात आले असून ते अबाधित राहण्यासाठी शासनाने चार छावण्या सुरू केल्या असल्या तरी लहान जनावरांकडे म्हणजे शेळ्या-मेंढ्यांकडे शासनाने अद्याप लक्ष दिलेले नाही. पश्चिम महाराष्ट्रात विशेषत: सोलापूर, सातारा व सांगली जिल्ह्यात धनगर समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असून तेथील धनगर समाज हा आपल्या पारंपरिक व्यवसायाद्वारे अजूनही शेळी-मेंढींचे पालन करीत आहे. सोलापूर जिल्ह्यात शेळ्या-मेंढ्यांची संख्या 8 लाख 91 हजार 489 असून सदर शेळ्या-मेंढ्यांनाही ऐन दुष्काळाचा मोठ्या प्रमाणात सामना सहन करावा लागत असून त्यांच्या चाऱ्यांचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून शेळ्या-मेंढ्यांच्या चाऱ्यांचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सोडविण्याबाबत निर्णय घ्यावा अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मंत्रालय परिसरात अल्प दरामध्ये धर्मशाळा सुरू करणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुंबई ही राज्याची राजधानी असली तरी देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. मंत्रालय, विधान भवन व विविध शासकीय कार्यालये तसेच, केंद्रीय कार्यालयेही मुंबईत आहेत. राज्यभरातून हजारो लोक व विविध क्षेत्रातील कार्यकर्ते मुंबईत येत असतात. ही मंडळी वेगवेगळ्या आमदारांच्या माध्यमातून आपले प्रश्न सोडवून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आमदारांकडे उतरतात व प्रसंगी मुक्कामालाही राहतात. या लोकांची सोय करण्यासाठी शासनाने मंत्रालयाच्या परिसरात अल्प दरामध्ये धर्मशाळा उपलब्ध करून द्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे शहर व उपनगरात उघड्यावर ठेवल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांची व बर्फाची तपासणी करणे याबाबत श्री.अनिल भोसले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

पुणे शहर आणि उपनगरात उघड्यावर ठेवल्या जाणाऱ्या तसेच खाण्यास अपायकारक असलेल्या खाद्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात बाजार भरत असतो. या विक्रत्यांना या पूर्वी आरोग्य परवाना देताना त्यांना महत्त्वाच्या अटी शर्ती घालण्यात येत होत्या. मात्र, गत दोन ते अडीच वर्षात शहर आणि जिल्ह्यात सुमारे लाखभर खाद्य पदार्थांचे परवाने देण्यात येणे, मात्र या खाद्य पदार्थांच्या दर्जाबाबत कोणतीही तपासणी अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात न येणे, तसेच उन्हाळ्याच्या दिवसात अन्न औषध प्रशासनाने बर्फाचे नमुने घेऊन बर्फाची तपासणी दिनांक 15 एप्रिल 2013 अखेर करण्यात न येणे, परिणामी दूषित बर्फामुळे व उघड्यावरील खाद्य पदार्थांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मात्र, महापालिका प्रशासन आणि औषध प्रशासन विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत पुणे शहर आणि उपनगरात उघड्यावर ठेवल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांची व बर्फाची तपासणी करण्याबाबत शासनामार्फत संबंधितांना आदेश द्यावेत अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

......

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : बीड जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन योजने पासून वंचित राहणे याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिक सक्रिय सहभागी असणे, पैकी अनेक स्वातंत्र्य सैनिकांना शासनाने सन्मान पेन्शन मंजूर करणे, बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन पासून वंचित राहणे, अनेक स्वातंत्र्य सैनिकांकडे मुक्तीसंग्राम लढ्यातील कामाचा पुरावा नसल्यामुळे सन्मान पेन्शनचा प्रस्ताव दाखल न करणे, सन्मान पेन्शन मंजूर झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पुराव्याचा आधार घेऊन सन 1995 नंतर अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी सन्मान पेन्शनचे प्रस्ताव शासनाकडे दाखल करणे, प्रस्तावात संबंधितांनी अनेक महत्वपूर्ण पुरावे व कागदपत्रे दाखल करणे, न्यायमूर्ती पालकर आयोगाच्या स्वातंत्र्य सैनिक संदर्भातील महत्वपूर्ण कागदपत्रांचा समावेश असणे, स्वातंत्र्य सैनिकांनी दाखल केलेले प्रस्ताव व संचिका मंत्रालयीन विभागातून अचानक गहाळ होणे, गहाळ झालेल्या कागदपत्रात अनेक महत्त्वपूर्ण पुरावे व दस्तऐजवांचा समावेश असणे, मोठ्या अथक प्रयत्नाने जमविलेले पुरावे गहाळ झाल्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांवर संकट कोसळणे, यामुळे जिल्ह्यातील शेकडो स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन पासून वंचित राहणे, स्वातंत्र्य सैनिकांनी याबाबत चौकशी करण्याची मागणी करणे, स्वातंत्र्य सैनिकांना न्याय देण्यासाठी प्रकरणाची चौकशी करण्याबाबत तत्पर कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

..........

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यात महू-हातगेघर धरणाची उभारणी करणे याबाबत श्री.नरेंद्र पाटील वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.नरेंद्र पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यामध्ये महू-हातगेघर या धरण प्रकल्पाची उभारणी सन 1990 मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात येणे, सदर प्रकल्पामध्ये आधी पुनर्वसन नंतर धरण अशी योजना व धोरण शासनाने प्रकल्पग्रस्तांसमोर मांडणे, तसेच गावठाण परिसरामध्ये राज्य शासनाच्या 18 नागरी सुविधा व केंद्र शासनाच्या 23 नागरी सुविधा असून सुध्दा येथील प्रकल्पग्रस्तांना शासनाने सुविधा न पुरविणे, या प्रकल्पामध्ये कावडी हे गाव पूर्णत: बाधित झाले असून त्यांचे पुनर्वसन शासनाच्या नियोजनाप्रमाणे जाधववाडी, झिरपवाडी, ता.फलटण, या ठिकाणी शासनातर्फे जमिनीचे व 7:12 चे वाटप करण्यात येणे व नागरी सुविधा देखील उपलब्ध करण्यात येणे, परंतु कालांतराने जाधववाडीचा प्रस्ताव काही त्रुटींमुळे व्यपगत (रद्द) करण्यात आल्याचे सांगण्यात येणे, तसेच महू-हातगेघर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना योग्य तो न्याय शासनाकडून मिळविण्यासाठी तेथील समाजसेवक श्री.पसंतराव मानुकूमरे व श्री.तुकाराम घाडगे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयावर दिनांक 29 एप्रिल 2013 रोजी आंदोलनाचे आयोजन करण्याचे परिपत्रक दिले असता, आंदोलनापूर्वीच त्यांच्यावर 189,506, 386 व 109 असे आय.पी.सी. कलम लावून या समाज सेवकांना दिनांक 15 एप्रिल 2013 रोजी अटक करण्यात येणे, परिणामी प्रकल्पग्रस्तांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना व यामुळे पुढे होणारा मानसिक उद्रेक टाळणे याबाबत शासनाने प्रकल्पग्रस्तांचें तातडीने पुनर्वसन करुन नागरी सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी आंदोलनाचा इशारा देणाऱ्या समाज सेवकांची सुटका करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे."

-----

3 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी एकच विनंती करतो की, या समाजसेवकांवर मोर्चा काढण्याच्या अगोदरच त्याठिकाणी कलमे लावण्यात आली आहेत. त्या कलमाच्या माध्यमातून धरणग्रस्तांचे प्रश्न मांडणे हा काय गुन्हा आहे काय? सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, तेथील एस.पी.यांनी जे गुन्हे दाखल केले आहेत त्यानुसार हा खंडणीचा, जमावबंदीचा गुन्हा दाखल होऊ शकतो आणि आंदोलन करणाऱ्यांवर जर अशा प्रकारचे गुन्हे दाखल केले तर त्यांनी प्रकल्पग्रस्तांचे मुद्दे मांडावयाचे नाही काय असा प्रश्न आहे. म्हणून माझी आपणाला अशी विनंती आहे की, धरणग्रस्तांचे प्रश्न मांडणाऱ्या व्यक्तींना काहीतरी दिलासा द्यावा. त्याचबरोबर तेथील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनी लवकरात लवकर मिळवून देऊन सदरहू कलमे रद्द करण्यासाठी निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : शासन याबाबतीत दखल घेईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला असे वाटते की, विशेष उल्लेख यासाठीच आहे की,सन्माननीय सदस्य जो मुद्दा मांडतात, त्याची चौकशी केली जाईल आणि त्याबाबत उत्तर मिळेल.

-----

. . . .3 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





पृ.शी./मु.शी. : राज्यातील ग्रामीण भागामध्ये निर्माण

झालेली भीषण पाणी टंचाई याबाबत
श्री.निरंजन डावखरें यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळाचे सावट असून ्ग्रामीण भागामध्ये भीषण पाणी टंचाई असताना राज्यातील शहरी भागामध्ये विशेषत: मुंबईमध्ये मात्र दररोज लाखो लि.पाणी गळतीमुळे वाया जात असणे, राज्यभरामध्ये दररोज 1998 द.श.लक्ष लिटर म्हणजे सुमारे वार्षिक 650 कोटी रुपयांचे पाणी वाया जात असल्याने राज्यातील तिजोरीलाही मोठा आर्थिक फटका बसत असणे. मोठ्या शहरातील पाणी पुरवठा यंत्रणेला लागलेल्या गळतीवर वेळीच उपाय शोधला नाही तर राज्याला नजिकच्या काळात पाण्याचे उद्‌भवणारे संकट आणखी भीषण होण्याची चिन्हे असणे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे..

या पाणी गळतीमध्ये मुंबई आघाडीवर असून नंतर पुणे, नाशिक, ठाणे व नागपूर आदि मोठ्या शहरांचा यात समावेश असल्याचे एका पाहणीत निष्पन्न होणे, मुंबईत विविध धरणांतून होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील 700 दशलक्ष लीटर पाण्याची दररोज होणारी गळती ही कोल्हापूर सारख्या शहराच्या रोजच्या पाणी पुरवठ्याच्या सुमारे सातपट असल्याचे उघडकीस येणे, मुंबईसह मोठ्या शहरातील पाणी गळतीवर नियंत्रण आणण्यासाठी नादुरुस्त जलवाहिन्या दुरुस्त करणे व पाणी चोरीवर आळा घालण्याबाबत उपाय योजना करण्याची आवश्यकता असल्याने यावर शासनामार्फत तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मंगळवार, दिनांक 16 एप्रिल, 2013 रोजी सकाळी हार्बर लाईनवरील मानखुर्द स्टेशनजवळ सुमारे 12 मुलांनी लोकलमध्ये शिरुन प्रवाशांना लुटायला सुरुवात केली. प्रवाशांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केल्यावर त्यातील एका मुलाने पळून जाण्यासाठी उडी मारली, पण दुर्देवाने समोर येणाऱ्या लोकलखाली त्याचा मृत्यू झाला. फक्त एका 14 वर्षाच्या मुलाला प्रवाशानी पकडून ठेवले व नंतर त्याला रेल्वे पोलिसांकडे सुपूर्द केले. तो अल्पवयीन असल्याने त्याची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली. त्याच दिवशी वांद्रे येथे रेल्वे पोलिसांनी 12 युवकांना महिलांची छेडछाड करताना ताब्यात घेतले. हे सर्व युवक मंगळवारी भल्या पहाटे सिध्दीविनायकाचे दर्शन घेऊन परतत होते. या 12 जणांमध्ये सुध्दा 4 अल्पवयीन मुलांचा समावेश होता. मागच्या आठवड्यात सांताक्रुझजवळ 25 तरुणांना लोकलवर दगडफेक करताना पकडण्यात आले होते. मुंबईची लाईफ लाईन असलेला लोकल प्रवास दिवसेंदिवस असुरक्षित होऊ लागला आहे. केवळ रेल्वे पोलिसांवर जबाबदारी टाकून चालणार नाही. मात्र हे दुर्देवी प्रकार सोमवारी रात्री आणि मंगळवारी पहाटेच्यावेळी सातत्याने घडत असल्याने या बाबतीत तातडीने गृह खात्यातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित रेल्वे पोलिसांचे प्रमुख यांनी एकत्र येऊन असे कटु प्रसंग वेळीच रोखण्यासाठी खबरदारी घेण्याची व कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

खाजगी मालकीची जमीन सार्वजनिक उपयोगासाठी किंवा सामाजिक कार्यासाठी उपयोगात आणताना सदर जमीन मालकाने विना मोबदला बक्षीसपत्राने शासनाच्या नावाने हस्तांतरित केली जात होती. परंतु शासनाच्या नवीन नियमानुसार खाजगी जमीन सामाजिक उपयोगासाठी आणताना किंवा बक्षीसपत्राने शासनाच्या नावे देताना रेडी रेकनरनुसार मुद्रांक शुल्क व स्वतंत्र नोंदणी शुल्क भरणे बंधनकारक आहे. सदर शुल्क हे जमीन मालकाला द्यावे लागते. सामाजिक कार्यासाठी कोणी मोफत जमीन देणार असेल तर त्याला कसे अडवायचे हे शासन पाहत आहे. बाकी लूट सुरु आहे त्याला कोणी अडवीत नाही. खाजगी जमीन शासनाच्या नावे बक्षीसपत्राने देताना नाहक आर्थिक भुर्दंड पडत असल्यामुळे सामाजिक वापरासाठी शासनास जमीन देण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे सार्वजनिक वापरासाठी खाजगी जमीन उपलब्ध होणे कठीण झाले आहे. याबाबत शासनाने पूर्वीच्या नियमाप्रमाणे शासनाला बक्षीसपत्राने जमीन देताना रुपये 100 च्या स्टॅम्प पेपरवर देण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश देण्याबाबत कारवाई करावी. गरिबांच्या, सामान्य माणसांच्या कामासाठी कोणी दानशूर, धार्मिक कामासाठी मदत करीत असेल तर ती या प्रकारामुळे बंद होईल. तेव्हा माननीय मंत्री प्रा.लक्ष्मण ढोबळे यांनी मंत्रिमंडळामध्ये त्याबाबत आवाज उठवावा. मंत्र्यांना जमिनी लाटायच्या आहेत त्या लाटत आहेत,त्याला कोण अडवित आहे काय ?

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"मुंब्रा येथे इमारत कोसळून त्यात अनेक व्यक्तींचा मृत्यू होणे" या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा सुरु असताना मंत्रालयीन अधिकारी गॅलरीमध्ये विषयाशी संबंधित एकही अधिकारी उपस्थित नसल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय सभापतींचा निर्णय.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी ):** मला या ठिकाणी तीन निर्णय जाहीर करायचे आहेत.

शुक्रवार, दिनांक 5 एप्रिल, 2013 रोजी "मुंब्रा येथे इमारत कोसळून त्यात अनेक व्यक्तींचा मृत्यू होणे" या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सभागृहात चर्चा सुरु असलेल्या विषयाशी संबंधित एकही मंत्रालयीन अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित नसल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले व जोपर्यंत अधिकारी गॅलरीमध्ये संबंधित विषयाचे अधिक्‍ारी उपस्थित राहत नाहीत तोपर्यंत सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात यावी अशी हरकत घेतली.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**......

या संदर्भात माननीय मंत्र्यांनी काही खुलासा करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी देखील हीच मागणी केली. दोन्ही बाजूच्या सदस्यांनी आग्रही मागणी केल्यामुळे त्यावेळी पीठासीन असलेल्या माननीय उप सभापतींना सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करावी लागली.

सभागृहात सुरु असलेल्या विषयाशी संबंधित अधिकारी उपस्थित नसतील तर ते येईपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करणे उचित आहे का ? या मुद्याबाबत मी विधानपरिषद नियम, महाराष्ट्र विधानमंडळ बोधिका, कौल आणि शकधर यांच्या ग्रंथातील विवेचने, प्रथा, परंपरा तपासून पाहिल्या असता, मला खालीलप्रमाणे बाबी आढळून आल्या.

विधानपरिषद नियम 2 (जे) मधील सभागृहाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :-

'सभागृह' म्हणजे, विधानपरिषद व 'सभागृहे' म्हणजे विधानपरिषद व विधानसभा होय. या व्याख्येमध्ये कोणत्याही अधिकारी गॅलरीचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.

"विधानपरिषद नियम 2 (प) मधील 'सभागृहाचे आवार' म्हणजे कक्ष (चेंबर), सभाकक्ष (लॉबी), गॅलरी व त्यात सभापती व विधानसभेचे अध्यक्ष वेळोवेळी निर्दिष्ट करतील अशा इतर ठिकाणचा समावेश होतो." असे नमूद करण्यात आले आहे.

या गॅलऱ्यांमध्ये प्रवेश देण्याच्या संदर्भामध्ये विधानपरिषद नियम 286 मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे :-

"विधानपरिषदेचे सभागृह व तिच्या गॅलऱ्या यात अधिकारी, प्रेक्षक व वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी यांना विधानपरिषदेच्या बैठका सुरु असताना प्रवेश देण्याच्या व्याख्येचे नियमन सभापतींनी केलेल्या विनियमास अनुसरुन करण्यात येईल."

विधानपरिषद नियम 286 प्रमाणे विधानपरिषद सभापती व विधानसभा अध्यक्ष यांनी सभागृहातील शासकीय गॅलरीमध्ये प्रवेश देण्याचे नियम तयार केले असून सदर नियम महाराष्ट्र विधानमंडळ बोधिकेमध्ये अंतर्भूत केलेले आहेत. त्या नियमान्वये शासकीय गॅलरीकरिता शासकीय अधिकाऱ्यांनी अर्ज केल्यानंतर प्रधान सचिव यांच्याकडून त्यांना प्रवेश पत्र दिले जाते आणि त्या प्रवेश पत्राच्या आधारे शासकीय अधिकाऱ्यांना तेथे प्रवेश मिळतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**......

दिनांक 5 एप्रिल, 2013 रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, शासकीय गॅलरी म्हणजे सभागृहाचा भाग आहे काय ? आणि त्या ठिकाणी संबंधित अधिकारी नसतील तर सभागृहाची बैठक तहकूब करण्याची आवश्यकता आहे काय ? या बाबत कौल आणि शकधर यांच्या पार्लमेंटरी प्रॅक्टीस ॲण्ड प्रोसिजर या ग्रंथात पृष्ठ क्रमांक 1000 व 1001 वर असे निवेदन केले आहे की,

"शासकीय गॅलरीमध्ये सभागृहामध्ये सुरु असलेल्या कामकाजाशी संबंधित शासकीय अधिक्‍ारी मंत्र्यांना मदत करण्यासाठी उपस्थित राहतील." ज्यावेळी प्रश्नोत्तराचा तास सुरु असतो किंवा सभागृहाच्या इतर कामकाजाबाबत मंत्र्यांचे उत्तर सुरु असते त्यावेळी सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात काही अधिकची माहिती देण्याची गरज भासली तर, अशा अधिकाऱ्यांची माननीय मंत्री महोदयांना व पर्यायाने या सभागृहास अधिक सुस्पष्ट माहिती मिळण्यास मदत होते.

मी या संदर्भात सभागृहास असे अवगत करु इच्छितो की, सभागृह म्हणजे त्यात सभागृहात असलेल्या कोणत्याही गॅलरीचा संबंध येत नाही. त्यांचा त्या गॅलरीमध्ये उपस्थित असणाऱ्या अधिकारी व इतर लोकांचा समावेश होत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत म्हणून सभागृहाची बैठक तहकूब करणे हे संसदीय कार्यपध्दतीला अनुसरुन नाही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी उपस्थित राहणे हे शासनाच्या दृष्टीने अनिवार्य आहे. मात्र, त्याकरिता बैठक स्थगित करण्याचा आग्रह धरणे हे खचितच या सभागृहाच्या प्रतिष्ठेस धरुन नाही. हे पूर्वोदाहरण होऊ नये व अशी प्रथा देखील पडू नये, असे मी या निमित्ताने सभागृहास विदित करु इच्छितो.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. आपण दिलेला निर्णय योग्य आहे. त्याबद्दल दुमत नाही. परंतु या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय गट नेते श्री.दिवाकर रावते यांनी गॅलरीतील अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबद्दल मुद्दा उपस्थित केल्यानंतर सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करण्यात आली. पीठासीन अधिकाऱ्यांना मदत करणाऱ्या सचिवांनी त्याच वेळी हा नियम त्यांच्या निदर्शनास आणून दिला असता तर सभागृहाचा 10 मिनिटे वेळ वाया गेला नसता. मुळात विधिमंडळ सचिवांचे काम पीठासीन अधिकाऱ्यांना मदत करण्याचे आहे. परंतु त्यांनी हा निर्णय पीठासीन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून न दिल्यामुळे सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करावी लागली आणि पुन्हा त्यावेळी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यावरील निर्णय देण्यासाठी इतका वेळ वाया गेला आहे. अशा प्रकारची वेळ पुन्हा येऊ नये ही जबाबदारी आपल्याला मदत करणाऱ्या सचिवांची आहे. असा प्रसंग उद्‌भवल्यास त्यांनी आपल्याला तत्काळ मदत केली पाहिजे. हे खरे आहे की, 'गॅलरी' हा सभागृहाचा भाग होऊ शकत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, ज्या दिवशी हा मुद्दा उपस्थित झाला त्या वेळी आपण सभागृहात होता. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्येष्ठ सदस्य आहेत.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब ज्या ज्या वेळी जी जी मागणी करतात त्यावेळी पीठासीन अधिकारी असतील, उप सभापती असतील, ते त्यांचे म्हणणे ऐकतात. त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जी मागणी केली ती ऐकून आम्हाला सुध्दा आश्चर्य वाटले. मी पहिल्यांदा ज्यावेळी या सभागृहामध्ये आलो त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचे एक वाक्य माझ्या लक्षात राहिले आणि ते म्हणजे अधिकाऱ्यांची गॅलरी ही अदृश्य असते. त्याची आपण कोणत्याही प्रकारे दखल घ्यावयाची नसते. गॅलरीत अधिकारी उपस्थित नाहीत म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सभागृहाचे कामकाज तहकूब करण्याची मागणी करावी याचे आश्चर्य वाटले.

श्री. रामदास कदम : त्यावेळी आपण सर्वांनी त्यांना पाठिंबा दिला आणि सभागृहाचे कामकाज तहकूब केले.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**अशासकीय कामकाजाच्या बॅलेटच्या वेळेबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय सभापतींचा निर्णय**

**तालिका सभापती** : गुरुवार, दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अशासकीय कामकाजाचे बॅलेट सकाळी 10.00 वाजता न घेता ज्यावेळी सभागृहाचे मध्यंतर असेल त्या वेळी घेण्यात यावे असा मुद्दा उपस्थित केला होता. या संदर्भात मी माहिती घेतली असून सदर बॅलेट मंगळवार, 12 मार्च, 2013 रोजी सभागृह सुरु होण्यापूर्वी म्हणजे सकाळी 10 वाजून 45 मिनिटांनी घेण्यात आले होते. सामान्यत: अर्धा-तास चर्चेचे बॅलेट सकाळी 10.30 वाजता घेण्यात येते व त्यानंतर लगेच 10 वाजून 45 मिनिटांनी अशासकीय कामकाजाचे बॅलेट घेण्यात येते. सभागृहाच्या बैठकीची नियमित वेळ सकाळी 11.00 वाजताची असल्याने या बॅलेट घेण्याच्या प्रचलित वेळा योग्य असल्याने त्यात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**सभागृहाच्या कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात माननीय सभापतींचा निर्णय**

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज कार्यक्रम पत्रिकेनुसार चालते मात्र अनेकदा सभागृहाचा अंदाज विचारात घेऊन, सभागृहातील नेत्यांशी विचारविनिमय करुन काही प्रमाणात बदल करण्यात येतात. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कार्यपध्दतीबाबत घेतलेला आक्षेप योग्य नाही. माननीय सभापतींनी अगोदरच्या दिवसाच्या यादीमधील प्रश्न पुकारल्या बाबतचा मुद्दा आपण सर्व जाणताच. या याद्या आजच पटलावर ठेवण्यासाठी कार्यक्रम पत्रिकेवर ठेवलेल्या होत्या. त्यातील एक यादी अनवधानाने हाती पडल्याने काहीसा गोंधळ झाला होता. मात्र ही बाब कार्यक्रम पत्रिकेवर होती हे ध्यानात घ्यावे.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : 2002 पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे

**मु.शी.** : 2002 पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, चंद्रकात पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री भाई गिरकर, रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब, श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांचा प्रस्ताव

**तालिका सभापती** : आता नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावर चर्चा सुरु होईल. ही चर्चा आपण किती वेळेपर्यंत चालू ठेवावी हे सन्माननीय सदस्यांनी सांगावे. नियमाप्रमाणे 2 तासांमध्ये दोन्ही बाजूच्या सदस्यांची भाषणे पूर्ण झाली पाहिजेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसाठी जास्त वेळ असतो.

**तालिका सभापती** : दोन तासाचा वेळ दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणासाठी असतो आणि माननीय मंत्र्यांच्या उत्तरासाठी 40 मिनिटांचा वेळ असतो. या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर आज ठेवावयाचे की उद्या ?

श्री. विनोद तावडे : उत्तर उद्या ठेवावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील अंतिम आठवडा प्रस्ताव मांडतो.

"सन 2002 पासून अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे, गत काही वर्षातील प्रमुख लेखाशीर्षामधील शेकडो कोटी रूपयांची रक्कम अखर्चित राहिल्याने अनुसूचित जातीचे बांधव विकासापासून वंचित राहणे, सन 2012-13 मध्ये देखील बऱ्याचशा योजनांमधील 50 टक्क्यापेक्षा अधिक रक्कम अखर्चित असल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जातीच्या बांधवांना दारिद्रय रेषेच्यावर आणावे, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ मर्यादित व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित या राज्य शासनाच्या उपक्रमाची स्थापना करण्यात येणे, परंतु या महामंडळातील योजनांचा लाभ केवळ जवळच्या कार्यकर्त्यांनाच देण्यात आल्याने अनुसूचित जातीतील गरीब बांधव या योजनांपासून वंचित राहणे, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, महार वतनांच्या जमिनीचा सुध्दा काही विशिष्ट व्यक्तींनी स्वहितासाठी वापर केल्याने अनुसूचित जातीच्या कोट्यवधी बांधवांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष, त्याचप्रमाणे अनुसूचित जमातींच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या व्यवसायांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस येवूनही दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांना शासनाकडून संरक्षण मिळाल्याचे निदर्शनास येणे, भ्रष्टाचारामुळेच आदिवासी बांधव आजही विकासाच्या मार्गापासून वंचित असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, तसेच अर्थसंकल्पामध्ये बेदखल कुळांच्या बाबतीत कोणतीही तरतूद न करणे, त्याचप्रमाणे, कोकण प्रदेश विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सन 2009 मधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घोषित केलेल्या कोकण विकास पॅकेजमध्ये 1900 कोटी रूपयांची रक्कम अद्यापही अखर्चित असणे, तसेच अनेक निसर्गरम्य ठिकाणे, जागतिक पातळीवर स्पर्धा करू शकतील असे स्वच्छ समुद्र किनारे कोकणाला लाभूनही अर्थसंकल्पात कोकणाला आवश्यक तो निधी न मिळाल्याने कोकणातील पर्यटनाचा विकास रखडलेला असणे, अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद न केल्याने सिंचन, कृषीपंप, रस्ते, इ. च्या अनुशेषामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण कोकणातील जनतेमध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

सभापती महोदय, सभागृहाच्या गॅलरीतील अधिकारी अदृश्य असतात हे आम्हाला माहीत आहे. परंतु ज्या मंत्री महोदयांनी दृश्य स्वरुपात सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे ते आदिवासी विकास विभागाचे दोन्ही मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्याचप्रमाणे या चर्चेच्या वेळी नियोजन विभागाच्या माननीय राज्यमंत्र्यांनी देखील सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांना असे वाटत असते की, आपल्या खात्याचे मंत्रीच उपस्थित राहत नाहीत तर आपण तरी कशाला उपस्थित राहावयाचे ? अशा प्रकारची भावना त्यांच्यात निर्माण होत असते.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या दृष्टीने अंतिम आठवडा प्रस्ताव अतिशय महत्वाचा असतो. या राज्यामध्ये मागासवर्गीय आहेत, आदिवासी आहेत, डोंगराळ भागात राहणारे कोकणवासीय आहेत. या सर्वांविषयी राज्य सरकारची भूमिका काय आहे ? या सर्वांसाठी काम करण्याचा शासनाचा दृष्टीकोन काय आहे, याचे वास्तव सर्वांसमोर यावे आणि यातून सरकारला काही सुचले पाहिजे. कारण प्रत्येक वेळी निवडणुका आल्यानंतर शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन मते ओरबडायची आणि पुढील 5 वर्षे सत्ता राबवावयाची. मग एखादे सामान्य खाते सन्माननीय मंत्री श्री.ढोबळे यांच्या सारख्या व्यक्तीला द्यावयाचे. या चळवळीत नेतृत्व करण्याची क्षमता असताना सुध्दा ते लक्ष्मणरेषा पाळतात, सरकारच्या प्रगती पुस्तकाबाबत पास नापास असे म्हटले असले तरी सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. कारण माननीय श्री.ढोबळे साहेब हे तळागाळातील लोकांमध्ये फिरत असतात. त्यांना वास्तव माहीत आहे. ते वास्तव प्राध्यापकी भाषेत मांडतात. परंतु नापास झालेले हे सरकार काय करते ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

हा विषय गांभीर्याने घेण्याचे कारण असे आहे की, मला नुकतीच जनगणनेची आकडेवारी वाचायला मिळाली. ही आकडेवारी आपल्या पुरोगामी महाराष्ट्राची आहे काय असा प्रश्न मला पडलेला आहे. राज्यात मागासवर्गीयांची सुमारे 34 लाख 11 हजार 405 कुटुंबे आहेत. त्यापैकी सुमारे 5 लाख 55 हजार 80 कुटुंबांना स्वतंत्र शौचालय नाही. तसेच सार्वजनिक शौचालय देखील उपलब्ध नाही. सुमारे 12 लाख 74 हजार 30 कुटुंबाना तर मोकळया जागेवर शौचाला जावे लागते. हे धक्कादायक वास्तव आहे. राज्यातील 18 लाख 32 हजार 110 मागासवर्गीय कुटुंबे रहात असलेल्या परिसरामध्ये शौचालयाची सोयच नाही. राज्यातील 1 हजार 193 माणसाद्वारे तर 6392 प्राण्यांद्वारे शौच वाहून नेण्याचे काम पुरोगामी महाराष्ट्रामध्ये, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये होत आहे. माणूस मैला वहात आहे. याची सत्ताधा-यांना लाज वाटते की नाही असा प्रश्न मला हे जनगणनेचे आकडे वाचताना पडला आहे. राज्यातील मागासवर्गीयांच्या 33 लाख 11 हजार 405 कुटुंबापैकी 43 हजार 122 कुटुंबाना आज लाईट नाही. त्यांच्यापर्यंत विजेचे कनेक्शन पोहोचलेले नाही. या कुटुंबाना आपण विकासाचा दिवा सोडा, साधा प्रकाश सुध्दा देऊ शकला नाहीत. वीज, रॉकेल, सौर ऊर्जा, इतर तेल व अन्य स्त्रोतांपासून मिळविण्याचे तंत्र या कुटुंबापर्यंत अद्याप पोहाचले नसून आपले राज्य किती प्रगती करीत आहे हे पाहिल्या नंतर राज्य शासन किती पोकळ बाता मारत आहे हे जाणवते. 17 लाख 77 हजार ग्रामीण कुटुंबांपैकी केवळ 9 लाख 34 हजार मागासवर्गीय कुटुंबे बँकिंगचा वापर करतात. मग कॅश फॉर सब्सिडी कशी देणार ? राहुल गांधी यांची कॅश फॉर सब्सिडीची जी योजना आहे तिची सब्सिडी ज्यांचे अकौण्ट नाही त्यांच्या नावे जाणार आहे की, त्यांच्या नावाने जे कार्यकर्ते बँकेत अकौण्ट उघडणार आहेत त्यांच्या नावे जाणार याबाबत आम्हाला चिंता आहे. बँकेचा वापर अपरिहार्य असताना 48 टक्के मागासवर्गीय कुटुंबे अद्याप बँकेचा वापर करीत नाहीत. 21व्या शतकातील महाराष्ट्राचे हे वास्तव आहे.

सभापती महोदय, आपण इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर करीत आहोत असे मला वाटले होते. परंतु आधुनिक युगात फक्त 12 हजार 915 मागासवर्गीय कुटुंबीयाकडे इंटरनेटची सुविधा आहे. ही परिस्थिती पाहून मला धक्का बसला. 0.72 टक्के मागासवर्गीय समाजामध्ये इंटरनेटचा वापर होतो. ही कोठली प्रगती आहे ?

===नंतर श्री. जुन्नरे..

श्री. विनोद तावडे.....

ग्लोबल व्हीलेज, वर्ल्ड इज राऊंड, ऑटोमोबाईल इंडस्ट्रीमध्ये बूम, पार्किंगला जागा नाही म्हणून पार्किंगला इन्सेन्टीव्ह देण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे असे सांगितले जाते. परंतु हे सर्व होत असतांना केवळ 14,681 चार चाकी वाहने मागासवर्गीय कुटुंबाकडे आहेत. याची टक्केवारी .82 येते. घरोघरी टीव्ही आणि टेलिफोनची सुविधा आहे. टीव्हीचा उपयोग मनोरंजनासाठी व घडामोडी कळण्यासाठी होत असतो. परंतु 13,932 मागासवर्गीय कुटुंबाकडेच टीव्ही आणि टेलिफोन आहे व ही टक्केवारी .78 आहे. शाहू, फुले व आंबेडकरांचे नाव घेऊन सत्तेमध्ये येणाऱ्यांमुळेच मागासवर्गीयांची अशी स्थिती झालेली आहे. आज मागासवर्गीयांची जी अवस्था आहे ती या राज्य सरकारमुळेच आली आहे असे म्हटले तर ते चूक होणार नाही. आम्ही दलितांचा उध्दार करणारे आहोत, मागास समाजाला प्रगतीकडे नेणारे आहोत अशा प्रकारचे होर्डींग मंत्रालयासमोर लावले जातात. आता या होर्डींगची काही सुध्दा गरज नाही. या होर्डींगच्या ठिकाणी मागासवर्गीयाची टक्केवारी कशी कशी कमी होत गेलेली आहे हे दाखविणारी आहे. .78 टक्के, .88 टक्के आकडेवारीची होर्डींग लावा. मंत्रालयात जातांना व मंत्रालयातून निघतांना रोज माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनाही हे होर्डींग दिसली पाहिजे. तसेच हे होर्डींग समाजकल्याण मंत्र्यांनीही रोज पाहिली पाहिजे.

सभापती महोदय, खरे म्हणजे ढोबळे साहेब आमच्या समाजाचा अशा प्रकारे गैरवापर करु नका असे आपण ठणकावून सांगितले पाहिजे. मागासवर्गीयांची आज आपल्या राज्यात काय स्थिती आहे याचे चित्रण दिसावे यासाठीच हा विषय अंतिम आठवडा प्रस्तावासाठी घेण्यात आलेला आहे. या सरकारने दलितांचा उध्दार केला आहे की, दलितांचे खच्चीकरण केले आहे याची माहिती देण्यासाठीच हा अंतिम आठवडा प्रस्ताव घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीयांची अवस्था बदलण्यासाठी विविध योजना आपण अर्थसंकल्पात घोषित करीत असतो. मागासवर्गीयांसाठी आपण निधीची तरतूद करतो त्याची आज काय स्थिती आहे याबाबत मी धावता आढावा आपल्याला देणार आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 46 अमलात आणण्यात शासन अपयशी ठरले आहे असा माझा आरोप आहे. अनुच्छेद 46



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

असे सांगतो की, राज्य हे दुर्बल वर्ग, विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे सरंक्षण करील अशी आपली घटना सांगते. योजना आयोगाच्या निर्देशानुसार, अनुसूचित जाती उपयोजनेचा निधी नॉन लॅप्सेबल आणि नॉन डायव्हर्टेबल असतो. माननीय मोघे साहेब आपला किती निधी डायव्हर्ट झाला हे सांगण्याची हिंमत तुम्ही आज या ठिकाणी दाखवली पाहिजे. अखर्चित निधी समर्पित होत नाही, तर तो दरवर्षी संग्रहीत होतो. हा संपूर्ण निधी अनुसूचित जातींच्या व्यक्ती/कुटुंब यांचे समग्र कल्याण तसेच त्यांचे वस्तीत पायाभूत सुविधांवरच खर्च करण्याचे बंधन आहे. त्यामुळे हा निधी इतरत्र कोठेही वळविता येत नाही. हेच तत्व अनुसूचित जमातीला सुध्दा लागू आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाकडे 10 वी व 11 वी पंचवार्षिक योजना वर्ष 2002-2003 ते 2011-12 या कालावधीचा सुमारे 7 हजार कोटी रुपयांचा अनुसूचित जाती उपयोजनेतील निधीचा अनुशेष आहे. विदर्भाचा आणि मराठवाडयाचा तर अनुशेष आहेच आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आणि त्यावर आपण बोलतो सुद्धा मागासवर्गीय लोकांचा 7 हजार कोटी रूपयांचा अनुशेष आहे. लोकसंख्ये नुसार जी रक्कम द्यायला पाहिजे होती ती दिलेली नाही. जी रक्कम दिली ती अखर्चित राहिली आहे. त्याची दरवर्षीची बेरीज करून आम्ही अनुशेष काढलेला आहे. अनुसूचित जाती उप योजनेचा निधी लॅप्स होत नाही. तो समर्पित होत नसल्यामुळे तो कॅरिफॉरवर्ड व्हायला पाहिजे. जसे आरक्षण धोरणानुसार सेवेतील पदांचा अनुशेष काढला जातो तसेच SCSP चा अनुशेष काढायला पाहिजे. परंतु. तसे केले गेले नाही हे त्यातील वास्तव आहे.

अनुसूचित जाती उपयोजना विषयाची माहिती माझ्याकडे आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार अर्थसंकल्पीय तरतूद 50258 कोटी होती. अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार अर्थसंकल्पीय तरतूद 1,61,075 कोटी एवढी होती. दहाव्या पंचवार्षिक योजने नुसार अनुसूचित जाती उप योजना आवश्यक तरतूद 10.2 टक्के प्रमाणे 5126 कोटी रूपये इतकी होती, तर अकराव्या पंचवार्षिक योजने नुसार अनुसूचित जाती उप योजना आवश्यक तरतूद 10.2 टक्के प्रमाणे 16430 कोटी रूपये इतकी तरतूद होती. दहाव्या पंचवार्षिक योजनेत नाकारलेली तरतूद 308 कोटी रूपयांची आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 1000 कोटी रूपये कमी दिले आहेत. दहाव्या पंचवार्षिक योजनेत खर्च झालेली रक्कम 3259 कोटी एवढी असून राहिलेली रक्कम 1559 कोटी एवढी आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खर्च झालेली रक्कम 10992 कोटी असून अखर्चित रक्कम 4152 कोटी एवढी आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नाकारलेली तरतूद 308 कोटी रूपयांची होती, तर अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नाकारलेली तरतूद 986 कोटी होती. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अखर्चित तरतूद 1559 कोटी रूपयांची असून अकराव्या पंचावार्षिक योजनेमधील अखर्चित तरतूद 4152 कोटी रूपये आहे. अशा प्रकारे 10 व्या व 11 व्या पंचवार्षिक कालावधीत आघाडी शासनाने 1294 रूपयांची रक्कम अनुसूचित जातींच्या बांधवांना दिलीच नाही व जी रक्कम दिली त्यापैकी 5711 कोटी रूपयांची रक्कम अखर्चित राहिली आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जयघोष करून पैसे मात्र दुसरीकडे वळवत शासनाने 7005 कोटी रूपयांचा अनुशेष जाणीवपूर्वक निर्माण केला आहे. त्यामुळे आपण ॲट्रॉसिटी दाखल केली पाहिजे. माझे म्हणणे खोटे आहे काय, हे सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी सांगावे. कॉलेजची फी सरकार भरणार आहे. ही फी सरकारकडून नंतर येणार आहे. ती फी विद्यार्थ्यांकडे मागितली तर ॲट्रॉसिटी दाखल करावा असे कायद्यामध्ये सांगितले आहे. मी जे म्हणतो आहे ते जर झाले असेल तर या राज्य सरकारवर ॲट्रॉसिटी दाखल केला पाहिजे की नाही हे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी सांगावे. जो प्रामाणिकपणे महात्मा फुले, पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांचे नाव घेतो त्याने मोकळेपणाने मांडले पाहिजे की, होय, ही आकडेवारी खरी असेल तर हा केलेला अन्याय आहे. त्यासाठी ॲट्रॉसिटी दाखल केला पाहिजे.

सभापती महोदय, माझ्याकडे लेखाशीर्षनिहाय अखर्चित रकमेची माहिती आहे. सन 2006 ते 20012 पर्यंत माझ्याकडे सगळी माहिती आहे. सन 2006-07 पासून 2225 या राज्यस्तर मागासवर्गीयांचे कल्याण लेखाशीर्षामध्ये 336.34 कोटी रूपयांची रक्कम अखर्चित आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.भारवी . . . . 16:50

श्री.विनोद तावडे . . ..

2006 पासून 2012 पर्यंत वर्षनिहाय आकडेवारी माझ्याकडे आहे. पण वेळ कमी असल्यामुळे मी त्यामध्ये जात नाही. लेखा शीर्ष 2235 सामाजिक सुरक्षा व कल्याण, 2006 पासून 2012 पर्यंत त्यातील अखर्चित असलेली रक्कम सव्वाकोटी रुपये आहे. तुम्हाला कोण-कोण मंत्री लाटतात हे कळावे म्हणून मी सांगत आहे. लेखाशीर्ष-2216, गृहनिर्माण यामध्ये जवळजवळ 2006 पासून 2011-2012 पर्यंत 344.85 कोटी इतकी रक्कम अखर्चित आहे. ते कोण मंत्री आहेत याची माहिती काढावी. लेखाशीर्ष - 4225, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या कल्याणावर भांडवली खर्च हा 2006-2007 पासून 2011-2012 पर्यंत अखर्चित रक्कम 541.16 कोटी रुपये आहे. सभापती महोदय, लेखा शीर्ष्-6225, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी कर्ज अखर्चित रक्कम 141.23 कोटी रुपये आहे. केंद्र पुरस्कृत योजनेचा निधी सुध्दा अखर्चित आहे. केंद्र पुरस्कृत योजना निधीचे लेखाशीर्ष यामधील 2006 पासून 2011-2012 पर्यंतचा खर्च काढला तर 307.73 कोटी रुपये हे अखर्चित दाखविले आहेत. अशा प्रकारे मी 2006-2007 पासूनचे महत्वाचे लेखा शीर्ष काढलेले आहे, सगळे काढलेले नाहीत. यामध्ये 1 हजार 650 कोटी रुपयांचा निधी अखर्चित ठेवलेला आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील जनतेकरता, अनुसूचित जाती उप योजना 2012-2013 या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत शासनातर्फे विविध विभागांना निधीचे वाटप करण्यात आले. पण त्या निधीची उपलब्धता तसेच विनियोग कशा प्रकारे करण्यात आला, याचे काही ठळक तपशीलातील नमुने सांगतो म्हणजे तुम्ही या मागासलेल्या समाजाला कसे मूर्ख बनवित आहात, त्यांच्यासाठी देण्यात आलेला निधी कसा डायव्हर्ट करीत आहात, तो दुसऱ्या ठिकाणी नेऊन कसा लाटला जात आहे ही सर्व उदाहरणे पाहिल्यानंतर लक्षात येते. रोजगार हमी योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी बांधण्यात आलेल्या विहिरींवर वीज पंप बसविणे या योजनेमध्ये 2012-2013 मध्ये कृषी व पशुसंवर्धन आणि मत्स्य व्यवसाय विभागास रोजगार हमी योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी बांधण्यात आलेल्या विहिरींवर वीज पंप बसविण्यासाठी 1 कोटी रुपये मंजूर केले. पण ते 1 कोटी रुपये सुध्दा खर्च झाले नाहीत. एक पैसा देखील खर्च झाला नाही. हा निधी जसाच्यातसा राहिलेला आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धनाच्या बाबत सांगावयाचे तर वैयक्तिक लाभार्थींना संकरित गाई-

. . . .3 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

म्हशींचे वाटप करणे. या योजनेमध्ये 2012-2013 मध्ये वैयक्तिक लाभार्थींना संकरित गाई-म्हशींचे वाटप करावयाचे आहे. दहा अधिक एक शेळी गटाचे वाटप करावयाचे आहे. कंत्राटी पध्दतीने मांसलपक्षी पालन करणे याकरता 21 कोटी 91 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. परंतु मंजूर निधीपैकीकेवळ 1 कोटी 37 लाख 47 हजार इतकाच निधी खर्च झाला. उर्वरित 20 कोटी 53 लाखाचा निधी जानेवारीपर्यंत खर्च झाला नव्हता.

सभापती महोदय, जवाहर विहिरी कार्यक्रम, शेततळी, फलोत्पादनाच्या कार्यक्रमासाठी 2012-2013 मध्ये 14 कोटी 32 लाख व 14 कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी शेततळी बांधण्याकरता जानेवारीपर्यंत 100 टक्के निधी खर्च झाला नव्हता आणि फलोत्पादनाच्या कार्यक्रमाकरता प्राप्त निधी पैकी जानेवारी 2013 पर्यंत 1 कोटी 25 लाख 69 हजार रुपये एवढाच निधी खर्च झाला आहे.

सभापती महोदय, महिला आर्थिक विकास महामंडळासाठी जिल्हा परिषदेला आय.सी.डी.एस.चे अनुदान असते. महिलांच्या सक्षमीकरणाकरता आणि एकात्मिक बालविकास सेवा योजना म्हणजे आय.सी.डी.एस. यासाठी 1 कोटी 38 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी महिला आर्थिक विकास महामंडळासाठी जिल्हा परिषद अनुदानाकरता मंजुरीपैकी म्हणजे 1 कोटी पैकी केवळ 20 लाख रुपये देण्यात आले होते आणि 38 कोटीपैकी 3 कोटी 33 लाख 28 हजार इतका निधी खर्च झाला होता हे यातील वास्तव आहे. त्यामुळे विविध विभागांमध्ये निधी कसा खर्च होत नाही आणि तो पैसा कसा डायव्हर्ट होतो किंवा ऐनवेळी सर्व बिले काढून कसा खाल्ला जातो याची ही सगळी उदाहरणे आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, बाल कामगार पध्दतीचे निर्मूलन आणि पुनर्वसन योजना- माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी, बालकामगार मुक्त करण्यात येतील अशी घोषणा केली होती. हे काम गृह विभागाचे आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. त्यांनी घोषणा तर जोरात केली होती. सन 2012-2013 मध्ये कामगार विभागास बाल कामगार पध्दतीचे निर्मूलन व पुनर्वसन योजनेकरिता 10 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. परंतु त्यासाठी सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सहकारी सूत गिरण्यांसाठी भाग भांडवली अंशदान योजना आहे. सन 2012-2013 मध्ये वस्त्रोद्योग विभागास सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान, अनुसूचित जातीच्या अस्तित्वातील यंत्रमाग घटकांच्या आधुनिकीकरणासाठी पात्र दीर्घ मुदती कर्जाचे दहा टक्के भांडवली अनुदान, वस्त्रोद्योग धोरणांतर्गत अनुसूचित जातीच्या यंत्रमाग घटकांच्या आधुनिकीकरणासाठी कर्ज प्रकल्प तयार करण्याकरिता व्यावसायिक संस्थांना अनुज्ञेय सक्सेस सस्केस फी देणे या करिता मंजूर झालेला 25 कोटी रुपयांचा संपूर्ण निधी अखर्चित राहिला.

सभापती महोदय, खादी ग्रामोद्योग विकास मंडळ - बलुतेदारांना व्याज अनुदान अशी ती योजना आहे. सन 2012-2013 मध्ये उद्योग विभागास खादी ग्रामोद्योग विकास मंडळ ग्रामीण कारागीर विकास योजना ( बलुतेदारांना व्याज अनुदान ) याकरिता मंजूर 20 कोटी रुपयांच्या निधीची या अर्थसंकल्पात तरतूदच करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, थोर राष्ट्रीय व्यक्तींच्या साहित्याचे प्रकाशन या योजनेमध्ये सन 2012-2013 मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागास थोर राष्ट्रीय व्यक्तींच्या साहित्याच्या प्रकाशनार्थ मंजूर व प्राप्त झालेल्या तीन कोटी रुपयांचा निधी जानेवारी 2013 पर्यंत अखर्चित राहिला.

सभापती महोदय, सन 2012-2013 मध्ये वैद्यकीय शिक्षण विभागास डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वोपचार रुग्णालय व संशोधन केंद्र, नागपूर करिता एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. परंतु सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पात त्यासाठी कोणतीच तरतूद करण्यात आली नाही.

..2.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग - योजनेचे नाव दलित वस्ती पाणी पुरवठा योजना - या योजनेमध्ये सन 2012-2013 मध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास महानगरपालिका/नगरपंचायती यांच्या नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजनांसाठी दहा कोटी रुपये मंजूर करण्यात आले त्यापैकी फक्त 2 कोटी 32 लाख 91 हजार इतका निधी खर्च करण्यात आला.

अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबांना वैयक्तिक पाणी पुरवठा नळ जोडणी देण्यासाठी सहाय्यक अनुदान म्हणून 60 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यातील 14 कोटी रुपये 57लाख 93 हजार इतका निधी खर्च झाला. माननीय मंत्री प्रा.लक्ष्मण ढोबळे साहेब जर दिव्याखाली अंधार असेल तर कसे व्हायचे ? आपण ज्या समाजातून आलात त्या समाजासाठी अधिक निधीची मागणी केली पाहिजे. पण आपले दादांसमोर काही चालत नाही. आपल्या विभागासाठी जो निधी मंजूर झाला तो आपण कार्यक्षमतेने खर्च केला पाहिजे.

नगर विकास विभाग - डॉ बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेकरिता नगरपरिषदांना सहाय्यक अनुदान, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना अनुदानाकरिता मंजूर व प्राप्त झालेला 14 कोटी 18 लाख रुपयांचा संपूर्ण निधी अखर्चित राहिला.

सार्वजनिक आरोग्य विभाग - आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत - आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वैद्यकीय मदत करण्यासाठी जीवनदायी योजना आहे. या योजनेसाठी 16 कोटी रुपये निधी प्राप्त झाला. त्यापैकी फक्त 6 कोटी रुपये 83 लाख 53 हजार इतका निधी खर्च झाला. म्हणज् मागासवर्गीय समाजातील लोक आजारी पडत नाही असे शासनास वाटते काय ?

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी 16 कोटी रुपये तर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी एक कोटी रुपये मंजूर झाले. परंतु या दोन्ही योजनांकरिता मंजूर झालेला निधी अखर्चित राहिला.

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सार्वजनिक आरोग्य विभागास या योजना अन्वये मंजूर व प्राप्त झालेल्या एकूण 33 कोटी रुपयांच्या निधीपैकी केवळ 6 कोटी 83 लाख 53 हजार रुपयांचाच निधी खर्च करण्यात आला. आपण हा निधी खर्च का करीत नाही. अशाप्रकारे निधी अखर्चित राहिला तर तो निधी ज्या ठिकाणी अगोदर बिले काढायची आहेत तिकडे वळवला जातो .

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग - अन्नपूर्णा योजनेकरिता अर्थसहाय्य- त्या त्या विभागाच्या सर्व मंत्री महोदयांवर ॲट्रॉसिटी दाखल केला पाहिजे. कारण अन्नपूर्णा योजनेकरिता मंजूर झालेला 7 कोटी 78लाख रुपयांचा निधी अखर्चित राहिला आहे.

सभापती महोदय, गृह निर्माण विभाग - एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या 30 कोटी रुपयांपैकी केवळ 73 लाख 75 हजार इतका निधी खर्च करण्यात आला. तसेच झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांना नागरी सुविधा पुरविण्याकरिता व राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक 1 करिता अनुक्रमे 60 कोटी व 27 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. परंतु हा संपूर्ण निधी अखर्चित राहिला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

हा निधी जानेवारी-2013 अखेरपर्यंत पडून राहिला. गृहनिर्माण विभागास प्राप्त झालेल्या 117 कोटी रुपयांपैकी केवळ 73 लाख 75 हजार रुपये खर्च झाले. सन 2012-13 मध्ये महसूल आणि वन विभागाकडून एलपीजी गॅसवरील सबसिडी साठी 10 कोटी रुपये तरतूद करण्यात आली. परंतु जानेवारी अखेरपर्यंत त्यातील एकही पैसा खर्च झाला नव्हता.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अभिमानाने मानव विकास निर्देशांकाबाबत (अनुसूचित जाती उपयोजना) उल्लेख केला जातो. 2012-13 या वर्षात या कामासाठी नियोजन विभागास 5 कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली, परंतु त्यापैकी केवळ 74 लाख 46 हजार रुपये खर्च झाला. शौचालय, वाहने, वीज इत्यादींच्या बाबतीत आपल्याकडे काय चित्र आहे ? राज्याच्या अर्थसंकल्पातील पैसा कसा आणि कोठे कापला जातो आणि तो पैसा कोण लुटतो हे निदर्शनास आणून देण्यासाठीच मी ही आकडेवारी मांडत आहे.

महोदय, विशिष्ट योजनेवर राज्य सरकारने केलेली तरतूद आणि प्रत्यक्षात झालेला खर्च वाचल्यास अजून गंभीर बाबी निदर्शनास येतील. 2012-13 मध्ये सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील उत्कृष्ट संस्थांना पारितोषिक देण्यासाठी 120 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती, परंतु त्यातील एकही पैसा खर्च केला नाही. स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान देण्यासाठी 30 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, परंतु त्यातील एकही पैसा खर्च झाला नाही. शासकीय वसतिगृहांच्या दुरुस्तीसाठी 50 कोटी रुपये तरतूद करण्यात आली, परंतु एकही पैसा खर्च झाला नाही. 2012-13 च्या अर्थसंकल्पात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्याची घोषणा करण्यात आली. त्यावेळी सत्ताधारी बाजूच्या सदस्यांनी बाके वाजवून त्या घोषणेचे स्वागत केले. महोदय, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधण्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्या काळात सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी बांधलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनचे उद्‌घाटन आता होत आहे. 2012-13 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनसाठी करण्यात आलेल्या 50 कोटी रुपयांच्या तरतुदीपैकी एकही पैसा खर्च करण्यात आला नाही.

महोदय, अनुसूचित जाती-जमातीच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा बांधण्याच्या कामी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, परंतु त्यातील एकही पैसा खर्च करण्यात आला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

अनुसूचित जाती व नवबौध्द उमेदवारांना सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यातील केवळ 1 कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि 9 कोटी रुपये खर्च झाले नाहीत. अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींसाठी विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली होती, त्यातील केवळ 2.5 कोटी रुपये खर्च करण्यात आले.

महोदय, अनुसूचित जाती व नवबौध्द भूमिहीन शेत मजुरांना जमिनीचे वाटप करण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी केवळ 3.2 कोटी रुपये खर्च करण्यात आले.

महोदय, पॉवर ट्रीलरचा पुरवठा करण्यासाठी अर्थसहाय्य करण्यासाठी 20 कोटी रुपये तरतूद होती, परंतु त्यातील एकही पैसा खर्च झाला नाही. ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी 499.99 लाख रुपये तरतूद केली होती. त्यापैकी केवळ 59.93 लाख रुपये खर्च झाले आणि उर्वरित रक्कम अखर्चित राहिली. अनुसूचित जाती व नवबौध्द मुलां-मुलींसाठी निवासी शाळा बांधण्याकरिता 50 कोटी रुपये तरतूद करण्यात आली. परंतु त्यातील एकही पैसा खर्च झाला नाही. हे वास्तव आहे. महोदय, 2012-13 च्या अर्थसंकल्पात या योजनांसाठी तरतूद करण्यात आली होती. परंतु तो खर्च झाला नाही हे मी या ठिकाणी मुद्दा सांगितले आहे.

महोदय, इतकेच नव्हे तर अर्थसंकल्पात योजना मंजूर करुन सुध्दा त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. 2012-13 च्या अर्थसंकल्पात शासनाने नवीन योजना मंजूर केल्या होत्या. युपीएससी, एमपीएससी, बँकींग स्पर्धा पूर्व परीक्षांचे प्रशिक्षण देण्याची योजना तयार केली. परंतु त्यासाठी तरतूद केली नाही. छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारक बांधण्याबाबत या ठिकाणी चर्चा झाली होती. परंतु त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. अनुसूचित जातीच्या व्यक्तींकरिता राज्य स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळ स्पर्धकांसाठी द्यावयाच्या प्रशिक्षणाबाबत, प्रशिक्षण शुल्क व खर्च अदा करण्याबाबत योजना केली. परंतु त्यासाठी तरतूद करण्यात आली नाही.

नंतर श्री.बरवड...

अप्रमाणित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विक्रम काळे )**

श्री. विनोद तावडे .....

मग आपल्या कबड्डीच्या सामन्यांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थी कसे येणार हे सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगावे. आपण ठराविक वर्गासाठीच स्पर्धा भरविणार का ?

सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या महिला बचत गटांसाठी उद्योग प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात आली. सुप्रियाताईच्या दबावाने ही घोषणा झाली असेल. पण पैसे दिलेले नाहीत. दादा कसे पैसे देतील ? सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सुप्रिया ताईंना हे सांगावे आणि नंतर त्यांचे उत्तर मला त्यांनी खाजगीत सांगावे.

सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील व इतरत्र असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना आली. माननीय मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांना सांगू इच्छितो की, मी आपली सोलापूर जिल्ह्यातील भाषणे ऐकतो. आपण म्हणता की, गावकुसाबाहेरील मुलांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाऊच नये का ? माझे सरकार, साहेबांचे सरकार असे आपण म्हणत असता. पण या ठिकाणी नुसती घोषणा होते. या ठिकाणी फसव्या घोषणा होतात. खोटे बोल पण रेटून बोल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व संचालक, समाजकल्याण यांच्याकडील अखर्चित निधीचे पुढे काय केले, ही माहिती मी मागितली. मला असे वाटले की, माननीय मंत्री श्री. मोघे साहेब यांना त्याचा उपयोग होईल. पण ते माहिती देत नाहीत. तो निधी पाटबंधारे विभागाकडे कोणाची बिले देण्यासाठी गेला की बाकीच्या खात्याकडे वळता केला याचा अंदाज आला तर ती माहिती श्री. मोघे साहेबांना देता येईल म्हणजे त्यांना ॲट्रॉसिटीची केस टाकण्यासाठी उपयोग होईल असे मला वाटले.

सभापती महोदय, सामान्य दलित माणसांवरील अत्याचाराच्या संदर्भात इतर सन्माननीय सदस्य बोलणार आहेत त्यामुळे मी त्यांवर जास्त बोलणार नाही. आपण स्वयंरोजगारासाठी ज्या योजना आणल्या त्यामध्ये आपण महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ स्थापन केले तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ स्थापन केले. महात्मा फुले आणि लोकशाहीर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे ....

अण्णाभाऊ साठे यांनी मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी ज्या प्रकारे जीवनभर कार्य केले म्हणून त्यांची नावे या महामंडळांना दिली. त्यांच्या नावाने महामंडळ स्थापन केल्यानंतर त्या महामंडळामध्ये काम करणारा जो कार्यकर्ता असेल तो काही तरी जनाची नाही तर मनाची लाज बाळगून चांगले काम करण्याचा प्रयत्न करील. परंतु या दोन्ही महामंडळांची स्थापना करताना जी उद्दिष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली होती ती उद्दिष्टे कितपत साध्य झाली हे बघितल्यास निराशाच पदरी पडते. ज्यावेळी ही महामंडळे स्थापन झाली त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांची आणि मंत्र्यांची भाषणे मी लायब्ररीमध्ये जाऊन वाचली. राज्यातील पददलित, मागासवर्गीय माणसाला खऱ्या अर्थाने कसे वर आणले पाहिजे या शुद्ध हेतूने या राज्यातील कर भरणाऱ्या माणसांच्या खिशातील पैसे या दोन महामंडळांकरिता देण्याचे ठरविले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

या दोन महामंडळांना 500 ते 1000 कोटी रुपयांचे भाग भांडवल उपलब्ध करुन दिलेले आहे. मागासवर्गीयांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी या भांडवलाचा उपयोग करुन त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणणे अपेक्षित होते.

महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ स्थापन करण्यामागचे उद्दिष्ट असे होते की, सांविधिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे, यांच्यामार्फत कृषी विकास कार्यक्रम, कृषी उत्पादनांचे पणन, प्रक्रिया व त्यांचा पुरवठा आणि साठा, लघु उद्योग, इमारत बांधकाम, वाहतूक आणि वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादींसारखा इतर धंदा यासंबंधी योजना आखावयाच्या होत्या, प्रचालन करावयाचे, मदत करावयाची, सल्ला द्यावयाचा, सहाय्य द्यावयाचे, वित्तीय सहाय्य द्यावयाचे, संरक्षण द्यावयाचे आणि उपक्रम हाती घ्यावयाचे होते. कंपनीच्या उद्दिष्टांपैकी कोणत्याही उद्दिष्टासाठी उपयुक्त असेल असे कोणतेही व्यापारचिन्ह, सध्या मार्केटिंगचे युग आहे. पेटंट, पेटंट हक्क, नवशोध असतील, प्रकाशन अधिकार (कॉपी राईटस्), संकल्प चित्र (डिझाईन्स) असतील किंवा गुप्त प्रक्रिया यासाठी अर्ज करणे आणि स्वीकारणे (टेक आऊट), खरेदी करणे किंवा संपादन करणे आणि त्याच्या वापरासाठी परवानाधारकांना लायसन्स देणे, त्यासाठी काम करणे, त्याचा विकास करणे, ते पार पाडणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि त्याचा फायदेशीर वापर झाला पाहिजे. ही त्यातील आपली कल्पना होती. परंतु वरील उद्दिष्टे बघितल्यास कृषी, कृषी प्रक्रिया, लघु उद्योग, अभियांत्रिकी व वैद्यकीय अशा सर्वच क्षेत्रांना स्पर्श केलेला आहे. या उद्दिष्टांची पूर्तता किती झाली आहे हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, गेल्या 10 वर्षात या महामंडळाकडून किती लाभार्थ्यांनी कर्जाच्या माध्यमातून लाभ घेऊन किती उद्योग सुरु केले आहेत याची संपूर्ण माहिती मिळू शकली नाही. परंतु उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार या लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थी प्रत्यक्षात स्वत:च्या पायावर उभे राहिले आणि सफल झाले हा खरा प्रश्न आहे. महात्मा फुले यांचे नाव देऊनही महामंडळाची उद्दिष्टे साध्य होऊ शकली नाहीत. महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ जवळच्या कार्यकर्त्यांना, चेलेचपेटे, फंटर हल्ली नवनवीन शब्द येत आहेत. या सर्वांना त्याचा

2....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

लाभ दिला गेला. स्वत:च्याच कार्यकर्त्यांना लाभ दिला गेला. एक तर आपल्याच कार्यकर्त्यांना अनुदान दिले जाते. ज्यांना अनुदान दिले आहे त्यांना मी विचारले होते. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, मला अनुदान दिले तर मेहेरबानी केली का, मी अध्यक्षांना 10 टक्के दिले आहेत. लाभार्थी असे सांगत आहेत. मी जबाबदारीने बोलत आहे की, कर्ज मंजूर करण्यासाठी 10 टक्के कमिशन द्यावे लागल्यामुळे लाभार्थ्यांना व उद्योजकांना दिलेल्या कर्जातून उद्देश सफल होऊ शकला नाही. काही जणांनी लाभार्थ्यांना असे सांगितले की, तू कर्ज घे, काही रक्कम मला दे, वसुलीचे नंतर बघू. अशा प्रकारची वाक्ये वापरण्यात आली आहेत. मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या नावाखाली स्वत:च्या कार्यकर्त्यांना पोसण्याचा हा धंदा सुरु करण्यात आलेला आहे.

या महामंडळाचे लेखापरीक्षण करीत असताना लेखापरीक्षकांना त्रुटी आढळून आल्या आहेत. सन 2005-06 या वर्षाचा आढावा घेतला असताना महात्मा फुले महामंडळाला 10,92,92,977 इतका तोटा झाल्याचे दिसून आलेले आहे. या वर्षामध्येच महामंडळाने बीज भांडवल योजना, विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजना, 50 टक्के अर्थसहाय्य योजना, प्रशिक्षण योजना, एनएसएफडीसी योजना अशा वेगवेगळ्या योजना राबविल्या होत्या. परिपक्व झाल्यावरच रोखतेच्या आधारे मुदत ठेवीवरील व बचत खात्यावरील व्याजाची परिगणना करण्यासंबंधीच्या आवश्यक तपशीलाअभावी हिशोब केलेल्या व्याजाची पडताळणी आणि त्याचा उत्पन्नावर काय परिणाम झाला याची परिगणना करु शकलो नाही असे त्यांनी कारण दिलेले आहे. समूह प्रकल्प व लाभार्थ्यांना दिलेली कर्जे याबाबतीत मत्तेची गणना लेखा मानक 28 प्रमाणे केलेली नाही, म्हणजे थातूरमातूर कारणे दिलेली आहेत.

सभापती महोदय, या महामंडळाने अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य दिले आहे त्याबाबत अशी तरतूद आहे की, सहकारी संस्थेचा स्वत:चा हिस्सा प्रकल्प मूल्याच्या 5 टक्के असतो, सहकारी संस्थांना शासकीय भाग भांडवल 35 टक्के, विशेष घटक योजनेमधून दीर्घ मुदतीचे कर्ज 35 टक्के व वित्तीय संस्थांकडून दीर्घ मुदतीचे कर्ज 25 टक्के दिले जाते. विशेष घटक योजनेच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक 70 टक्के अनुसूचित जातीचे असावेत. सहकारी संस्थांचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरु झाल्यानंतर त्यामधील कर्मचारी वर्ग व कामगार वर्गही 70 टक्के अनुसूचित जातीचा असावा अशा त्यातील अटी आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

श्री. विनोद तावडे...

अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मूल्याच्या 5 टक्के एवढया निधीची उभारणी स्वत: केल्यानंतर 35 टक्के भाग भांडवल व दीर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येते. सहकारी संस्थांना प्रकल्प खर्चाच्या 25 टक्के अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संस्थांकडून उपलब्ध करुन घ्यावे लागते. प्रकल्प उभारणीकरिता कमाल 52 आठवड्यांचा कालावधी दिला जातो. सहकारी निधीच्या उपलब्धतेप्रमाणे निधी मंजूर करण्यात येतो. कर्जाची परतफेड संस्थेच्या देय असलेल्या प्रकल्प मूल्याच्या 70 टक्के अदा केल्यानंतर दोन वर्षांनी सुरु करण्यात यावी आणि कर्ज परतफेडीचा कालावधी 6 वर्षाचा असावा. वित्तीय संस्थांच्या कर्जाची वसुली प्रथम 4 वर्षांच्या आत 24 समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी व नंतर व्याजाची वसुली 8 समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी, अशा प्रकारच्या या अटी आहेत. या अटी व शर्तींच्या आधारे 372 संस्थांचे प्रकल्प मंजूर करण्यात आले. या संस्था बहुतांश सत्ताधा-यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या आहेत किंवा त्या बेनामी आहेत. मागासवर्गीयांच्या नावाखाली स्वत:च्या कार्यकर्त्यांना 35 टक्के भागभांडवल देण्यात आले आहे. ही बाब आधीच मागास असलेल्या मागासवर्गीय जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. एवढेच नाही तर बोगस कागदपत्रे सादर करुन ब-याच संस्थांनी शासकीय भागभांडवल लाटले आहे.

याचे उदाहरण द्यायचे झाले तर ते स्टार मागासवर्गीय सहकारी संस्थेचे देता येईल. या संस्थेने सर्व बोगस कागदपत्रे शासनाकडे सादर करुन शसनाकडून अर्थसहाय्य प्राप्त केलेले आहे. ही कागदपत्रे कोणती आहेत ? 1) नॅशनल बँकेचे टेक्निकल रिपोर्ट, 2) संचालक मंडळ, सभासद यादी, संचालक मंडळाचे एकत्र फोटो, 3) पासपोर्ट साईजचे संचालकांचे फोटो, 4) संस्था नोंदणीकृत झाल्याची कागदपत्रे, 5) बँकेचे डिपॉझिट 5 टक्के इत्यादी. या संस्थेने या पूर्वी अर्थसहाय्य घेऊन शासनाची कोटयवधी रुपयाची फसवणूक केलेली आहे. शेअर सर्टिफिकेट दिलेले नाही, बँकेत ठेवी नाहीत, अशा अनेक अनियमितता या संस्थेमध्ये आहेत. या अनियमिततांची चौकशी करावी अशी मी मागणी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, महार वतनाच्या जमिनीची दोन-तीन उदाहरणे आहेत. महार वतनाच्या मिळकती महार समाजाच्या इसमांना उपभोग घेऊन उपजीविका करण्यासाठी प्रदान करण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आलेल्या होत्या. सदरील मिळकती नवीन शर्तीच्या असल्याने त्याबाबत ठराविक बंधने घालण्यात आलेली होती. परंतु सदर बंधनाच्या विरुध्द कार्यवाही होऊन मिळकती महार समाजाव्यतिरिक्त जनरल लोकांना विक्री करण्यात आलेल्या आहेत.

पुणे शहरामधील वानवाडी येथील सर्व्हे क्रमांक 64/1 ते 32 या मिळकतीचे 20 हेक्टर 94 आर क्षेत्राची मिळकत ही भोगवटादार वर्ग-2 अन्वये महार वतन म्हणून सावळा महार, मारुती महार व इतर यांच्या नावावर आहे. सदरची मिळकत ही अन्य विकासकास देण्यात आली असून शासनाकडून सदरची मिळकत विकासकास हस्तांतरित करण्याकरिता परवानगी देण्यात आली आहे. सदरच्या संपूर्ण जागेवर आज हर्षवर्धन डेव्हलपर्स या नवाचा फलक असून सदर डेव्हलपर्सचे खाजगी सुरक्षारक्षक सुध्दा तेथे तैनात आहेत. यावरुन पुणे शहरामधील शेकडो कोटी रुपयाचे मूल्य असणा-या महार वतनी मिळकती ह्या कोणत्याही मागास समाजाच्या उन्नतीसाठी न वापरता त्या भूमाफीयाने गिळंकृत केल्या आहेत. या मिळकतीवर आता टोलेजंग टॉवर उभे रहातील आणि या मागासवर्गीय समाजातील माणूस चौकीदार म्हणून देखील तेथे दिसणार नाही.

सभापती महोदय, अशाच स्वरुपाचे पुणे येथील दुसरे उदाहरण मी आपणास सांगतो. पुणे शहरातील मुंढवा येथील वेस्टीन या पंचतारांकित हॉटेलच्या नजीक असलेल्या मिळकतीवर सुध्दा भूमाफियांचा डोळा आहे. सर्व्हे नंबर 99/1 ते 26 क्षेत्र 17 हेक्टर 26 आर या जमिनीच्या 7/12मध्ये इतर हक्कात महार वतन नमूद केलेले आहे. कृष्णा गेणू गायकवाड, सीमा लिंबा महार व इतर व्यक्तींची नावे इतर हक्कात दाखविलेली आहेत. ही मिळकत महार वतन असताना धारक म्हणून दाखविण्याची कल्पना विकासकाची आहे. धारक दाखवून शासनाची परवानगी घ्यायची आणि त्यावर टोलेजंग इमारती बांधायच्या हा त्यामागचा उद्देश आहे.

सभापती महोदय, मी नाशिकमधील देखील एक उदाहरण आपणास देतो. नाशिक मधील मौजे दसक येथील सर्व्हे नंबर 71/1 ते 79/7 या शेत मिळकती ...

...नंतर श्री. जुन्नरे...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

महार वतन म्हणून रेकॉर्ड ऑफ राईटसला अनेक वर्षापूर्वी दाखल करण्यात आल्या होत्या. परंतु सदरील बंधनाचेविरुध्द कार्यर्वाही होवून मिळकती महार समाजाव्यतिरिक्त जनरल लोकांना विक्री करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, त्यामुळे मिळकतींचे रेकॉर्ड ऑफ राईटस् मध्ये विपरीत परिस्थिती निर्माण झालेली आहे. सदरील मिळकतीचे हस्तांतरणास परवानगी देतांना जिल्हाधिकारी, नाशिक यांनी मिळकतीसंबंधीचा पूर्व इतिहास विचारात न घेता अतिशय मोघमपणे हस्तांतरणास परवानगी दिलेली असल्यामुळे संपूर्ण परिस्थिती बदललली आहे. सर्व्हे नंबर 6, 8 व 9 या मिळकतीवर सायट्रीक इंडिया कंपनी उभारण्यात आलेली आहे. मी हा विषय यासाठी मांडतो आहे की, समाजातील दुर्लक्षित, मागास घटकाला कोठे तरी संरक्षण देण्यासाठी ज्या योजना राबविल्या गेल्या त्या राजकीय सत्तेतील लोकांच्या संगनमताने आज लुटण्याचे काम चालले आहे व हे मायबाप सरकार बघ्याची नाही तर मदतीची भूमिका घेतांना दिसत आहे. सामान्य माणसाला न्याय मिळावा यासाठी विरोधी पक्षातर्फे अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला जातो.

आदिवासींच्या सर्व प्रश्नांचा उल्लेख मी या ठिकाणी करीत नाही. या सरकारला खरोखर शाहू, फुले व आंबेडकरांचे नाव घेऊन प्रामाणिकपणे काम करावयाचे असेल व जो समाज शाहू, फुले व आंबेडकरांना देव मानतो त्यांना न्याय द्यावयाचा असेल तर आज आम्ही या समाजाचे जे वास्तव मांडले आहे त्याबाबतचे उत्तर देण्याची हिंमत समाज कल्याण मंत्र्यांमध्ये आहे काय ? हा जो भ्रष्टाचार आहे तो जर शाहू, फुले व आंबेडकरांचे नाव घेऊन होत असेल तर आपण या गरीब जनतेला मूर्ख बनवण्याचा कार्यक्रम वर्षानुवर्षे करीत आहात व या प्रश्नाला आज या सभागृहात वाचा फुटली असेल तर माझी अपेक्षा आहे की, आमच्याकडून चूक झाली आहे, या समाजासाठी आम्ही इतके हजार कोटी रुपये खर्च केले नाहीत, त्यामुळे या पुढे या राज्यात या समाजावर अशा प्रकारचा कोणतही अन्याय होणार नाही व जो अशा प्रकारे अन्याय करेल त्यांच्यावर आम्ही कारवाई करणार आहोत असे सांगण्याची हिंमत हे सरकार दाखविणार आहे काय ? तुम्ही काही केले तरी आम्ही दलितांवर अन्याय, अत्याचार करतच राहणार व हेच आमच्या सरकारचे ब्रीद आहे असे म्हणून हे सरकार पुढे जाणार आहे काय ? या विषयाकडे आम्ही अपेक्षेने पाहतो आहोत की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

राज्य सरकार व राज्य सरकारमध्ये स्वत:ला जबाबदार लोक आहेत ते जर याबाबतीत काहीच मानत नसतील तर खऱ्या अर्थाने या ठिकाणी या समाजाचे प्रतिनिधीत्व करणारी माणसे बसली आहेत ते यावर आपले काय विचार मांडणार आहेत याकडेही आमचे लक्ष राहणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून मी अपेक्षा व्यक्त करतो की, या राज्यातील मागास समाजाला कोठे तरी न्याय देण्याचा प्रयत्न विरोधकांनी जाग आणल्यानंतर का होईना सरकार करेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे बोलणे थांबवतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदय, खरे म्हणजे या अतिशय महत्वाच्या विषयाला प्रायोरिटी का देण्यात आली नाही हा प्रश्न मला पडलेला आहे. सामाजिक दृष्टया न्यायाची भाषा करणारा आणि खरोखर मागासवर्गीयांच्या बद्दल जीव्हाळयाच्या प्रस्तावावर आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्याचा मी प्रतिवाद करु इच्छित नाही. परंतु माझ्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे की, अतिशंय महत्वाच्या विषयावरील प्रस्ताव हा अंतिम आठवडयामध्ये का आला, त्याला प्रायोरिटी का मिळाली नाही ? सामाजिक न्यायाचा विषय या ठिकाणी आपण मांडलेला आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

ही चर्चा आधी का घेतली नाही ? हा सामाजिक न्यायाचा विषय आहे. तो अतिशय चांगला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड्.जयदेवराव गायकवाड हे चळवळीतील जुने कार्यकर्ते असले तरी सभागृहात नवीन आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, अंतिम आठवडा प्रस्तावाला एक वेगळे महत्व असते. आपल्याला अंतिम आठवडा प्रस्तावासंबंधातील माहिती नसल्यामुळे मी त्यावर काहीच बोलणार नाही. अंतिम आठवडा प्रस्तावाला एक वेगळे महत्व असते. त्यामुळे तो विषय सोडून आपण बोललात तर बरे होईल असे मला वाटते.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, हा सोशल इश्यू आहे. तो आपण अगोदर घ्यायला पाहिजे होता. आपण मागासवर्गीयांना न्याय देण्याची भाषा केलेली आहे. त्यासंबंधी आपण अतिशय तीव्रपणाने आपले विचार मांडले आहेत. हा विषय शेवटच्या आठवड्यात घेतला तरी त्याला तेवढेच महत्व आहे असे आपले म्हणणे आहे.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महत्वपूर्ण अशा एका चांगल्या विषयावर चर्चा केली आहे. पण माझ्या मनाला एक सारखे वाटत होते की, आपण राजकीय परिभाषेतच बोलत होता. आपण मनापासून विषय मांडला असला तरी कथनी आणि करणी यामध्ये अंतर आहे असे मला स्वत:ला वाटत होते. दलितांच्या विकासासाठी शासनाच्या योजनांची अंमलबजावणी झाली पाहिजे असे आपण अतिशय आग्रहाने बोलत होता. दलितांच्या विकासाच्या योजनांचा आढावा घेताना आपला सर्व रोख भ्रष्टाचारावर होता. दलितांच्या विकासाच्या योजना राबविल्या जात नाहीत, शासनाच्या नाकर्तेपणावर आपण बोट ठेवले असते तर मी ती बाब समजू शकलो असतो. या योजनेत भ्रष्टाचार झाला आहे अशा प्रकारची आपली भाषा होती. भ्रष्टाचारासंबंधी व्यवस्थित पाठपुरावा करून, संशोधन करून तो उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला असता तर ते अधिक जास्त परिणामकारक झाले असते.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटना दिली. त्यांनी दलितांच्या विकासासाठी प्रचंड विचार केला व राज्य घटनेमध्ये विकासाच्या गोष्टी सांगितल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: असे मिशन होते की, त्यांनी आपल्या जीवनात मागासवर्गीयांच्या विकासाचा एक मूलमंत्र सांगितला. त्यांनी सर्वात पहिल्यांदा ही गोष्ट सांगितली की, या देशामध्ये समतेवर आधारित समाज निर्माण झाला पाहिजे. समाजात आर्थिकदृष्ट्या, समाजिकदृष्ट्या मागे पडलेले लोक आहेत त्यांना पुढे आणल्याशिवाय देशात समता निर्माण होऊ शकत नाही. समान पातळीवर समाज येऊ शकत नाही. त्यामुळेच त्यांना कोणताही न करता भेदभाव मागासवर्गीय समाजाला पुढे आणण्याची संकल्पना राज्य घटनेमध्ये मांडली. त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे, नोकऱ्या मिळायला पाहिजेत यासाठी घटनेमध्ये तरतुदी केल्या. आपल्यापुढे डायरेक्टीव्ह प्रीन्सीपल आहेत. त्यामुळे मागासवर्गीयांचा विकास झाला पाहिजे असा प्रयत्न राज्याने केला पाहिजे. देशामध्ये, राज्यामध्ये फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेण्याचा प्रश्न नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड . . . .

फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने आर्थिक विकासाचा कार्यक्रम आणि सामाजिक समतेकडे नेणारा जो कार्यक्रम आहे, तो निश्चितपणे अग्रेसर आहे. म्हणून आपण असे म्हणू शकत नाही की, या ठिकाणी असलेले सरकार हे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांशी प्रतारणा करीत आहे असे कधी होऊ शकत नाही. मी असे ठोसपणे सांगू इच्छितो की, देशामध्ये जी काही राज्ये आहेत, त्या राज्य संस्थांमध्ये महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. याठिकाणी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराचे योगदान आहे. हे योगादान खऱ्या अर्थाने डोळ्यासमोर ठेऊन आपल्या राज्यामध्ये कारभार केला जातो.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, दलितांच्या विकासाचे जे काही मार्ग आहेत, त्यामध्ये शिक्षणाला अग्रक्रम आहे. शिक्षणाच्या साधनानेच खऱ्या अर्थाने मागासवर्गीयांची प्रगती होऊ शकते. त्यादृष्टीने महाराष्ट्रामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त खर्च शिक्षणावर केला जातो. त्यामुळे या राज्याची निश्चितपणे दिशा व एक कार्यक्रम आपल्याला पहावयास मिळतो. राजकीय परिभाषेमध्ये बोलताना किंवा पहाताना लोकशाहीमध्ये असलेल्या अधिकाराचा उपयोग करुन मी अनेक वेळा ही चर्चा ऐकतो की, मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती मिळण्यामध्ये उशीर होतो. पण शिष्यवृत्ती देण्याची योजना किंवा त्याची तरतूद या सरकारने केलेली आहे की नाही, तर मी याबाबत निश्चितपणे असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाने शिक्षणाला सर्वांत जास्त महत्व दिलेले आहे आणि तशा प्रकारची तरतूदही केलेली आहे. जे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, त्या लोकांना खऱ्या अर्थाने वर आणण्याचा कार्यक्रम आपल्याकडे निश्चितपणे आहे.मग कोणतेही सरकार असेल, त्या सरकारचा मी आमदार म्हणून एक पाईक आहे.अशा वेळी जरी कोणी ्टीका किंवा आत्मटीका केली तरी आपण त्याबाबत आत्मपरिक्षण केले पाहिजे.

सभापती महोदय, आम्ही असे म्हणतच नाही की, ज्या काही आम्ही योजना राबविल्या त्या 100 टक्के राबविल्या गेल्या असतील. मात्र जर त्या योजना राबविल्या गेल्या नसतील तर लोकशाही पध्दतीने त्यावर चर्चा करुन याबाबत आपण प्रयत्न केले पाहिजेत. यादृष्टीने दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या मागासवर्गीयांचे जीवनमान उंच्चावण्याचा जो कार्यक्रम आहे, तो जास्त तीव्रपणे आणि परिणामकारकपणे कसा राबविता येईल याबाबत निश्चितपणे प्रयत्न केला पाहिजे असे मी म्हणेन आणि त्यादृष्टीने मी पुढे जाऊन असे सांगेन की, एका तालुक्यामध्ये 100 ते 150..

3 एस-2



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड . . ..

गावे असतात. या गावांपैकी 25 गावांमधील 100 ते 200 शेतकऱ्यांना गाई-म्हशी दिल्या म्हणजे त्यांचे जीवनमान ऊंचावले जाते असे नाही. यादृष्टीने खऱ्या अर्थाने विश्लेषण केले पाहिजे. याबाबतीत निश्चित स्वरुपाची पहाणी केली पाहिजे आणि मार्ग शोधले पाहिजेत.

सभापती महोदय, जो मागासवर्गीय माणूस असतो, त्याचा आर्थिक स्तर ऊंचावण्यासाठी कोणते मार्ग आहेत याचा देखील विचार करण्याची गरज आहे. आम्ही असे समजतो की, महाराष्ट्र शासनाकडे जो कार्यक्रम आहे, त्या कार्यक्रमाचा देखील पुनर्विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब, मी येथे मुद्दाम उल्लेख करीन की, दोन वर्षापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने जी सनद जाहीर केली, त्या सनदेमध्ये देखील मागासवर्गीयांच्या 41 प्रश्नांच्या बाबतीत अतिशय गंभीरपणे उल्लेख केला आहे आणि ते पॉईंट आऊट केले. त्यापैकी काही प्रश्न हे आऊट डेटेड झालेले आहेत. उदाहरण द्यावयाचे तर ग्रामीण भागामध्ये जे वाटप होते तेव्हा अशी अपेक्षा केली जाते की, यामुळे मागासवर्गीयांचा विकास होईल. आम्ही त्या बाबत देखील निश्चितपणे असे समजतो की, जो कार्यक्रम आज आऊट डेटेड झालेला आहे आणि त्यातून काही फलनिष्पत्ती होत नसेल तर तो प्रोग्रॅम या कार्यक्रमातून काढला पाहिजे आणि जो महत्वाचा, प्रॉयोरिटीचा कार्यक्रम आहे उदाहरणार्थ शिक्षण, निवारा, घरे मिळणे याकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, जे नवीन उद्योगधंदे करु इच्छित असतील अशा तरुण मुलांना आर्थिक भांडवल किंवा जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे. या महत्वाच्या कार्यक्रमावर अधिक लक्ष दिले पाहिजे. आम्ही आमच्या पक्ष पातळीवर हा प्रश्न नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. मी जाता-जाता एवढेच सांगेन की, मागासवर्गीयांसाठी जो निधी असतो तो लॅप्स होता कामा नये. मागील कालखंडामध्ये जर हा निधी खर्च झाला नसेल तर तो मागासवर्गीयांच्याच विकासासाठी खर्च केला पाहिजे. आगामी काळामध्ये देखील योग्य पध्दतीने आणि परिणामकारकपणे मागासवर्गीयांची प्रगती करणारा कार्यक्रम अंमलात आणला पाहिजे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयदेव गायकवाड . . . .

फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने निश्चित स्वरुपाच्या आर्थिक विकासाचा कार्यक्रम आणि सामाजिक समतेकडे नेणारा जो कार्यक्रम आहे, तो निश्चितपणे अग्रेसर आहे. म्हणून आपण असे म्हणू शकत नाही की, या ठिकाणी असलेले सरकार हे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांशी प्रतारणा करीत आहे असे कधी होउु शकत नाही. मी असे ठोसपणे सांगू इच्छितो की, देशामध्ये जी काही राज्ये आहेत, त्या राज्य संस्थांमध्ये महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य संस्था आहे. याठिकाणी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराचे योगदान आहे. हे योगादान खऱ्या अर्थाने डोळ्यासमोर ठेउुन आपल्या राज्यामध्ये कारभार केला जातो. ही गोष्ट खरी आहे की, दलितांच्या विकासाचे जे काही मार्ग आहेत, त्यामध्ये शिक्षणाला अग्रक्रम आहे. शिक्षणाच्या साधनानेच खऱ्या अर्थाने मागासवर्गीयांची प्रगती होउु शकते. त्यादृष्टीने महाराष्ट्रामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त खर्च शिक्षणावर केला जातो. त्यामुळे या राज्याची निश्चितपणे दिशा व एक कार्यक्रम आपल्याला पहावयास मिळतो. राजकीय परिभाषेमध्ये बोलताना किंवा पहाताना लोकशाहीमध्ये असलेल्या अधिकाराचा उपयोग करुन मी अनेक वेळा ही चर्चा ऐकतो की, मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती मिळण्यामध्ये उशीर होतो. पण शिष्यवृत्ती देण्याची योजना किंवा त्याची तरतूद या सरकारने केलेली आहे की नाही, तर मी याबाबत निश्चितपणे असे सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाने शिक्षणाला सर्वांत जास्त महत्व दिलेले आहे आणि तशा प्रकारची तरतूदही केलेली आहे. जे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत, त्या लोकांना खऱ्या अर्थाने वर आणण्याचा कार्यक्रम आपल्याकडे निश्चितपणे आहे.मग कोणतेही सरकार असेल, त्या सरकारचा मी आमदार म्हणून एक पाईक आहे. कोणत्याही सरकारने ्टीका किंवा आत्मटीका केली तर आपण आत्मपरिक्षण केले पाहिजे. आम्ही असे म्हणतच नाही की, ज्या काही आम्ही योजना राबविल्या त्या 100 टक्के राबविल्या गेल्या असतील. मात्र जर त्या योजना राबविल्या गेल्या नसतील तर लोकशाही पध्दतीने त्यावर चर्चा करुन याबाबत आपण प्रयत्न केले पाहिजेत. यादृष्टीने दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या मागासवर्गीयांचे जीवनमान उुंचावण्याचा जो कार्यक्रम आहे, तो जास्त तीव्रपणे आणि परिणामकारकपणे कसा राबविता येईल याबाबत निश्चितपणे प्रयत्न केला पाहिजे असे मी म्हणेन आणि त्यादृष्टीने मी पुढे जाउुन असे सांगेन की, एका तालुक्यामध्ये 100 ते 150 गावे असतात. या गावांपैकी 25 गावांमधील 100 ते 200 शेतकऱ्यांना गाई-म्हशी दिल्या म्हणजे त्यांचे जीवनमान उुंचावले जाते असे नाही. यादृष्टीने खऱ्या

2...

17-4-2013 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) 3 एस-2

APR पूर्वी श्री.भारवी . .. . 5.30

श्री.जयदेव गायकवाड . . . .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

अर्थाने विष्लेषण केले पाहिजे. याबाबतीत निश्चित स्वरुपाची पहाणी केली पाहिजे आणि मार्ग शोधले पाहिजेत.

सभापती महोदय, जो मागासवर्गीय माणूस असतो, त्याचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कोणते मार्ग आहेत याचा देखील विचार करण्याची गरज आहे. आम्ही असे समजतो की, महाराष्ट्र शासनाकडे जो कार्यक्रम आहे, त्या कार्यक्रमाचा देखील पुनर्विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्स श्री.हेमंत टकलेसाहेब, मी येथे मुद्दाम उल्लेख करीन की, दोन वर्षापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने जी सनद जाहीर केली, त्या सनदेमध्ये देखील मागासवर्गीयांच्या 41 प्रश्नांच्या बाबतीत अतिशय गंभीरपणे उल्लेख केला आहे आणि ते पॉईंट आउुट केले. त्यापैकी काही प्रश्न हे आउुट डेटेड झ ालेले आहेत. उदाहरण द्यावयाचे तर ग्रामीण भागामध्ये जे वाटप होते तेव्हा अशी अपेक्षा केली जाते की, यामुळे मागासवर्गीयांचा विकास होईल. आम्ही त्या बाबत देखील निश्चितपणे असे समजतो की, जो कार्यक्रम आज आउुट डेटेड झालेला आहे आणि त्यातून काही फलनिष्पती होत नसेल तर तो प्रोग्रॅम या कार्यक्रमातून काढला पाहिजे आणि जो महत्वाचा, प्रॅायोरिटीचा आहे उदाहरणार्थ शिक्षण, निवारा, घरे मिळणे याकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, जे नवीन उद्योगधंदे करु इच्छित असतील अशा तरुण शिकलेल्या मुलांना आर्थिक भांडवल किंवा जमीन उपलब्ध करुन दिली पाहिजे. या महत्वाच्या कार्यक्रमावर अधिक लक्ष दिले पाहिजे. हे आम्ही आमच्या पक्ष पातळीवर हा प्रश्न नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. मी जाता-जाता एवढेच सांगेन की, मागासवर्गीयांसाठी जो निधी असतो तो लॅप्स होता कामा नये. मागील कालखंडामध्ये हा निधी खर्च झाला नसेल तर मागासवर्गीयांच्याच विकासासाठी खर्च केला पाहिजे आणि आगामी काळामध्ये देखील तो योग्य पध्दतीने आणि परिणामकारकपणे मागासवर्गीयांची प्रगती करणारा कार्यक्रम आयोजित पाहिजे.

यानंतर श्री.अ.शिगम

....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

मागासवर्गीयांच्या विकासाची जी प्रक्रिया आहे, परिवर्तनाची प्रक्रिया योग्य आहे की नाही, त्याचा विकास होतो किंवा नाही याची पाहणी करण्याची आवश्यकता आहे. ज्या कार्यक्रमातून विकास होत नसेल तर किंवा जो कार्यक्रम कालबाह्य झाला असेल तर तो कार्यक्रम रद्द केला पाहिजे. जे कार्यक्रम अधिक परिणामकारक असतील त्याचा अधिक उपयोग केला पाहिजे एवढेच या निमित्ताने सांगून माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक

**मु.शी.**: सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 2 सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे )** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सहसचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

सहसचिव : कळविण्यात येते की, दिनांक 17 एप्रिल, 2013 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेला पुढील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीकरिता पाठविण्यात येत आहे.

**प्रस्ताव**

सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहातील 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरच्या दिनांकांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, दिनांक 17 एप्रिल, 2013 रोजी झ ाालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास या सभागृहाने सहमती द्यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

"सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 2- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहातील 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरच्या दिनांकाच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

1. श्री.दिवाकर रावते
2. श्री.दिलीपराव देशमुख
3. श्री.अमरसिंह पंडित
4. ॲड.आशिष शेलार
5. श्री.जयंत प्र.पाटील
6. श्री.मनीष जैन

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या संयुक्त समितीवर माझ्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची नियुक्ती करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या संयुक्त समितीवर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची नियुक्ती करण्यात येत आहे. माझी विनंती आहे की, सभागृहाने सुधारित प्रस्ताव मंजूर करावा.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता मी सुधारित प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**माननीय गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या विरोधात**
**कर्नाटक शासनाने दाखल केलेला गुन्हा**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र राज्याचे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या संबंधी सदनामध्ये भावना व्यक्त केल्या. संपूर्ण महाराष्ट्र, विधिमंडळ आणि शासन त्यांच्या मागे खंबीरपणे उभे असून त्यांच्यावर जी कार्यवाही केलेली आहे त्याबाबत त्यांनी आपल्या पध्दतीने खेद व्यक्त करुन कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना हा गुन्हा काढून टाकण्याबाबत विनंती करणार आहेत. त्यावेळी मी म्हणालो होतो की, ही नामी संधी आलेली आहे. आमचा एक हिरा तेथे जाऊन अटक करुन घेण्यासाठी उभा राहिला पाहिजे. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी तेथे जाऊन अटक करुन घेतली तर महाराष्ट्राच्या गृह मंत्र्याला अटक होते या नावाखाली संपूर्ण हिंदुस्थानमध्ये सीमा प्रश्नाला एक उजाळा मिळेल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांची मोठी चर्चा होईल की, माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील त्या ठिकाणी अटकेला सामोरे गेले आणि त्यांच्या मागे महाराष्ट्रातील प्रमुख नेते गेले. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, सीमा प्रश्नाला नव्याने महत्त्व देण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये आहे.

महोदय, त्या भागात आचारसंहिता असल्याचे बोलले जाते. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील त्या भागात 'तरुण भारत' वर्तमानपत्राच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमानिमित्त गेले होते. त्या कार्यक्रमात त्यांनी भाषण केले. संयुक्त महाराष्ट्र आणि मराठी माणसांच्या अस्मितेबद्दल ते बोलले. त्यामुळे निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस देऊन त्यांच्याकडून खुलासा मागितला. परंतु माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील हे त्यांच्या म्हणण्यावर ठाम राहिले. त्यांनी त्यातून 10 कोटी मराठी जनतेची अस्मिता जपली आणि निवडणूक आयोगाला सांगितले की, मी केलेल्या वक्तव्याबद्दल मला काहीही खुलासा करावयाचा नाही. तुम्हाला जे काही करायचे असेल ते करावे. मी त्यास सामोरे जाण्यास तयार आहे. अशा प्रकारचा बाणेदारपणा त्यांनी निवडणूक आयोगाकडे दाखविला. माननीय मंत्र्यांच्या या धीरोदात्त कृतीबद्दल मी सभागृहाच्या वतीने त्यांच्या प्रती आदर व्यक्त करतो. वास्तविक पाहता अशा प्रकारचा आदर सरकारच्या वतीने व्यक्त व्हावयास हवा होता. परंतु त्यांच्यातील वादामुळे तो होऊ शकला नाही. माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्यामुळे सीमा प्रश्नाला वेगळे बळ मिळाले आहे. त्याबद्दल विरोधी पक्षाच्या वतीने मी त्यांना धन्यवाद देतो. या सभागृहाने माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे अभिनंदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्याचे सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सीमा प्रश्नाबद्दल मराठी माणसांच्या भावना बेळगांवमध्ये जाऊन व्यक्त केल्या. त्यामुळे सीमावासीयांच्या मनामध्ये त्यांच्या जखमेवर फुंकर घातल्याचे समाधान निर्माण झाले. या वातावरणात कर्नाटक राज्यात निवडणुका होऊ घातल्या आहेत. निवडणूक आयोगाने माननीय गृह मंत्र्यांना नोटीस का आणि कशासाठी पाठविली हा विषय बाजूला ठेवला तरी माननीय मंत्र्यांच्या कृतीमुळे आणि त्यांच्या धैर्यामुळे या प्रश्नाला वाचा फुटली आहे. त्याचा तमाम मराठी माणसांना 100 टक्के अभिमान वाटतो. माननीय गृह मंत्र्यांच्या कृतीमुळे महाराष्ट्रातील जनता, विधानपरिषद, विधानसभा आणि सर्व राजकीय पक्ष एकत्रितपणे आपल्या पाठीमागे उभे आहेत हा संदेश





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सीमावासीयांना मिळाला आहे. सीमावासीय मराठी बांधवांना आपल्या प्रांतात आणण्याच्या भूमिकेचे समर्थन एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाले आहे. माननीय मंत्र्यांनी बाणेदाररपणे निवडणूक आयोगाला कळविले की, झालेल्या प्रकाराबद्दल खुलासा करण्याचे मला काही एक कारण नाही. तुम्हाला जे काय करायचे असेल ते आपण करु शकता, असे त्यांनी निवडणूक आयोगाला सांगितले. याचा आम्हाला सुध्दा मनापासून आनंद झाला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावाचे आम्ही सत्ताधारी पक्षाच्या वतीने स्वागत करतो.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्राचा बाणा दाखविल्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रस्ताव मांडला आहे. 1983 साली कर्नाटक पोलिसांचा आडमुठेपणा मी अनुभवलेला आहे. माननीय श्री.छगन भुजबळ यांनी शिवसेना-भाजपाच्या वतीने त्या भागात जाऊन सत्याग्रह केला होता. त्या वेळी म्हणजेच 1983 साली कर्नाटक राज्याच्या पोलिसांनी बेळगाव येथे आम्हाला अटक करुन कोर्टात हजर केले.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ....

आम्हाला कोर्टात हजर करताना कोर्ट सुरु होईपर्यंत ते आम्हाला एस.टी. बसमधून खाली उतरु देत नव्हते. आम्हाला जवळजवळ चार पाच तास एस.टी.बसमध्ये कोंडूनच ठेवले होते. त्यांचा आडमुठेपणा कसा आहे हे मला सांगावयाचे आहे. त्यांनी आम्हाला 5.00 वाजता कोर्टात हजर केल्यानंतर सोडले. त्यांचा जो आडमुठेपणा आहे त्याला न जुमानता आपण तेथील दंडुकेशाहीला विरोध केला. निवडणूक आयोगाने सांगून सुध्दा आपली भूमिका योग्य असल्यामुळे आपण निवडणूक आयोगालाही दाद दिली नाही. त्याबद्दल हा जो ठराव मांडलेला आहे त्याला मी माझ्या पक्षाच्या वतीने पाठिंबा देतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, परवा सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त आणि मी याबाबत ठराव मांडला होता. श्री. आर.आर.पाटील यांनी त्या ठिकाणी जाऊन ज्या पध्दतीचे वक्तव्य केले आहे त्याचे मला आश्चर्य वाटत नाही. कारण लहानपणापासून त्या लढ्यामध्ये ते सीमावासीयांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिलेले आहेत. अनेक वेळा एकत्रितपणे कोल्हापूरला आणि बेळगावला या लढ्यामध्ये सामील झालेले आम्ही मराठी भाषिक होतो. तो बाणा त्यांनी कायम ठेवलेला आहे. आबांना माझी या निमित्ताने विनंती आहे की, आपल्या नेतृत्वाखाली तेथील सीमावासीयांना एकत्रित करण्याचे काम खऱ्या अर्थाने आपण आज केले पाहिजे. सीमाभाग जर आपल्याला महाराष्ट्रामध्ये पाहिजे असेल तर त्या ठिकाणी उद्या होणाऱ्या ज्या निवडणुका आहेत त्यासाठी त्या ठिकाणी सर्वांनी एकत्रित येऊन, महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी एकत्रितपणे त्या ठिकाणी जाऊन, बेळगावकरांना एकत्र घेऊन संपूर्ण महाराष्ट्र तुमच्या पाठीशी आहे हे दाखवून दिले पाहिजे असे मला वाटते. आपण त्यासाठी पुढाकार घ्यावा. आम्ही सर्व आपल्याबरोबर येऊ.

मी गेले 15 दिवस सातत्याने बेळगावकरांच्या संपर्कात आहे. तेथील जे मतभेद आहेत ते मिटविण्याचा प्रयत्न मी त्या ठिकाणी सातत्याने आठ दहा दिवस करीत आहे. कारण गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत त्या ठिकाणी ज्या पध्दतीचे निकाल लागले होते तेव्हा मराठी लोकांचे त्या ठिकाणी वर्चस्व कमी झालेले आहे असा संदेश तेथील कन्नडिगांनी दिला होता. पण महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये तेथील सर्व मराठी बांधव एकत्र येऊन त्यांनी पुन्हा बेळगाव

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत प्र. पाटील ....

महापालिकेवर मराठी माणसांचे वर्चस्व खऱ्या अर्थाने प्रस्थापित केलेले आहे. उद्या होणाऱ्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सर्व सीमाभागातील विधानसभेच्या ज्या सर्व जागा आहेत त्या ठिकाणी महाराष्ट्र एकीकरण समितीच्या उमेदवारांना आपण सर्व शक्तीनिशी पाठिंबा दिला पाहिजे. मी आबांचे जरुर अभिनंदन करतो आणि त्यांना माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी अत्यंत महत्वाचा विषय या सभागृहामध्ये मांडलेला आहे. आबा हे स्पष्टवक्ते आहेत. ही वामनमूर्ती आहे. मूर्ती लहान, कीर्ती महान अशा प्रकारचे आतापर्यंतचे त्यांचे कार्य आहे. बेळगावमध्ये जाऊन महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील भावना व्यक्त करणे हे सुध्दा धाडसाचे काम आहे. त्यानंतर ज्या प्रतिक्रिया उमटल्या, निवडणूक आयोगाने दखल घेणे आणि निवडणूक आयोगाला बाणेदारपणे उत्तर देणे ही बाब महत्वाची आहे. कारण एकूणच लोकशाहीमध्ये निवडणूक आयोगाचा मोठ्या प्रमाणामध्ये बाऊ केलेला आहे. त्यामुळे आबांचे हे भाषण, त्यांची बेळगावमध्ये जाऊन दिलेली प्रतिक्रिया ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. सीमावासीयांच्या मनामध्ये आशेचा किरण जागृत करणारी ही भावना आहे. त्यामुळे मी मनापासून आबांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, आबा हे बाणेदार आहेत, त्यांचे उद्‌गार बाणेदार आहेत. ही गोष्ट फार उशिरा त्यांच्या लक्षात आली. ती बाब त्यांच्या लक्षात आली त्याबद्दल मी त्यांचेही मनापासून अभिनंदन करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज सभागृहामध्ये सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी बेळगांवमध्ये जे वक्तव्य केले त्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी माननीय श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण या महाराष्ट्र राज्याचे गृह मंत्री आहात. आम्ही या महाराष्ट्राचे भाग्य समजतो की, आपल्या सारखे तडफदार व बाणेदार गृह मंत्री आपल्या राज्याला लाभलेले आहेत. आपण महाराष्ट्राचे नेतृत्व करीत असल्यामुळे आपल्या पाठीशी संपूर्ण महाराष्ट्र खंबीरपणे उभा आहे याची आपण निश्चितपणे नोंद घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि जवळपास सर्वच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना येथे व्यक्त केलेल्या आहेत. त्या सर्वांच्या भावनांचा आदर करुन येणारा कोणताही प्रसंग असो, त्या प्रसंगाच्या वेळी आम्ही सर्वजण आपल्या पाठीशी आहोत. ही भावना व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे. मला पूर्ण खात्री आहे की, आपण या प्रसंगाला बाणेदारपणे सामोरे जाल.

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, अनेक सन्माननीय सदस्य आणि आपणही येथे भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. मी बेळगावमध्ये जे काही वक्तव्य केले होते त्याबाबत निवडणूक आयोगाने नाराजी व्यक्त केलेली आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे. आतापर्यंत आपण सर्वांनी आणि मी तर नेहमीच या यंत्रणेचा आदरच केलेला आहे. भविष्यात या यंत्रणेबद्दल आदराचीच भावना राहिली पाहिजे. निवडणुका इम्पार्शल वातावरणात घेणे ही त्या यंत्रणेची जबाबदारी आहे. आयोगाची जबाबदारी आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये काम करणाऱ्या सर्वांनी त्यांचा सन्मान राहील, त्यांचे आदेश पाळले जातील असे वागणे हे देखील तितकेच आवश्यक आहे. त्या यंत्रणेबद्दल पूर्णपणे आदर होता, आहे आणि राहील.

प्रश्न मात्र असा आहे की, मी बेळगांवला जाऊन भावना व्यक्त केल्या होत्या. परंतु तो कार्यक्रम किंवा दौरा संपूर्णपणे खाजगी होता. त्यासाठी कोठेही शासकीय यंत्रणा वापरलेली नव्हती. पूर्णपणे खाजगी स्वरुपाचा तो दौरा होता. महाराष्ट्र एकीकरण समितीसाठी 'तरुण भारत' या संस्थेचे ठाकूर घराणे गेली कित्येक वर्षे राबत आहे. पोलिसांच्या लाठ्याकाठ्या खात आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

संघर्ष करीत आहे. त्या कुटुंबातील व्यक्तीच्या एकसष्ठीचा तो कार्यक्रम होता. तेथे मी महाराष्ट्राच्या जनतेच्या भावना व्यक्त केल्या होत्या. मागील विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी आपसातच फूट पडल्यामुळे अतिशय प्रतिकूल परिणाम त्या परिसरात लागले होते. या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी एकजुटीची भावना दाखविली आहे. सीमा भागातील लोक महाराष्ट्रात येऊ इच्छितात. त्यासाठी ते लढत आहेत, त्यांच्या पाठीशी आपला पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून महाराष्ट्रातील सर्व पक्ष एकसंघपणाने महाराष्ट्रात येऊ इच्छिणाऱ्या मराठी भाषिकांच्या पाठीशी आहेत. ही गोष्ट सर्वांच्या वक्तव्यातून स्पष्ट झालेली आहे.

सभापती महोदय, शेवटी लोकशाहीत मी जरी प्रतिकात्मक तलवारीची भाषा वापरली असली तरी त्याचा शब्दश: अर्थ घ्यावयास नको होता. महाराष्ट्रामध्ये ती प्रतिकात्मक भाषा वापरली जाते. आता विरोधकांनी सत्तारुढ पक्षावर तोफा डागल्या असे म्हटले जाते. याचा अर्थ विरोधकांकडून प्रत्यक्षात तोफा आणून उडविल्या जात नाहीत. तोफा डागल्या याचा अर्थ कठोरपणे शाब्दिक टीका केली असा होतो. मराठी भाषा कर्नाटकातील लोकांना समजेलच असे नाही. मराठी भाषिकांचे दुसरे असे वैशिष्ट्य आहे की, कोठेही भाषिक वाद करणे हे आपण आपले कधीच कर्तव्य मानत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:55

श्री. आर.आर.पाटील...

तेथील आपल्या मराठी भाषिकांवर अन्याय होत आहे, बोर्ड काढले जात आहेत, लाठी चार्ज केले जात आहेत, महापौरांच्या तोंडाला काळे फासून लाथा-बुक्क्यांनी मारले जात आहे, म्हणून महाराष्ट्रामध्ये राहाणा-या लाखो कन्नड बांधवांना येथे कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता नेहमीच मराठी भाषिकांनी घेतलेली आहे. त्यांचा देखील आपल्या बरोबर सर्वांगीण विकास होईल ही भावना सरकारने नेहमीच ठेवलेली आहे. भाषिका-भाषिकामध्ये तेढ निर्माण करणे हे आपण कधी केलेले नाही.

मराठी भाषिकांना न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका स्वीकारत असताना कन्नड भाषिकांवर अन्याय व्हावा ही आपली भावना नाही. त्यांची संस्कृती आहे, त्यांची भाषा आहे, तिचा देखील त्यांच्या राज्यामध्ये चांगल्या त-हेने विकास व्हावा. परंतु तेथील जे मराठी भाषिक त्यांच्या जोखडामध्ये अडकलेले आहेत ते महाराष्ट्राला जोडले जावेत इतकी मर्यादित भावना महाराष्ट्रातील तमाम पक्षांची आणि अनेक वर्षापासून सातत्य ठेवून असलेली भावना आहे. याचा अर्थ कन्नड भाषिकांबरोबर आपला संघर्ष नाही. तेथे असलेल्या आपल्या मराठी भाषिकांवर अन्याय करणा-या राज्यकर्त्यांच्या विरोधात आपला संघर्ष आहे. तेथे जे कोणी सत्तेवर असतात ते सारखेच वागत आहेत. त्यामुळे कर्नाटकात काम करणा-या कोणत्या पक्षाच्या विरोधात आपली भूमिका आहे असेही नाही. तेथे जे कोणी सत्तेवर असतात त्यांची भूमिका मराठी भाषिकांच्या बाबतीत, सीमा भागाच्या बाबतीत सारख्याच रहात आहेत. त्यामुळे येथील पक्ष मराठी भाषिकांची बाजू घेत आहेत आणि तेथील पक्ष त्यांची बाजू घेत आहेत. त्यांच्या शाखा येथे वेगळी भूमिका घेत आहेत.

आज सर्व महाराष्ट्र, महाराष्ट्रातील सर्व पक्ष, सीमावासीयांच्या बाजूने आहेत. सीमावासीय बांधवांना आपण एकत्रितपणे आवाहन करु या. जसे आम्ही येथे एकसंध आहोत त्याप्रमाणे या निवडणुकीमध्ये देखील ते सुध्दा असेच एकसंध राहिले पाहिजे. कारण कर्नाटकचे आजचे राजकीय चित्र बघितले तर तेथे चार-दोन आमदारांना देखील खूप मोठी किंमत येऊ शकते. सीमा भाग महाराष्ट्राला कधी जोडायचा याचा निर्णय सुप्रीम कोर्ट देईल. आपण कोर्टामध्ये गेलो आहोत. पण आज रोज उठून अन्याय होत आहेत. चार-सहा आमदारांचे बळ असेल तर उद्या सरकारल सुध्दा धारेवर धरता येईल, वचक ठेवता येईल आणि मराठी भाषिक जनतेवर होणारे अन्याय निश्चितपणे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

कमी होऊ शकतील. आपण त्यांना असे आवाहन करु या की, जसा महाराष्ट्र आणि मराठी भाषिक हा त्यांच्या बाबतीत इथे एकसंध आहे. त्याप्रमाणे त्यांनी सुध्दा एक शेवटचा धक्का म्हणून निवडणुकीमध्ये एकसंध राहाण्याची भूमिका घेतली तर रोज उठून जे अन्याय होत आहेत ते सुध्दा कमी होतील. म्हणून आपणा सर्वांच्या वतीने मी त्यांना आवाहन करीन की, प्रचाराच्या दरम्यान त्यांनी एकसंधपणाने महाराष्ट्राची बाजू घ्यावी.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे खूप उदार आहेत. मी तेथे पुन्हा जावे आणि अटक व्हावे अशी त्यांनी सूचना केली. त्यांच्या सूचना चांगल्या आहेत. मी त्यांच्या सूचनांचा देखील विचार करीन. पण आपण सगळे मिळून गेलो तर मला सुध्दा एकाकी वाटणार नाही. आपण तेथे बसून राज्य चालवू. कर्नाटकच्या तुरुंगात बसून महाराष्ट्राचे गृहखाते आपल्याला चालविता आले तर यापेक्षा दुसरी भाग्याची गोष्ट नाही. आपल्या लाखो सीमाबांधवांनी अंगावर लाठ्याकाठया झेलून जे आजपर्यंत सोसले आहे त्यापैकी काही जरी आपल्याला सोसायला मिळाले तर ते आपले भाग्य समजू.

सभापती महोदय, मला निवडणूक आयोगाने नोटीस काढली होती. मी तेथे जे बोललो ते वक्तव्ये मी नाकारली नाहीत. पण निवडणूक आयोगाला इतकी विनंती केली होती की, त्याचा शब्दश: अर्थ न घेता त्याचा भावार्थ, त्याच्या पाठीमागील भावना समजून घ्याव्यात. त्यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. भविष्यामध्ये त्यांना पुन्हा नाराजी व्यक्त करावी लागणार नाही याची दक्षता मी घेईन. पण या निमित्ताने जर एकीकरण समितीने आपल्याला बोलावले तर महाराष्ट्राचे एक वेगळे चित्र आपण सीमावासीय बांधवांना दाखवू. आपण सर्वजण महाराष्ट्रामध्ये कधी एकत्र येऊ शकत नाही. पण सीमावासीय बांधवांना महाराष्ट्रात घेण्यासाठी सर्व महाराष्ट्र एकसंध आहे, आपण एकत्रितपणे तेथे जरुर जाऊ आणि एक वेगळी लढाई सीमाभागामध्ये करु. ती लढाई लोकशाहीच्या माध्यमातून असेल, मतपेटीच्या माध्यमातून असेल. यावेळी कधी नव्हती एवढी सीमावासीय बांधवाना विजय मिळण्याची शक्यता आहे आणि आवश्यकता सुध्दा आहे. सभापती महोदय, आपण ज्या भावना व्यक्त केल्या त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

--

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : 2002 पासून अनूसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे

**मु.शी.** : 2002 पासून अनूसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, चंद्रकात पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री भाई गिरकर, रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब, श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 259 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदिवासी आणि मागासवर्गीय समाजाबद्दल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले विचार मांडले आहेत. मी कोकणाविषयी बोलणार आहे. आपण अधिक वेळ बोलण्याची संधी दिली तर मागासवर्गीय आणि आदिवासींच्या संदर्भातील मुद्दे मांडणार आहे. कोकणाचा विकास करण्यासाठी कोकणातील तज्ज्ञांनी तयार केलेला 'कोकण विकास जाहीरनामा, 2004' कोकण भवन, नवी मुंबई येथे डॉ.विजय केळकर यांच्याकडे सुपूर्द केला होता. त्या जाहीरनाम्यामध्ये अनेक शिफारशी केलेल्या आहेत. शासनाकडे हा जाहीरनामा उपलब्ध आहे. झोपलेल्याला जागे करता येते, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला आपण जागे करु शकत नाही. अशीच अवस्था या महाराष्ट्र शासनाची झालेली आहे असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम........

सभापती महोदय, त्या जाहीरनाम्यामध्ये शैक्षणिक विकासासाठी कोकणात स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करावी अशी मागणी 2004 साली करण्यात आली होती. गेल्या 8-9 वर्षात या मागणीबाबत विचार झाल्याचे कुठेही दिसून आले नाही. या अनुषंगाने कोकणवासियांसाठी, कोकणातील विद्यार्थ्यांसाठी, कोकणाच्या शैक्षणिक भवितव्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले जाणार की नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यंदाच्या अर्थसंकल्पात पर्यटनासाठी भरीव तरतूद केल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. दुर्दैवाने पर्यटनासाठी दिलेले मागील वर्षाचे 16 कोटी रुपये अद्याप खर्ची पडलेले नाहीत. या संदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे हे आम्हाला कळले पाहिजे. आम्ही वारंवार कोकणातील पर्यटनासाठी, कोकणाच्या विकासासाठी निधीची मागणी करतो. यावर्षी पर्यटनासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी गेल्या वर्षीचे 16 कोटी रुपये खर्च झाले नाहीत याची नैतिक जबाबदारी कोणी घ्यायची? जो निधी अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करुन दिला आहे तो कोकणातील पर्यटनासाठीच खर्च होईल, तो इतरत्र वळविला जाणार नाही याची ग्वाही मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

सभापती महोदय, 2009 मध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळेला कोकण पॅकेजचे लॉलीपॉप दाखविण्यात आले.

नंतर 3झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

मागच्या निवडणुकीच्या वेळी कोकणवासियांसाठी 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेजचे गाजर दाखविण्यात आले होते. त्या पॅकेजचा आणि अर्थसंकल्पाच्या निधीचा काही एक संबंध नव्हता. कोकणासाठी पॅकेजचा एकही पैसा दिलेला नाही. असे असतांना तुम्ही कोकणासाठी 5 हजार कोटी रुपयांचे पॅकेज का जाहीर केले ? कोकणच्या पॅकेजसाठी कोकणामध्ये मुख्यमंत्री आले, उप मुख्यमंत्री आले, कॅबिनेट झाली, पत्रकार परिषद घेऊन कोकण पॅकेज जाहीर करुन टाकले. निवडणुकीच्या वेळेस कोकणाच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचेच काम केलेले आहे.

सभापती महोदय, कोकणाच्या पर्यटनाच्या माध्यमातून विकास करावयाचा असेल तर कोकणाला निसर्गाने 897 कि.मी जो समुद्र किनारा दिला आहे त्या समुद्र किनाऱ्यावर आम्हाला बोटींग सुरु करावयाची असेल, चांगली हॉटेल्स काढावयाचे असतील, परदेशी पर्यटक आणावयाचे असतील तर त्याबाबतीतील सीआरझेडच्या बाबतीत आपण काय निर्णय करणार आहात ? समुद्र किनाऱ्याचा विकास करण्यासाठी, सीआरझेडच्या बाबतीत कधी निर्णय घेणार आहात ? या सभागृहात कोकणाच्या संदर्भात चर्चा पहिल्यांदाच झाली नाही तर अनेक वेळेस झालेली आहे. परंतु जोपर्यंत सीआरझेडची नियमावली बदली जात नाही, कोळीवाडयांचा नियम बदलला जात नाही तोपर्यंत आम्ही बोटींग सुरु करु शकत नाही, मोठ मोठी हॉटेल्स सुरु करु शकत नाही व पर्यायाने परदेशी पर्यटक येऊ शकणार नाही. आपण कोकणाच्या पर्यटनाचा पैसा नेमका कोठे खर्च करणार आहात ? सीआरझेडच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन यासंदर्भात केंद्रातील संबंधित मंत्री महोदयांकडून सीआरझेडच्या संदर्भातील नियमावली जो पर्यंत बदलत नाही तोपर्यंत कोकणाच्या पर्यटनाचा विकास होणार नाही. कर्नाटक व गोव्यामध्ये समुद्रामध्ये हॉटेल्स आहेत, या राज्यानी समुद्रात हॉटेल उभे करण्यासाठी परवानग्या कशा आणल्या ? या परवानग्या मिळवण्यासाठी महाराष्ट्राला कोणत्या अडचणी आहेत ?

सभापती महोदय, कोकणासाठी जागतिक व्यापार केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यावेळचे आदरणीय मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी कोकणासाठी 100 टक्के अनुदानावर फलोद्यान योजना दिली होती. या फलोद्यान योजनेतून कोकणामध्ये आज मोठया प्रमाणात आंबे आले, काजू, कोकम, आवळे, जांभळे, फणस आले.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम .. . .

सभापती महोदय, द्राक्षाच्या बाबतीत सांगावयाचे तर ज्याप्रमाणे शासनाने त्याची वाईन करण्यासाठी टॅक्समध्ये माफी दिलेली आहे, तशी ती जांभळासाठी का देत नाही, तशी ती देणार आहात की नाही ते सांगावे. आम्ही जास्त काही सांगत नाही.पण नाशिकला न्याय वेगळा, कोकणाला न्याय वेगळा अशी स्थिती आहे. त्यामुळे आज शासनाने याबाबत भूमिका स्पष्ट करावयास पाहिजे. कोकणामध्ये फूड प्रोसेसिंग झाले किंवा जांभळाच्या वाईनवर किंवा काजूच्या बोंडावर प्रोसेसिंग झाले तर आम्ही त्यावर टॅक्स घेणार नाही असे शासनाने एकदा स्पष्टपणे सांगावे. जेणेकरुन तुम्हाला कोकणाबद्दल किती आत्मीयता आहे हे आम्हाला कळू शकेल. आमच्या कोकणामध्ये दापोली कृषी विद्यापीठ आहे. करवंद, जांभूळ, काजूबोंड या फळांची तेथे वाईन बनविली जाते. याबाबतीत त्यांनी आमच्यासमोर आदर्श ठेवलेला आहे.

(माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतात.)

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये आले आहेत, मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना कोकणाबद्दल काही आपुलकी, आस्था, आदर, जिव्हाळा आणि प्रेम नाही असे मी म्हणू शकणार नाही. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदय केवळ सदनामध्ये एक निवेदन करण्यासाठीच आले आहेत आणि नंतर निघून जाणार आहेत असे व्हावयास नको एवढेच मला सांगावयाचे आहे.

(सभापतीस्थानी माननीय सभापती

-----

नंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्थानिक संस्था कर

**मु.शी.**: स्थानिक संस्था करासंबधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस :येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 एप्रिलपासून ज्या महानगरपालिकांमध्ये ही प्रणाली सुरु केली त्यांची नावे सांगितली. परंतु उरलेल्या महापालिकांचा उल्लेख झाला नाही. मी विचारु इच्छितो की, सर्व महापालिकांमध्ये ही प्रणाली केव्हा लागू करण्यात येईल, त्यामध्ये अकोला महापालिकेचा समावेश आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : महोदय, अकोला येथील बाब न्यायप्रविष्ट आहे. परंतु जे बदल केलेले आहेत ते अटी व शर्तीनुसार सर्व महापालिकांमध्ये लागू होतील. ही प्रणाली 1 एप्रिलपासून राबविण्यात मोठ्या महापालिकांमध्ये अडचणी आल्या होत्या. त्यामुळे मुद्दाम टप्प्याटप्प्याने सुरुवातीला लहान महापालिकांमध्ये ही प्रणाली राबविण्याचे ठरविले आहे. मुंबई महापालिकेमध्ये काही दिवसांनी ही प्रणाली सुरु करणार आहोत. मोठ्या महापालिकांमध्ये ज्या अडचणी आल्या त्या बाबत स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे. परंतु ही प्रणाली सर्व महापालिकांना लागू होणार आहे.

श्री.मोहन जोशी : महोदय, 1 एप्रिलपासून राज्यातील काही महानगरपालिकांमध्ये स्थानिक कर वसुलीस सुरुवात झाल्यानंतर काही जाचक तरतुदींमुळे व्यापाऱ्यांमध्ये असंतोष होता. ही बाब मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून व इतर आयुधांच्या माध्यमातून उपस्थित केली होती. या संदर्भात निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री व राज्य शासनाचे अभिनंदन करतो. त्यांनी व्यापाऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी पाऊल उचलले आहे. मला खात्री आहे की, महाराष्ट्रातील सर्व व्यापारी वर्ग या नवीन सुधारणेचे स्वागत करेल. या माध्यमातून जास्तीत जास्त कर वसुली होऊन त्या निधीतून स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होईल, असे मला वाटते. एकंदरीत या पध्दतीचा फायदा स्थानिक महानगरपालिकांना होईल. या बद्दल मी पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

श्री.सतीश चव्हाण : महोदय, ही प्रणाली राबविण्यासाठी 20 लाख लोकसंख्येचा निकष लावण्यात आलेला आहे. औरंगाबाद महापालिकेची लोकसंख्या 11 लाख आहे. या बाबत औरंगाबाद महापालिकेबद्दल सरकारचे धोरण काय आहे, यासाठी आम्हाला सुध्दा आंदोलन करावे लागेल काय ?

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : महोदय, ज्या ठिकाणी या प्रणालीला पहिल्यापासून सुरुवात झाली त्या ठिकाणी एकदम बदल करणे अडचणीचे होते. सध्या 20 लाख लोकसंख्या असलेल्या महापालिकांसाठी ही रक्कम वाढविली आहे. तरी सुध्दा या बाबतीत विचार करुन जे काही करायचे आहे ते करण्यात येईल. कदाचित यामध्ये मधला टप्पा करावा लागू शकतो काय हे पहावे लागेल. या बाबत मी सन्माननीय सदस्यांना भेटून सांगतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यापाऱ्यांची गाऱ्हाणी ऐकून काही अटी सुटसुटीत केल्या आहेत. ही चांगली बाब झाली.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका आहेत पण एकाच वस्तूवर 2.4 अशा दराने कर आकारणी पिंपरी-चिंचवडमध्ये होते आणि पुणे महानगरपालिकेमध्ये मात्र 0.6 पासून 10 पर्यंतच्या दराने कर आकारणी होत आहे. म्हणून माझी विनंती राहील की, दोन्ही महानगरपालिकांचे इतके एकत्रित आदानप्रदान होते, व्यापाराची केंद्रे आहेत, त्यांच्यामध्ये सुसूत्रीकरण होण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी पुणे शहराच्या करप्रणालीमध्ये पिंपरी चिंचवडप्रमाणे सुसूत्रता राहील अशा प्रकारे खास लक्ष घालून त्याबद्दलचा निर्णय घ्यावा. आज आपण जे तपशीलवार निवेदन केलेले आहे त्यावर व्यापाऱ्यांची आणि जनतेची प्रतिक्रिया आम्हाला समजून घ्यावी लागेल. त्यामुळे मी पूर्ण 100 टक्के स्वागत करत नाही परंतु आपण निदान ऐकून घेत आहात ऐकल्यावर यामध्ये आणखी काही सुधारणा शक्य असतील तर तो आढावा देण्यासाठी आपण आम्हाला संधी द्यावी असे मी नमूद करते.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, कराचा दर काय असावा हे संपूर्णपणे महानगरपालिकेने ठरवावयाचे आहे. त्यामध्ये राज्य शासनाची काहीही भूमिका नाही. उलट ते जी यादी आमच्याकडे पाठवतील ती आम्ही थोडी तपासून मान्य करतो. आम्ही यामध्ये उल्लेख केलेला आहे की, या सर्व ज्या याद्या आहेत आणि विशेषत: मोठ्या महानगरपालिकांमध्ये संपूर्ण राज्यभर एकच कर असावा असा आमचा प्रयत्न राहील. पण शेवटी आपण कायद्याने महानगरपालिकेला अधिकार दिलेले आहेत. महानगरपालिकांनी त्याबाबत बसून ठरवावे. आम्ही कोऑर्डिनेशन करण्याची भूमिका निश्चित घेऊ.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती राहील. या ठिकाणी माननीय पालकमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. माननीय पालकमंत्री आणि आपण स्वत: पुणे महानगरपालिकेचा तिढा सोडविण्यासाठी मार्गदर्शन करावे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, निश्चितपणे त्यांना एकत्र बसण्यास सांगून सुसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्यांनी औरंगाबादच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. आणखी काही धोरणात्मक अडचणी आल्या तर शासनाचे मन खुले आहे. शासनाची विचार

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पृथ्वीराज चव्हाण .....

करण्याची तयारी आहे पण हे सुटसुटीत करण्याकरिता यामध्ये खूप मोठे बदल केलेले आहेत. आपल्याकडे व्हॅटची पध्दत अनेक दिवसांपासून चालू आहे आणि त्यासारखेच सर्व नियम केलेले आहेत. व्हॅटप्रमाणेच हा अकाऊंट बेस टॅक्स आहे. हा सोपा टॅक्स आहे. फक्त कर वसुली करण्याचे काम व्यापारी करणार पण शेवटी कर आपल्यालाच द्यावा लागणार आहे. सामान्य माणसालाच तो टॅक्स द्यावा लागतो. जकात सुध्दा आपल्यालाच द्यावी लागत होती. फक्त कर सुटसुटीतपणे गोळा व्हावा याकरिता हा प्रयत्न आहे. सर्व व्यापारी शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करतील असे मला वाटते.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी 1 एप्रिल रोजी लावण्यात आलेल्या एलबीटीच्या संदर्भामध्ये काही शिथिलता दिलेली आहे त्याबद्दल मी वाशीमध्ये असणाऱ्या आशिया खंडातील सर्वात मोठ्या एपीएमसीतील व्यापाऱ्यांतर्फे आपले मनापासून अभिनंदन करतो. परिस्थिती अशी झाली होती की, या एलबीटीमुळे हळूहळू व्यापार नवी मुंबईतून मागे सरत चालले होते. अशा प्रकारच्या करामधून त्या ठिकाणी करचुकवेगिरी होणार होती परंतु राज्याच्या या फार मोठ्या विषयामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जातीने लक्ष घालून हा विषय मिटविला. 22 तारखेपासून महाराष्ट्रातील सर्व व्यापारी बेमुदत संपावर जाणार होते आणि या कराचा बोजा हा सामान्य लोकांवरच पडणार होता. कारण त्यांना जर टॅक्स लागला तर तो टॅक्स किरकोळमध्ये जो दुकानदार विकतो त्यांच्याकडून ग्राहकांवर टॅक्स लावण्याची शक्यता होती. त्यामुळे शासनाने घेतलेला हा निर्णय फार चांगला आहे. या निर्णयाबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, अर्बन लोकल बॉडीजमध्ये नगरविकास खात्याने फार लुडबूड करु नये किंवा फार लक्ष घालू नये अशा पध्दतीचा संकेत आहे. स्वाभाविकत: आपण अर्बन लोकल बॉडीजना पावरफूल करण्याची भूमिका सातत्याने घेतलेली आहे. आपण बोलताना असे सांगितले की, कोणतीही महानगरपालिका असो, दर काय असले पाहिजेत हे त्यांनी ठरवावे. हे सुध्दा बरोबर आहे. आपण तत्वत: ही भूमिका घेतली ती आता पुढे कशी चालवावयाची त्या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

दराबाबतचे धोरण त्यांनी ठरवावयाचे आहे. अगदी अशाच प्रकारे प्रॉपर्टी टॅक्सच्या बाबतीत रेटेबल व्हॅल्यूवरुन कॅपिटल व्हॅल्यूवर जाण्याचा ॲक्ट आपण केला. त्यासाठी जे फॉर्म्युलाज आणि फॅक्टर्स होते ते महानगरपालिकांनी ठरविले. त्याचा अल्टिमेट रिझल्ट मुंबई शहरामध्ये दिसला. त्याची चर्चा विधानसभेत झाली आणि विधान परिषदेत सुध्दा झाली. ती चर्चा अशी झाली की, आपण कायद्यात बदल केला, फॅक्ट ॲंड फॅक्टर्स जे आहेत ते महानगरपालिकेने ठरविले आणि प्रॉपर्टी टॅक्सचा बोजा मेजॉरिटीने लोकांवर पडला आणि आता तेथून रिॲक्शन आली.

आपल्या दालनात आपण बैठक घेणार होता पण ती बैठक झाली नाही. मी सकाळी त्याचा उल्लेख केला. तसेच याचे सुध्दा होऊ नये. आपण तत्वत: एलबीटीचा निर्णय घेतला, दर महानगरपालिकेने ठरविले. आपण अर्बन लोकल बॉडीजवर जास्त प्रेशर आणू नये ही तत्वत: भूमिका बरोबर आहे. पण महापालिकेनेच या दराच्या बाबतीत सर्वंकष चर्चा कशी करावी या बाबतीत काही मार्गदर्शक तत्वे आपण महानगरपालिकेला देणार आहात का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.......
याबाबत त्या त्या महानगरपालिकांना मार्गदर्शक तत्वे दिली पाहिजेत. याचे कारण असे की, पर्यायाने त्याचा बोजा लोकांवर येणार आहे. तत्वत: दर त्यांनी ठरविलेले आहेत असे उद्या शासनाकडून सांगितले जाईल. त्या त्या महानगरपालिकांना सर्वंकष चर्चा करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे द्यावीत अशी माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, एलबीटीचा निर्णय 2010 मध्ये घेतलेला आहे. गेल्या 3 वर्षांपासून लहान महानगरपालिकांमध्ये ही कर प्रणाली अतिशय चांगल्या प्रकारे चालू आहे. सुरुवातीला औरंगाबादला या कर प्रणालीला विरोध केला होता, परंतु नंतर लोकांनी ती स्वीकारली आहे. कल्याण-डोंबिवली येथे चांगल्या प्रकारे स्वीकारलेली आहे. ही कर पध्दत सुटसुटीतपणे सुरु आहे. तरीही मी सांगू इच्छितो की, स्थानिक स्तरावर शासनातर्फे एक समन्वय समिती नेमली जाईल. त्यानंतर अडचणी आल्या तर निश्चितपणे शासनातर्फेत निश्चितपणे समन्वय साधण्याचे काम केले जाईल. कोणत्या गोष्टी माफ करावयाच्या आहेत त्याची एक कॉमन लिस्ट तयार केली जाईल. सुरुवातीला मोठ्या महानगरपालिकेसाठी ती यादी करु. त्यानंतर संपूर्ण राज्यभरातील महानगरपालिकांसाठी करण्याचा प्रयत्न करु. यासंबंधी अतिशय चांगल्या प्रकारे समन्वय ठेवण्याचे काम केले जाईल. त्यामुळे ग्राहकांवर बोजा पडणार नाही आणि महानगरपालिकांचे उत्पन्नही चांगले राहील, जकातीपेक्षा कमी राहणार नाही. अशा प्रकारचा हा समन्वय राहील. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेबाबत मी सर्वांना धन्यवाद देतो.

**सभापती** : माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

**महापौरांचा उल्लेख कार्यवाहीतून काढून टाकण्याबाबत**

**सभापती** : आज दुपारी प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी मुंबई महानगरपालिकेचे महापौर असा ज्यावेळी उल्लेख आला त्यावेळी सभागृहामध्ये काहीशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि माझी चर्चा झालेली आहे. त्यावेळी सदनामध्ये मी एक निवेदन करावे अशा प्रकारचा निष्कर्ष काढण्यात आला होता. महापौराचा झालेला उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्याबाबत शिवसेना पक्षाचे गट नेते श्री.दिवाकर रावते व सर्व सन्माननीय सदस्य तसेच माननीय विरोधी पक्ष नेते यांनीही विनंती केलेली आहे. याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, एसीबीने जर महापौरांना बोलविले असेल तर तपासून पाहून मी ते शब्द कामकाजातून काढण्याचा निर्णय घेईन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, धन्यवाद.

**सभापती** : मघाशी सभागृहात चालू असलेल्या चर्चेच्या वेळी काही सन्माननीय सदस्यांनी, 'आपण कचऱ्यामध्ये पैसे खाता' असा उल्लेख केला होता. ते मी शब्द कामकाजातून काढून टाकणार आहे.

आज सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात आलेला आहे. त्यावर बोलू इच्छिणाऱ्या सदस्यांची खूप मोठी यादी माझ्याकडे आलेली आहे. या अधिवेशनाचा उद्याचा एकच दिवस शिल्लक राहिलेला आहे. उद्याचे दैनंदिन कामकाज संपल्यानंतर आजच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील मंत्री महोदयांचे उत्तर होईल. त्यामुळे आज बोलू इच्छिणाऱ्या काही सदस्यांची नावे गट नेत्यांमार्फत कमी करावी लागतील. आता 6 वाजून 39 मिनिटे झालेली आहेत. आणखी एक शासकीय विधेयक आपल्याला मंजूर करावयाचे आहे. आज ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी मागितलेली आहे त्यापैकी काही सन्माननीय सदस्याचीही नावे कमी करावी लागतील. याकरिता सभागृहाचे कामकाज आज किती वाजेपर्यंत सुरु ठेवावयाचे आहे याचा निर्णय सभागृहाने घ्यावा.

( काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींना उद्देशून बोलत असतात.)

2....

17-04-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4F-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

**सभापती**........

आजचे कामकाज संध्याकाळी 7 वाजेपर्यंत सुरु ठेवावे असे काही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. या वेळेमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल. परंतु गट नेत्यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपल्या पक्षातर्फे केवळ 2-2 सदस्यांची नावे माझ्याकडे द्यावीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:40

श्री. दिवाकर रावते : शिवसेना पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे बोलतील.

श्री. भाई गिरकर : भारतीय जनता पक्षातर्फे मी आणि ॲड. आशिष शेलार बोलणार आहेत.

**सभापती** : काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे त्यांच्या पक्षाच्या गटनेत्यांनी तीन-तीन नावे सुचवावीत.

श्री. सुभाष चव्हाण : काँग्रेस पक्षातर्फे मी, डॉ. सुधीर तांबे आणि प्रा. सुरेश नवले बोलणार आहोत.

श्री. हेमंत टकले : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे श्री. रमेश शेंडगे, श्री. प्रकाश बिनसाळे व श्रीमती विद्याताई चव्हाण हे बोलतील.

**सभापती** : आता एक शासकीय विधेयक घेण्यात येईल व त्यानंतर 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO.V OF 2013 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE.

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत करण्यात आला.)

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विधेयकावरील माझ ो भाषण अपूर्ण होते. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994च्या कलम 13(1) नुसार प्रतिकुलगुरुची नेमणूक होते. या अधिनियमाच्या कलम 13(3) मध्ये प्रतिकुलगुरुच्या पदावधीबाबत "प्रतिकुलगुरुचा पदावधी कुलगुरुच्या पदावधी बरोबरच समाप्त होणे किंवा त्यांच्या वयाची 60 वर्षे पूर्ण होणे यापैकी जी घटना अगोदर घडेल तो पर्याय असेल." अशी तरतूद होती. दिनांक 5.3.2011 रोजी महारष्ट्र शासनाने प्राध्यापक आणि प्राचार्यांचे वय 65 वर्षापर्यंत वाढविलेले असल्यामुळे आणि प्रतिकुलगुरुंची नेमणुकीसाठीची किमान अर्हता ही प्राध्यापक किंवा प्राचार्य असल्यामुळे आपण जी नवीन सुधारणा करीत आहोत ती या प्रमाणे आहे : प्रतिकुलगुरुचा पदावधी, कुलगुरुच्या पदावधीबरोबरच समाप्त होणे किंवा त्याचे वय, नियम सेवावधी पूर्ण होण्याएवढे होणे, यापैकी जी घटना अगोदर घडेल, तोपर्यंत असेल."

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत....

मी आपल्यामार्फत विनंती करतो की, या सुधारणेला सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 47 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 45 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीच्या प्रस्तावावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचे प्रस्ताव मतास टाकले जातील व ते असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 13 च्या पोट कलम (1) मध्ये अशी तरतूद आहे की, कुलपती, कुलगुरुशी विचारविनिमय केल्यानंतर 150 पेक्षा अधिक संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था असतील. प्रतिकुलगुरु की प्र कुलगुरु हे स्पष्ट झाले पाहिजे. प्रतिकुलगुरु म्हटले असले तरी प्र कुलगुरु अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार प्राध्यापक व प्राचार्याचे सेवानिवृत्तीचे वय 62 व 65 वर्षे असा बदल केला आहे. त्यानुसार प्रतिकुलगुरुचा 'पदावधी' असे म्हटले आहे. या ठिकाणी पदावधी ऐवजी कालवधी असा शब्दप्रयोग असणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. प्रतिकुलगुरुचा पदावधी हा कुलगुरुच्या पदावधीबरोबरच समाप्त होणे किंवा त्याचे वय, नियत सेवावधी पूर्ण होण्याएवढे होणे, यापैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शॉर्टकटचा अवलंब करीत असल्याचे दिसून येते. सेवावधी किंवा सेवा कालावधी यापैकी कोणता शब्दप्रयोग योग्य आहे? बिल मांडत असताना त्याच्या मराठी प्रतीमध्ये प्रचंड चुका दिसून येत आहेत. अशा प्रकारे चुका राहिल्या तर हे बिल जशास तसे छापले जाऊन महाराष्ट्रात वितरित होणार आहे.

नंतर 4आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्रीमती शोभा फडणवीस .........

या विधेयकामध्ये मराठीच्या प्रचंड चुका आहेत. या विधेयकात ज्या चुका आहेत त्या चुका नेहमीसाठी तशाच्या तशा राहणार आहेत. या चुकांसह या विधेयकाचे कायद्यामध्ये रुपांतर होणार आहे. जर आपले मराठी धड नसेल तर ते योग्य नाही. त्यामुळे या विधेयकात मराठीच्या ज्या चुका करण्यात आलेल्या आहेत त्या प्रथम दुरुस्त करणे आवश्यक आहे. पदावधी कोठे, सेवावधी कोठे ? आपण सेवावधी म्हणतो का ? आपण सेवावधी नाही तर कालावधी म्हणत असतो. ज्याची जितक्या दिवसाची सेवा असेल त्याचा तो कालावधी मोजला जातो.

या विधेयकामध्ये "प्रतिकुलगुरुचा पदावधी हा कुलगुरुच्या पदावधी बरोबर समाप्त होणे किंवा त्याचे वय नियत सेवावधी पूर्ण होण्याएवढे होणे यापैकी जी घटना, अगोदर घडेल." असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यामध्ये आता कोणती घटना घडणार आहे ? ज्यांचा कालावधी पहिले संपेल ती घटना असे आपल्याला म्हणायचे आहे काय ? या ठिकाणी अतिरेकी येणार आहेत की, भ्रष्टाचार होणार आहे अशा कोणत्या घटना घडणार आहेत ? घटना आणि कालावधीमध्ये आपल्याला काहीच फरक दिसून येत नाही काय ? हे विधेयक उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा कायदा जर मराठीची ऐशीतैशी करुन येणार असेल तर महाराष्ट्रासाठी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट होईल.

या विधेयकामध्ये ज्या चुका आहेत त्या सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांच्या मनाला लागणाऱ्या या चुका आहेत. सन्माननीय सदस्य रावते साहेब मराठीच्या बाबतीत नेहमी सजग असतात. यामध्ये घटना कोठली घडणार आहे याचे आपण या ठिकाणी उदाहरण देण्याची आवश्यकता आहे. या विधेयकावर काय बोलावे हेच आम्हाला आता समजत नाही त्यामुळे आम्हीच माननीय मंत्री महोदयांना विचारणार आहोत की, या ठिकाणी कोणत्या घटना घडणार आहेत ? अपघात होणार आहे काय , अपघात झाल्यानंतर सेवानिवृत्ती संपणार आहे का ? या विधेयकामध्ये जे चुकीचे शब्द वापरण्यात आलेले आहेत ते बदलवण्याची नितांत आवश्यकता आहे. शब्दामध्ये दुरुस्ती केल्यानंतर हे विधेयक येथे आणावे अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

सभापती महोदय, 1994 च्या कायद्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. 150 महाविद्यालय विद्यापीठाशी जोडले असून त्यांच्यासाठी प्रकुलगुरुची नियुक्ती केली आहे. परंतु दोन जिल्हयांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .........

महाविद्यालयांचा संबंध असेल त्या ठिकाणी आपण प्रकुलगुरु देणार नाही. आपण या विधेयकात "प्रतिकुलगुरु" असा उल्लेख केला असला तरी मी प्रतिकुलगुरुच म्हणणार आहे.

आपण चंद्रपूर व गडचिरोलीसाठी गोंडवाना विद्यापीठ दिले आहे. महाराष्ट्र शासन अधिनियम 1994 च्या कलम (3) च्या पोटकलम 2 नुसार 27 सप्टेंबर,2011 रोजी गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. या विद्यापीठाच्या निमित्तने बॅनर लागले, सत्कार झाले परंतु हजारो अडचणी घेऊनच हे विद्यापीठ जन्माला आले. या विद्यापीठाच्या अडचणी सोडविण्याचा कोणीही प्रयत्न केलेला नाही. आम्हाला शेवटी असे वाटायला लागले की, आमच्यावर सर्व बाजूने अन्याय होतोच होतो. चंद्रपूर व गडचिरोली हे जिल्हे नक्षलवादी, आदिवासी जिल्हे, मागासलेले जिल्हे आहेत. या सभागृहात आम्ही या दोन जिल्हयांच्या विकासासाठी सतत विचार मांडत असतो. गोंडवाना विद्यापीठाला कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा दिलेल्या नाहीत. गोंडवाना विद्यापीठाच्या नावाने विदर्भावर अन्याय सुरु केलेला आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. डिसेंबर 2011 च्या शासन राजपत्र भाग दोनच्या पोट कलम 12 नुसार चंद्रपूर, गडचिरोली शैक्षणिक सत्र 2012-2013 गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाकरिता नाव नोंदविले असेल त्याच्या परीक्षा मार्च 2013 मध्ये होतील. सन 2013 मध्ये विद्यापीठाच्या माध्यमातून या ठिकाणच्या कॉलेजमध्ये परीक्षा होणार आहेत. हे जिल्हे अगोदरच आदिवासी आणि मागासलेले जिल्हे आहेत तसेच हे जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. या ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीकरिता विद्यापीठाला सर्व सोयीसुविधा ताबडतोब पुरवण्याची गरज होती. आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा 3 टक्क्याच्यावर गेलेला नाही. मागासवर्गीयांमध्ये 91.11 टक्के लोक आजही द्रारिद्रय रेषेखाली आहेत. या ठिकाणी कोणत्याही पध्दतीचा विकास झालेला नाही. असे असतांना आपण या ठिकाणच्या विद्यार्थ्यांवर अन्याय सुरु केलेला आहे. एकीकडे आदिवासींची चांगल्या कॅटेगरीची मुले मिळत नाहीत असे म्हणतो परंतु ही कॅटेगरीज ठरवित असतांना आपण जे विद्यापीठ निर्माण केले त्या मध्ये कोणत्याही सोयी नाहीत. आपण या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना अन्यायाच्या खाईत लोटले आहे. आज ही मुले कोणत्याही परीक्षा देऊ शकत नाही अशी अवस्था आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

आपणाला विद्यापीठ करायचेच नव्हते तर ते कशासाठी केले ? विद्यापीठ दिल्यानंतर तेथे सर्व सोयी करणे हे आपली जबाबदारी होती. आजही हे विद्यापीठ दहा एकरामध्ये झोपडी सारखे उभे आहे. त्याकडे शासनाचे पूर्णत: दुर्लक्ष झाले आहे. गडचिरोली, चंद्रपूर येथील विद्यार्थी शिकावा, आदिवासी मुलांनी पुढे जावे, स्पर्धेमध्ये यावे अशी आम्ही इच्छा व्यक्त करतो.

आम्ही सतत मागणी करतो की, आपल्याला विद्यापीठ द्यायचे नसेल तर मग आम्हाला वेगळे करावे. आम्ही वेगळे होण्याची मागणी केली की, आमच्यावर सर्व ओरडतात. आमच्या विद्यार्थ्यांचे आयुष्यच बरबाद होणार असेल, त्यांच्या कुठल्याच मागण्या मान्य होणार नसतील तर मग अशा वेळी आम्ही कोणता विचार करायचा हे आपण सांगितले पाहिजे. आम्हाला काय दिले आहे ? गोंडवाना विद्यापीठाच्या माध्यमातून आम्हाला काय मिळाले आहे ? आज आम्ही कोणती मागणी करीत आहोत ? मी परवाच माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांना पत्र दिले आहे. आम्ही या गोष्टी मागून सुद्धा त्या वर्षोनवर्ष देणार नसाल तर मग आमच्या विद्यापीठासाठी आपण कोणती सोय करणार आहात ? आपण कोणतीच सोय करणार नसाल तर ते विद्यापीठ एकदाचे रद्द करावे आणि आम्हाला पुन्हा नागपूर विद्यापीठाशी संलग्न करावे अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

आपले शासकीय अधिकारी आम्हाला किती सहकार्य करतात याचे मी आपल्याला उदाहरण देते. विद्यापीठाच्या दहा एकराच्या जागेला लागून 40 एकर जागा गोंडवाना विद्यापीठासाठी संपादित करण्याचा प्रस्ताव दिनांक 19 मार्च 2012, 23.8.2012, 31.1.2013 रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करण्यात आला. परंतु, माननीय जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी अनेक त्रुटी काढून सदर प्रस्ताव परत केला. हे विद्यापीठ सरकारी आहे. ते शासनाने आदिवासी क्षेत्रासाठी उभे केले आहे. असे असून सुद्धा गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना 40 एकर जागेचा प्रश्न सोडविता येत नसेल तर काय म्हणावे. त्यांनी विद्यापीठाच्या कोर्टातच बॉल टाकलेला आहे, हे योग्य आहे काय ? आम्हाला जागा संपादित करून देण्याची जबाबदारी कोणाची आहे ? विद्यार्थ्यांचा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी कोणाची आहे ? ज्यांनी विद्यापीठ केले त्यांची ही जबाबदारी आहे. सरकार स्वत:च्या जबाबदारी पासून दूर जात असून लोकांवर अन्याय करण्याची परंपरा आता दूर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

झाली पाहिजे असे माझे मत आहे. दिनांक 22 मार्च 2013 रोजी पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्या प्रस्तावावर त्रुटी काढून पूर्ततेसाठी पाठविण्यात आला.

चजिल्हाधिकारी व विद्यापीठाचे अधिकारी हे एकाच ठिकाणी आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन जागेवरच त्रुटी पूर्तता करून आम्हाला ही जागा मिळवून दिली असती तर आता पर्यंत आमची इमारत उभी राहिली असती. जिल्हाधिकारी यांनी एकरी 40 लाख इतका दर जमिनीला द्यावयास तयार आहेत काय अशा प्रकारची त्रुटी काढली आहे ? यात निगोसिएशन करून ती जागा देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची नाही काय ? शेवटी भूसंपादनाची कार्यवाही कोण करतो ? जिल्हाधिकाऱ्यांनी 40 लाख दर हा कुठल्या हिशोबाने कसा काय ठरविला आहे ? सरकारच्या कामासाठी जागा आवश्यक असेल तर ती जागा घेण्याचा अधिकार शासनाला आहे, महसूल विभागाला आहे. मग स्वतःच्या कायद्याचा वापर येथे का करण्यात येत नाही ? विद्यापीठ आज कोणालाही पैसे देऊ शकत नाही. आपल्याला हे विद्यापीठ होऊ द्यायचे नाही काय, आपल्याला आदिवासींवर अन्याय करायचा आहे काय, नक्षलवाद्यांना प्रोत्साहन द्यायचे आहे काय ? कुठल्या पद्धतीने जिल्हाधिकाऱ्यांनी 40 लाख हा दर कशाचा आधार घेऊन ठरविला आहे ? त्याचा येथे खुलासा होणे आवश्यक आहे. शासकीय जमिनीचे दर काय आहेत हे जिल्हाधिकारी विद्यापीठाला विचारतो. जिल्हाधिकाऱ्यांकडे रेडिरेकनर असतो.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .. . .

रेडीरेकनर प्रमाणे महसूल विभाग जागा ठरविते, ते दर ठरवितात. अशा वेळी त्यांनीच विद्यापीठाला विचारावयाचे की, या जमिनीचा शासकीय दर किती आहे? हे अकलेचे तारे ऐकल्यानंतर असे वाटते की, कोणालाही त्या जिल्ह्यामध्ये काम करण्याची इच्छा नाही. केवळ हे लोक अन्याय करण्यासाठी बसले आहेत की काय असा प्रश्न पडतो आणि ही अपेक्षा कलेक्टर कडून कधीच केलेली नाही. आम्ही असे समजतो की, कलेक्टर हे आमच्या जिल्ह्याचे प्रमुख आहेत आणि ते आमच्या जिल्ह्याकडे पूर्णपणे लक्ष देतात. ते आमच्या जिल्ह्याला न्याय देण्यासाठी बसलेले आहेत आणि जर तेच अन्याय करीत असतील तर मग याठिकाणी आम्हाला न्याय मिळणे कठीण आहे.

सभापती महोदय, त्यानंतर तिसरी त्रुटी काढण्यात आली. सदर शेतकऱ्यांसमोर कोणत्या दराने जमिनीची किंमत देणे योग्य आहे याबाबतचे मत प्रदर्शन तुम्ही शेतकऱ्यांसमोर केले आहे काय? ही जबाबदारी खरी कोणाची आहे? याठिकाणी जर एखादा कारखाना उभा करावयाचा असेल तर त्या कारखान्याच्या जमिनीसाठी कलेक्टर धावत जाऊन तेथील शेतकऱ्यांबरोबर बैठक घेतो आणि त्यांना तेथे कमी दरामध्ये जागा मिळवून देण्याचा प्रयत्न करतो. वेळप्रसंगी पोलिसांची मदत घेतो. पण तेथे कारखाना उभा राहिला पाहिजे, परंतु विद्यापीठ उभे राहिले पाहिजे एवढी जरी त्यांच्यात मानसिकता नसेल, संवेदना नसेल तर येथील आदिवासी मुलांचे काय होईल याचा विचार करण्याची गरज आहे. याकडे शासन लक्ष देत नाही आणि सरकार लक्ष देत नाही म्हणून कलेक्टर लक्ष देत नाही आणि कलेक्टर लक्ष देत नाही म्हणून आज तेथे मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांचा प्रभाव आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी भाषण लवकर संपवावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, याठिकाणी विधेयकावर चर्चा सुरु आहे. आपण मला बोलू द्यावे. मला कितीही वेळ बोलू द्या, त्याची अडचण नाही. मला जे विषय मांडावयाचे आहेत, ते मांडू द्यावेत. अशा त्रुटी गोंडवाना येथील उप जिल्हाधिकारी यांनी काढून दाखविल्या आणि हा शासनाच्या विचाराचा भाग नाही काय. मग तुम्ही आम्हाला सांगावे की, आम्ही काहीच करणार नाही, तुम्हाला काय करावयाचे असेल ते करावे. अशा पध्दतीने जर अन्याय होत असेल तर कुठेतरी विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तेव्हा या जमिनीच्या बाबतीत गंभीरपणे विचार करुन 40 एकर जागा विद्यापीठाला मिळवून देण्याची आवश्यकता आहे आणि एक ते दोन महिन्याच्या कालावधीमध्ये याबाबतीत शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

सभापती महोदय, या त्रुटींच्या संबंधातील पत्र जिल्हाधिकारी यांनी प्रतिलिपी माननीय प्रधान सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण सचिव यांना सादर करुनही त्यांनी त्याबाबत त्यांच्या स्तरावरुन काहीही कार्यवाही केली नाही. ते पत्र सचिवांकडे गेल्यानंतर सचिवांना सुध्दा असे वाटले नाही की, याबाबत काही कार्यवाही करावी, यामध्ये चूक झाली आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही काय? अशा पध्दतीने जर सचिव काम करणार नसेल, जिल्हाधिकारी काम करणार नसेल तर त्या विद्यापीठाला एकदा तुम्ही रामराम करा आणि सांगा की, बाबा रे, आम्ही तुला उभे केले हे आमचे चुकले. परंतु विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळण्याचा अधिकार तुम्हाला कोणीही दिलेला नाही. आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत आणि त्यांच्या आयुष्याच्या बाबतीत खेळण्याचा कोणालाही अधिकार नाही. जर करावयाचे असेल तर ते पूर्ण करावे आणि जर करावयाचे नसेल तर पुढे काय करावयाचे याबाबत आमची तयारी आहे. परंतु तुम्ही अशा प्रकारे लोकांवर अन्याय करु नका.

सभापती महोदय, विद्यापीठासाठी लागणाऱ्या खर्चाची मागणी केली आहे. विद्यापीठाने दहा एकर जागेसाठी 18 शैक्षणिक विभागाकरता 29 कोटी 15 लाख रुपयांची मागणी केली. या वर्षापासून तुम्ही तेथे परीक्षा घ्यावयास सांगितली आणि परीक्षा केंद्र उभे करण्यासाठी शासनाने एकही पैसा दिला नाही, आम्हाला मदत केली नाही. ज्यावेळी गोंडवाना विद्यापीठ उभे केले, तेव्हा तुम्ही 1994 च्या कायद्यात स्पष्टपणे नमूद केले आहे की, जेव्हा हे विद्यापीठ उभे होईल, तेव्हाा परीक्षा केंद्र आणि प्रशासन भवनासाठी तातडीने व्यवस्था केली जाईल. तुम्ही ही बाब कायद्यामध्ये सांगितली आहे, गोंडवाना विद्यापीठ स्थापन करताना सांगितले आणि आता मात्र दोन वर्षे झाली तरी परीक्षा केंद्र व प्रशासन भवनासाठी फक्त 18 कोटी 15 लाखाची मागणी केली पण ती सुध्दा शासनाने मान्य केली नाही. सदरहू मागणीचा उल्लेख बजेटमध्ये देखील करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, या बजेटमध्ये वसतीगृहासाठी 18 कोटी रुपयांची गरज असताना फक्त 7 कोटी रुपये देण्यात आले. वसतीगृहासाठी 15 कोटी 39 लाख रुपयांची मागणी केली, अशी एकूण 62 कोटी 59 लाख रुपयांची मागणी 12-10-2012 रोजी केली. यानंतर डिसेंबरमध्ये पुरवणी मागण्या मंजूर केल्या. नंतर मार्च मध्ये परत नव्याने 5-5 हजार कोटीच्या, 7-7 हजार कोटीच्या पुरवणी मागण्या मंजूर केल्या. परंतु या विद्यापीठासाठी मात्र 62 कोटी 69 लाख रुपये आदिवासी विभागासाठी देण्यात आले नाहीत याचे याठिकाणी दु:ख वाटत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, आदिवासी विभागाचे स्वत:चे साडेतीन हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. आदिवासींच्या मुलांसाठी विद्यापीठ उभे करीत असताना एकीकडे गोंडवाना असे नाव द्यायचे आणि दुसरीकडे गोंडवांना लंगोटीमध्ये ठेवायचे अशी आपली भावना आहे काय ?

(बेल वाजविण्यात आली)

**उप सभापती** : मी आपणास नियम वाचून दाखवितो. अन्य सन्माननीय सदस्य देखील बोलण्यासाठी हात वर करीत आहेत. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सुधारणांवर बोलावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीचे विधेयक आलेले आहे. माझी पहिला मागणी आहे की, शासनाने प्रथम चुकीचे विधेयक दुरुस्त करुन आणावे त्यानंतर येथे चर्चा करावी.

सभापती महोदय, आदिवासींचे कल्याण करणारा आदिवासी विभाग वस्तू खरेदीवर सर्वात जास्त आर्थिक तरतूद करतो. परंतु विद्यापीठाच्या विकासासाठी काही खर्च करीत नाही. तेव्हा विद्यापीठासाठी 62 कोटी 59 लाख रुपयांची तरतूद करावी अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, विद्यापीठासाठी आवश्यक असलेला प्राध्यापक आणि कर्मचारी वर्ग नाही. विद्यापीठाने इंग्रजी, इतिहास, समाजशास्त्र, गणित आणि विज्ञान या पाच विषयांकरिता 35 प्राध्यापक आणि 26 कर्मचाऱ्यांचा मागणीचा प्रस्ताव माननीय संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्या शिफारशीसह उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे दिनांक 7 एप्रिल, 2012 रोजी पाठविला. परंतु अजूनही त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. विद्यापीठामध्ये प्राध्यापक नाहीत, कर्मचारी वर्ग नाही, बिल्डींग नाही, सामान नाही. विद्यापीठामध्ये काहीच नसेल तर विद्यार्थी कशाप्रकारे उच्च व तंत्रशिक्षण घेणार, कशा पध्दतीने पोस्ट ग्रॅज्युएट होणार ? याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठाला पद भरतीचा आदेश प्राप्त झाला नाही तर गडचिरोली विभागातील पदवी घेऊ इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता प्राध्यापक उपलब्ध होणार नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे याकडे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे लक्ष नाही याचे मला दु:ख होत आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

गरीब,आदिवासी नक्षलग्रस्त विभागातील विद्यार्थी शिक्षण घेऊ इच्छित आहे. त्यांना असे वाटते की, त्यांनी पुढे जावे, शिकावे, त्यांना सर्व सवलती मिळाव्यात. त्यांच्यावर जर अशा पध्दतीचा परिणाम होत असेल तर ते विद्यार्थी उद्या नक्षलवादी झाले तर त्याच्यावर अन्याय होणार आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहापुढे विचारार्थ असलेले विधेयक आणि सन्माननीय सदस्या ज्या विद्यापीठाबद्दल माहिती देत आहेत ते दोन्ही विषय संपूर्ण वेगळे आहेत. या विधेयकामध्ये ज्या तरतुदी आहेत किंवा ज्या त्रुटी आहेत त्यावर चर्चा करणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्या जो विषय मांडत आहे तो महत्वाचा आहे हे आम्ही मान्य करतो..

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा विषय वेगळा आहे हे मला देखील माहीत आहे, परंतु आम्ही आमच्या भावना कोठे मांडायच्या?

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा विषय महत्वाचा आहे. त्यावर आपण वेगळी चर्चा घेऊ शकतो. त्यावेळी आपण हा विषय मांडू शकता. या विधेयकातील तरतुदीमध्ये काही त्रुटी असतील तर त्यामध्ये कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत या विषयावर सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शन केले तर ते अधिक उपयुक्त होईल असे मला वाटते

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला माहिती दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देते.

सभापती महोदय, विद्यापीठासाठी पुढील अभ्यासक्रमाची मागणी केलेली आहे, बायो-टेक्नॉलॉजी, मायक्रो बायोलॉजी, कंम्प्युटर सायन्स, फिजिक्स, केमिस्ट्री, जॉग्रफी, इकॉनॉमिक्स, एमसीएम, एमसीए, एमबीए, होम इकॉनॉमिक्स, पोलिटिकल सायन्स हे विषय सुरु करायचे आहेत. हे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी 133 प्राध्यापक, 102 शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पद मान्यतेचा प्रस्ताव दिनांक 24.5.2012 रोजी सादर करण्यात आला. आज मार्च 2013 सुरु आहे. तेव्हा या सर्व मागण्या पूर्ण कराव्यात अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, या कायद्या अंतर्गत आपण विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुच्या वयाचा विचार केलेला आहे. त्याच बरोबरच पुत्र म्हणून जे विद्यापीठ उभे केलेले आहे त्यास निधी देऊन सक्षम केले पाहिजे. केवळ मोठ्या विद्यापीठाचा विचार न करता या छोट्या विद्यापीठाचा देखील विचार करावा अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

--------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक-5 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, केवळ शब्दश्लेष काढावयाचा म्हणून मी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव दिलेला नाही. कारण मराठीमध्ये 'प्रति' आणि 'प्र' या दोन शब्दांचा वेगळा अर्थ होतो. आपण म्हणतो की, एखादी व्यक्ती स्वत:ला प्रति अमुक-तमुक समजते. याचा अर्थ ती त्याची मदतनीस समजते असे नसून स्वत:च पर्यायी भूमिका बजावणारी व्यक्ती समजत असते. हा त्यातील महत्त्वाचा भाग आहे. प्रशिक्षण, प्रवक्ता यामध्ये माणूस जर 'प्रति' समाजायला लागला तर मला वाटते त्यात शब्दाचा अनर्थ होतो. या ठिकाणी बहुमत किंवा अल्पमत याचा विचार करुन विधेयक रेटून न्यायची भूमिका माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री घेत असतील तर ते योग्य होणार नाही. कारण शब्दांच्या अर्थाचे काय महत्त्व आहे हे आज सर्वांना समजले आहे.

या विधेकात प्रतिकुलगुरु हा जो मराठी शब्द वापरण्यात आलेला आहे तो योग्य नाही. कुलगुरु आणि प्रतिकुलगुरु असा कारभार राज्यात सर्वत्र सुरु झाला तर कुलगुरु इतकेच प्रतिकुलगुरुंना अधिकार आहेत असा त्याचा अर्थ होईल. या कायद्याच्या 13 व्या कलमामध्ये प्रतिकुलगुरु कशा पध्दतीने नेमावेत या बाबतच्या सूचना नमूद केलेल्या आहेत. कायद्यात नमूद केलेले आहे की, चान्सलर हे व्हाईस चान्सलरशी बोलून प्रतिकुलगुरु नेमतील. तसेच ज्या विद्यापीठामध्ये 150 पेक्षा जास्त कॉलेजेस असतील त्याच ठिकाणी प्रतिकुलगुरु नेमता येणार आहेत. तसेच दुसरा मुद्दा असा की, प्रतिकुलगुरुला कमीत कमी 15 वर्षे शिकविण्याचा अनुभव पाहिजे. तिसरी बाब अशी की, प्रतिकुलगुरु आणि कुलगुरु या दोघांची कालमर्यादा सारखीच असली पाहिजे. ज्यांची वयाची 60 वर्षे अगोदर होतील त्यावेळी दोघांना सारखेच नियम लागू राहणार आहेत. प्रतिकुलगुरु फुलटाईम ऑफीसर राहणार आहे. त्याच बरोबर राज्य सरकार या बाबतीत नियम बदलू शकते. प्रतिकुलगुरुची जागा रिक्त असेल त्या वेळी दुसरा कोणताही अधिकारी नेमता येईल. माझा प्रश्न असा आहे की, प्रतिकुलगुरु कसा नेमला जाईल या बाबत सभागृहात का सांगितले गेले नाही ? आम्ही मूळ कायदा वाचल्यानंतर ही बाब रेकॉर्डवर आणली. नाही तर बहुतेक ठिकाणी कुलगुरुंच्या मर्जीतील प्रतिकुलगुरु नेमायचा अशा पध्दतीची शिफारस माननीय राज्यपालांकडे जाऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदय, मी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सहकार विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचे प्रस्ताव मांडले होते. परंतु आम्हाला आमचे प्रस्ताव मागे घ्यावे लागले. परंतु विधानसभेत ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. आम्ही ज्यावेळी या संदर्भातील प्रस्ताव मांडला त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांच्या चेहऱ्यावर उपहासाचे भाव होते. परंतु विधानसभेतून ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठविले गेले. प्रत्येक वेळी वरिष्ठ सभागृह म्हटले जात असेल आणि आमच्या प्रस्तावाच्या मांडणी बाबत जर उपहासाची भावना मनामध्ये असेल तर ते योग्य नाही. आम्ही अल्पमतात असलो तरी जनतेत जे प्रश्न वा शंका निर्माण होणार आहेत त्या बाबत आपण वरिष्ठ सभागृहात गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्यामुळे हा विषय प्रतिष्ठेचा न करता 'प्रति' ऐवजी 'प्र' असा शब्द वापरणार असाल तर मराठीत तसा नियम करुन टाका आणि त्यानंतर काय काय गोंधळ होतो ते पहा. प्रत्येक जण स्वतःला प्रतिशिवाजी समजेल. म्हणून या विधेयकाच्या बाबतीत पुनर्विचार झाला पाहिजे असे मला वाटते.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक-5 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या विधेयकातील उद्देश व कारणे या मध्ये तांत्रिक चुका झाल्या आहेत. या विधेयकावर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विचार मांडले.

महोदय, महाराष्ट्राचे आणि या विधिमंडळाचे दुर्दैव असे की, अगोदर इंग्रजी भाषेत विधेयक तयार करण्यात येते व त्या नंतर त्याचे मराठीत भाषांतर करण्यात येते. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेची अशी ही अवस्था आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

माझी आपल्याला विनंती आहे की, यापुढे किमान पहिल्यांदा मराठीमध्ये बिल तयार होईल आणि मग त्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर होईल अशी भूमिका शासन घेणार आहे का ?

सभापती महोदय, या ठिकाणी दोन सुधारणा मांडण्यात आलेल्या आहेत. यामध्ये आपण 'घटना' असा उल्लेख केलेला आहे. घटना म्हटल्यानंतर कोठे अपघात झाला का किंवा कोणी मयत झाला का असा वाईट विचार मनामध्ये येतो. घटना या शब्दाचा अर्थ साधारणतः असा होतो. तो शब्द चुकीचा असल्यामुळे आपल्याला यातून वगळावा लागेल. तसेच आपण 'प्र' असा जो उल्लेख केला आहे त्या बाबतीतही सुधारणा करावी लागेल. त्यामुळे आपण सुधारणा करुन बिल आणावे. मग काही अडचण राहणार नाही. मला यावर अधिक काही बोलावयाचे नाही. माझी आपल्याकडे एकच मागणी आहे की, आपण आम्हाला कोकणामध्ये विद्यापीठ द्यावे. आपण कोकणात विद्यापीठ देणार का ? कोकणामध्ये विद्यापीठ द्यावे ही अनेक वर्षापासूनची मागणी आहे. आम्ही नेहमीप्रमाणे या ठिकाणी मागणी करण्याचे काम करतो.

सभापती महोदय, मी कोकणामध्ये डोंगरी भागामध्ये पहिले डेंटल कॉलेज काढले. मी आपल्याला मुद्दाम सांगतो. एकदा मी एका नेत्याला फोन केला की, आमच्याकडे एक गरीब शेतकऱ्याचा मुलगा आहे त्याला ॲडमिशन पाहिजे. त्यांनी सांगितले की, त्याला 10 लाख रुपये डोनेशन घेऊन पाठवा. मला फार चीड आली. मनामध्ये चीड आल्यामुळे मी कोकणामध्ये डेंटल कॉलेज काढले. गरीब, लंगोटीवाल्या शेतकऱ्याच्या मुलाला सुध्दा त्या कॉलेजमध्ये शिक्षण मिळाले पाहिजे आणि तो डॉक्टर झाला पाहिजे हा दृष्टीकोन समोर ठेऊन पहिल्यांदा कोकणात डेंटल कॉलेज काढले. कोकणामध्ये अनेक नेते होऊन गेले पण नवी मुंबई सोडली तर कोकणामध्ये एकही डेंटल कॉलेज नव्हते. म्हणून मी कोकणामध्ये डेंटल कॉलेज उभे केले. ते कॉलेज कसे उभे केले हे माझे मलाच माहीत आहे. त्या डोंगरी भागामध्ये कोणत्याही सुविधा नाहीत. कारण जे नियम आहेत ते फारच कडक आहेत त्यामुळे आमची अडचण होते. कधीकधी असे वाटते की, ते कॉलेज बंद करुन टाकावे. ते कॉलेज काढून आयुष्यातील मोठी चूक केली असे वाटते. कारण शासनाच्या विद्यापीठाचे जे नियम आहेत ते अतिशय जाचक आहेत. सर्वसामान्य माणूस डोंगराळ भागामध्ये असे कॉलेज चालवूच शकत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, शैक्षणिक विकासासाठी कोकणामध्ये विद्यापीठ मान्य करावे. कोकण मागासलेला आहे. कोकणाला शैक्षणिक दृष्ट्या मागे ठेवण्याचे काम शासनाने सातत्याने केले आहे. ही मागणी मी आज पहिल्यांदा करीत आहे अशातील भाग नाही. कोकणाच्या विकासासाठी 2004 मध्ये ज्यावेळी तज्ज्ञांनी केळकर समितीच्या हातामध्ये जाहीरनामा दिला त्यामध्ये पहिली मागणी ही आहे. 2004 साली ज्या 10 प्रमुख शिफारशी केल्या होत्या त्यामध्ये पहिली शिफारस ही आहे. गेल्या आठ वर्षापासून सतत आम्ही मागणी करीत आहोत. आज देखील कोकणातील एक प्रतिनिधी म्हणून मी या सभागृहामध्ये परत एकदा ही मागणी करतो. ही मागणी आपण मान्य करावी अशी विनंती करतो. या ठिकाणी तेवढे जरी झाले तरी मी समाधान व्यक्त करीन.

सभापती महोदय, आज या ठिकाणी मी कोकणाच्या विषयावर बोलण्यास सुरुवात केली तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते मला असे म्हणाले की, श्री. आर.आर.पाटील सभागृहात आलेले आहेत, त्यांनी चांगले काम केले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करु या. मी म्हटले, करुन टाका. त्यांचे अभिनंदन केले. मी खाली बसलो. त्यांचे अभिनंदन करण्यामध्ये आर्धा पाऊण तास वेळ गेला. मग पुन्हा माननीय मुख्यमंत्री सभागृहात आले. त्यांनी सांगितले की, मला निवेदन करावयाचे आहे. मुख्यमंत्र्यांना कोण नाही म्हणणार ? मी पुन्हा खाली बसलो. त्या निवेदनावर पुन्हा प्रश्नोत्तरे झ ाली. पुन्हा त्यामध्ये अर्धा पाऊण तास गेला. नंतर पुन्हा माननीय सभापती महोदय आले. त्यांनी सांगितले की, अगोदर हे बिल पास करा, मग कोकणाचे बघू. मी परत खाली बसलो. या विधिमंडळामध्ये आमच्या कोकणाची ही अवस्था आहे. या सभागृहामध्ये आम्ही कोकणाच्या व्यथा सुध्दा सलगपणे मांडू शकत नाही, ही आमची व्यथा आहे. त्यामुळे आपण या बिलाच्या संदर्भात जेव्हा उत्तर द्याल तेव्हा आपण कोकणामध्ये इतक्या दिवसात विद्यापीठ देऊ असे सांगावे. आम्हाला नुसते आश्वासन नको. आर्थिक तरतूद कशी करणार, काय करणार, किती दिवसामध्ये विद्यापीठ उभे करणार हे सर्व सांगितले तर मी आपला अत्यंत आभारी राहीन.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहासमोर विधानपरिषद विधेयक क्रमांक 5 चर्चेसाठी आलेले आहे. या विधेयकासंबंधी मी माझे विचार मांडण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेले आहे. मी केवळ एकच मुद्दा मांडणार आहे. मंत्री महोदयांनी हे विधेयक का आणावे लागले त्याबाबत या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 कलम पोट-कलम (2) मध्ये बदल करावा लागत आहे. प्राध्यापकांच्या व प्राचार्यांच्या निवृत्तीच्या वयात बदल करण्यासाठी शासनाने दि.23.2.2012, दिनांक 5.3.2011, दिनांक 23.11.2011 आणि दिनांक 11.10.2012 रोजी जी.आर.इश्यू केलेले आहेत. त्यानुसार प्राध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय 62 व प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय 65 निश्चित केलेले आहे. प्रो-व्हाईस-चान्सलर पदी नियुक्ती करण्यासाठी एक अट घातलेली आहे. प्राध्यापकाला किमान 15 वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावयास पाहिजे. शासनाने आता प्राध्यापक व प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात बदल केल्यामुळे प्रतिकुलगुरुंच्या पदी नेमावयाच्या व्यक्तीच्या वयामध्येही बदल करणे गरजेचे आहे. शासन प्राचार्य व प्राध्यापकांच्या वयोमर्यादत बदल करीत आहे. तोच धागा पकडून शासन कलम 13 च्या पोट कलम (3) मध्ये प्रतिकुलगुरुंसाठीही बदल केला जात आहे. शासन या वयोमर्यादामध्ये बदल करु इच्छित आहे, तशी दुरुस्ती शासनाने या विद्यापीठ अधिनियमामध्ये केली आहे काय, एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे.

-------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक): सभापती महोदय, मला आपण वि.प.वि.क्र.5 वर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. मी केवळ 2-3 मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, प्रतिकुलगुरुंसंबंधीचा खरा मुद्दा बाजूलाच पडलेला आहे. प्र-कुलगुरुंचा जॉब चार्ज लक्षात घेतला तर प्र-कुलगुरु हा उप कुलगुरु या दर्जाचा नसतो. प्र-कुलगुरु हा कुलगुरुंचे निरनिराळया ठिकाणी प्रतिनिधीत्व करीत असतो. मंत्री महोदयांनी त्यांच्या वयाच्या अटीची दुरुस्ती आणलेली आहे. कुलगुरुंना सहाय्य करणारी त्यांची जी भूमिका आहे. हे जरी खरे असले तरी प्र-कुलगुरु हा कुलगुरुंची मर्जी असेपर्यंतच त्या खुर्चीत राहू शकतो. कुलगुरुंना चॅलेंज करण्याची त्यांनी भूमिका घेतली तर तो त्या खुर्चीत राहू शकत नाही. अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, 150 महाविद्यालये असतील तरच प्र-कुलगुरुंचे पद निर्माण करणे ही अट घातलेली आहे. ही अट तितकीशी सयुक्तिक नाही. एखाद्या विद्यापीठाच्या संलग्न असलेल्या महाविद्यायांचे जिल्हे लक्षात घेतले तर प्रत्येक जिल्ह्यासाठी एक प्र-कुलगुरुंचे पद निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तशी दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.

तिसरा मुद्दा असा आहे की, कुलगुरु देशात किंवा देशाबाहेर गेल्यानंतर त्यांचे काम करण्याची जबाबदारी प्र-कुलगुरुंवर टाकली पाहिजे. अशा वेळी प्रभारी कुलगुरुंची नेमणूक करुन प्र-कुलगुरुंना दुय्यम स्थान दिले जाते. कुलगुरुंच्या अनुपस्थितीत प्र-कुलगुरुंनी काम केले पाहिजे. असाही उल्लेख या विधेयकात करण्याची गरज आहे. एवढेच उल्लेख करुन मी या ठिकाणी थांबतो.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी या विधेयकावर बोलत असताना "प्रकुलगुरु" आणि "प्रतिकुलगुरु" या शब्दाबाबत आक्षेप घेतलेला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की. 1994चा हा कायदा आहे. त्या कायद्यामध्ये देखील "प्रतिकुलगुरु" असाच शब्दप्रयोग आहे. त्यानंतर या कायद्यामध्ये सन 2000 मध्ये सुधारणा करण्यात आली ती देखील "प्रतिकुलगुरु" म्हणूनच करण्यात आली. प्रोव्हाईस चॅन्सलर या इंग्रजी शब्दाचे मराठी भाषांतर प्रतिकुलगुरु असे केलेले आहे आणि त्यास भाषा संचालनालयाने मान्यता दिलेली आहे. ही आजची घटना नाही. आज देखील जे प्रकुलगुरु म्हणून काम करीत आहेत त्यांचे पदनाम देखील प्रतिकुलगुरु असेच आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याचा योग्य वेळी विचार करण्यात येईल. हा शब्द आपण नव्याने समाविष्ट करीत नाही. त्यामुळे याबाबती सन्माननीय सदस्यांनी जास्त आग्रह धरु नये असे मला वाटते.

श्री. दिवाकर रावते : प्रकुलगुरु या शब्दाऐवजी प्रतिकुलगुरु शब्द शासनाला योग्य वाटत असेल तर पुढील अधिवेशनामध्ये तशी सुधारणा आणावी.

श्री. डी.पी.सावंत : या बाबतीत योग्य वेळी विचार करण्यात येईल असे मी सांगितलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आदरणीय श्री. काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. त्यांनी महाराष्ट्र विद्यापीठाचा कायदा कसा असावा या संदर्भात काही सूचना केलेल्या आहे. येणा-या काळामध्ये विद्यापीठ कायद्यामध्ये आपण आमूलाग्र बदल करणार आहोत. त्यावेळी हा बदल आपण जरुर करु. हा कायदा 1994 पासूनचा आहे. त्यामुळे आज तरी हा बदल सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असू नये असे मला वाटते.

सभापती महोदय, "पदावधी" या शब्दाबाबत आक्षेप घेण्यात आला. पद आणि अवधी या दोन शब्दांची पदावधी ही संधी आहे. जसे काल आणि अवधी म्हणजे कालावधी त्याप्रमाणे पद आणि अवधी म्हणजे पदावधी. प्रकुलगुरु हे पद आहे. त्यामुळे सेवावधी हा शब्द कुलगुरुसाठी योग्य राहील असे मला वाटत नाही. त्यामुळे पदावधी हा योग्य शब्द आहे. त्यामुळे हा शब्दप्रयोग देखील आपण मान्य करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..

श्री. डी.पी.सावंत...

सन्मननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी वयाचा उल्लेख केला. आपण युजीसीच्या सूचनेनुसार वयामध्ये बदल केला. आपल्याला प्राध्यापकांना 5व्या आणि 6व्या वेतन आयोगाचा फरक द्यायचा आहे. युजीसीने असे सांगितले होते की जोपर्यंत तुम्ही आमचे पूर्ण पॅकेज स्वीकारत नाही तोपर्यंत आम्ही यास मान्यता देणार नाही. म्हणून वयोमर्यादा वाढविल्यामुळे ही सुधारणा आणावी लागली आहे. युजीसीच्या सांगण्यावरुन आपण हे करीत आहोत. या संदर्भात 2011मध्ये आपण जी.आर.देखील काढला होता. त्यामध्ये वय कशा प्रकारे वाढवायचे हे सांगितलेले आहे. समितीसुध्दा नेमलेली आहे. त्यामुळे याबाबतीत आक्षेप असण्याचे काही कारण नाही.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी गोंडवाना विद्यापीठासंबंधीचा उल्लेख केला. त्यांनी खूप पोटतिडिकेने आपले विचार मांडले. आता माझ्याकडे गोंडवाना विद्यापीठासंबंधीचे डिटेल्स नाहीत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत माझ्या स्तरावर आपण बैठक घेऊ आणि जिल्हाधिका-यांकडून काही अडचणी असतील तर त्या समजून घेऊ. गोंडवाना विद्यापीठ हा आमच्या विभागाचा प्रेस्टिजिअस प्रोजेक्ट आहे. येत्या महिनाभराच्या आत बैठक घेऊन याबाबतीत काय तोडगा काढता येईल या दृष्टीने प्रयत्न करु.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी कोकण विद्यापीठासंबंधी सांगितले. आता आपण विद्यापीठाचा नवीन कायदा करीत आहोत. त्याचा मसुदा आमच्या समोर आलेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ पूर्वी श्री.शिगम 19:30

श्री.डी.पी.सावंत.....

त्यांनी सांगितले की, प्रत्येक जिल्हयाला विद्यापीठाचे उपकेंद्र असावे. डिसेंट्रलायझेशन ऑफ एज्युकेशन असे त्यांनी सुचविले आहे. अनेक चांगल्या गोष्टी सुचविल्या आहेत. पुढील काळात जिल्हयांमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करुन ते चांगल्याप्रकारे कसे विकसित करता येईल या संदर्भात विचार केला जाईल. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना जरुर विचारात घेऊ. कोकणासाठी विद्यापीठ करता आले तर ते चांगलेच आहे. माझी पाळेमुळे कोकणातच आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही 2004 पासून मागणी करीत आहोत. कोकणाचा शैक्षणिक विकास होण्यासाठी विद्यापीठ मंजूर झाले पाहिजे. एसएससी बोर्ड मंजूर केले त्याबद्दल मंत्री महोदयांचे आभार मानतो. कोकणासाठी विद्यापीठ मंजूर करण्याची मागणी आणखी किती वर्षे करावी लागेल?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची कोकणासाठी जी तळमळ आहे त्या दृष्टीने त्यांनी चांगली कल्पना मांडली आहे. त्याबाबत विचार करु. लवकरात लवकर निर्णय घेण्याचा प्रयत्न करु. मी माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी आपला प्रस्ताव मागे घ्यावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मंत्री महोदयांनी सांगितले की, विद्यापीठ विषयक कायद्याचा पुनर्विचार करीत आहोत. माझी सूचना आहे की, संपूर्ण राज्यभरात त्याबद्दल सूचना मागवून, वेगवेगळया सदस्यांकडून त्याबद्दलचे मत मागवून नंतर कायद्यात दुरुस्ती करण्यात यावी. समाज कायद्याने चालतो, कायदा समाजानुसार चालतो असे यातून दिसते. कायद्यात जरी 1994 साली प्रतिकुलगुरु असा शब्दप्रयोग केलेला असला तरी समाजात प्रकुलगुरु हा शब्द रुढ झाला आहे. याचा अर्थ समाजाने योग्य तो शब्द स्वीकृत केला आहे. त्या दृष्टीने कागदोपत्री पदनाम बदलण्याच्या संदर्भात पुनर्विचार करावा अशी विनंती करते आणि माझा प्रस्ताव मागे घेण्यास मला सभागृहाने अनुमती द्यावी अशी विनंती करते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी तातडीने निर्णय घेऊ असे म्हटले नाही. लवकरात लवकर करु असे म्हटले. लवकरात लवकर हे शब्द आता ठिसूळ झाले आहेत. तातडीने कोकणातील सर्व आमदारांची मुख्यमंत्र्यांसमवेत किती दिवसात बैठक घेण्यात येईल हे सांगावे. हा कोणत्या राजकीय पक्षाचा विषय नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत : मुंबई विद्यापीठाचे उपकेंद्र रत्नागिरी येथे सुरु आहे. विद्यापीठ विभाजनासाठी डॉ.राम ताकवले यांची समिती नेमली होती. त्यांच्या शिफारशींवर विचार करीत आहोत. त्यानुसारच मी लवकरात लवकर असे म्हटले आहे. त्यांचा अहवाल अद्याप स्वीकृत व्हायचा आहे. तो अहवाल स्वीकारल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेऊन याबाबत विचार करता येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी केलेल्या विनंतीनुसार मला माझा प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाने अनुमती द्यावी.

**उप सभापती** : आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा प्रस्ताव प्रथम मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

नंतर 4आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 5 संमत झाले आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : 2002 पासून अनूसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे

**मु.शी.** : 2002 पासून अनूसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अनुशेष हजारो कोटीपर्यंत गेल्याचे निदर्शनास येणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, चंद्रकात पाटील, डॉ. दीपक सावंत, श्री. सुमंतराव गायकवाड, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री भाई गिरकर, रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब, श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे ऑनलेग आहेत. त्यामुळे माझी आपल्या वतीने सदनाला विनंती आहे की, आता अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु न करता ती उद्या सकाळी 10.00 वाजता उत्तरासहित घेण्यात यावी अशी विनंती आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे अंतिम आठवडा प्रस्तावावर ऑन लेग आहेत. आता अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु न करता उद्या सकाळी 10.00 वाजता पुन्हा सुरु करावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : अंतिम आठवडा प्रस्ताव आता घ्यावयाचा की, उद्या सकाळी घ्यावयाचा याबाबत माननीय सभापती महोदयांना विचारुन निर्णय घ्यावा लागेल. पाच मिनिटात यासंदर्भात माननीय सभापती महोदयांकडून अनुमती येईल तो पर्यंत सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय,अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असतांना अनेक मुद्दे मी मांडलेले आहेत. फळावर प्रोसेस करण्यासाठी काजू व आंब्यावर प्रोसेस करण्यासाठी स्वतंत्र मंडळ...

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये यासाठी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम मघाशी असे म्हणाले होते की, विमानतळ उभे करण्यासाठी निधी कधी देणार व विमानतळ कधी सुरु होणार ? हे विमानतळ खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसीत होत आहे. या विमानतळाचे उद्‌घाटन माननीय श्री राणे साहेबांनी केलेले आहे. विमानतळाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवातही झालेली आहे. आपल्याला यासंदर्भात माहिती नसेल किंवा माहिती घेतली नसेल, किंवा दिलेली माहिती चुकीची आली असेल यासाठी मी हरकतीद्वारे मुद्दा उपस्थित केलेला आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, विमानतळाच्या विषयाच्या संदर्भात मी असे म्हणालो होतो की, विमानतळासाठी जेवढी जागा लागेल त्याच्या तीनपट जागा आपण गरीब शेतकऱ्यांच्या घेऊन ठेवल्या आहेत त्या कशासाठी ? मी हे बोलणारच होतो परंतु मी बोलत असतांना हरकतीचा मुद्दा काढून, मला खाली बसवून हरकतीचा मुद्दा काढला आहे. आपण आताच यासंदर्भात फोनवरुन माहिती घेतली असेल. आम्ही सत्तेमध्ये असल्यापासून या विमानतळाचा विषय सुरु आहे. खरे म्हणजे हा विषय तुम्ही मला सांगण्याची आवश्यकता नाही. विमानतळाचा विषय गेल्या वीस वर्षापासून मी ऐकतो आहे. माननीय नवले साहेब आपण मराठवाडयाचे आहात मी कोकणाचा आहे मला या विषयाची पूर्ण माहिती आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, आज रत्नागिरीतील विमानतळ सुरू आहे काय ? ते विमानतळ बंद आहे. त्यासाठी माननीय पालक मंत्री काय करत आहेत ? मी याच्या खोलात गेलो नाही. मी फक्त ओझरता उल्लेख केला आणि पुढे गेलो. आपण उगाचच पुन्हा मागे जायला भाग पाडू नका.

काजू आणि आंबा या पिकांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यासाठी समिती स्थापन केली. या समितीला आपण दोन महिन्यांची मुदत दिली. या समितीची दोन महिन्यांची मुदत संपली आहे. ही मंडळे स्थापन करण्यासाठी आपण अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केली आहे हे आपण सांगावे.

सभापती महोदय, आंबा, काजू फळ पिकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली चालना देण्यासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना कधी करण्यात येणार आहे हे आपल्या भाषणामध्ये सांगावे. कोकणासाठी वैधानिक विकास महामंडळाची स्थापना करणार होता. त्याचे काय झाले आहे ? यासंबंधी सभागृहात अनेक वेळा प्रश्न विचारले आहेत. विधान मंडळामध्ये एकमताचे प्रस्ताव करून दिल्लीला पाठवले. बाकी सगळी वैधानिक विकास महामंडळे होतात. मात्र, कोकणासाठी अडचण येते. आपण केळकर समिती नेमली आहे. त्या दांडेकर समितीचे काय झाले ? एखादी गोष्ट करायची नसेल तर समित्या नेमून वेळ काढत बसायचे हे योग्य नाही. केळकर समिती सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये बसली. ती समिती आम्हाला मंडणगड येथून बोलावते. म्हणजे त्यांना भेटण्यासाठी आम्हाला 200 कि.मी.अंतरावर जावे लागते आणि मग आम्ही आमच्या अडचणी त्यांना सांगायच्या. एखाद्या गोष्टीचे वाटोळे करायचे असेल तर समित्या नेमायच्या आणि त्या नंतर बासनात गुंडाळून ठेवायच्या. ही चांगली युक्ती काढली आहे.

सभापती महोदय, सिंचनासाठी कोकणाला पश्चिम महाराष्ट्राच्या पंखाखाली ठेवले आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या नावाखाली कोकणाला सर्वात खाली ठेवले आहे. आम्ही विचारणा केल्यानंतर माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार ते देतील तेवढा निधी आम्ही कोकणाला देतो असे सांगण्यात येते. मानननीय राज्यपाल महोदयांनी आपणाला कोणते निदेश दिले आहेत ? त्यांनी असे सांगितले होते काय, 70 हजार कोटी रूपये खर्च करून फक्त 0.1 टक्के एवढेच सिंचन क्षेत्र निर्माण केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

आज कोकणाची अवस्था काय आहे ? राज्यातील एकूण पावसाचे प्रमाण विचारात घेतले तर माझ्या कोकणात एकूण राज्याच्या तुलनेत 40 टक्के पाऊस पडतो. असे असताना कोकणातील पाणी अडविले का जात नाही ? हे पाणी अडविण्यासाठी आपल्याला कोणती अडचण आहे ? आपण निधी का देत नाही ?

सभापती महोदय, मी खेड मतदार संघाचे 20 वर्षे प्रतिनिधीत्व केले. आज तेथे 6 पाटबंधाऱ्यांची कामे सुरू आहेत. शिवशाहीच्या काळात 35 पाटबंधाऱ्यांची कामे सुरू केली होती. त्यावेळी मला समोरच्या बाकावरून उत्तर मिळाले होते की, आपल्यामध्ये दम नाही म्हणून कामे पूर्ण केली नाहीत. आपणामध्ये दम आहे. योग्य वेळी मी त्या विषयावर येईन.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

सभापती महोदय, कोकणामध्ये किती दम आहे ते योग्य वेळी दाखविता येईल. आम्ही थोडेच हे सोडणार आहोत काय? आमच्यामध्ये दम होता म्हणून आम्ही 35 पाटबंधाऱ्यांची कामे सुरु केली. तुमच्यामध्ये दम होता तर तुम्ही गेल्या 14 वर्षामध्ये ही कामे का पूर्ण केली नाहीत. मग आम्ही उठून उभे राहिलो की, सर्व ब्रिगेड मागून उठणार आणि आम्हाला बोलू देणार नाही, गप्प बसविणार. त्यांनी हवे ते बोलावयाचे आणि आम्ही त्याचे उत्तर देण्यासाठी उभे राहिल्यावर आम्हाला बोलावयास द्यावयाचे नाही. त्यांच्या विरोधात एक शब्द बोलावयाचा नाही. त्यांनी आम्हाला काहीही बोलावे की, यांनी तुम्हाला पाडले, त्यांनी तुम्हाला पाडले. पण कोण पडत नाहीत, बरेचसे उमेदवार पडतात. कै.श्रीमती इंदिरा गांधी देखील निवडणुकीमध्ये पडल्या होत्या. पण सदनामध्ये ही बाब आणावयाची की, त्यांनी तुम्हाला निवणुकीमध्ये पाडले आहे. होय, ठीक आहे, आम्हाला पाडले. आपण ते पाहू. केवळ ही एकच निवडणूक आहे काय? पण मला अभिमान आहे की, मला माझ्या पक्षाने दोन महिन्याच्या आत विधीमंडळामध्ये पाठविले. पण येथे हेतूपुरस्सर अवमान करावयाचा, वाटेल ते बोलावयाचे आणि आम्ही उभे राहिलो की, मग सगळी बिग्रेड उभी रहाणार. आम्ही बोलावयाचे नाही, ठीक आहे. पण हे किती दिवस चालणार आहे हा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोकणातील हेटवणे, हरिहरेश्वर, लेंडी, काळू, शाही, सुसरी, बाणगंगा इ.धरणांच्या खर्चामध्ये 500 ते 600 टक्के वाढ झाली आहे आणि याला कोण जबाबदार आहेत? माझ्याकडे विदर्भातील पाटबंधाऱ्याच्या संबंधातील संपूर्ण कुंडली आहे. कोकणामध्ये तुम्ही जे काम केले आहे, त्याबाबतीत माहितीच्या अधिकारामध्ये संपूर्ण दोन गाड्या भरतील एवढी माहिती मागविली आहे आणि मी केवळ योग्य वेळेची वाट पहात आहे. विदर्भ पाटबंधाऱ्याच्या प्रत्येक कामाची माहिती माझ्याकडे आहे. 6000 हजार कोटी रुपयांचे सहा महिन्यामध्ये 26 हजार कोटी कसे झाले याची माहिती देखील माझ्याकडे आहे. परंतु कोकणावर सतत अन्याय करण्यात येत आहे. मग या सदनामध्ये जर आम्हाला बोलावयाचे असेल तर बोलू द्यावयाचे नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मला एक गोष्ट सांगावयास पाहिजे की, आज देखील सिंचन घोटाळ्याच्या बाबतीत कॅग ठाम आहे. या सदनामध्ये आमचे राष्ट्रवादी पक्षाचे जे सहकारी उपस्थित आहेत, त्यांनी हे मुद्दाम ऐकावयास पाहिजे. केवळ मी हे बोलत नाही तर राज्यामध्ये सिंचन घोटाळा

. . . .4 टी-2

श्री.रामदास कदम . . . .

झाल्याचा निष्कर्ष हा राज्य सरकारच्या निरनिराळया खात्यांनी ऑडीट दरम्यान दिलेल्या उत्तराच्या आधारावर काढण्यात आलेला आहे असे कॅगने काल कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट दिलेले आहे. हे माझे म्हणणे नाही. तसेच त्यामध्ये काय उल्लेख केला आहे तर "भारताचे महालेखापाल आणि नियंत्रणपाल यांनी आपण सादर केलेला अहवाल योग्य असल्याची भूमिका हाय कोर्टापुढे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राव्दारे घेतली आहे." इतके हे स्पष्ट असून "दूध का दूध" "पानी का पानी" हे सिध्द झाले आहे. यासाठी चितळे समिती नियुक्त केली होती. पण शेवटी आमच्यासमोर काय आले तर नेमके किती सिंचन झाले आहे तेवढी माहिती आम्ही देऊ शकू म्हणजे आम्हाला चौकशी करण्याचे अधिकार नाहीत आणि मग आम्हाला शेंडी लावली आणि मग नागपूर येथील अधिवेशन 7 दिवस बंद केले. मला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी सांगितल्यावर मी असे म्हणालो की, ठीक आहे.

सभापती महोदय, मी आज याठिकाणी जाहीरपणे एक मागणी करीत आहे. चितळे समितीने आपली कक्षा स्पष्ट केलेली आहे आणि महालेखापाल यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी जे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे, त्यामध्ये कोकणाचा देखील उल्लेख केला आहे. तसेच कॅगचे वरिष्ठ उप महालेखाकार, प्रशासक श्री.एम.हिंगबिंदू यांनी हाय कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यांनी त्या प्रतिज्ञा पत्रामध्ये माझ्या कोकणाचा देखील उल्लेख केलेला आहे. कोकणातील कामामध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे असे देखील त्यांनी सदरहू प्रतिज्ञापत्रामध्ये म्हटलेले आहे. त्यामुळे मी या राज्याचे माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करीत आहे आणि मी माननीय राज्यपाल महोदयांना भेटणार आहे आणि सांगणार आहे की, या सगळया सिंचन प्रकल्पांची मग ते कोकणासह, विदर्भासह अगदी मागच्या 10 वर्षामध्ये जे काही सिंचन झाले आहे, त्या सगळयाची सी.बी.आय.मार्फत देखील चौकशी झाली पाहिजे, ही देखील मी या सदनामध्ये देखील ही मागणी करीत आहे.

श्री.अ.शिगम . .. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

हे शासन आमच्या जीवाशी खेळत आहे. पैशांचा चुराडा होत आहे आणि त्या प्रमाणात सिंचन देखील होत नाही, यास कोण जबाबदार आहे ? कोयनेच्या पाण्याचे काय झाले, कोकणातील 64 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे.

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात विरोधी पक्ष नेता असताना मला आश्वासन देण्यात आले होते. माझ्या सोबत चिपळूणला चार अधिकारी पाठविण्यात आले त्यांनी तेथील सर्वेक्षण केले. त्यांनी माझ्या सोबत बैठका घेतल्या. आपण तेथील पाणी उचलू आणि शिल्लक राहिलेले पाणी मुंबईला आणू असे मला सांगण्यात आले, त्याबाबत पुढे काय झाले ? कोकणातील पाणी समुद्राला मिळत आहे आणि मराठवाड्यातील लोक पाणी पाणी करीत आहेत. जनावरे तडफडून मरत आहेत, तेथील लोक मुंबई, ठाणे, पुणे या शहरात स्थलांतरित होत आहेत. कोकणातील सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. कुठे शासन आहे, कुठे गेला पैसा ?

सभापती महोदय, मागील चौदा वर्षामध्ये कोकणामध्ये किती पाझर तलाव झाले याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. माननीय मंत्री महोदय ही माहिती देऊ शकणार नाही. शिवशाहीचे राज्य गेल्यानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरकार आले, त्या सरकारने कोकणामध्ये एकही पाझर तलाव घेतलेला नाही. कोकणाला कोण पैसा देणार ? युतीच्या शासनामध्ये कोकणामध्ये किती पाझर तलाव घेतले याची आपण माहिती घ्यावी, हे मी जबाबदारीने बोलत आहे. सरकार बदलल्यानंतर पाझर तलाव करणे बंद केले. आम्ही काय पाप केले होते ? या राज्यामध्ये 18 टक्के सिंचन होत आहे त्यातील 90 टक्के सिंचन पश्चिम महाराष्ट्रात होत आहे. कोकणामध्ये फक्त एक टक्का सिंचन होत आहे. मराठवाडा आणि विदर्भापेक्षा कोकणामध्ये कमी सिंचन आहे. सर्वात जास्त पाऊस कोकणामध्ये पडतो आणि सर्वात कमी सिंचन कोकणामध्ये आहे. आम्ही काय पाप केले आहे ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देऊ शकणार नाहीत. फक्त निवडणुका आल्या की पॅकेज जाहीर करायचे परंतु ते पॅकेज देखील कुठे आहे ? कोकणामध्ये अर्धवट असलेल्या पाटबंधारे प्रकल्पासाठी किती निधी देणार हे त्यांनी त्यांच्यात हिम्मत असेल तर तसे सांगावे. आपण आम्हाला ठोस उत्तर देऊ शकणार नाही. येत्या निवडणुकीमध्ये कोण कसा पडला ते पाहू. सभागृहामध्ये कोणाला वाटेल ते बोलायचे, कोणाचाही अवमान करायचा, सर्वांना कस्पटासमान मानायचे आणि मी म्हणेन ते झाले पाहिजे अशी भूमिका योग्य नाही. माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, सिंचनासाठी कोकणाला ताबडतोब निधी द्यावा.

17-04-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4U-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यटक येण्यासाठी मुंबई-गोवा हाय-वेचे चौपदरीकरण करावे अशी मी सातत्याने मागणी करीत आहे. कोकणाच्या विकासासाठी पैसा नाही. माननीय मंत्री श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील यांनी माझ्या एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले की, एस.टी.महामंडळाचे पत्र आले की,ते माझ्याकडे द्या मी आपणास रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी देतो. एस.टी.महामंडळाने पत्र दिलेले आहे की, रस्त्याची अवस्था अतिशय खराब झालेली आहे, रस्त्यावर एस.टी.बसेस चालविणे कठीण झाले आहे, रस्त्यांची दुरुस्ती केली नाही आम्ही एस.टी.सेवा बंद करु. रस्त्यांची दुरुस्ती न केल्यामुळे एस.टी.सेवा बंद झालेली आहे. आम्ही साडेतीन कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला होता आम्हाला एक कोटी रुपये देण्यात आले. कोकणाला भीक मागितल्या सारखा तुकडा दिला आहे. कोकणात सर्वात जास्त पाऊस पडतो. तो डोंगराळ भाग आहे. दोन वर्षे पाऊस झाला तर रस्ता शिल्लक राहत नाही. आम्हाला भीक मागावी लागते. कोकण महाराष्ट्रामध्ये नाही काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

कोकण महाराष्ट्राच्या बाहेर आहे काय ? वाहतुकीची व्यवस्था नसल्यामुळे आज लोक 10-10 कि.मी. अंतर पायी चालत आहेत. खेड पासून 40 कि.मी. अंतरावर नांदीवली गाव आहे. त्या डोंगराळ गावातील एस.टी. बंद पडल्यामुळे लोक डोक्यावर ओझे घेऊन पायी ये-जा करीत आहेत.

आम्ही विकास कामांसाठी निधी मागतो परंतु आम्हाला निधी दिला जात नाही. माननीय ग्राम विकास मंत्री श्री.जयंत पाटील आणि राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांना सुध्दा ही बाब सांगितली. माननीय मुख्यमंत्री व राज्याच्या मुख्य सचिवांना सुध्दा मी या बाबत पत्र दिले. तरी सुध्दा काही कार्यवाही केली जात नाही. ही कोकणची परिस्थिती आहे. कोकणात विमानतळ झाले, कोकणात अमुक झाले, तमुक झाले अशा गोष्टी केल्या जातात. पण प्रत्यक्षात मात्र भलतेच चित्र आहे.

महोदय, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र सरकारने पैसा दिला नाही तर महाराष्ट्र सरकार स्वत:च्या निधीतून इंदापूरपासून पुढे काम करणार की नाही हे सांगितले पाहिजे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, आपले भाषण संपत आले काय ?

श्री.रामदास कदम : महोदय, अजून मला आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या विषयावर बोलायचे आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. आपण या प्रस्तावावरील चर्चेवर ऑन-लेग आहात.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक 18 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 ते 12.15 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत अंतिम आठवडा प्रस्तावावर माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह चर्चा होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 7 वाजून 56 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 18 एप्रिल, 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही